म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५९९६
REFBK-0001754

प्र.वि. २८६

# कार्लाईल व हिंदु-चालीरीति.

लेखक व प्रकाशक

गोविंद चिमणाजी भाटे, एम्. ए.,
प्रिन्सिपॉल, विलिंग्डन् कॉलेज,
सांगली.

मुद्रकः

केशव रावजी गोंधळेकर,
'जगद्धितेच्छु प्रेस', ५०७ शनवार पेठ, पुणें.

[ सर्व हक्क स्वाधीन.

REFBK-0001754

प्रथमावृत्ति.

सन १९२०.

दा. क. १०५९८.
(ग्रंथ संग्रहालय)

किंमत दीड रुपाया.

# दोन शब्द.

या पुस्तकाचा सुमारें अर्धा भाग पूर्वी नवयुग मासिकांत क्रमशः प्रसिद्ध झालेला आहे. पण पुस्तक छापतांना त्या लेखांत बरेच फेरफार केलेले आहेत. बाकीचा भाग आतांच प्रसिद्ध होत आहे. कार्लाईलच्या एका प्रसिद्ध पुस्तकांतील शिकवणीचा सारांश व रहस्य सांगण्याचा या पुस्तकांत प्रयत्न केलेला आहे व त्या शिकवणीच्या दृष्टीनें आपल्या समाजांतील कांहीं चालीरीतींचें निरीक्षण केलें आहे. या पुस्तकाला प्रस्तावना माझे मित्र व सहाध्यापक प्रो० वासुदेवराव पटवर्धन यांनीं लिहिली आहे. त्यांचा इंग्रजी व मराठी अशा दोन्ही वाङ्मयांशीं दृढ परिचय आहे. त्यांच्यासारख्या गृहस्थाचे उपोद्धातात्मक विचार या पुस्तकाच्या वाचकांस उपयोगी पडतील अशा बुद्धीनें मी त्यांना विनंति केली व त्यांनीं ती मान्य करून आपले विचार वाचकांस सादर केले याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

गो. चि. भाटे.

# अनुक्रमणिका.


प्रस्तावना.

| | | |
|---|---|---|
| १ | कार्लाईलचें इतिवृत्त. ... ... ... | १ |
| २ | विचारकथेचें लेखन प्रकाशन-निदर्शन. ... ... | १५ |
| ३ | विचारकथेच्या काल्पनिक जनकाचा जीवनवृत्तांत. ... | २७ |
| ४ | टॉयफल्सड्राखचा आध्यात्मिक विकास. ... ... | ४० |
| ५ | नेपथ्यमीमांसा ( पूर्वार्ध ) ... ... ... | ६० |
| ६ | नेपथ्यमीमांसा ( उत्तरार्ध ) .... ... ... | ७२ |
| ७ | रंगेलपेशे व कंगालपेशे लोक.... ... ... | ८७ |
| ८ | उपनयन. ... ... ... ... | १०१ |
| ९ | विवाहविधि. ... ... ... ... | ११६ |
| १० | अंत्यविधि. ... ... ... ... | १३० |
| ११ | वर्णव्यवस्था अथवा जातिभेद. ... ... | १४६ |
| १२ | उपसंहार. ... ... ... ... | १५७ |

श्रीमंत चिंतामणराव

ऊर्फ

आप्पासाहेब पटवर्धन

सांगली--संस्थानाधिपति

यांचे चरणीं

त्यांच्या आश्रयास असतांना लेखकानें लिहिलेलें

हें पुस्तक

सप्रेम सादर अर्पण केलें आहे.

सं.ग्रं.२६३

# प्रस्तावना.

माझे मित्र व व्यवसायबंधु प्रि० भाटे यांनीं आपल्या पुस्तकाला प्रस्तावना लिहावयास मला कां सांगितलें कोण जाणे ! वस्तुतः त्यांच्या पुस्तकाला दुसऱ्याच्या प्रस्तावनेची जरूरच नाहीं. प्रि० भाटे आजच नव्यानें महाराष्ट्रापुढें पुस्तकरूपानें येत आहेत अशांतला भाग नाहीं. मासिक पुस्तकांतील त्यांच्या लेखांनीं आणि स्वतंत्र रीतीनें प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या लहानमोठ्या पुस्तकांनीं महाराष्ट्राला त्यांचा चांगला परिचय करून दिला आहे. तत्त्वज्ञानाचे अध्यापक म्हणून, विश्वविद्यालयाचे परीक्षक म्हणून, डे. ए. सोसायटीचे लाईफ-मेंबर म्हणून, विलिंग्डन कॉलेजाचे प्रिन्सिपॉल ह्मणून, कट्टे समाजसुधारक म्हणून, कांहीं ना कांहीं ह्मणून, रा० भाटे आज पंचवीस वर्षे तरी महाराष्ट्राचे नजरेसमोर आहेत. महाराष्ट्राच्या माहितींतले आहेत. त्यांच्या पुस्तकांचा पुरस्कार त्यांच्या नांवानें जितका होईल तितका माझ्या प्रस्तावनेनें होणें नाहीं. असें असूनहि मला त्यांनीं ती लिहावयास सांगितलें आहे आणि स्नेहाखातर त्यांच्या शब्दाला मान देणें मला भाग आहे. त्यांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेला येवढी प्रस्तावना जोडणें अवश्य होतें. ती जोडिल्यानें वाचकांना बुचकळ्यांत पडावें लागणार नाहीं. 'कार्लाईल व हिंदुचालीरीति' या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याचा अव्यापारेषु व्यापार सारा जन्म इंग्रजी कविता शिकविण्यांत आणि क्वचित् मराठी कविता वाचण्यांत घालविणाऱ्या मीं कां करावा ? असा वाचकांना प्रश्न पडला असता, तसा आतां पडणार नाहीं.

हिंदुचालीरीतींचा आणि कार्लाईलाचा काय संबंध ? कार्लाईल हिंदुचालीरीतींचा अभ्यास करायाला कधीं आला होता ? हिंदुस्तानांत जन्मलेल्या, वाढलेल्या आणि येथेंच जन्म कंठणाऱ्या आह्मांला आमच्या चालीरीतींसंबंधानें, स्कॉटलंडांत जन्मलेल्या आणि बहुतेक जन्म इंग्लंडांत घालविलेल्या आणि इंग्रज व स्कॉट लोकांतच राहिलेल्या कार्लाईलानें काय सांगावयाचें आहे ? या परकी गृहस्थानें आह्मांला आमच्या चालीरीती सांगायाला कशाला यावें ? आणि रा० भाट्यांनीं तरी त्याला वेठीस कां

धरावें ? त्यांना काय त्यांच्या मदतीवांचून आपल्या चालीरीतींची छाननी करितां येत नव्हती ? आली नव्हती ? हे किंवा असले अनेक प्रश्न प्रस्तुत पुस्तकाचें नांव वाचितांच अनेकांच्या मनापुढें उभे राहतील. कित्येक न कळत ते प्रश्न स्वतःचे स्वतःला विचारतीलही ! कित्येकांना त्याही-पुढें दोन पावलें जावेंसें वाटण्याचा संभव आहे. तसें झाल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. मला—आणि मला वाटतें रा० भाट्यांना देखील—त्यांत अस्वाभाविक असें कांहीं दिसत नाहीं. हिंदुचालीरीतींचा आणि कार्लाईलाचा नसता संबंध जर धडधडीत पुस्तकाच्या नांवानें जोडिला आहे, तर वांचकांनीं तसे प्रश्न कां विचारूं नयेत ? अलबत् विचारावे; अवश्य विचारावे; आणि ते नुसते प्रश्न विचारूनच थांबूं नये, तर त्यांचीं उत्तरें घेतल्याशिवाय स्वस्थ बसूं नये; अशीच रा० भाट्यांची व माझी मनापासून इच्छा आहे. पुस्तकाचें नांव पाहतांच वरच्यासारखे अनेक प्रश्न वाचक विचारूं लागले म्हणजे नांवाचें निम्में सार्थक झालें असें समजायाला हरकत नाहीं. पुस्तकाचें नांव ठरवितांना ज्या अनेक गोष्टींचा विचार करावयाचा असतो; त्यांपैकीं एक तरी अशी आहे. नांव वाचितांच वाचकांची कुतूहलवृत्ति जागृत झाली पाहिजे. नांवानेंच त्यांची दृष्टि वेधली पाहिजे, त्यांना पछाडलें पाहिजे. प्रस्तुत पुस्तकाच्या नांवानें जर वरच्यासारखी प्रश्नावलि वाचकांपुढें उभी राहिली तर त्यानें एका दृष्टीनें आपलें काम केलें.

हें जरी एका अर्थीं कदाचित् खरें असलें तरी तें सर्वांशीं खरें नाहीं. कार्लाईलाचा आणि हिंदुचालीरीतींचा अर्थाअर्थीं कांहीं संबंध नसला तरी प्रस्तुत पुस्तकाचा आणि कार्लाईलाचा फारच जवळचा संबंध आहे, हें वाचकांना पुस्तकाचीं कांहीं पृष्ठें उलटल्याबरोबर समजून येईल. किंबहुना कार्लाईलाचें पुस्तक रा० भाट्यांनीं वाचिलें नसतें, तर त्यांच्या या पुस्तकाचा सध्यांच्या रूपानें तरी जन्म खास झाला नसता. इंग्रजी गद्यवाङ्मयाच्या इतिहासांत, विशेषतः एकोणिसाव्या शतकांतील इंग्रजी गद्यवाङ्मयांत 'कार्लाईल' या नांवाचा उल्लेख प्रमुखपणें होतो. त्या वाङ्मयाचीं कांहीं अंगें त्यानेंच विशेष उज्ज्वल केलीं आहेत. त्या वाङ्मयाच्या त्या प्रांतापुरता तो अनभिषिक्त राजाच होता असेंहि कित्येक ह्मणतील.

इतक्या योग्यतेचा कार्लाईल असल्यामुळें रा० भाटयांचें मन त्यानें वेधावें यांत नवल नाहीं. रा० भाटेच काय, एकोणिसाव्या शतकाच्या कांहीं दशकांत स्वतंत्र विचाराचे आणि कुशाग्र बुद्धीचे ह्मणून नाणावलेले कित्येक लोकही कार्लाईलाच्या तेजानें दिपून गेल्यासारखे झाले होते. चेलसीकर तत्त्ववेत्याच्या अगाध ज्ञानाचें, अलौकिक बुद्धिमत्तेचें आणि अनन्यसाधारण वाक्प्रभावाचें कौतुक करण्यांत विद्वानांचे बरेच दिवस गेले. आकाशांत एकदम एकादा अत्यंत तेजस्वी तारा चमकूं लागावा आणि त्याकडे सामान्य लोकांनीं, तसेंच ज्योतिर्विदांनीं आश्चर्यानें बघत रहावें तसेंच कांहीं दिवस इंग्लंडांत कार्लाईलाचे संबंधानें झालें होतें. तेव्हां कार्लाईलाच्या ग्रंथांत उत्तम गणिलेला त्याचा ग्रंथ वाचिल्यावर त्याचा लाभ मराठी वाचकांना करून देण्याची इच्छा रा० भाटयांना साहाजिकपणें झाली; आणि तो सबंध ग्रंथ नाहीं, तर त्यांतलें सार तरी मराठींत उतरण्याचा उपक्रम त्यांनीं केला. कार्लाईलानें आपल्या 'सॉर्टर' ग्रंथांत आपल्या वेळच्या बऱ्याच सामाजिक संस्थांचा समाचार घेतला असल्यामुळें रा० भाटयांनाहि हिंदुसमाजाच्या ठळक चालीरीतींचा तशाच रीतीनें परामर्श घेण्याची बुद्धि झाली यांत नवल काय ? अर्थात् कार्लाईल आणि हिंदुचालीरीती यांचा जो सबंध प्रस्तुत पुस्तकांत आहे तो एवढ्यापुरताच आहे. कार्लाईलानें हिंदुचालीरीतींसंबंधानें काय म्हटलें आहे, तें या पुस्तकांत सांगितलेलें नाहीं—तसें कांहीं कार्लाईलानें ह्मटलेलेंच नाहीं मुळीं—तर रा० भाटे तरी तें कोठून सांगणार ? हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

'सार्टर रिसार्टस' ऊर्फ 'ठिगळें लावलेला शिंपी' पुस्तक केव्हां लिहिलें, कसें लिहिलें, तें प्रसिद्ध कोठें व कसें झालें वगैरें हकीकत रा० भाट्यांनीं एका प्रकरणांत दिलेली आहे. तीवरून कोणाच्याही इतकें लक्षांत येईल कीं, प्रथम प्रथम त्या पुस्तकाची किंमत लोकांना मुळींच कळली नाहीं. उलट त्याला बहुतेकांनीं नाकें मुरडलीं. तरी ज्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठीं कार्लाईलाला प्रकाशकांकडे खेटे घालून निराशेनें परत यावें लागलें होतें, व जें हप्त्याहप्त्यांनीं प्रसिद्ध होत असतां त्याचा तिटकारा येऊन कित्येक लोक ज्या मासिकांत तें प्रसिद्ध होत होतें तें मासिक घेण्याचें बंद करायाला तयार झाले, तेंच पुस्तक पंचवीसतीस वर्षांचे अवधींत

नुकसानीचें तत्त्वज्ञान,' 'वाण्याची विद्या' इत्यादि नांवांनीं करीत असे. कारण ही प्रवृत्ति म्हणजे ऐहिकापलीकडे कांहीं नाहीं असें सांगणारी होती. द्रव्यलोभ, सत्ताभिलाष, अहमहमिका, या त्रयीनें जनतेची दिनचर्या व्यापिली होती. बुद्धिमान् लोकांनादेखील कालमाहात्म्यानें घोंटाळ्यांत पाडिलें होतें. राजकीय, सामाजिक, औद्योगिक, आधिभौतिक, आधिलौकिक, आधिदैविक, कोणतीही बाब असो, तिला कसोटी एक! तिचा निकाल केवळ पार्थिव दृष्टीनें लागे. बाहेरच्या जगाच्या डोलाऱ्यानें आणि बाह्य व्यापारांनीं मनाच्या शक्ति इतक्या गुरफटून टाकिल्या होत्या कीं, त्यांची गति अंतर्मुख होणें दुर्घट झालें होतें. बेंथम् नांवाच्या तत्त्ववेत्त्यानें विचाराची आणि तत्त्वमीमांसेची इमारत एकदां सुखाच्या आणि उपयुक्ततेच्या पायावर उभी केल्यापासून आध्यात्मिक आणि आधिदैविक परंपरा कुचकामाची वाटूं लागली. ख्रिस्ताची शिकवण मागें पडली. धर्मबंधनें शिथिल झालीं. नीतिनियमांचा पूर्वीचा परमेश्वरी आज्ञेचा आधार ढांसळून ती मानवी युक्तीचा—युक्तायुक्त—विवेकशक्तीचा आसरा शोधूं लागली. जनपदहितवादाचें खूळ अतोनात माजलें. सामान्यतः लोकगंगेचा बंधारा सुटला आणि कळिकाळाचा हुतूतू सुरू झाला. स्वर्गनरकांचे अर्थ बदलले. जनमनाला मोठी भीति एकच उरली. ती फसण्याची, अपयशाची, पैसा, लौकिक किंवा तशीच दुसरी एखादी ऐहिक जोड न लाभण्याची; मुख्यतः पैसा न मिळण्याची! लौकिक अपयश म्हणजे रौरव गति. अशा स्थितींत समाजाचें जीवित अस्थिर झाल्यास नवल काय? मनाचा तळ सुटल्याची साक्ष तत्कालीन वाङ्मयांत जागोजाग आढळते. क्लफ्, ॲर्नोल्ड, टेनिसन् वगैरे कवींचीं तत्कालीन काव्यें म्हणजे अफाट दर्यांत इतस्ततः वाहात जाणाऱ्या, सुकाणूं हरवल्यामुळें स्वतांचा मार्ग स्वतां ठरवितां न आल्यामुळें खिन्नपणें आसुसलेल्या दृष्टीनें मागें पाहणाऱ्या, गेलेल्याची आठवण करणाऱ्या आणि पुढच्याच्या भीतीनें थरथरणाऱ्या तारवांसारखीं आहेत. 'वरच्या वर्गाच्या नशीबीं रिकामपणाची सुस्ती, वायफळ निरुद्योगाचा आळस आला आहे, तर खालच्यांच्या कपाळीं नकारघंटा, सांचलेल्या डबक्याचा सडकेपणा आला आहे. अर्थात् जिकडे तिकडे हलाखी पसरली आहे, एवढेंच निश्चित आहे.

आणखी काय निश्चित आहे ? जें झूट त्यावर विश्वास बसत नाहीं हेंही निश्चित आहे. आजच्या तत्त्वमन्यांना येवढेंच समजतें. येवढेंच खरें वाटतें. इंद्रियातीत आध्यात्मिक असे कांहीं विषय आहेत यांवर त्यांचा विश्वासच बसत नाहीं." असें कार्लाइलानें एका ठिकाणीं म्हटलें आहे. सदा अतृप्त, सदा ताऱ्हेलीं पंचेंद्रियें आणि सहावें अहं येवढें काय तें आतां उरलें आहे." हें कार्लाईलानें केलेलें तत्कालीन स्थितीचें वर्णन वाचिलें म्हणजे जडविषयाच्या मागें लागल्यानें, आणि जड तें जगत्सर्वस्व, दिसतें तेंच खरें, दिसत नाहीं तें सर्व झूट, अशी मनाची खात्री करून घेतल्यानें, आध्यात्मिक रहस्यावर, अजडाच्या आधारावर उभारलेल्या सर्व संस्था शुष्क वाटूं लागल्या; आणि दिसणाऱ्या पसाऱ्याच्या पोटीं असणारें अदृश्य रहस्य दृष्टीआड झालें. सगुणब्रह्मांडाच्या अंतर्भागीं एका कालीं असलेली निर्गुण निराकार चित्कला स्थानभ्रष्ट झाली. आणि तिची जागा रिकामी पडली.

पण अखेर परिणाम काय ? नुसत्या जडानें—नुसत्या इंद्रियविषयानें—नुसत्या दिसणाऱ्या पसाऱ्यानें मानवाची भूक भागेल काय ? नुसत्या जडाच्या पाठलागानें—नुसत्या ऐहिक भरभराटीनें मनुष्याला समाधान लाधेल काय ? दणगट स्नायूंनीं आणि बळकट हाडांनीं उभा केलेला देह घेऊन त्याला आनंद होईल काय ? वस्त्रालंकारांनीं भूषविलेल्या नुसत्या पुतळ्यांनीं काय होणार ? ते पुतळे चालूं बोलूं लागले तरच त्यांत कांहीं राम ! पुतळ्यांना चालूं बोलूं लावणारा हा राम त्या वेळच्या लोकांना सांपडला नव्हता. त्या वेळच्या संस्थांतून तो नाहींसा झाला होता. शोधकबुद्धीला आणि विवेचकचित्ताला तो कोठें दिसत नव्हता. उंचीउंची वस्त्रांचीं बासनें हवीं तितकीं होतीं. अमोलिक हिऱ्यारत्नांच्या, अलंकारांच्या पेट्या खचलेल्या होत्या, परंतु तीं वस्त्रें परिधान करणारे, ते अलंकार अंगावर घालणारे, जणों कोणी नव्हते. ओसाड पडलेल्या घराप्रमाणें आणि खुंटीला टांगलेल्या कपड्यांप्रमाणें सर्व समाज बनला होता. राजसंस्था, समाजसंस्था, धर्मसंस्था उद्योगसंस्था म्हणजे नुसते आंगरखे, सद्रे, पायजमे, विजारी, लुगडीं, पैठण्या, धोतरें आणि तींही जीर्ण लकतऱ्या झालेलीं. वापरणारें कोण आहे ? आंत काय

आहे ? उपरकी तो खूप बनी. अंदरकी ? कालीईलाला ही वस्तुस्थिति समजली. त्यानें पाहिलें; भोंवतीं जिवंत माणसें नाहींत. सगळीं मोडकी तोडकी यंत्रें ! सगळे नुसते कपडे ! तेहीं पुष्कळ ठिकाणीं वापरून वापरून फाटलेले. सगळा समाज हे कपडेच घेऊन बसलेला ! तेच तेच कपडे वापरून वापरून चिंध्या करीत बसलेला ! तो एकदम ओरडत उठला; "कपडे—कपडे—कपडे. नुसते कपडे ! नुसत्या चिंध्या ! शिंपी कोठें आहे ? शिंपी ! शिंपी ! शिंपी ! चिंध्या काय करावयाच्या ? द्या फेंकून ! निदान पुन: शिवा ! ठिगळें लावा ! फाटके कपडे धड करा ! शिंपी शोधा ! कपडेवाला शोधा ! नवरानवरीशिवाय मंगलदायकें दर्शी होणार ? नुसता मांडव काय कामाचा ? कपडे, कपडे, कपडे. जगांत जिकडे तिकडे फाटक्यातुटक्या कपडयांची गर्दी झाली आहे."

'खरेंच.मनुष्य म्हणजे कोण ? मनुष्य म्हणजे कपडे घालणारा प्राणी.असें नव्हे काय ? सगळें सजीव जग धुंडाळा ! कपडयांनीं अंग झांकणारा दुसरा कोणता प्राणी आहे ? एकटा मनुष्यच ! त्यानेंच कपडे निर्माण केले. त्यानेंच कपडयांनीं जीवसृष्टीला व शिवसृष्टीला मढवून टाकिलें. कपडयावर कपडे घालून मूळवस्तु झांकून टाकण्याची करामत माणसाचीच ! अरे बापरे ! केवढा कपडयांचा ढिगारा हा ! कोणास ठाऊक ! त्यांच्या आंत काय आहे तें ? कोण पहातें आंत काय आहे तें ? आज युगांचीं युगें आम्हीं नुसते कपडेच पहात आलों आहों. कपडेच घालीत आलों आहों ! आंत कांहीं आहे ? आंतल्याची आह्मांस दादही नाहीं ! अहाहा रे आंधळ्या ! तुला डोळे आहेत काय ? कोठें आहेत डोळे ? नाहींत. स्वच्छ, स्पष्ट दृष्टीचे डोळेच तुला नाहींत. काढ ते काढ कपडे. अगदीं एकूणएक कपडा काढून टाक. माणसाला अगदीं उघडेंबोडकें कर. मग पहा तो काय आहे आणि कसा आहे.

माणसांचेच कशाला ? समाजानें तरी काय केलें आहे ! तेंच. अंगावर कपडे चढवून समाज नटला आहे. पोलीस, लष्कर, मुलकी अधिकारी, दिवाणी कामगार, न्यायकचेऱ्या, न्यायाधीश, कायदेकानू हे सगळे कपडे आहेत. अगदीं अंगरखे नका म्हणूं हवें तर ! नुसतीं पडदणींचीं आहेत म्हणा; पण कपडेच. इतकें कशाला ? समाजच मुळीं कपड्यां-

वर उभारलेला आहे. कपडे काढा म्हणजे समाज संपला ! कपड्यांशिवाय समाज राहील कसा ? राहणारच नाहीं ! ढांसळून पडेल. संस्कृत समाज, नागर समाज कपड्यावांचून जिवंत राहणें अशक्य. '

" खोल विचार केला तर सर्व दृश्य वस्तु म्हणजे नुसते वरचे देखावे आहेत; बाह्यवेश आहेत; कपडे आहेत. त्यांच्या आंत परमेश्वर आहे. सर्व वस्तुजाताच्या अंतर्यामीं परमेश्वर आहे. परमेश्वरानें पांघरलेले कपडे म्हणजे सारें दृश्य विश्व. सूर्य, चंद्र, पृथ्वी, तारे, हीं सर्व परमेश्वराचीं वस्त्रें होत, बाह्य वेष होत, दृश्य चिन्हें होत. तीं नीट पहा. त्या वस्त्रांकडे टक लावून पहा. म्हणजे त्यांचे आंत तुम्हांला दिसूं लागेल. तीं पारदर्शक ठरतील. त्यांचे अंतर्यामीं असणारा, त्यांच्या अवगुंठनांत लपलेला, त्यांच्या आभरणांनीं नटलेला परमेश्वर दिसेल. केवढें वस्त्रांचें—कपड्यांचें महत्त्व हें !

पण थांबा, कपडे परमेश्वराची गांठ घालून देतात तसेंच ते सैतानाची वाट दाखवितात. कपडे तारक, कपडेच मारक, कपड्यांनींच मानवाचा घात केला आहे. मेंढरांचे कपडे पांघरून कितीक वाघ आणि कोल्हे समाजांत वावरत असतात! त्यांच्या कपड्यांमुळें त्यांचें खरें रूप कोणाला समजत नाहीं. परागतीला नेणारे जसे परमेश्वरी कपडे, तसेच अधोगतीला नेणारे सैतानी कपडे.हे बाहेरून परमेश्वरी कपड्यांसारखे दिसतात. माणसांची दृष्टि त्यांवरच खिळते; त्यांच्या पलीकडे तिचा शिरकावच होत नाहीं. दृश्याच्या अवगुंठनांत एकदां दृष्टी गुरफटली कीं संपलें ! अंतरंगाची ओळख पुढें पडणें नाहीं. कपड्यांचा हा मोठा घातक स्वभाव आहे.

"तेव्हां माणसानें कपडे नीट तपासून घेतले पाहिजेत. जीर्ण झालेल्या चिंध्या पांघरून बसतां नये. देवाचे कपडे देवासारखे. कपड्यांचें काम कपडे करीतनासे झाले कीं ते फेंकून दिले पाहिजेत; नाहींतर तेच समंधासारखे बोकांडी बसतात. इत्यादि इत्यादि.

याप्रमाणें कार्लाईल ओरडत उठला; आणि अंतरंगाला विसरलेल्या, अंतर्याम्याला पारखी झालेल्या, अंतःकरणाचा आधार सुटल्यानें ज्वरिताप्रमाणें तळमळणाऱ्या, चुकलेल्या गुराप्रमाणें सैराट धांवत सुटलेल्या जनतेला

त्याच्या ओरडण्याचा प्रथम अर्थच कळेना. परंतु हळु हळू त्याचें म्हणणें काय आहे तें लोकांच्या ध्यानीं येऊं लागलें. आणि ते त्याच्या मागें जाऊं लागले. अफाट समुद्रांत वाट चुकलेल्या जहाजाला दुरून एकादा दीप दिसावा, किंवा निःशब्द–निर्जन अरण्यांत सांपडलेल्या वाटसराला ओळखीचा शब्द ऐकूं यावा तसें इंग्लंडांतलि लोकांचें कार्लाईलाच्या ग्रंथानें झालें. जेथें सगळें संदिग्ध सगळें दुग्ध्यांतलें अनिश्चित होतें; डोळ्यांना दिसेल त्याशिवाय बाकी सगळें लटकें पडलें होतें, तेथें निर्धाराचें, ठामपणाचें, निःसंदेहाचें बोलणें कानीं आलें. येथें संशयाला जागा नव्हती. कार्लाईलाचा प्रत्येक शब्द अन्तःकरणाच्या बालंबाल खात्रीचा खणखणीत वाजत होता. त्यामुळें त्याच्या शब्दांचा पडसाद लोकांना स्वतांच्या हृदयांत उठलेला ऐकूं येऊं लागला. कार्लाईलानें भांबावलेल्या जनमनाला वाटेवर आणिलें. समाजाचे व सामाजिक–धार्मिक–नैतिक संस्थांचे डळमळणारे पाये पुनः भरले आणि भक्कम केले. नीतिच्या, न्यायाच्या, धर्माच्या, भक्तीच्या, आस्तिक्याच्या, पापपुण्याच्या कल्पनांचे आधार सुटले होते ते परत बांधून तयार केले. आणि जडाच्या अभ्यासानें आणि नित्य परिचयानें जड झालेल्या जनतेला अजडाच्या रहस्याचे दाखले दिले. बहिर्मुख झालेल्या लोकदृष्टीला अन्तर्मुख केलें आणि ऐहिक ऐश्वर्याच्या, लौकिक संपत्तीच्या–पैशाच्या आणि धनादि उपभोग साधनांच्या मागें लागलेल्या समाजाला जागें केलें. सुखाभिलाषापेक्षां वरच्या दर्जाचें असें कांहीं माणसामध्यें आहे याची, त्याला प्रतीति आणून दिली. निष्काम कर्माची आणि खऱ्या कर्तव्याची ओळख पटविली. अंधळ्याला डोळे दिल्यासारखीच करणी नव्हे का ही ? मग कार्लाईलाच्या ग्रंथाची योग्यता कित्येकांना बायबलाच्या तोडीची वाटली तर आश्चर्य काय ?

मला वाटतें महाराष्ट्राची आजची स्थिति कार्लाईलच्या वेळच्या इंग्लंडच्या स्थितीसारखीच अंशतः आहे. कपडे पांघरणारापेक्षां कपड्यांची किंमत महाराष्ट्राला आज विशेष वाटत आहे. प्राणापेक्षां कुडीचें महत्त्व अधिक वाटून महाराष्ट्रजनता आज प्रेतांना मिठी मारून बसली आहे. धार्मिक, सामाजिक, व्यावसायिक बाबतींत कितीक तरी आचार आज फाटक्या कपड्यांसारखे झाले आहेत. आज महाराष्ट्राच्या अंगावर किती

तरी लक्तऱ्या आहेत. चिंध्या आहेत! त्या पुनः नीट शिवून ठिगळें लावून धड तरी केल्या पाहिजेत, किंवा फेंकून देऊन नव्या प्रसंगाला नवे कपडे शिवविले पाहिजेत. महाराष्ट्राचे अंगांत आज आहेत त्यांतले कितीसे अजून दैवी आहेत बरें? ज्यांतील मूळचा अर्थ कायम आहे, ज्यांचें मूळचें तत्त्व जागृत आहे, ज्यांत आजून जिवंतपणा आहे, ज्यांचें यथार्थत्व आजून अबाधित आहे, असे आचार, अशा रूढि, अशा चाली, असे रिवाज आज महाराष्ट्रांत कितीसे सांपडतील? महाराष्ट्राचे सण घ्या, महाराष्ट्रांतील उत्सव घ्या, महाराष्ट्रांतील पंथ घ्या, महाराष्ट्रांतील संप्रदाय घ्या, महाराष्ट्रांतील तीर्थें घ्या, महाराष्ट्रांतील देवळें घ्या, संस्थानें घ्या, महाराष्ट्रांतील घराणीं घ्या, महाराष्ट्रांतील लोक घ्या, जाती घ्या, धर्म घ्या, व्यवसाय घ्या, कलाकुसरी घ्या, कारागिरी घ्या, खेळ घ्या, कोणतीही बाब घ्या. सगळें जीर्ण झालेलें, प्रेताप्रमाणें निर्जीव बनलेलें, आढळून येईल. महाराष्ट्रांतले ब्राह्मण कोठें आहेत? क्षत्रिय कोठें आहेत? वैश्य कोठें आहेत? शूद्र तरी कोठें आहेत? ब्रह्मचारी कोठें आहेत? वानप्रस्थ कोठें आहेत? संन्यासी तरी कोठें आहेत? तीर्थांचा तीर्थपणा गेला आहे; धर्माचा धरबंद सुटला आहे; पापपुण्यांचा विधिनिषेध राहिला नाहीं. घाण्याच्या बैलाप्रमाणें महाराष्ट्र ठरलेल्या—मळलेल्या वाटेनें प्रदक्षिणा घालीत आहे; पण घाण्यांत दाणा नाहीं आणि दाण्यांत तेल नाहीं, अशी महाराष्ट्राची आज स्थिति झाली आहे.

प्रेतांना बिलगल्यामुळें स्वराज्य गेलें, स्वातंत्र्य हरपलें, स्वपराक्रमाचें शून्य झालें, सगळें एकजात दासमय झालें. तरी अजून महाराष्ट्राची दृष्टि साफ होत नाहीं. अंतरंगापेक्षां बहिरंगावरच महाराष्ट्राचें अजून लक्ष असतें. अर्थापेक्षां शब्दांचें, कार्यापेक्षां कार्यावडंबराचें, अंगापेक्षां सोंगाचें, जिव्हाळ्यापेक्षां मृगजळाचें, करण्यापेक्षां बोलण्याचें, पडप महाराष्टाला विशेष वाटतें. नुसत्या कपड्यांना भुलून महाराष्ट्र कपडयांचेच मागें धांवत सुटतें. आज सभोंवार पहा, म्हणजे याचें प्रत्यंतर पावलोंपावलीं येईल. टांकीचे घाव सोसिल्याखेरीज देवपणा येत नाहीं, या महासूत्राचा महाराष्ट्राला आज विसर पडला आहे. आणि आकाशाला गवसणी घालण्याचा नाद त्याला लागला आहे. पण महाराष्ट्रा, तुझ्या जीवनरसाचा शोष करणारीं

बांडगुळें किती आहेत याची तुला दाद आहे काय ? तुझ्या अंगांतले कपडे फाटून चिंध्या झाले आहेत हें तूं विसरलास काय ? दसरा आला कीं तूं शिलंगणाची मिरवणूक काढितोस; संक्रान्त आली, तिळगुळाच्या नांवानें हलव्याचा कारखाना घालतोस; पाडवा आला, गुढयातोरणें उभारतोस; रामनवमी आली, रामाला दरवर्षीं पाळण्यांत घालतोस ! पण सध्यांचें तुझें शिलंगण पूर्वीच्या तेजस्वी आणि पराक्रमोन्मुख सीमोल्लंघनाचें प्रेत नव्हे काय ? संक्रान्त आली तरी अन्तःकरणाच्या संक्रमणावांचून हलव्याच्या दाण्यांचें एका हातांतून दुसऱ्या हातांत होणारें संक्रमण काय होय ? स्नेहाचें चिन्ह म्हणून तीळ आाण गाड प्रेमाचें चिन्ह म्हणून गूळ द्यावयाचा. पण स्नेहावांचून तीळ आाण प्रेमावांचून गूळ म्हणजे प्राणावांचून कुडी नव्हे काय ? पाडवा येतो आणि जातो. पण गुढयातारण उभारण्यासारखा आनंद तुला व्हावा असें तो काय आणितो ? तूं कशासाठीं गुढया उभारितोस ? कसलीं तोरणें बांधतोस ? तुझ्यांत राम नाहीं. भारतवर्षांत राम उरला नाहीं. तुझ्या वर्तनांत राम नाहीं, वचनांत राम नाहीं, बाणांत राम नाहीं. तरी दरवर्षीं तूं पाळण्यांत राम घालतोस तो घालतोसच ! त्या कुचक्या नारळाला फुसकें कुंचडें घालून राम बनविल्यानें आणि त्याला 'जो–जो' केल्यानें गेलेला राम परत येतो काय ? रामाच्या जीवंत लीला जाऊन हा आरामाचा पोरखेळ खेळतोस तूं ! तुला काय म्हणावें ? कपडे जुने फाटके तुटके कपडे ! जा शिंपी आण, आणि त्यांना ठिगळ लाव. किंवा कर निश्चय, कर जिवाचा धडा, आणि दे या चिंध्या फेंकून. नवा देश, नवा वेश, नवा दम, नवा जम, नवा मनु, नवें धनु ! काळ नवा आहे, त्याला अनुरूप तुझें आचार विचार पुनः नवे झाले पाहिजेत. संप्रदाय आणि प्रचार यांची मातब्बरी किती ? कुडींत जीव आहे–धुगधुगी आहे–तोंवर औषधोपायांची पराकाष्ठा करणें अवश्य कर्तव्य. ती विझत चाललेली ठिणगी पुनः धगधगीत करणें प्रत्येकाचें काम आहे. ती पुनः शिलगवावी लागली तरी पुनः शिलगवावी. पण कुडींतला प्राण निघून गेला असेल तर ती जवळ बाळगून काय करणार ? तिचें उत्तरकार्य जितकें लवकर उरकून टाकतां येईल तितकें टाकावें हेंच इष्ट आहे. तसें करण्यासाठीं महाराष्ट्रा प्रथम आपल्या

करड्यांची–अर्थात् आपल्या आचारविचारांची चालीरीतींची, सामाजिक–धार्मिक–राजकीय संस्थांची–चळवळींची–उद्योगांची व व्यवसायांची शुद्ध, अन्तर्वेधी आणि तत्त्वान्वेषी दृष्टीनें छाननी कर. बांडगुळें कोणतीं आहेत, प्रेतें कोणतीं आहेत, आसन्नमरण काय आहे, आणि जुजबी रोगानें पछाडलेलें काय आहे याची करून चवकशी कर, आणि एकदां निरर्थांचा–निर्माल्यांचा निर्जीवांचा पाचोळा वेगळा काढिला कीं दे पेटवून ! दर वर्षांत सांचणारा असला आध्यात्मिक, आधिभौतिक निर्जीव पाचोळा जाळून समाजाचा संसार पूर्ववत् सजीव, तेजस्वी, रसरसीत करण्यासाठींच तुझ्या शिमग्याचा अवतार होता. पण आतां काय ? जीर्णाचें भस्म करण्याऐवजीं जवानांना जितें जाळण्याचा, अमंगळाची होळी करण्याऐवजीं मंगलासच अग्नयेस्वाहा करण्याचा त्याचा उलटा क्रम झाला आहे ! याप्रमाणें महाराष्ट्रांतील सर्वच कारभार विपर्यस्त झाला आहे जिताला प्रेताचा, आणि प्रेताला जिताचा सोहळा अर्पण करण्यांतला प्रकार महाराष्ट्राचा सध्यां होत आहे. याचें कारण एकच ! अंतरंगाचा विसर पडून बहिरंगाचा बडेजाव महाराष्ट्रानें फार माजूं दिला आहे. बाह्यरंग, बाह्यवेश यांच्या पायीं अंतर्यामाची उपेक्षा केली आहे. शब्दांच्या नादीं लागून–दिखाऊ डोलाऱ्याला भुलून, अलंकाराच्या भरीं भरून अर्थ बळ आणि प्राण यांना तो आंचवला आहे. अशा वेळीं, अशाच स्थितींत खितपत पडलेल्या लोकांस ज्या ग्रंथानें जागें केलें आणि त्यांनां पूर्व पदाच्या वाटेला लावण्याचें अंशतः श्रेय घेतलें त्याचें सारकथन आणि त्याच्या अनुरोधानें महाराष्ट्रांतील कित्येक चालींचें परीक्षण प्रो. भाटयांनीं प्रस्तुत पुस्तकांत केलें आहे. तें महाराष्ट्राला पटो, त्याचेयोगें महाराष्ट्राला चुकलेली वाट सांपडो, निदान त्या वाटेची दिशा तरी लागो म्हणजे त्यांच्या श्रमाचें चीज झाल्यासारखें होईल.

पुणें.
ता. २६–१–२१.

**वा. ब. पटवर्धन.**

# कार्लाईल व हिंदु चालीरीति

१

## कार्लाईलचें इतिवृत्त

"नर करणी करे तो नरका नारायण हो जाय" ही हिंदी किंवा मराठी भाषेनें आपलीशी केलेली ह्मण सर्वश्रुत आहे. या ह्मणीचा अर्थ गहन किंवा गूढ नाहीं. मनुष्य जर करणी करील तर तो देवपण पावेल. अर्थात् ही करणी 'बोलणीं मानभावाचीं करणी कसाबाची' या ह्मणींतील नव्हे. कसाबाच्या करणीनें देवपण येण्याऐवजीं दानवपण किंवा दैत्यपण येईल. पण मनुष्य—मग तो कितीही हीन स्थितींत असो—जर चांगली करणी करील, जर तो चांगली कर्तबगारी दाखवील, तर त्याला या जगांत श्रेष्ठपणा मिळवितां येईल. ह्मणजे मनुष्यप्राणी इतर प्राण्यांप्रमाणें किंवा निर्जीव वस्तूप्रमाणें सर्वस्वीं पराधीन किंवा परिस्थितीच्या आधीन नाहीं. आपलें बरें वाईट करणें, आपल्या ठायीं श्रेष्ठपणा अथवा नीचपणा आणणें हें मनुष्याच्या स्वतःच्या हातीं आहे. "टांकीचे घाव सोसल्यावांचून देवकळा येत नाहीं," या शुद्ध मराठी ह्मणींत हिंदी ह्मणीचाच अर्थ एका रूपकानें सांगितला आहे. ज्याप्रमाणें ओबडधोबड

दगडाची देवाची मूर्ति करावयाची असली तर त्या दगडावर टाकीचे घाव घातल्याखेरीज त्याला देवकळा देतां येत नाहीं, त्याप्रमाणेंच मनुष्यानें संसारांत येणाऱ्या अडचणींना तोंड दिल्याखेरीज, अंगमेहनत केल्याखेरीज, कष्ट सोसल्याखेरीज; सारांश स्वतः कर्तबगारी, दाखविल्याखेरीं त्याला जगांत श्रेष्ठपणा मिळवितां येणार नाहीं. वेणीसंहार नाटकांत अश्वत्थाम्यानें कर्णाच्या हीनकुलाबद्दल त्याची चेष्टा केली असतां त्याला कर्णानें जो जोरदार जबाब दिला—" **दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषं** " त्या जबाबाचाही वरील ह्मणीसारखाच अर्थ आहे कीं, मनुष्याचा श्रेष्ठपणा त्याच्या कुलावर, जन्मावर किंवा प्रथमारंभींच्या स्थितीवर अवलंबून नाहीं, तर तो त्याच्या कर्तबगारीवर व पराक्रमावर अवलंबून आहे.

या सर्व ह्मणींची सत्यता पटविणारीं उदाहरणें सर्व देशांच्या इतिहासांत थोड्या फार प्रमाणांत दिसून येतात, हें खरें आहे. तरी पण देशांतील सामाजिक व इतर संस्था यांवर त्यांचें कमी अधिक प्रमाण अवलंबून असतें, हें कांहीं खोटें नाहीं. उदाहरणार्थ, ज्या देशांत गुलामगिरीची पद्धति चालू असते तेथें कांहीं माणसांची स्थिति देशांतील गुराढोरांसारखी असते. त्या माणसांना स्वतंत्र असें सामाजिकदृष्ट्या अस्तित्व नसतें. अशा पद्धतींत गुलामगिरीच्या अवस्थेंत असलेल्या माणसांना आपली कर्तबगारी अंगांत असली तरी दाखविण्यास व त्या योगें आपल्या ठायीं श्रेष्ठत्व आणण्यास कायद्यानें मनाईच केलेली असते. तसेंच ज्या ठिकाणीं एका देशांतील लोकांचा राजकीय अंमल दुसऱ्या देशांतील लोकांवर असतो, किंवा एकाच देशांत एका जातीचे लोक जेते व दुसऱ्या जातीचे लोक जित असा संबंध असून सर्व सत्ता, अधिकार, व वरच्या दर्जाचीं कामें जेत्यांच्या हातांत असतात व जित लोकांकडे ' लांकूडफोड्याचें व पाणक्याचेंच ' फक्त काम असतें अशा ठिकाणीं देखील एका जातीच्या लोकांच्या कर्तबगारीस देशांत वावच नसतो; व ह्मणून अशा लोकांना आपल्याला श्रेष्ठपणा मिळविणें अशक्य होतें. या दोन परिस्थितींप्रमाणें ज्या समाजांत जातिनिर्बंध कडक असतात व मनुष्याचा सामाजिक दर्जा, त्याचा व्यवसाय, त्याची रहाणी वगैरे सर्व जन्मावर ठरविलीं जातात त्या

समाजांत सुद्धां मनुष्याच्या कर्तबगारीस फारसा अवसर नसतो, व म्हणूनच या म्हणीच्या सत्यतेचीं पुष्कळशीं उदाहरणें अशा समाजांत दृष्टीस पडत नाहींत. आपला हिंदी समाज वर निर्दिष्ट केलेल्या दोन कोटींमध्यें बऱ्याच अंशांनीं सध्यां पडतो हें कोणीही कबूल करील, व हल्लींचीं युरोपांतील राष्ट्रें या कोणत्याही कोटींत पडत नाहींत, हेंही कबूल करणें भाग आहे. म्हणूनच अर्वाचीन युरोपच्या इतिहासांत 'नर करनी करे' या म्हणीच्या सत्यतेचीं किती तरी उदाहरणें दृष्टीस पडतात. आपल्या देशांत तितकीं दिसून येत नाहींत.

कार्लाईल या इंग्रज ग्रंथकारानें आपल्या ग्रंथांत वरील म्हणींतील तत्वाचा उच्च स्वरानें उपदेश केला आहे इतकेंच नव्हे, तर त्याचें चरित्रही या तत्वाच्या सत्यतेचा एक दाखला आहे. तरी त्याच्या ग्रंथांच्या व विशेषतः त्याच्या 'विचारकंथा' या नांवाच्या प्रख्यात ग्रंथाच्या विवेचनास लागण्यापूर्वी कार्लाईलचें थोडक्यांत इतिवृत्त देणें वावगें होणार नाहीं.

टॉमस कार्लाईल याचा जन्म स्कॉटलंडांतील आननूडेल परगण्यांत एकलफेकन् या गांवीं ४ दिसेंबर १७९५ मध्यें झाला. कार्लाईलचा बाप जेम्स हा पाथरवटाचा धंदा करीत असे. ज्या घरांत कार्लाईलचा जन्म झाला तें घर जेम्स कार्लाईलनें स्वतः हातानें बांधलेलें होतें. जरी जेम्स हा विद्वान् नव्हता तरी तो मोठा दृढनिश्चयी, करारी, अभिमानी, व स्वातंत्र्य-प्रिय माणूस होता. तसाच तो बोलणारा बांका होता. त्याचा आपल्या मुलांवर फार दरारा असे. यामुळें तीं त्याला भीत असत. कार्लाईलची आई मार्गारेट ही जेम्सची दुसरी बायको होती. तिला एकंदर नऊ मुलें झालीं. त्यांतला कार्लाईल हा पहिलाच मुलगा होय. मार्गारेटचा स्वभाव व जेम्सचा स्वभाव हे अगदीं परस्परविरुद्ध होते. मार्गारेट प्रेमळ, गरीब व अत्यंत धर्मभोळी होती तर जेम्स हा रागीट, कडक व धर्म सुधारक होता. तिचें टॉमस कार्लाईलवर फारच प्रेम होतें. कार्लाईल मोठा प्रख्यात ग्रंथकार झाल्यावर त्याला आपल्यास पत्र लिहावयास यावें व त्याचे ग्रंथ वाचावयास सांपडावे येवढ्याकरितां ती मोठ्या वयांत लिहावाचावयास शिकली.

टॉमस कार्लाईल पांच वर्षांचा झाल्यावर गांवच्या शाळेंत जाऊं लागला, व आपल्या चलाख बुद्धीमुळें दोन वर्षांतच त्याला चांगलें लिहा-वाचावयास येऊं लागलें. कार्लाईलच्या आईबापांचा मोठा मनोदय होता कीं, आपल्या हुशार मुलानें विश्वविद्यालयांतील विद्या संपादन करून धर्मोपदेशक व्हावें. या उद्देशानें त्यांनीं आधीं त्याला आनन्डेल येथील वरच्या दर्जाच्या शाळेंत पाठविण्याचें ठरविलें. जेम्सचा शेजारी या योजनेविरुद्ध होता. तो ह्मणाला, " मुलाला विद्या शिकविली ह्मणजे तो आपल्या अज्ञानी आईबापांना तुच्छ लेखूं लागतो. " पण जेम्सनें या ह्मणण्याकडे लक्ष न देतां आपल्या निश्चयाप्रमाणें १८०५ मध्यें टॉमसला आनन्डेल शाळेंत घातलें. टॉमस हा फार भिडस्त व हळव्या मनाचा मुलगा होता; पण मोठा रागीट होता. ह्मणून मार्गारेटनें टॉमसला " दुसऱ्या मुलांना कधींही मारूं नको, " ह्मणून सांगितलें होतें, व टॉमसनें आईची आज्ञा अक्षरशः पाळली. आनन्डेल शाळेंत टॉमसला लाटिन व फ्रेंच भाषा चांगल्या अवगत झाल्या; ग्रीक शिकण्यासही त्यानें प्रारंभ केला; व बीजगणित व भूमिति यांत त्याची बरीच प्रगति झाली. त्याला इतिहास वाचण्याचीही तेथेंच गोडी लागली.

टॉमसचा आनन्डेल शाळेंतील सर्व अभ्यास पुरा झाला त्या वेळीं तो चौदा वर्षांचा होता. पुढें त्यास विद्याभ्यासासाठीं एडिंबरो विश्व-विद्यालयांत धाडण्याचें जेम्सनें ठरविलें, व त्याप्रमाणें १८०९ मध्यें टॉमस ८० मैल पायीं चालत जाऊन एडिंबरोस पोंचला. कांहीं अंतरापर्यंत जेम्स हा आपल्या मुलाला पोंचवावयास आला होता. जेम्सची स्थिति गरिबीचीच असल्यामुळें मुलाला स्वस्त अशा जागेंत रहावें लागलें. खर्चाची काटकसर करण्याकरितां त्याला घराहून येणाऱ्या ओटमील, बटाटे व लोणी या वस्तूंवर गुजारा करावा लागे. अशा हालांत व गरिबींत त्याला विश्वविद्यालयांत विद्या संपादन करावी लागली. टॉमस कार्लाईल १८१४ पर्यंत विश्वविद्यालयांत राहिला. तेथील वाचनानें व विचारांनीं त्याच्या मनावर जो परिणाम झाला, त्यामुळें त्याचा ख्रिश्चनधर्मावरील विश्वास उडाला, व ह्मणून त्यानें धर्मो-पदेशक होण्याचा नाद सोडून दिला. कार्लाईलच्या आईबापांस याबद्दल

फार वाईट वाटलें. पण तीं विचारी असल्यामुळें मुलाच्या इच्छेच्या विरुद्ध गेलीं नाहींत.

१८१४ मध्यें टॉमस कार्लाईलनें प्रथम आननूंडेल शाळेंत शिक्षकाची नोकरी धरली, व पुढें तो कर्कॅकल्डी येथील शाळेंत शिक्षक झाला. येथें त्याची एडवर्ड अर्व्हिंग या शिक्षकाशीं ओळख झाली, व दोघांचा अत्यंत स्नेह जमला. अर्व्हिंग कार्लाईलला निरनिराळ्या विषयावरील ग्रंथ वाचण्यास देई, व कार्लाईल ते मोठ्या अधाशीपणानें वाची. या दोघां स्नेह्यांचें निरनिराळ्या विषयांवर संभाषणही होई. या विचारविनिमयापासून आपला विलक्षण फायदा झाला, असें कार्लाईल मोठेपणीं म्हणे. १८१८ मध्यें या दोघांनीं कर्कॅकल्डीची शाळा सोडली व ते एडिंबरोस आले. कार्लाईलनें अजून निश्चित असा आपला उद्योग किंवा आयुष्यक्रम आंखला नव्हता. यामुळें हीं त्याचीं पांच चार वर्षे मोठ्या काळजींत व कष्टांत गेलीं. धड खाणेंपिणें वेळेवर नाहीं, विद्याभ्यासाचाही बोजा फार; या कारणानें त्याला अजीर्णाचा कायमचा विकार जडला. हा रोग म्हणजे ' आपल्या पोटाचा गाभा सतत कुरतुडणारा उंदीर ' होय असें कार्लाईलनें त्याचें विनोदी वर्णन केलेलें आहे. त्याचा ख्रिश्चन धर्मावरील विश्वास पार उडाला होता, व त्याच्या मनांत नास्तिकवाद, संशयवाद वगैरे विचारांचें काहूर माजलेलें होतें. शिवाय आयुष्यांतील कायमच्या कार्यक्रमाबद्दलही अनिश्चय होता. एकदां त्याच्या मनांत एंजिनीयर व्हावयाचें आलें व त्याप्रमाणें तो धंद्याला लागणाऱ्या विषयांचा अभ्यास करूं लागला, व खनिजशास्त्र शिकण्याकरितां त्यानें जर्मन भाषेचा अभ्यास सुरू केला. एका विशिष्ट हेतूनें त्यानें जर्मन भाषेचा अभ्यास केला खरा. पण त्यापासून एक अनपेक्षित परिणाम घडून आला. त्याची जर्मन भाषेंत उत्तम प्रगति झाली इतकेंच नाहीं, तर जर्मन भाषेंतील वाङ्मयानें व त्यांतील आध्यात्मिक विचारांनीं त्याच्या संशयग्रस्त मनाला शांति दिली; तो या वाङ्मयाचा मोठा अभिमानी बनला या भाषेंतील विचार इंग्रजींत आणण्याचा त्याचा निश्चय झाला व हेंच त्याच्या आयुष्याचें ध्येय बनलें. ही गोष्ट १८२१ मध्यें घडली. या वर्षी आपला आध्यात्मिक पुनर्जन्म झाला असें कार्लाईल म्हणत असे.

याच वर्षी त्याच्या आयुष्यांतील आणखी एक महत्वाची गोष्ट घडली. अर्व्हिंग याची एक हुशार विद्यार्थीण होती. ती आपल्या आईसह हॅडिंगटन येथें रहात असे. अर्व्हिंगचा लंडनला जाण्याचा बेत झाला, म्हणून त्यानें कार्लाईलची व या मुलीची ओळख करून दिली, व त्याला तिच्या विद्याभ्यासावर देखरेख करण्यास सांगितलें; या वेळेपासून कार्लाईलचा व जेन वेल्शचा स्नेह जमला व तो हळू हळू वाढत गेला.

अर्व्हिंग लंडनला आल्यावर त्याला आपल्या मित्राला मदत करण्याची आणखी एक संधि मिळाली. बुलर या नांवाच्या बाईनें आपल्या दोन मुलांच्या शिक्षणाच्या व्यवस्थेबद्दल अर्व्हिंगची सल्ला घेतली, व त्यानें कार्लाईलची शिक्षक या नात्यानें शिफारस केली. थोड्याशा पत्रव्यवहारानंतर सालीना दोनशें पौंडांवर कार्लाईलनें हें शिक्षकाचें काम १८२२ च्या जानेवारींत पतकरलें, व तें त्यानें दोन वर्षें केलें. बुलरबंधूपैकीं एक फारच हुषार होता. कार्लाईलचा व या घराण्याचा पुढें चांगला ऋणानुबंध राहिला. पण त्यांपैकीं एक भाऊ लवकरच वारला. बुलरबाईकडे शिक्षकाचें काम करीत असतांना कार्लाईलनें जर्मन ग्रंथकार व कवि शिलर याचें चरित्र लिहिलें; तसेंच जर्मनीचा शेक्सपीयर जो गटे त्याच्या 'विल्हेम् माइस्टरची उमेदवारी' या नांवाच्या कादंबरीचें भाषांतर केलें. हे दोन्ही ग्रंथ फारच चांगले वठले. ते इतके कीं, गटेनें स्वतः कार्लाईलला प्रशंसापर पत्र लिहिलें. या दोन पुस्तकांनीं कार्लाईलला आत्मविश्वास उत्पन्न झाला. वाङ्मयांत आपल्याला वर्चस्व मिळवितां येईल व यापुढें आपल्या आयुष्याचें ध्येय ह्मणजे वाङ्मयसेवाच होय असें कार्लाईलनें आपल्या मनाशीं ठरविलें व ह्मणूनच त्यानें बुलरबाईच्या मुलाची शिकवणी १८२४ मध्यें सोडून दिली, व लेखनव्यवसायावर आपली स्वतंत्रपणें उपजीविका चालविण्याचा निश्चय केला. विश्वविद्यालय सोडल्यापासून व धर्मोपदेशकाचा धंदा न करण्याचें ठरविल्यापासून कार्लाईलच्या मनाची जी चलबिचल झाली होती, हें करूं कीं तें करूं असें जें त्याचें मन हेलकावे खात होतें, तें सर्व आतां नाहींसें झालें. त्याच्या आयुष्याच्या तयारीचे दिवस संपून त्याच्या कामगिरीचे दिवस सुरू झाले. आयुष्याचें ध्येय ठरल्यावर त्याच्या उद्योगाला लागण्यापूर्वी

त्यानें गृहस्थाश्रमी बनण्याचा निश्चय केला व १८२१ पासून ज्या जेन वेल्श मुलीशीं त्याची निकट ओळख होऊन प्रेमबंधन होत आलें होतें तिच्याशींच कार्लाईलनें १८२६ मध्यें लग्न केलें.

लग्न झाल्याबरोबर कार्लाईलनें आपला स्वतंत्र संसार सुरू केला, व तो कमलीबँक एडिंबरो येथें राहूं लागला. तेथें असतांना त्याची एडिंबरो रिव्ह्यूचा संपादक जेफ्री याच्याशीं ओळख झाली, व तो एडिंबरो रिव्ह्यू व इतर मासिक पुस्तकें यांमध्यें निरानिराळ्या विषयांवर निबंध लिहूं लागला. जर्मन भाषेंतील वाङ्मयाचा व त्या वाङ्मयांतील विचारांचा ब्रिटिश जनतेला परिचय करून देणारा दुभाषी या नात्यानें प्रथम त्यानें यश संपादन केलें खरें. पण तो केवळ दुभाषी व भाषांतरकार नव्हता. जर्मन वाङ्मय, त्यांतील विचारसरणी, त्या देशांतील ग्रंथकर्त्यांची टीका करण्याची रीति, तेथील लेखकांची ऐतिहासिक पद्धति, सारांश, जर्मन वाङ्मयाचे जे जे विशेष होते ते ते कार्लाईलनें आपलेसे करून घेतले व या नव्या पद्धतीवर त्यानें इंग्रजींत स्वतंत्रपणें ग्रंथलेखनाचें काम सुरू करून अत्यंत प्रतिभावान्, अत्यंत जोरदार व परिणामकारक टीकाकार, लेखक, तत्वज्ञानी व इतिहासकार अशी कीर्ति मिळविली.

कार्लाईलच्या यापुढील आयुष्याचे महत्वाचे प्रसंग म्हणजे त्याच्या निरानिराळ्या विषयांवरील ग्रंथप्रकाशनाचे प्रसंग होत.

कार्लाईलला पुढें पुढें वाङ्मयामध्यें जें श्रेष्ठत्व मिळालें, तें कांहीं इतर इंग्रज लेखकांप्रमाणें एकदम व आकस्मिक मिळालें नाहीं. त्याच्या विचित्र भाषेमुळें, त्याच्या जर्मन वाङ्मयाबद्दलच्या अभिमानामुळें व विषय मांडण्याच्या भानगडीच्या पद्धतीमुळें प्रथमतः त्याचे लेख व ग्रंथ लोकप्रिय झाले नाहींत, व त्यांचा खपही बेताबातानें होत असे. यामुळें त्याची खर्चाच्या बाबतींत ओढघरतीची स्थिति असे. खर्चाची अडचण होती म्हणून व आपल्याला लिहितांना आसपास फार शांतता लागते म्हणून, कार्लाईल १८२८ मध्यें म्हणजे लग्न झाल्यावर दोन वर्षांनीं एडिंबरो शहर सोडून आपल्या पत्नीच्या क्रेगनपटॉक नांवाच्या शेतवाडीवर राहण्यास गेला. या ठिकाणीं त्याला हवी ती शांतता मिळाली, व येथें खर्चही कमी येत असे. पण जेन कार्लाईलला घरगुती काम फार करावें

लागे, व तिला बायकामाणसांची सोबतही फार कमी असे. यामुळें त्यांचा येथला आयुष्यक्रम फारसा सुखावह झाला नाहीं. या ठिकाणीं कार्लाईल सहा वर्षें राहिला, व त्याचें बरेंच लेखन येथें झालें. त्याचा ' विचारकंथा ' हा तात्विक ग्रंथ याच ठिकाणीं लिहिला गेला. फ्रान्सच्या राज्यक्रांतीचा इतिहास लिहिण्याचा बेत त्यानें येथेंच केला. या वेळीं त्याची नामांकित ग्रंथकर्त्यांशीं ओळख झाली होती, व त्याच्या लेखांबद्दल लोकांत आवड वाढत चालली होती. म्हणून कार्लाईलनें इंग्लंडच्या राजधानींतच कायमचें जाऊन राहण्याचा निश्चय केला, व त्याप्रमाणें त्यानें १८३४ मध्यें लंडन शहरांत बिऱ्हाड नेलें. तो लंडनमध्यें चेल्सी भागांतील चेनीरोड नांवाच्या रस्त्यावरील एका घरांत राहूं लागला, व आमरणांत म्हणजे सुमारें सत्तेचाळीस वर्षें त्यानें या ठिकाणींच काढलीं. ज्याप्रमाणें कॉनिग्सबर्ज या शहरास कँटमुळें पावित्र्य आलें त्याप्रमाणें कार्लाईलमुळें चेल्सी या भागाला पावित्र्य आलें व कार्लाईलला चेल्सीचा साधू अशी लोकांत पदवी मिळाली. देशोदेशींचे वाङ्मयभक्त या चेल्सीच्या शारदाभक्ताच्या भेटीस येऊं लागले. आपल्या अंगच्या कर्तबगारीनें कार्लाईलनें पुढील चाळीस वर्षांत इतकी कीर्ति व मान मिळविला.

पण कार्लाईलचे अझून ( १८३४ मध्यें ) कष्टाचे दिवस संपले नव्हते. लंडनमध्यें आल्यावर कार्लाईलनें आपल्या फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या इतिहासाच्या लेखनास सुरुवात केली. मिलनें इतिहासाची पुष्कळ सामुग्री व साधनें कार्लाईलला दिलीं. मार्च १८३५ मध्यें या इतिहासाचा पहिला भाग तयार झाला. या ग्रंथावर कार्लाईल व त्याची पत्नी यांची मोठी मदार होती. कारण, लंडनसारख्या महागाईच्या ठिकाणीं राहण्यास किरकोळ मासिक–पुस्तकी लेखांचें उत्पन्न त्यांना पुरें पडत नसे. या इतिहासाच्या पहिल्या भागाची हस्तलिखित प्रत तयार झाली असें समजल्याबरोबर मिलनें ती पहावयास मागितली. कार्लाईलनें ती मिलला दिली. त्यानें ती प्रत आपल्या मिसेस टेलर नांवाच्या मैत्रिणीस दिली, व तिच्या घरीं ती प्रत मोलकरणीच्या निष्काळजीपणानें व हलगर्जीपणानें जळाली. अर्थात् या अनपेक्षित अपघाताबद्दल मिलनें दुःखित अंतःकरणानें कार्लाईलजवळ दिलगिरी प्रदर्शित केली. कार्लाईलचें या वेळचें

वर्तन विलक्षण शांततेचें होतें. कारण हा अपघात म्हणजे कार्लाईलवरील भयंकर संकट होतें. कारण त्याला पैशाची अत्यंत जरूर होती, व ग्रंथ-लेखन हें कार्लाईलला स्कॉटप्रमाणें लीलेनें करतां येत नसे. ऐतिहासिक विषयावर लिहावयाचें असल्यामुळें तो आपल्या विधानांबद्दल विलक्षण काळजी घेत असे, व आधाराखेरीज उगाच मतें व विधानें दडपून देण्याचा त्याचा स्वभाव नव्हता; यामुळें अशा पुस्तकाच्या पहिल्याच भागाचा नाश होणें म्हणजे किती तरी दिवसांचे शक्ति क्षीण करणारे श्रम फुकट जाणें होय. कार्लाईलला पुनः सर्व खटाटोप करण्याची पाळी आली, व या मध्यंतरींच्या काळांत त्याची पैशाची फारच ओढघस्त झाली. पुनः लिहिण्याच्या श्रमांचे ओझ्याखालीं कार्लाईलचें मन दडपून तें त्या व्यवसायापासून माघार घेऊं लागलें. मनाला विरंगुळा व्हावा व फुकट गेलेल्या श्रमानें रंजीस आलेल्या मनास पुनः लिहिण्याचा हुरूप यावा म्हणून कार्लाईलनें कांहीं दिवस कादंबऱ्या वाचण्यांत घालविले. मिलला कार्लाईलवरील संकटाबद्दल वाईट वाटलें, म्हणून वर सांगितलेंच आहे, पण हें वाईट वाटणें व ही दिलगिरी निवळ वरकरणी नव्हती, हें मिलच्या वर्तनावरून दिसून येतें. त्यानें कार्लाईलला जळलेल्या हस्त-लिखिताबद्दल दोनशें पौंड देऊं केले. पण कार्लाईलनें त्यांपैकीं अत्यंत आवश्यक म्हणून शंभर पौंडच घेतले. कांहीं दिवसांनंतर तो पुनः आपल्या लेखनाच्या कामाला लागला, व त्यानें त्या इतिहासाचे सर्व आठही भाग दोन वर्षांनीं लिहून काढले. परंतु या दोन वर्षांत त्याची पैशाची फार तारांबळ उडाली. म्हणून मिस मारटेन्यूच्या सूचनेप्रमाणें त्यानें १८३७ मध्यें जाहीर व्याख्यानमाला सुरू केली. त्या मालेची मिस मार्टेन्यू इनें स्वतः तिकिटें खपविलीं. ‘ जर्मन वाङ्मयावरील पहिली व्याख्यानमाला ’ कार्लाईलनें १८३७ मध्यें गुंफली. ही व्याख्यानमाला फारच यशस्वी झाली व त्यायोगें कार्लाईलला १३५ पौंड मिळाले. याप्रमाणें पहिली व्याख्यानमाला यशस्वी ठरल्यामुळें कार्लाईलला पैसे मिळविण्याचें एक नवीन साधन उपलब्ध झालें व त्यानें व्याख्यानाचा क्रम वार्षिकच केला. तदनुरूप त्यानें १८३८ मध्यें ‘ मनुष्याचा आध्यात्मिक इतिहास ’ या विषयावर व्याख्यानें दिलीं;

१८३९ मध्यें फ्रान्सच्या राज्यक्रांतीवर त्यानें व्याख्यानें दिलीं, व १८४० मध्यें 'विभूति व विभूतिपूजा' या विषयावर त्यानें व्याख्यानमाला गुंफली. व्याख्यानकार या नात्यानें कार्लाईलनें समाजांत बरीच खळबळ उडवून दिली. त्याचे नवे विचार, त्याची कळकळ व बोलण्याची ढब यांमध्यें कांहींएक विशेष होता, म्हणून त्याच्या व्याख्यानास खूप गर्दी जमे.

'फ्रान्सच्या राज्यक्रांतीचा इतिहास' या मोठ्या ग्रंथानें कार्लाईलची उत्तम इतिहासकारांत गणना होऊं लागली. त्याच्या पुस्तकाचा जिकडे तिकडे बोलबाला झाला, व त्या ग्रंथानें इंग्रजी वाङ्मयांत श्रेष्ठ कोटींत जागा पटकावली. 'चारटीझम' या प्रचलित विषयावरील त्याच्या निबंधाचा खप असाच तावडतोब झाला, व दुसरी आवृत्ति लवकरच काढावी लागली. 'विभूति व विभूतिपूजा' ही व्याख्यानमाला ग्रंथरूपानें प्रसिद्ध झाली, व तिचा खपही चांगला झाला. त्याचप्रमाणें त्याचा 'विचारकंथा' या ग्रंथाचा व विविधविषयसंग्रहाच्या पुस्तकाचाही खप झपाट्यानें होऊं लागला, व कार्लाईलचे पहिले कष्टाचे, हालअपेष्टेचे व अडचणीच्या राहणीचे दिवस कायमचे नष्ट झाले. कार्लाईलचें घर म्हणजे शारदाभक्तांचें विश्रांतिगृह बनलें व कार्लाईलला 'शारदीय केसरीचा' किताब जनतेनें दिला.

फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या इतिहासानंतर कार्लाईलनें दुसरा ग्रंथ हातांत घेतला तो क्रामवेलच्या चरित्राचा होय. इंग्लंडांतील 'आपसांतील लढाईचा' इतिहास लिहिण्याचा त्याचा प्रथम मनोदय होता. त्या इतिहासाचीं साधनें मिळविण्याकरितां त्यानें अतोनात खटपट केली. पण मनाजोगा व हितकर असा ग्रंथ तयार होण्याचीं चिन्हें दिसत ना, म्हणून तो थोडा निराश झाला. या कामांत चार वर्षें गेलीं व त्यामध्यें दोन व्यत्यय आले. पहिला त्याच्या सासूच्या मरणाचा. ती १८४२ मध्यें वारली, व कार्लाईलला तिच्या मिळकतीच्या व्यवस्थेंत महिना पंधरा दिवस घालवावे लागले. पण त्या योगें त्याच्या पत्नीला सालीना दोनशें पौंडांच्या उत्पन्नाची मिळकत मिळाली. क्रामवेलच्या पूर्व वयांतील आयुष्यक्रमाशीं संलग्न असलेल्या ठिकाणांची तपासणी करीत असतां तेथल्या अनाथगृहांतील लोकांची दुर्दशा व एकंदर जनतेची वाईट स्थिति

कार्लाईलच्या दृष्टीस पडली. त्याला या लोकांची दया आली, व सरकार या बेकार लोकांचें दैन्य दूर करण्यास कांहीं एक उपाय योजीत नाहीं, म्हणून सरकारचा त्याला राग आला. या मनःस्थितींत आपल्या ऐतिहासिक ग्रंथाचें काम बाजूला ठेवून त्यानें ह्या प्रचलित विषयावरील आपले विचार व मतें 'भूत व वर्तमान' या नांवाच्या ग्रंथांत ग्रथित केले. कार्लाईलचा जलद लिहिलेला ग्रंथ म्हणजे हाच होय. तो त्यानें १८४३ मध्यें सात आठवड्यांत लिहिला, व लागलाच प्रसिद्ध केला.

नंतर तो आपल्या इतिहासाच्या लेखनास लागला. हा मोठा इतिहास लिहिण्यापूर्वी या इतिहासांतील मुख्य भूमिका जी क्रामवेल त्याचीं पत्रें व भाषणें यांची क्रमवार यादी करण्याचा व त्या पत्रांतील मजकूर समजण्याकारितां त्या पत्रांना ऐतिहासिक गोष्टींचीं टिपणें जोडण्याचा त्यानें बेत केला. पण हेंच काम त्याला फार त्रासाचें व जिकीरीचें वाटलें. व शेवटीं दोन वर्षांनीं हें काम पुरें झालें व 'क्रामवेलचीं पत्रें व भाषणें ऐतिहासिक टिपणांसह' या नांवानें त्यानें दोन भाग प्रसिद्ध केले. या पुस्तकाची फारच वाहवा झाली. फार मोठा व नामांकित इतिहासकार म्हणून कार्लाईलची एव्हांपासून ख्याति झाली. हा काळ म्हणजे त्याच्या कीर्तीच्या कळसाचा काळ होता. या दोन भागांत आपसांतील लढाईबद्दल जें कांहीं आपल्याला लिहावयाचें होतें त्याचा समावेश झाला आहे असें पाहून त्यानें मग स्वतः इतिहासलेखनाचा नाद सोडून दिला.

पुढें त्यानें पुष्कळ प्रचलित विषयांवर लेख व निबंध लिहिले. पण त्यामध्यें त्याची एकतर्फी व प्रतिगामी धोरणाचीं मतें दिसून येत. त्या लेखांची तात्पुरती चहा झाली. पण त्यांना वाङ्मयांत कायमचें महत्त्वाचें स्थान मिळालें नाहीं.

कार्लाईलचा यापुढला वाङ्मयांतील प्रयत्न म्हणजे जॉन स्टर्लिंगचें चरित्र हा होय. हें चरित्र त्यानें १८५१ मध्यें प्रसिद्ध केलें. स्टर्लिंगचा व कार्लाईलचा फार स्नेह होता. व या निकट स्नेहाचें योग्य स्मारक असेंच हें चरित्र वठलें आहे.

कार्लाईलचा शेवटला पण सर्वांत मोठा ग्रंथ म्हणजे प्रशियाचा राजा फ्रेडरिक धि ग्रेट याचा इतिहास होय. स्टर्लिंगचें चरित्र पुरें झाल्यावर लागलींच हें काम कार्लाईलनें हातीं घेतलें, व आठ भागांमध्यें हा इतिहास पुरा करण्याचा त्यानें बेत केला. हा बेत तडीस नेण्यास त्याला एकंदर चवदा वर्षें लागलीं. क्रामवेलवरील ग्रंथापेक्षांहि या ग्रंथलेखनास त्याला जास्त दगदग व श्रम करावे लागले. इतिहासाचीं साधनें मिळविण्याकारितां व फ्रेडरिकच्या युद्धस्थानांचें निरीक्षण करण्याकारितां कार्लाईल दोन वेळां जर्मनीस जाऊन आला. शिवाय त्याला आतां लिहितांना अगदीं थोडासुद्धां गोंगाट सहन होत नसे. त्याकरितां आपल्या चेल्सी येथील घराच्या माथ्यावर त्यानें ध्वनिप्रतिबंधक अशी एक खोली आपल्याकारितां बांधविली. तरी पण तो जबर कामामुळें इतका त्रासिक व चिडखोर झाला होता कीं, त्याची पत्नी जेन नेहमीं म्हणे, “ यांचे जवळ राहणें म्हणजे घरांत वेड्याचें इस्पितळ ठेवणें होय. ”

१८५३ मध्यें कार्लाईलची आई अत्यवस्थ असल्याचें कळल्याबरोबर तो तिच्या भेटीस गेला. पण तिचे मरणकालचे शेवटचे शब्द त्याचे कानीं पडले इतकेंच. कार्लाईलला आईच्या मृत्यूमुळें फार दुःख झालें. त्याचें आईवरील प्रेम अवर्णनीय होतें. कार्लाईलनें आपल्या आईला लिहिलेलीं पत्रें या प्रेमाची साक्ष देतात. आईचा उपदेश त्याच्या मनावर किती बिंबला होता, व तिच्या शब्दाबद्दल त्याला किती आदर वाटत असे याचें प्रत्यंतर खालील गोष्टीवरून येईल.

फार मोठ्या वयांत कार्लाईल आपल्या मित्रासह एका मोठ्या रस्त्यावरून बोलत चालला होता. इतक्यांत कार्लाईलला धुरळ्यांत व चिखलांत रुतलेलें कांहीं दिसलें, म्हणून त्यानें वांकून तें उचलून घेऊन, धूळ व चिखल पुसून रस्त्याशेजारच्या ओट्यावर ठेवलें. तो भाकरीचा तुकडा होता. कार्लाईलचा मित्र या त्याच्या कृत्याकडे आश्चर्यानें पाहूं लागला. कार्लाईलनें उत्तर दिलें, “ अन्न कधींही व्यर्थ घालवूं नये असें आमची आई सांगत असे; ही भाकरी फुकट जाऊं नये म्हणून मीं ओट्यावर ठेविली; ती पक्षी तरी खातील. ”

'फ्रेडरिक. धि ग्रेटचा इतिहास' हा कार्लाईलचा ग्रंथ १८६६ मध्यें प्रसिद्ध झाला. या ग्रंथाच्या लेखनाबरोबर कार्लाईलचें वाङ्मयांतील काम संपलें व त्याचें वाङ्मयविषयक चरित्रही संपलें. तो पुढें आणखी पंधरा वर्षें जगला खरा, व त्याला पुष्कळ मान व पदव्याही मिळाल्या खऱ्या, पण तो पिकल्या पानासारखा झाला होता. १८६६ मध्यें डिझरायली हा एक उमेदवार असतां त्याला टाकून एडिंबरोच्या विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांनीं कार्लाईलची लार्ड रेक्टरच्या [ आपल्या इकडला चॅन्सेलर ] जागीं निवडणूक केली. रेक्टर या नात्यानें विश्वविद्यालयांत एक भाषण करावयाचें असतें; त्या निमित्त तो एडिंबरोस गेला व तेथें कांहीं दिवस राहिला. त्या वेळीं विद्यार्थ्यांनीं त्याचें विलक्षण उत्साहानें स्वागत केलें. एडिंबरोहून विश्रांतीकरितां तो स्कॉटस ग्रीग येथें गेला. तेथें पायाच्या घोट्यास इजा झाल्यामुळें त्याला जास्त दिवस रहावें लागलें, तोंच त्याला आपली पत्नी वारल्याची तार आली. जेन कार्लाईलला फारच आकस्मिक मृत्यु आला. ती लंडन येथील हाईड पार्क नांवाच्या प्रसिद्ध बगीच्यांत फिरावयास गेली होती. तिच्या आवडत्या कुत्र्याच्या पायावरून गाडीचें चाक गेलें म्हणून कुत्र्याला मदत करण्याकरितां तिनें गाडींतून उडी टाकली. पण हा धक्का तिच्या हृदयाला सोसला नाहीं, व ती पुनः गाडींत बसते तोंच तिच्या हृदयाची क्रिया बंद होऊन तिचें गाडींतल्या गाडींत प्राणोत्क्रमण झालें ! ही बातमी ऐकून कार्लाईलला विलक्षण दुःख झालें. राहिलेल्या सर्व आयुष्यभर या पत्नीवियोगाबद्दल त्याला राहून राहून वाईट वाटत असे. कार्लाईल व मिसेस कार्लाईल यांचें लग्न सुखाचें झालें नाहीं; त्या दोघांमध्यें खरें प्रेम नव्हतें; त्यांची नेहमीं भांडणें होत; त्या दोघांचा स्वभाव परस्पर विरुद्ध होता; सारांश, हें जोडपें विजोड होतें; असा पुष्कळ दिवस चरित्रकारांचा समज होता. कार्लाईलचा आपल्या बायकोशीं बेबनाव हा कार्लाईलच्या मरणानंतर एक लेखकांचा टीका-विषयच होता. पण कांहीं कालानंतर कार्लाईलचा व त्याच्या पत्नीचा पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला, व या पत्रव्यवहारावरून हा आरोप अगदीं खोटा आहे असें ठरलें. कार्लाईलचें जेनवर खरें प्रेम होतें, कार्लाईलचीं प्रेमपत्रें फार हृदयंगम आहेत. हें खरें कीं, कार्लाईल व

त्याची पत्नी या दोघांचा स्वभाव हळवा होता, व कार्लाईल लेखनाच्या दगदगीनें थोडा त्रासिक व चिरडखोर झाला होता; यामुळें या पतिपत्नीमध्यें केव्हां केव्हां खटका उडे; पण तो क्षणिक असे; व त्या योगें त्यांच्या कायमच्या प्रेमांत अंतर पडलें नाहीं. हेंही खरें आहे कीं, १८४५ च्या सुमारास कार्लाईल व त्याची पत्नी हीं दोघें लार्ड व लेडी आशबर्नर यांचे येथें रहात असतां लेडी आशबर्नरकडे कार्लाईलचा ओढा आहे अशी कार्लाईलच्या बायकोस शंका येऊन ती लेडी आशबर्नरवर नाराज झाली. पण ही कल्पनाच असंमजसपणाची होती, व कार्लाईलनें क्षुल्लक म्हणून तिकडे लक्ष दिलें नाहीं. तरी पण कार्लाईलचा चाळीस वर्षांचा संसार एकंदरीनें सुखासमाधानाचाच झाला. बायकोच्या मरणानें कार्लाईलला जो उद्वेग उत्पन्न झाला तो शेवटपर्यंत कायम राहिला.

इंग्लंड व जर्मनी या दोन्ही देशांच्या सरकारांनीं कार्लाईलला मोठमोठ्या मानाच्या पदव्या दिल्या. प्रिय पत्नीच्या मरणानंतर कार्लाईल पंधरा वर्षें जगला. तो आपल्या वयाच्या ८१ व्या वर्षीं म्हणजे ता. ४ फेब्रुआरी १८८१ रोजीं निवर्तला.

कार्लाईल फार दांडगा लेखक होता. त्याच्या सर्व ग्रंथांची संपूर्ण आवृत्ति तीस भागांत निघालेली आहे. त्याच्या ग्रंथाचे स्वाभाविक चार भाग होतात. पहिला भाग निबंधात्मक, टीकात्मक व भाषांतरात्मक ग्रंथांचा होय. कार्लाईलनें टीकेची व निबंधाची एक नवीन पद्धति इंग्रजी भाषेंत सुरू केली असें या भागावरून दिसून येतें. दुसरा भाग तात्विक ग्रंथाचा होय. यांत ' विचारकंथा ' हाच मुख्य ग्रंथ आहे. तिसरा भाग, राजकीय, सामाजिक व आर्थिक अशा प्रचलित विषयांवरील लेखांचा होय. चवथा व सर्वांत मोठा भाग म्हणजे ऐतिहासिक ग्रंथांचा होय.

या पुस्तकांत कार्लाईच्या ' विचारकंथा ' या ग्रंथाचें सविस्तर विवेचन करावयाचें आहे. तरी आतां त्या ग्रंथाच्या प्रकाशनाच्या व सामान्य स्वरूपाच्या माहितीकडे वळूं.

२

# विचारकंथेचें-लेखन-प्रकाशन-निदर्शन.

कार्लाईलच्या ज्या 'विचारकंथा' ग्रंथानें कित्येकांमध्यें उत्साह उत्पन्न केला; कित्येकांच्या मनांत कर्तव्यजागृति केली; कित्येकांना आध्यात्मिक दृष्टि दिली; कित्येकांस उद्योगाची पवित्रता पटविली; सारांश, ज्या ग्रंथानें समाजांत एक प्रकारची खळबळ उडवून दिली; व कालें-करून जो ग्रंथ इंग्रजी वाङ्मयाचा बहुमोल अलंकार गणला गेला, त्या ग्रंथाच्या प्रकाशनाला कार्लाईलला किती प्रयास व सायास पडले हें पाहिलें म्हणजे, होतकरू ग्रंथकर्त्यांना निराश होण्याचें कारण नाहीं. लोकांची अभिरुचि ही रूढीप्रमाणेंच घोपटमार्गी असते. या धोपट मार्गाला सोडून एखाद्या प्रतिभावान् ग्रंथकारानें निराळ्या दिशेनें प्रयत्न केला कीं, प्रथमतः तो प्रयत्न लोकाभिरुचीस पटत नाहीं. पण ग्रंथकर्त्यामध्यें जर खरी प्रतिभा असेल; त्याच्या भाषेंत ओज असेल; त्याच्या कल्पना सत्याला धरून असतील; त्याला समाजाला कांहीं कळकळीचा व जिव्हाळ्याचा संदेश सांगावयाचा असेल; त्याला समाजापुढें उदात्त ध्येय ठेवावयाचें असेल, तर त्या ग्रंथकर्त्याचे ग्रंथ कालें करून लोकमान्य झाल्याखेरीज राहत नाहींत. मात्र ग्रंथकर्त्यानें धीर धरला पाहिजे; त्यानें लोकांच्या अवहेलनेकडे काना-डोळा केला पाहिजे; त्यानें लोकाराधनेला बळी पडतां कामा नये किंवा 'सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयात् न ब्रूयात्सत्यमप्रियं' या म्हणीची जपमाळ घेऊन बसतां कामा नये; तर आपले अप्रिय पण पथ्यकर विचार समाजापुढें बेधडक मांडण्याचा निश्चय केला पाहिजे. असा ग्रंथकर्त्याचा निश्चय असला म्हणजे कालें करून लोकाभिरुचि बदलते. लोक त्या ग्रंथकर्त्याचें ह्मणणें ऐकून घेऊं लागतात, त्याचा उपदेश लोकांना पटून ते त्याचे अनुयायी बनतात, व त्या ग्रंथकर्त्याच्या ग्रंथाची चहा होऊं लागते. प्रसिद्ध संस्कृत कवि भवभूति याच्या ग्रंथाची प्रथमतः अवहेलना झाली असावी, असें मालतीमाधवांतील त्याच्या खालील श्लोकावरून दिसून येतेः—

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां
जानंतु ते किमपि तान् प्रति नैष यत्नः ।
उत्पस्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥

ज्या भवभूतीला 'मालतीमाधवा'च्या प्रसिद्धीच्या वेळीं लोकांच्या अवज्ञेमुळें आपल्या ग्रंथाच्या गुणग्रहणाकरितां, ' निरवधि काल व विपुला पृथ्वी ' या न्यायानें खऱ्या रसिकाची वाट पहावी लागली, त्याच भवभूतीच्या ' उत्तररामचरित ' या नाटकाच्या प्रसिद्धीचे वेळीं त्याला अशा प्रकारचे उद्वेकजनक उद्गार काढण्याचा प्रसंग आला नाहीं इतकेंच नव्हे तर,

यं ब्रह्माणमियं देवी वाग्वश्येवानुवर्तते ।
उत्तरं रामचरितं तत्प्रणीतं प्रयुज्यते ॥

असा अभिमानपूर्वक आपल्या नांवाचा उल्लेख करितां आला. यावरून या मध्यंतरींच्या काळांत भवभूतीच्या ग्रंथाबद्दल लोकांना आदर वाटू लागला होता असें दिसतें. कार्लाईलची स्थिति भवभूतीप्रमाणेंच झाली, हें त्याच्या चरित्रावरून व खालीं दिलेल्या हकीकतीवरून दिसून येईल.

आपल्या पत्नीच्या क्रेगनपटॉक या शेतवाडीवर रहात असतां कार्लाईलनें आपला 'विचारकंथा' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाची मूळ कल्पना त्याला स्विफ्ट या ग्रंथकर्त्याच्या एका पुस्तकांतील विचारांवरून सुचली असावी असें कोणी ह्मणतात. कोणी ह्मणतात ॲडिसनच्या एका विचारावरून ती कल्पना सुचली. कोणी ह्मणतात स्टर्न या ग्रंथकर्त्याच्या एका उत्कृष्ट कृतीवरून ती त्याला सुचली. कोणी ह्मणतात कीं, प्रसिद्ध कवि बर्न्स याच्यावरील आपला निबंध लिहीत असतां बर्न्सच्या चरित्रांतील एका प्रसिद्ध आख्यायिकेवरून ती त्याला सुचली. ती आख्यायिका अशी:—बर्न्स हा एकदां आपल्या मित्राजवळ बोलत असतां त्यानें एक अगदीं चिंध्या नेसलेला माणूस पाहिला. तेव्हां तो मित्राला सोडून त्या माणसाजवळ जाऊन त्याच्याशीं बोलला. मित्रानें विचारलें, " अशा माणसाजवळ तूं कां बोललास ? " बर्न्स कवि उत्तरला, " मी त्या

कपड्यांजवळ बोलत नव्हतों, तर त्या कपड्यांनीं आच्छादिलेल्या मानव-प्राण्याशीं बोलत होतों." या कल्पनांपैकीं कोणती तरी एक कल्पना खरी असेल, किंवा सर्वांत थोडें थोडें सत्य असेल. इतकें खरें कीं, कार्लाईल-सारख्याच्या प्रतिभासंपन्न मनामध्यें रुजलेली दुसऱ्या कवीची एखादी सुंदर कल्पना किंवा उपमा ह्मणजे अत्यंत सुपीक जमिनींत पावसाळीं टाकलेल्या उत्तम बीजाप्रमाणें होय, यांत शंका नाहीं. त्या बीजाला ज्याप्रमाणें तावडतोब अंकुर फुटून व त्याचा रोपा होऊन त्याचा जोरानें फोफावणारा वृक्ष बनतो, त्याप्रमाणें कार्लाईलला मिळालेल्या उपमेचा ग्रंथरूपी प्रचंड वृक्ष बनला. प्रथमतः १८३० मध्यें त्यानें या विषयावर फ्रेजरच्या मासिकाकरितां पन्नास पानांचा निबंध लिहिला होता. पण तो फ्रेजरला पसंत न झाल्यामुळें तो त्याच्याकडे तसाच पडून राहिला होता. दरम्यान कार्लाईलला या विषयाचा एक स्वतंत्र मोठा ग्रंथ बनवितां येईल अशी कल्पना सुचली, व म्हणून कार्लाईलनें आपल्या भावाच्या मार्फत फ्रेजरकडे पडून राहिलेला निबंध परत आणविला व या नव्या सुचलेल्या कल्पनेप्रमाणें कार्लाईलनें ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला. त्याच्या रोजनिशीवरून असें दिसतें कीं, कार्लाईल केव्हां केव्हां हा ग्रंथ लिहिण्यांत रात्रंदिवस गढून जात असे. पुस्तकाचे कांहीं कांहीं भाग बरे झाले आहेत, कांहीं कांहीं भाग मनाजोगे झाले नाहींत, असें त्याला वाटे. तरी एकंदर ग्रंथ समाजांत खळबळ उडवून देईल; कांहींना तर तो विचित्र वाटेल; रूढ झालेल्या अभिरुचीस तो पटणार नाहीं, असेंही कार्लाईलला वाटे. मात्र या ग्रंथात आपल्याला जी प्रतिभाशक्ति देवानें दिली आहे, तिचें सर्वस्व ओतून हा ग्रंथ आपण बनविला आहे, अशी कार्लाईलची मनोदेवता त्याला सांगत असे. शेवटीं १८३१ च्या आगष्टच्या पहिल्या आठवड्यांत ग्रंथ समाप्त झाला. कार्लाईलची पत्नी जेन ही स्वतः चांगली शिकलेली होती, व तिच्यामध्यें थोडीशी प्रतिभाशक्ति होती. तिनें ग्रंथाची हस्तलिखित प्रत वाचली व हा ग्रंथ म्हणजे प्रतिभाशक्तीची अद्वितीय कृति आहे असा अभिप्राय तिनें दिला.

ग्रंथ तयार झाल्याबरोबर कार्लाईलला त्याच्या प्रकाशनाची काळजी लागली. त्याच्याजवळ त्या वेळीं प्रवासापुरतेसुद्धां पैसे नव्हते. म्हणून जेफ्रीज-

जवळून थोडेसे पैसे उसने घेऊन तो लंडन राजधानीस आला. राजधानीस येण्यांत आणखीही त्याचे दोन तीन उद्देश होते; पण ते गौण होते. मुख्य उद्देश ग्रंथप्रकाशनाचा होता. म्हणून राजधानींत पोंचल्याबरोबर तो त्याच उद्योगाला लागला. कार्लाईलनें जेफ्रीजकडून मरे नांवाच्या प्रकाशकास व नेपीयरकडून लॉंगमन व रीज या नांवाच्या प्रकाशकांस शिफारसपत्रें आणिलीं होतीं. प्रथमतः तो ज्या फ्रेजर मासिकांत लेख लिहीत असे त्या मासिकाच्या प्रकाशकाकडे गेला. पुस्तकाच्या लेखनाबद्दल कांहीं मोबदला देण्याचें ऐवजीं उलट पुस्तकप्रकाशनाकरितां १५० पौंड कार्लाईलजवळ फ्रेजरनें मागितले! हें ऐकून कार्लाईलच्या एका वकील स्नेह्यानें त्यास म्हटलें, "मला वाटतें, या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या बाबतींत तुह्मीं थोडे दिवस वाट पहावी." कार्लाईल उत्तरला, "होय, त्या बाबतींत कालाच्या अंतापर्यंत वाट पाहण्याचा माझा बेत आहे." लॉंगमन व रीज यांनीं ग्रंथ छापण्याचें मुळींच नाकारलें. कोलबर्न व बेंटली यांनीं सांगितलें कीं, "जरी आपल्यामध्यें प्रतिभा आहे तरी आपलें पुस्तक लोकप्रिय होणार नाहीं." अर्थात् त्यांनींही पुस्तकाचा स्वीकार केला नाहीं. नंतर कार्लाईल मरे या प्रकाशकाकडे गेला. त्यानें मोठ्या मिनत-वारीनें नफ्याच्या समसमान वांटणीच्या अटीवर ७५० प्रतींची पहिली आवृत्ति छापण्याचें कबूल केलें, व पुढच्या आवृत्तीचा सर्व हक्क ग्रंथ-कर्त्याकडे ठेवण्याची सवलत दिली. कशा तऱ्हेनें कां होईना, पण पुस्तक प्रकाशित होणार असें पाहून कार्लाईलला आनंद झाला, व स्वतःस कांहीं एक पैसा खर्च न पडतां पुस्तक छापलें जात आहे, याबद्दल त्यानें देवाचे आभार मानले, व त्याप्रमाणें आपल्या आईला पत्र लिहिलें. "देवाच्या प्रसादानें तें पुस्तक लिहिण्याची मला स्फूर्ति झाली. व त्याच्याच कृपेमुळें त्याबद्दल मला कांहीं एक घेण्याची गरज पडली नाहीं. घेतलेला पैसा हळू हळू नाहींसा झाला असता. माझ्या पुस्तकांत जर कांहीं सत्य भरलें असेल तर तें कदापि नाहींसें होणार नाहीं. माझ्या पुस्तकांत खरें सत्य असो वा नसो, पण मला जें सत्यसें वाटलें तें मीं लिहून काढलें आहे. तेव्हां देवाच्या नांवानें मी तें वाङ्मयरूपी समुद्रांत लोटतों. मग तें त्याच्या इच्छेप्रमाणें तरो अथवा बुडो."

आपल्या आईच्या पत्रांत ज्या पुस्तकाबद्दल कार्लाईलनें वरच्यासारखे गंभीर व भक्तिपरायण उद्गार काढले त्याची पुढील हकीगत विस्मयजनक आहे. मरेच्या हातांत ती हस्तलिखित प्रत छापण्याकरितां पडली. पण लंडनमधला सर्वांत मोठा प्रकाशक लॉंगमन यानें हा ग्रंथ नाकारला, असें मरेला नंतर कळलें. तेव्हां त्यानें आपल्या वचनांतून आपल्याला मोकळें करण्याबद्दल कार्लाईलला विनंति केली व आपल्या दुकानाच्या वाङ्मयपंडिताचा सल्ला व अभिप्राय घेतल्याखेरीज छपाईबद्दल कांहींएक करितां येत नाहीं असें सांगितलें. या पंडिताचा अभिप्राय तर प्रतिकूलच पडला! झालें! दोन महिने लंडनमध्यें खटपट करून व निरनिराळ्या प्रकाशकांकडे हेलपाटे घालून निष्पन्न काय झालें? तर कार्लाईलला आपल्या पुस्तकाच्या हस्तलिखिताचें भेंडोळें कांखेंत मारून हात हालवीत लंडनहून क्रेगनपटॉकला परत यावें लागलें. लंडनमध्यें जाण्यांत त्याचे दुसरे जे उद्देश होते तेही सिद्धीस गेले नाहींत. मात्र या लंडनमधील निवासांत त्याची पुष्कळ लेखकांशीं व ग्रंथकर्त्यांशीं ओळख झाली, व त्यांतल्या त्यांत जॉन स्टूअर्ट मिल याच्याशीं त्याचा स्नेह जमला. तसेंच कार्लाईलच्या लेखनशक्तीबद्दल मासिकांच्या संपादकांची खातरी झाली व आपल्या मासिकांकरितां लेखांची मागणी त्यांनीं केली.

आपल्या पुस्तकप्रकाशनाच्या खटपटींत आपल्याला यश आलें नाहीं म्हणून कार्लाईलला फार वाईट वाटलें. पण त्यानें धीर सोडला नाहीं. एडिंबरोमध्यें कोणी प्रकाशक मिळतो काय याबद्दल त्यानें चवकशी केली. पण तेथेंही पुस्तक छापण्यास कोणी तयार होईना। कार्लाईलचें मन सारखें त्या पुस्तकाकडे ओढे. पण करणार काय! स्वतःच्या खर्चानें पुस्तक छापण्याचें आर्थिक सामर्थ्य कार्लाईलजवळ नव्हतें. पुस्तक लिहून जवळ जवळ दोन वर्षें झालीं, तरी तें पुस्तकरूपानें छापण्याचें जमेना. म्हणून मे १८३३ मध्यें त्यानें तें फ्रेजर मासिकांत खंडशः प्रसिद्ध करण्याचें ठराविलें. फ्रेजरनें तें पुस्तक दहा अंकांत दहा खंडांत छापविण्याचें कबूल केलें, व प्रत्येक खंडाबद्दल बारा गिनी कार्लाईलला देण्याचा करार केला. नवंबर १८३३ ते आगष्ट १८३४ या काळांत कार्लाईलचा ग्रंथ एकदाचा प्रसिद्ध झाला. सर्व खंडांचे मिळून आपल्याला फक्त ८२ पौंड

मिळाले असें कार्लाईलनें आपल्या एका पत्रांत लिहून ठेविलें आहे. पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर तरी काय? प्रकाशनाच्या वेळची स्थिति! बहुतेक दैनिक पत्रांचा अभिप्राय प्रतिकूलच पडला. कोणीं म्हणावें, हा ग्रंथ म्हणजे मूर्खांचा बाजार आहे; कोणीं म्हणावें, हा ग्रंथ म्हणजे वेड-सराचें बरळण आहे; कोणीं म्हणावें, ही सर्व फसवणूक आहे; कोणीं म्हणावें, या ग्रंथाचा अर्थच करता येत नाहीं. अशा नाना तऱ्हेच्या टीका कार्लाईलच्या ग्रंथावर झाल्या. फ्रेजर मासिकाच्या प्रकाशकानें या लेखमालेमुळें मासिकावर संकटें येण्याचीं चिन्हें दिसत आहेत असें कार्लाईलला कळविलें. उदाहरणार्थ, एका वर्गणीदारानें तर प्रकाशकास धमकी दिली कीं, "त्या भिकारड्या शिंप्याचे लेख जर लवकर बंद झाले नाहींत तर आपण वर्गणीदाराच्या यादींतून आपलें नाव काढून घेऊं." या सर्व प्रतिकूल टीकेच्या गहजबामध्यें दोन वर्गणीदारांचीं पत्रें मात्र अपवादात्मक होतीं. एका आयरिश गृहस्थानें लेखमालेची स्तुति केली होती. तसेंच अमेरिकेंतील एमरसन या तरुण लेखकानें एका पत्रांत या लेखांची वाहवा केली होती. जॉन स्टूअर्ट मिलला लेखमाला वाचून फार आनंद झाला. पहिल्या लेखकाबद्दल कार्लाइल आपल्या पत्रांत म्हणतो, "एका निनांवी आयरिश गृहस्थाकडून माझ्या पुस्तकावर खरा व अत्यंत अनुकूल अभिप्राय आला आहे. निदान एक तरी मानव माझे विचार अगदींच खोटे नाहींत असें म्हणतो. याबद्दल मी त्याचे आभार मानतों व त्यावर ईश्वराचा प्रसाद होवो अशी आशा करितों."

इंग्लंडांत याप्रमाणें जरी कार्लाईलच्या पुस्तकाचें गुणग्रहण झालें नाहीं—कारण तें पुस्तक इंग्लंडातील रूढ कल्पनांविरुद्ध होतें व त्याची भाषा व लिहिण्याची पद्धतीही रूढीबाह्य होती,—तरी अमेरिकेंत रूढीचें फारसें प्राबल्य नव्हतें, म्हणून कार्लाईलच्या ग्रंथाची तेथें लवकरच चहा झाली, व कार्लाईलच्या संदेशाचा व विचारांचा तेथें व्याख्यानपीठावरून अनुवाद निघूं लागला. १८३६ मध्यें कार्लाईलच्या विचारकंथेची एक आवृत्ति अमेरिकेंत छापली व दुसऱ्या वर्षी दुसरी एक आवृत्ति काढावी लागली. या दुसऱ्या आवृत्तीपैकीं फक्त पंचवीस प्रती इंग्लंडमध्यें मागविल्या गेल्या! या अवधींत कार्लाईलचा 'फ्रान्सच्या

राज्यक्रांतीचा इतिहास ' हा ग्रंथ प्रसिद्ध होऊन त्याची इंग्लंडमध्यें जिकडे तिकडे वाहवा झाली, व कार्लाईलचें नांव सर्वतोमुखीं झालें. याप्रमाणें ऐतिहासिक ग्रंथानें कीर्ति मिळविल्यावर कार्लाईलला आपला 'विचारकंथा' हा तात्त्विक ग्रंथ इंग्लंडमध्यें पुस्तकरूपानें स्वतंत्रपणे छापतां आला. त्या पुस्तकाचा साधारण चांगल्या तऱ्हेचा खप होऊं लागला, व हळू हळू त्या ग्रंथांतील विचारांकडे लोकांचें लक्षही जाऊं लागलें. कार्लाईलच्या जोरदार व कळकळीच्या संदेशाचा थोडा थोडा परिणाम जनमनावर होऊं लागला. शेवटीं कार्लाईलच्या विचारकंथेनें इंग्रजी वाङ्मयांत कायमचें श्रेष्ठ स्थान पटकाविलें, व त्या पुस्तकाच्या आवृत्यांवर आवृत्या निघूं लागल्या.

येथपर्यंत विचारकंथेच्या प्रकाशनाच्या विस्मयकारक इतिहासाचें दिग्दर्शन केलें. आतां त्या पुस्तकाच्या अंतरंगाकडे वळण्यापूर्वीं त्याच्या सामान्य स्वरूपाच्या व त्या ग्रंथाच्या काठिण्याच्या आविष्करणास लागूं. या बाबतींत माझा स्वतःचा अनुभव वाचकांस सादर केला म्हणजे पुरे आहे.

कार्लाईलची ' विचारकंथा ' या ग्रंथाचें मननपूर्वक अध्ययन करण्याचा माझा फार दिवसांचा मानस होता. माझ्या तत्वज्ञानगुरूंच्या तोंडून त्या पुस्तकाची मीं पुष्कळ स्तुति ऐकिली होती. एकोणिसाव्या शतकातील इंग्रजी वाङ्मयांतील एक विलक्षण कृति म्हणून मीं त्या ग्रंथाची कीर्ति ऐकिली होती. Sartor Resartus पुस्तकाच्या नांवाचा शब्दार्थ " पुनः टांके घातलेली शिंप्याची कृति " असा आहे असें मला समजलें होतें. व या विलक्षण नांवाखालीं व कपड्याच्या मिमांसेच्या मिषानें कार्लाईलनें मानवी आयुष्याच्या इतिकर्तव्यतेबद्दल आपले विचार प्रगट केले आहेत असें मला कळलें होतें. पण कोणत्याही पुस्तकाचें काळजीपूर्वक अध्ययन करितांना मीं बेकनच्या पद्धतीचा अंगीकार करीत असें. बेकनचें म्हणणें असें असे कीं, कोणत्याही विषयाचा अभ्यास करावयाचा तो निर्विकार मनानें करावा त्यासंबंधीं पूर्वग्रह अनुकूल किंवा प्रतिकूल करून घेऊं नये; हे पूर्वग्रह म्हणजे आरशावरील मलाप्रमाणें आहेत, अशा मलाच्छादित आरशामध्यें ज्याप्रमाणें पदार्थाचें प्रतिबिंब बरोबर उमटत नाहीं, त्याचप्रमाणें पूर्वग्रहदूषित मनामध्यें नवीन विषयाचें प्रतिबिंब स्पष्ट

पडत नाहीं. एखाद्या प्रसिद्ध ग्रंथावरील टीकात्मक संक्षेपात्मक व उपोद्घातात्मक लेख म्हणजे आरशावरील मलाप्रमाणें आहेत, अशी माझी समजूत असल्यामुळें कोणत्याही प्रख्यात ग्रंथाचा अभ्यास करतांना सटीक पुस्तक कधींही वापरावयाचें नाहीं, असा माझा बेकनच्या उपदेशान्वयें नियम असे. त्याला अनुसरून मीं कार्लाईलच्या ग्रंथाची साधी समूळ पण अटीक प्रत विकत आणिली, व ग्रंथवाचनास सुरवात केली. पहिले एक दोन भाग सहज वाचून झाले. पण जसजसें पुढें पुढें वाचूं लागलों तसतशी समजण्याची अडचण भासूं लागली. कार्लाईलची ती आधीं विलक्षण भाषा, त्यांत पदोपदीं येणारे ते ऐतिहासिक व वाङ्मयात्मक उल्लेख व अवतरणें; त्याचीं मध्यें मध्यें येणारीं उद्गार चिन्हें; तो भाषांतरात्मक भासणारा व टीकात्मक वाटणारा भाग; तीं तुटक तुटक किंवा अर्धवट टाकलेलीं वाक्यें; ते लांबलांब सामासिक व अप्रसिद्ध शब्द; ती कवितेप्रमाणें अनुप्रासात्मक गद्यरचना; त्या पानोपानीं खच्चून भरलेल्या उपमा व रूपकें; तीं लॅटिन व जर्मन भाषेतील वाक्यखंडें; या सर्व अद्वितीय लेखनपद्धतीनें माझी वाचतांना फारच धांदल उडूं लागली. काळोखांतून अनोळखी वाटेनें खांच खळग्यांतून चालतांना जी मनुष्याच्या शरीराची स्थिति होते, तीच माझ्या मनाची स्थिति झाली. आपण कोठें चाललों आहों, वाचतों याचा खरा अर्थ काय; लिहिलेला ग्रंथ सुसंगत तरी आहे काय; ग्रंथकर्त्याचा उद्देश तरी काय; हें कांहीं एक नीट समजेना. पण निश्चय केल्याप्रमाणें मीं पुस्तक शेवटपर्यंत तर वाचलें. पुस्तक संपल्यावर तें खालीं ठेवलें व एकंदर पुस्तकाचा मनावर काय परिणाम झाला हें पाहूं लागलों तों आपण धुक्यामधून चालत असतां जसें डोळ्यांपुढें प्रथमतः कांहीं एक दिसत नाहीं, त्याप्रमाणेंच माझ्या मनाची स्थिति झाली. पण हळू हळू धुकें विरत चाललें म्हणजे आपल्याला सभोंवारच्या सृष्टीचा देखावा व आपल्या डोक्यावरील चकाकणाऱ्या तारा मधून मधून स्पष्टपणें दिसूं लागतात, त्याप्रमाणें या पुस्तकापैकीं कांहीं कांहीं भाग मला स्पष्टपणें कळूं लागले व त्या भागांच्या सौंदर्यानें व भव्यपणानें मनाला आनंद वाटूं लागला व ग्रंथकर्त्याच्या विलक्षण प्रतिभाशक्तीबद्दल मनांत आदर उत्पन्न झाला. याप्रमाणें पहिल्या वाचनानें पुस्तकाबद्दल साधारणतः

अनुकूल ग्रह झाला. मग मीं तें पुस्तक दुसऱ्यांदा वाचावयास हातीं घेतलें. या दुसऱ्या वाचनाचे वेळीं अंधारांत चांचपडल्यासारखें वाटलें नाहीं. तर उलट पहिल्या वाचनानें पुस्तकाचें सामान्य धोरण, ग्रंथकर्त्याचा प्रतिपाद्य विषय व त्याच्या एकंदर मनाचा रंग थोडासा स्पष्टपणें निदर्शनास आल्यामुळें दुसऱ्या वाचनाचे वेळीं दिव्याच्या साहाय्यानें आपण चालत आहों असें वाटलें व पहिल्यानें ध्यानांत न आलेल्या गोष्टी आतां स्पष्टपणें कळूं लागल्या व ग्रंथवाचनाची जास्त गोडी लागूं लागली व ग्रंथकर्त्याचें हृद्गत जास्त कळूं लागलें. ग्रंथाच्या तिसऱ्या वाचनापासून माझा तो ग्रंथ एक आवडीचा ग्रंथ झाला, व या ग्रंथाला इंग्रजी वाङ्मयांत श्रेष्ठ स्थान कां मिळालें हें मला कळलें. असो.

कार्लाईलच्या ग्रंथाचा कठीणपणा कांहीं अंशीं त्याच्या विलक्षण भाषाशैलीमुळें उत्पन्न झाला आहे खरा, तरी पण त्याचें प्रधान कारण कार्लाईलनें आपले अप्रिय पण पथ्यकर विचार प्रदर्शित करण्याकरितां योजलेल्या युक्तीमध्यें आहे. कार्लाईलच्या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय, समाजस्थिति व मनुष्याचें तद्विषयक कर्तव्य याबद्दल आहे हें खरें. पण तो ग्रंथ एखाद्या साध्या तात्विक ग्रंथासारखा निबंधरूप नाहीं. निबंधामध्यें ग्रंथकर्त्याला आपले विचार एकापुढें एक, स्पष्टपणें व आपल्याच नांवावर लिहावे लागतात. अशा पद्धतींत ग्रंथकार नियमांनीं बांधलेला असतो. त्याला सर्व विचार उघड, सरळ व गंभीरपणें वाचकांपुढें मांडावे लागतात. परंतु अशा तात्विक निबंधाला काव्याचें रूप कधींही येऊं शकत नाहीं. कार्लाईलचा ग्रंथ तर गद्यमय काव्यग्रंथच होय. या तात्विक ग्रंथाला काव्याचें रूप देण्याकरितां कार्लाईलनें योजिलेली युक्ति विलक्षण आहे. काव्य व तत्वज्ञान यांचा मनोहर मिलाफ करण्याकरितां अशा युक्त्या ग्रंथकारांनीं योजलेल्या आहेत. प्लेटो या ग्रीक तत्वज्ञान्यानें आपले सर्व विचार आपला गुरु साक्रेटीस याच्या व इतर पात्रांच्या तोंडून वदविले आहेत, व त्याकरितां त्यानें आपल्या ग्रंथांत काल्पनिक संभाषणाची युक्ति योजिली आहे. यामुळें प्लेटोचे विचार अरिस्टाटल-प्रमाणें पुष्कळ ठिकाणीं असतांना प्लेटोचे ग्रंथ काव्यमय झाले आहेत. तर अरिस्टाटलचे ग्रंथ शास्त्रीय बनले आहेत अर्वाचीन काळींसुद्धां

तात्विक विचार प्रदर्शित करण्याकरितां संभाषणाच्या युक्तीचा उपयोग बार्क्ले, लायबनिट्स, ह्यूम वगैरे तत्वज्ञान्यांनीं केला आहे. आपले विचार प्रदर्शित करण्याकरिता पत्रव्यवहाराची युक्ति पुष्कळांनीं उपयोगांत आणलेली आहे. प्रसिद्ध मुत्सद्दी व राजनीतिशास्त्रज्ञ बर्क यानें फ्रान्सच्या राज्यक्रांतीवरील आपले विचार पत्राच्या रूपानें प्रगट केले आहेत. आपले विचार प्रदर्शित करण्याकरितां नाटक किंवा कादंबरी या युक्तीचा उपयोग करण्याचा तर बहुतेक देशांत परिपाठच आहे. या सर्व तऱ्हेच्या युक्त्यांनीं ग्रंथकर्त्यांचा हेतु साध्य होण्यास फार उपयोग होतो. आपल्या ग्रंथाला अशा एखाद्या युक्तीचें रूप दिलें म्हणजे ग्रंथ बहुजनसमाजापुढें झटदिशीं येतो. इतकेंच नव्हे, तर विषयप्रतिपादनामध्यें त्याला किती तरी स्वातंत्र्य मिळतें. अशा युक्त्यांनीं केव्हां विषयप्रतिपादन गंभीरपणें करतां येतें, तर केव्हां विनोदानें करतां येतें; केव्हां उपरोधाचा अंगीकार करतां येतो, तर केव्हां आर्जवाचा स्वीकार करतां येतो; केव्हां दोषैकदृष्टि धरतां येते, तर केव्हां "परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य" असा आव घालतां येतो; केव्हां थट्टा व टर करतां येते, तर केव्हां कळकळ दाखवितां येते; केव्हां अलंकारिक रीतीनें बोलतां येतें, तर केव्हां स्पष्टोक्तीचा अवलंब करतां येतो; सारांश, अशा एखाद्या युक्तीच्या साहाय्यानें विषयप्रतिपादनांत विलक्षण वैचित्र्य आणतां येतें; व वाचकांमध्यें त्या विषयाबद्दल तार्किक निश्चय उत्पन्न करतां येतो; इतकेंच नव्हे, तर त्या विषयाबद्दल विलक्षण मनोवृत्ति प्रदीप्त करतां येतात व त्यांना प्रवृत्तिपर बनवितां येतें. तात्विक लेखापेक्षां काव्यमय लेखाचा हाच विशेष आहे, व कार्लाईलनें योजिलेल्या युक्तीनें हाच कार्यभाग त्यानें आपल्या ग्रंथांत साध्य करून घेतला आहे.

प्रथमतः कार्लाईलनें जर्मन भाषेंतील ग्रंथांचा भाषांतरकार म्हणून इंग्लंडमध्यें नांव मिळविलें. जेव्हां त्याला इंग्रजींत स्वतंत्र ग्रंथरचना करण्याची स्फूर्ति झाली व त्या ग्रंथरचनेंत आपल्याच समाजांतील दोषांचें आविष्करण करण्याची कल्पना मनांत आली, तेव्हां भाषांतरकार किंवा दुभाष्या हीच भूमिका ग्रंथात स्वीकारणें त्याला सोईचें वाटलें. आपल्या समाजाचे दोष दाखविण्याकरितां गोल्डस्मिथनें अशीच युक्ति योजिली होती. 'एका चिनी माणसाचीं पत्रें' हा गोल्डस्मिथचा ग्रंथ या युक्तीचाच

एक मासला होय. भाषांतरकाराच्या भूमिकेमुळें ग्रंथ खरोखरीच भाषांतर-रूपच आहे,' असा भास कार्लाईलला जनमनांत उत्पन्न करतां आला, व आपलें नांव गुप्त ठेवतां आलें. जेव्हां खंडशः कार्लाईलचा ग्रंथ प्रसिद्ध होऊं लागला तेव्हां खरोखरीच जर्मनग्रंथाचें तें भाषांतर आहे असें पुष्कळांना वाटलें व त्यांनीं जर्मनींत त्या पुस्तकाबद्दल चवकशी केली. कांहींनीं जर्मनीचा नकाशा बारकाईनें पाहून कार्लाईलनें उल्लेखित केलेलीं ठिकाणें नकाशांत सांपडतात कीं काय याचा तपास केला. कल्पनासृष्टीला इतकें सत्य स्वरूप देणें हें काम फारच कठीण, पण कुशलतानिदर्शक आहे. ब्रह्म हें सृष्टिरूपी आभास मायेनें उत्पन्न करतें असें वेदांत सांगतो. त्यासारखीच ही कवीची कल्पनाशक्ति होय व तिनें केलेला आभास मायेनें केलेल्या आभासाइतका बेमालुम असतो यांत शंका नाहीं.

इतक्या विवेचनानंतर कार्लाईलच्या विचारकंथेचें सामान्यस्वरूप आतां थोडक्यांत सांगतां येईल. या ग्रंथाचीं तीन पुस्तकें केलेलीं आहेत. हा ग्रंथ जर्मनींतिल सर्वविद्याविशारद अशा एका जर्मन प्रोफेसराच्या 'नेपथ्य-मीमांसा' नांवाच्या ग्रंथाचें भाषांतर आहे असें कार्लाईलनें मिष केलें आहे. व तें भाषांतरही एकसारखें व सरळ आहे अशांतला भाग नाहीं. 'जो जो मूळ ग्रंथाचा भाग आपल्याला उपयुक्त व विलक्षण वाटला त्या त्या भागाचें मधून मधून आपण भाषांतर करणार आहों' असें दुभाषा या नात्यानें कार्लाईलनें सांगितलें आहे. पहिल्या पुस्तकांत मूळ ग्रंथाच्या भाषांतरांत आपल्याला काय काय अडचणी आल्या; तसेंच आपण जर्मनींत असतांना ह्या प्रोफेसराशीं गांठ पडली तेव्हां आपल्याला त्याच्या गूढ व गहन विचारांबद्दल किती आदर व कौतुक वाटत असे, याचें निवेदन करून ग्रंथांतील कांहीं उताऱ्यांचें मासल्याकरितां भाषांतर केलें आहे असें भासविलें आहे. दुसऱ्या पुस्तकांत या प्रोफेसराचा जीवनवृत्तांत थोडक्यांत दिला आहे. तोही बहिरंग व अंतरंग या दोन स्वरूपाचा आहे. बहिरंगांत प्रोफेसराचा जन्म, बालपण, तरुणपण, तरुणपणांत प्रेमासंबंधीं आलेला अनुभव व त्यायोगें उत्पन्न झालेलें नैराश्य व वैराग्य यांचें वर्णन असून प्रोफेसरसाहेबांच्या जगत्प्रवासाचा नुसता उल्लेख केलेला आहे. या जीवन-वृत्ताच्या अंतरंगांत प्रोफेसरसाहेबांच्या शिक्षणाचा व मानसिक विका-

साचा इतिहास दिलेला आहे. हाच भाग जास्त महत्वाचा आहे. ज्याप्रमाणें डिकिन्सची ' डेव्हिड कॉपरफील्ड ' ही कादंबरी बरीच आत्मचरित्रपर आहे असें समजतात त्याचप्रकारें या कार्लाईलच्या पुस्तकांतला बराच भाग आत्मचरित्रपर आहे असें म्हणतात. विशेषतः प्रोफेसरसाहेबांच्या मानसिक विकासाचें जें चित्र रेखाटलें आहे, तें कार्लाईलच्या ' आध्यात्मिक पुनर्जन्माच्या ' अनुभवावरून लिहिलें आहे यांत शंका नाहीं. या चित्राच्या योगें अर्वाचीन काळच्या सुशिक्षित माणसाच्या मनःपरिवर्तनाचें दिग्दर्शन करण्याचा कार्लाईलचा मानस होता. आपला मनोविकास म्हणजे एक सार्वत्रिक दिसून येणारा चमत्कार होय असें वाटून त्यानें त्याचें इतकें सविस्तर वर्णन केलें आहे. ग्रंथाच्या तिसऱ्या पुस्तकांत कार्लाईल परत नेपथ्यमीमांसेकडे वळला आहे, व त्या ग्रंथांतील मुख्य मुख्य विषयांचें प्रतिपादन करून कार्लाईलनें वाचकांची रजा घेतली आहे. ग्रंथाचें रहस्य समजण्याचे दृष्टीनें दुसऱ्या पुस्तकापासून सुरुवात करणें सोईचें आहे असें वाटल्यावरून दुसऱ्या पुस्तकाचें विवेचन आधीं केलें आहे. तरी आतां जर्मन प्रोफेसर सोहबांच्या जीवनवृत्तांताकडे वळूं.

३

# विचारकंथेच्या कल्पित जनकाचा जीवनवृत्तांत.

[ या लेखांत उच्चार करण्यास कठीण व कानाला अत्यंत अपरिचित अशीं मूळ ग्रंथांतील जर्मन नांवेंच कायम ठेविलीं आहेत. हीं विलक्षण नांवें कार्लाईलनें अशा खुबीनें बनविलीं आहेत कीं, त्यांचा उच्चार कार्लाईलच्या चरित्राशीं संलग्न असणाऱ्या खऱ्या नांवाचा अस्पष्ट आभास उत्पन्न करतो. शिवाय या काल्पनिक नांवांचा शब्दार्थही त्याच्या चरित्रांतील खऱ्या गोष्टी सूचित करतो व ग्रंथांतील विषयही ध्वनित करतो. उदाहरणार्थ, ' एनटेफूल ' हें नांव कार्लाईलचें जन्मग्राम एकलफेकन याची अस्पष्ट आठवण करून देतें. शिवाय ' एनटेफुल ' याचा अर्थ ' बदकाचें तळें ' असा आहे. यावरून मनुष्यजात म्हणजे बदकासारखी अनुकरणप्रिय आहे असें ध्वनित केलें गेलें आहे. ' फुटराल ' याचा अर्थ ' खड्गकोष ' अथवा म्यान असा आहे. यावरून कार्लाईलचा जन्म लढवय्ये घराण्यांतील आहे असें ध्वनित होतें. ' ग्रेटशन ' हा मार्गारेट या इंग्रजी नांवाचा जर्मन अपभ्रंश आहे. मार्गारेट, हें कार्लाईलच्या आईचें नांव होतें. ' वाईझनिष्टवो ' विश्वविद्यालय याचा अर्थ ' कोठें आहे ठाऊक नाहीं ' असा आहे. यावरून कार्लाईल हा विश्वविद्यालयांत प्रोफेसर होण्यास योग्य होता, पण त्याला ती जागा मिळाली नाहीं असें सूचित केलें आहे. पुढील लेखांतील खुब्या कळण्यास इतकें स्पष्टीकरण पुरे आहे. प्रत्येक जर्मन शब्दापुढें एकदां त्याचा अर्थ कंसांत घातला आहे. ]

जर्मनींतील ' एन्टेफूल ' या गांवीं आन्ड्रीयस फुटराल ( खड्गकोष अथवा म्यान ) व त्याची पत्नी रहात होतीं. त्यांना अजून मूलबाळ नव्हतें; यामुळे तीं एकटींच होतीं व उतार वय होत चाललें होतें तरी तीं सुखासमाधानानें रहात असत. आन्ड्रीयस हा प्रशियाचा

राजा मोठा फ्रेडरिक याचे कारकीर्दींत सैन्यांत हवालदार होता, व नंतर तो पलटणीचा शिक्षकही झाला होता. पण आतां भालाबर्ची टाकून त्यानें कुदळपावड्यांचा स्वीकार केला होता व लहानशी फळबाग करून त्यावर तो मोठ्या स्वाभिमानानें आपली उपजीविका करीत असे. सताळु, सफरदळ, द्राक्षें वगैरे अनेक प्रकारचीं फळें ऋतुमानाप्रमाणें त्याचे बागेंत होत व त्यांची तो किफायतशीर विक्री करीत असे. सायंकाळीं तो धूम्रपान करण्यांत वेळ घालवी, किंवा पलटणींतील शिक्षकाला अनुरूप असें कांहीं तरी वाचीत असे किंवा कथाप्रिय शेजाऱ्यापाजाऱ्यांना त्याच्या मतें एकमेवाद्वितीय अशा फ्रेडरिक राजाच्या जयाबद्दल व आपल्यासारख्या गरीबाजवळ राजेसाहेबांनीं प्रत्यक्ष बोलण्याचा अनुग्रह कसा केला याबद्दल गोष्टी सांगत असे. तो प्रसंग असा—आन्ड्रीयस हा एकदां लष्करच्या छावणींत पहाऱ्यावर होता. त्यानें पुढून येणाऱ्या माणसाजवळ परवलीचा शब्द विचारला असतां राजाच्या हुजऱ्याकडून उत्तर येण्यापूर्वींच राजेसाहेबांनीं "चूप रहा रखवालीच्या कुत्र्या," असें स्वतः म्हटलें. [ आन्ड्रीयसच्या अभिमानपूर्वक सांगितलेल्या गोष्टीवरून हिंदु समाजांतील एका हरदासी गोष्टीची आठवण झाल्याखेरीज रहाणार नाहीं. एक विवाहित स्त्री आपल्या सखीजवळ मोठ्या अभिमानानें सांगत होती, "आज तिकडून माझ्याजवळ बोलणें झालें!" मैत्रिणीनें विचारलें, "हें कसें काय झालें ?" ती स्त्री म्हणाली, "मी होते दारापाठीमागें उभी. बाहेरून येणें झालें व दारापलीकडे असतांना 'आंत कोण आहे' असें विचारणें झालें. व मी म्हटलें 'मी'!" ]

झुंजाररावानें ज्याप्रमाणें आपल्या सौंदर्यानें नव्हे तर शौर्यानें कमळजेला मिळविलेली होती त्याप्रमाणेंच आन्ड्रीयसनेंही आपली गृहिणी ग्रेटशन ( मार्गारेट या इंग्रजी शब्दाचें जर्मन रूप ) ही मिळविली होती. पण ग्रेटशन कमळजेप्रमाणें ताटाखालचें मांजर होऊन रहाणारी नव्हती. आन्ड्रीयस नेहेमीं ह्मणे कीं, बायका कह्यांत राहणाऱ्या नाहींत. तरी पण आपल्या पतीचें शौर्य व शहाणपणा या गुणांमुळें तिचें त्याच्यावर खरें प्रेम होतें. कारण पलटणींतील हवालदार व शिक्षक म्हणजे तिच्या दृष्टीनें भीष्म व द्रोणच होत. तेव्हां जरी ग्रेटशन ही केव्हां केव्हां रागावत असे,

तरी पण पतिव्रतेप्रमाणें ती त्याची सेवाचाकरी करी, व त्याच्या जवळ-जवळ असे. ती सर्व धुणेंपांणी, जेवणखाण व शिवणटिपणें करी. त्यामुळें आन्ड्रीयसचे कपडेलत्तेच नव्हे तर घरांतील सर्व जागा नीटनेटक्या व आल्हादकारक असत. त्याचें घर चांगलें प्रशस्त व रंगवलेलें होतें. तें फळझाडें, रानझाडें व लतावेली यांनीं आच्छादिलेलें होतें. तसेंच तें उंचवट्यावर असून त्याच्या सभोवार हिरव्यागार गवतानें आवृत्त अशा जमिनीच्या पट्या होत्या. घराच्या खिडक्यांतून वेलींचीं मुळें बाहेर डोकावत होतीं. घराच्या वळचणीला पावसाचा त्रास न होईल अशा व्यवस्थित तऱ्हेनें ठेवलेलीं बागेंतील हत्यारें होतीं, व घराच्या आसपास उन्हाळ्यांत ज्यावर बसून राजालाही धूम्रपान करण्याची इच्छा व्हावी अशीं बाकें टाकलेलीं होतीं. ग्रेटशनच्या टापटीपीनें अशा तऱ्हेची व्यवस्थित व आल्हाददायक ती शेतवाडी होती. त्यामध्यें आन्ड्रीयसच्या मजबूत हाताची व बागाइताच्या कौशल्याची भर पडली होती. मग तें ठिकाण इतकें मनोहर असावें यांत नवल काय?

अशा या प्रच्छाय स्थळीं एके दिवशीं संध्याकाळीं एक ऋषितुल्य माणूस आंत आला व त्या आश्चर्यचकित दंपत्याला गंभीरपणें नमस्कार करून तो त्यांच्यापुढें उभा राहिला. त्यानें आपलें सगळें आंग पांघरुणानें गुरफटून घेतलें होतें. अधिक कांहींएक न बोलतां त्यानें त्या पांघरुणांत हिरव्या रेशमी कपड्यांत गुंडाळलेलें टोपलीसारखें कांहीं तरी बाहेर काढून मेजावर ठेविलें, व तो त्या पतिपत्नीस म्हणाला, "तुम्हीं चांगलीं धर्मशील माणसें आहांत. ही पहा तुमच्याकरितां मी एक अमूल्य ठेव आणिली आहे. तिची चांगली काळजी घ्या; तिचा खबरदारीनें उपयोग करा. असें केल्यास ही ठेव परत करते वेळेस तुम्हांस चांगला मोबदला मिळेल. तसें न कराल तर उलट पक्षीं कडक शासन भोगावें लागेल. हे विलक्षण शब्द स्पष्ट, चिरस्मरणीय व घंटेसारख्या खणखणीत आवाजानें उच्चारून तो परका माणूस सफाईनें परतला व आन्ड्रीयस व त्याची गृहिणी हीं दोघेंजणें आश्चर्यसंमूढतेनें प्रश्न किंवा उत्तर करतात न करतात तोंच तो पार नाहींसा झाला. दाराबाहेरही त्याचा मागमूस लागेना. तो त्या झाडींतून व अंधारांतून निघून गेला. त्यानें जातांना बागेचें फाटक

लावून घेतलें होतें. हा सर्व प्रकार इतक्या शांतपणें, इतका एकाएकी व इतक्या थोड्या वेळांत घडला कीं, हा काय सर्व कल्पनेचा खेळ आहे, कीं, ही कोणा देवदूताची करणी आहे अशी त्या जोडप्यास शंका आली. परंतु कल्पनेला किंवा देवदूताला आणतां येणार नाहीं अशी साक्षात् इन्द्रियगोचर हिरव्या रेशमी कपड्यानें झांकलेली टोपली मूर्तिमंत त्यांच्या दिवाणखान्याच्या मेजावर होती. अर्थात् या टोपलीकडे लक्ष देणें त्यांना भाग होतें व म्हणून मेणबत्ती आणून त्यांनीं त्या टोपलीवरील आच्छादन दूर केलें तों काय आश्चर्याची गोष्ट, त्यांना त्या टोपलींत राजरत्न किंवा राजाचिन्ह सांपडलें नाहीं, तर मऊ मखमालीच्या व पराच्या गादीवर शांतपणें निजलेलें गुलाबी रंगाचें अर्भक आढळलें. त्या मुलाच्या शेजारीं सोन्याच्या नाण्यांनीं भरलेला कसा होता. त्या नाण्यांची संख्या किती होती हें कांहीं समजण्यासारखें नव्हतें. तसेंच त्या मुलाच्या शेजारीं नामकरणाचें दाखलेपत्र होतें. दुर्दैवानें त्या पत्रांतील फक्त नांव मात्र लागत होतें; माहिती देण्यास दुसरा कागद किंवा खूण कांहींएक नव्हती.

तेव्हां व पुढें केव्हांही आश्चर्य किंवा अंदाज करणें व्यर्थच होतें. एन्टेफूल या गांवांत दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीं त्या परकी माणसाची कांहीं एक वार्ता कळली नाहीं. शेजारच्या शहरांतून चार घोड्यांच्या गाडींतून गेलेल्या प्रवाशाचा या प्रकाराशीं संबंध जोडणें म्हणजे निव्वळ वेडेपणा होता. दरम्यान आन्ड्रीयस व त्याची पत्नी यांना त्या निजलेल्या गुलाबी मुलाचें काय करावयाचें हा मोठा प्रश्न होता. अर्थात् सालस व प्रेमळ कुटुंबी माणसाप्रमाणें त्यांनीं हा प्रश्न सोडविला. या मुलाची जोपासना करण्याचा त्यांनीं निश्चय केला. उगीच रिकामटेकड्या चवकस मंडळीचें तोंड बंद करण्याकरितां आपल्या एका दूरच्या नातेवाईकाचा हा पोरका मुलगा आहे असें सांगून त्या दांपत्यानें त्या मुलाच्या जोपासनेस प्रारंभ केला. ईश्वराच्या कृपेनें त्यांच्या प्रयत्नाला यश येऊन त्या गूढजन्म मुलाची शारीरिक, मानसिक व नैतिक वाढ होऊन तो डायोजीनीस टॉयफलसड्राख ( सैतानवल्ली--भुतेंखेतें नाहींशीं करणारी औषधी ) या नांवाच्या वाईझ्झनिष्टवो या नव्या विश्वविद्यालयांत वस्तुमात्राचें ज्ञान करून देणाऱ्या नव्या विद्येचा प्रोफेसर झाला किंवा होण्यास पात्र झाला.

टॉयफल्सड्राखच्या जन्माच्या गूढाबद्दलची वरील हकीगत त्याला त्याच्या प्रेमळ आईनें बाराव्या वर्षी प्रथम सांगितली, तेव्हां त्याच्या मनावर त्या हकीगतचा विलक्षण परिणाम झाला. " तूळ राशीवर सूर्य असतांना माझ्या बापाच्या बागेंतील घरांत येणारा ऋषितुल्य माणूस कोण असावा बरें ? या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मिळण्याकरितां प्रेम व शोक या दोन विकारांनीं व्याकूळ झालेलें माझें मन फार अधीर होई. मी एकटा असलों किंवा दुःखांत असलों म्हणजे माझें मन आशाळभूत-पणें त्या माझ्या अज्ञात पित्याकडे धांव घेई. माझे वडील कदाचित् माझ्याजवळ असतील कदाचित् दूर असतील, पण कोणत्याही तऱ्हेनें ते मला अदृश्यच आहेत. पण ते येऊन मला आपल्या हृदयाशीं घट्ट धरतील काय ? असें होईल तर माझीं किती तरी दुःखें पार दूर जातील. माझे बाबा या जगांत अजून जिवंत असतील काय ? किंवा ते परलोकीं कायमचें विश्रांतिसुख घेत असतील ? मी अजून तें रेशमी कापड जपून ठेविलें आहे. माझें नांवही तेंच ( नामकरणपत्रांत असलेलें ) राखलें आहे. माझ्या नांवाबद्दल किती तरी वेळां मीं विचार केला आहे व त्या-बद्दल अटकळ करण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या वडिलांचेंच का हें नांव ! मी पलटणींच्या शिपायांच्या याद्या धुंडाळल्या आहेत, तसेंच वर्गणीदारांच्या याद्या चाळल्या आहेत; पण टॉयफल्स-ड्राख हें नांव मला कोठेंही मिळालें नाहीं ! आणखी ' डायोजीनीज ' या ग्रीक नांवाचा अर्थ काय ? त्या पाटीवाल्यानें या नांवाच्या योगानें माझें भविष्य वर्तविलें होतें किंवा त्याच्या त्या वेळच्या मनःस्थितीचें तें नांव दर्शक होतें ? कदाचित् दुसरा अंदाज खरा असेल. कदाचित् दोन्हीही बरोबर असतील! माझ्या वडिलांना परभृताप्रमाणें आपल्या पिलांचा दुसऱ्याकडून संभाळ कां बरें करावा लागला ? बाबा, तुमची इहलोकची यात्रा सुरळीत पार पडली काय ? आपण खरोखरी दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडलां होतां काय ? किंवा आपल्या हातून दुष्कृत्य घडलें होतें काय ! मला केव्हां केव्हां असें वाटे कीं, तुमच्या बिकट जीवनकलहांत त्या काल-महात्म्यानें तुह्माला बिघडविलें असेल; तुमचा पाणउतारा केला असेल; तुह्मांला पंगू केलें असेल; तुमच्या हातांत बिड्या घातल्या असतील;

तुह्मांला दुखापत केली असेल; शेवटीं तुमचा प्राणनाश केला असेल; ह्मणूनच तुमच्या मूळच्या सत्त्वशील आत्म्याला रागाचा त्वेष आला असेल व त्या रागाच्या झपाट्यांत सैतानाच्या विरुद्ध बोलती चालती मूर्तिमंत प्रतिज्ञा व भविष्यकालाला मूर्तिमंत विनंति ह्मणून माझें टॉयफलसड्राख असें नांव आपण ठेविलें काय ? कारण नांवांत काय जादू नाहीं. या जगांत अवतीर्ण होणाऱ्या प्रत्येक आत्म्याला नांवरूपी पांघरूण आपण प्रथम गुंडाळतों. तें नांव मग त्या आत्म्याला त्याच्या शरीरापेक्षांही जास्त घट्ट चिकटलेलें असतें. कारण मनुष्य मेल्यावरही त्याचें नांव हजारों वर्षें टिकतें. अशा या आत्म्याला चिकटलेल्या नांवाचा जादुगिरीसारखा परिणाम आत्म्यावर होत नसेल काय ? विशेषतः अगदीं लहानपणीं जेव्हां मनुष्याचें मन लहान रोपट्याप्रमाणें मऊ व सहज वळविण्यासारखें असतें तेव्हां या नांवाचा केवढा परिणाम त्यावर होत असेल ! या नांवाचा महिमा काय वर्णावा ? खरोखर विचार केला असता सर्व शास्त्रें व काव्यें ह्मणजे यथार्थ नामकरणच होय. मनुष्याचा आदिपिता ॲडम याचें पाहिलें काम नांवें देण्याचेंच होतें व मनुष्यजात तेंच आदिपित्याचें काम चालवीत आहे. मग हे सृष्टपदार्थ सेन्द्रिय असोत, निरिंद्रिय असोत, आकाशस्थ असोत, किंवा काव्यामधील मनोविकार, सद्गुण किंवा संकटें असोत. अगदीं स्पष्ट शब्दानें म्हणच सांगते कीं, ‘ एखाद्याला चोर म्हणा म्हणजे तो कालेंकरून चोरी करील; ’ त्याप्रमाणेंच एखाद्यास डायोजीनीस टॉयफलसड्रॉख म्हणा म्हणजे तो ‘ नेपथ्य-मीमांसा ’ करील.”

बाराव्या वर्षी या मुलाच्या डोक्यांत आपल्या जन्माविषयींचें गूढ कळल्यामुळें कोणत्या प्रकारचे विचार घोळूं लागले हें सांगण्यांत आपण जरा जास्त पुढें मजल मारली पण आतां आपल्याला थोडें मागें वळलें पाहिजे.

आपण का कसे, व कोठें जन्मास आलों याबद्दल जन्मतः इतर माणसांप्रमाणें अगदीं अजाण असणारा ( कस्त्वं कुत आयातः ) आमचा होतकरू टॉयफलसड्राख (लडिवाळपणें—डॉयोजीनीस या शब्दांतील उत्तरार्धाचें हें अपभ्रष्ट रूप आहे—असें टोपण नांव त्याला त्या जोडप्यानें दिलें होतें.) उजेडाकडे पाहूं लागला; आपले हातपाय व आपलीं दहा

वाट पसरूं लागला; तसेंच तो लक्ष देऊं लागला; चव घेऊं लागला व चांचपडूं लागला; सारांश, आपल्या सर्व ज्ञानेंद्रियांचा तसेंच तहानभूक इत्यादि वासनांचा उपयोग करून या जगाचें ज्ञान मिळवूं लागला. त्याची वाढ जोरानें चालली. पंधरा महिन्यां त्याला बोलायाला येऊं लागलें.

मुलाची बाल्यावस्था फार सुखदायक अ. ते असें ह्मणतात तें खोटें नाहीं. या वयांत जेवायला, खायला, राहायला, निजायला, फुकट मिळतें. ह्मणण्यासारखें काम नसतें. तरी पण या वयांतच पुढील कामासूपणाचा पाया घातला जातो. कारण मुलांची निष्कारण मोडतोड व नासधूस करण्याची व खेळाची प्रवृत्ति ह्मणजेच त्यांची उत्पादक उपजत बुद्धि होय. त्या वामन मूर्तीला वाटते कीं, आपण मनुष्यकोटींत जन्मलों आहों व आपलें कर्तव्यकर्म उद्योग करणें हें होय. लहान मुलाला सर्वांत निवडक देणगी म्हणजे एखादें हत्यार, मग तो विधायक प्रवृत्ति वाढविणारा चाकू असो कीं विघातक प्रवृत्ति वाढविणारी छोटेखानी बंदुक असो. विधायक असो, विघातक असो, पण मुलाची प्रवृत्ति कांहीं तरी करण्याची किंवा फेरबदलण्याची असते. मंडळी मिळवून कौशल्याच्या व शक्तीच्या खेळांत तो मुलगा सहकार्याचे धडे शिकत असतो यांत शंका नाहीं.

टॉयफलड्राख—नव्हे ग्रेशन—याचे जोपासनेंत या बाबतींत समाधानकारक स्थिति नव्हती. यथेष्ट विषयनिरीक्षण, प्रेमळ स्वभाव व जिज्ञासा यांसंबधी त्याची सुस्थिति होती, पण हालचाल, मोडतोड व उद्यमवृत्ति या बाबतींत ग्रेशनचे पालक त्यास मनाप्रमाणें वागूं देत नसत. त्याला आज्ञाधारकपणाचे कडक धडे शिकावे लागत. यामुळें या मुलामध्यें प्रवृत्तीपेक्षां निवृत्ति, आचारापेक्षां विचार, संगतिप्रियतेपेक्षां एकांतप्रियता यांची वाढ ज्यास्त झाली. याचें निदर्शन या मुलाच्या आवडीनिवडीवरून स्पष्टपणें होतें. ग्रेशनला सायंकाळचें आपलें जेवण ( दुधांत शिजविलेले पावाचे तुकडे ) बागेच्या भिंतीवर बसून जेवण्यास फार आवडे. त्याला भिंतीवर चढूं येऊं लागलें होतें. आन्ड्रीयसनें आपलीं झाडें छाटावयाची शिडी भिंतीला लावलेली असली म्हणजे भिंतीवर जाण्याची त्याला एक मजाच वाटे. येथें तो क्षणोक्षणीं रंग पालटणाऱ्या आकाशाकडे व दूर असलेल्या पर्वताकडे सारखा पहात राही. तसेंच त्या मुलाला मुंग्यां

जनावरांची व पक्षांची फार आवड असे. यामुळें एकंदर प्राणिमात्राबद्दल त्याच्या मनांत सहानुभूति उद्‌भूत होत गेली. ग्रेशनच्या मानासिक विकासाचें महत्वाचें एक साधन म्हणजे एनटेफूल या गांवीं भरणारा गुरांचा वार्षिक बाजार होय. या ठिकाणीं प्रांतोप्रांतीचे व निरनिराळ्या धंद्याचे लहानथोर, गरीब व श्रीमंत लोक एकत्र जमत असत व मौजा मारीत असत. त्या बाजाराच्या दिवसांत ग्रेशनच्या दृष्टीस किती तरी पोषाखाच्या तऱ्हा, वागण्याच्या तऱ्हा व बोलण्याच्या तऱ्हा पडत असत. तसेंच आन्ड्रीयसला ऐतिहासिक गोष्टी व दंतकथा सांगण्याचा फार नाद असे. त्यामुळें मुलाला लहानपणापासून इतिहास व चरित्रें ऐकण्याची गोडी लागली.

या स्वाभाविक मनोविकासाबरोबर अर्थात् त्याचें शाळेंतील शिक्षण चालूं होतें. त्याला लिहावाचायास तर फारच लवकर शिकविलें गेलें व त्या गांवच्या शाळेंत होणारें सर्व शिक्षण झाल्यावर ग्रेशनला दुय्यम शिक्षणाच्या शाळेंत पाठविण्यांत आलें. आपल्या बापाबरोबर पाहिल्यांदाच हिन्टरश्लाग जिमनाशियम ( ठोकपट्टीची शाळा. या शाळेंत ठोकाशिवाय दुसरें कांहीं मिळत नसे ) मध्यें जाण्याकरितां त्या गांवच्या मुख्य रस्त्यावर त्यानें पाऊल टाकलें तोंच त्याला एक विलक्षण देखावा दिसला, व त्याचा त्याच्या मनावर अचल परिणाम घडला. कांहीं वात्रट मुलांनीं एका कुत्र्याच्या शेपटीला एक जस्ताची किटली बांधली होती व तिच्या भीतीनें तो कुत्रा जोरानें धांवत होता. जों जों तो जोरानें धावे, तों तों ती किटली ज्यास्त ज्यास्त जोरानें वाजे; व ती किटली जों जों जोरानें वाजे तों तों त्या कुत्र्याला ज्यास्तच चेव येई व तो ज्यास्त ज्यास्त जोरानें पळे. याप्रमाणें तो कुत्रा तीव्र वेदना भोगीत गांवभर पळाला व सर्व गांवभर त्याची ख्याती झाली.

या शाळेंत आल्यापासून ग्रेशनच्या दुःखास आरंभ झाला. हा एकलकोंडा व शांत स्वभावाचा होता. यामुळें शाळेंतील वात्रट मुलें याची कुचेष्टा करीत व याला त्रास देत. त्याचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य त्याच्यामध्यें नव्हतें. कारण तो वयानें त्या मुलांपेक्षां लहान होता. तेव्हां त्याचा शेवटचा उपाय म्हणजे रोदन हा होता, म्हणून तेरा वर्षांपर्यंत त्याला ' रडत राऊत ' किंवा रडवी भागुबाई म्हणत असत.

या शाळेंत ग्रेशननें तीन वर्षें घालविलीं. त्या वेळीं त्याचा बाप आन्ड्रीयस हा वारला. मृत्यूची पहिली कल्पना त्याला तेव्हां आली. अर्थात् घरांतील सर्वांना अत्यंत दुःख झालें, व याच वेळीं त्याची आई ग्रेटशन हिनें मागें उल्लेख केल्याप्रमाणें त्याच्या जन्माचें गूढ त्याला सांगितलें. यामुळें ' आपण दुहेरी पोरके झालों ' असें ग्रेशनला वाटलें. असो.

परंतु या घरगुती अडचणींस न जुमानता ग्रेशननें आपलें शिक्षण चालू ठेवून तो विश्वविद्यालयांत शिरला व तेथीलही अभ्यासक्रम त्यानें पुरा केला असें दिसतें. मात्र यामध्यें त्याला त्याच्या घरच्या गरिबीमुळें फार अडचणी आल्या व त्यानें मोठ्या हालअपेष्टांत हे दिवस काढले याच दिवसांत त्याची टाऊगुड ( भलं कर ) या नांवाच्या इंग्लंडांतून जर्मनींत शिकण्याकरितां आलेल्या एका गृहस्थाशीं मैत्री जमली. टॉयफल्सड्राखसारख्या गूढ व एकांतप्रिय स्वभावाच्या माणसाची कोणाशीं मैत्री जमणें कठीण. पण समानशीलत्वानें म्हणा किंवा समानमतामुळें म्हणा, पण या दोघांची मैत्री जमली हें खास. या दोघांची आयुष्याच्या इतिकर्तव्यतेबद्दल, विश्वविद्यालयातील निरुपयोगी शिक्षणाबद्दल, शिकलेल्या तरुण माणसाला व्यवहारांत योग्य धंदा मिळण्यास व त्यांत शिरकाव होण्यास कशी अडचण पडते याबद्दल मजेदार संभाषणें होत. या संभाषणांत जगातील स्थितीचें काळेंकुट्ट चित्र रेखाटण्यांत दोघांही मित्रांची चढाओढ चालत असे.

विश्वविद्यालयांत ग्रेशननें कायद्याचा अभ्यास करून त्यात प्राविण्य मिळविलें, पण त्याच्यासारख्या भिडस्त, एकलकोंड्या व मागे मागें घेणाऱ्या तरुणाचा या धंद्यांत शिरकाव कसा व्हावा ? शिवाय त्याचा सामाजिक दर्जाही कमी प्रतीचा व वशिल्याशिवाय त्या धंद्यांत प्रवेश होणें दुरापास्त. शिवाय त्याची आवड इकडे नव्हती हें निराळेंच. अशा स्थितींत विश्वविद्यालयांतून बाहेर पडल्यावर " आतां पुढें काय ? " हा प्रश्न दत्त म्हणून त्याच्या पुढें उभा रहावा हें साहाजिक होतें. " कोठें खासगी शिकवणी धर; कोठें एखाद्या मासिकास लिही; कोठें एखाद्या पुस्तकाचें भाषांतर कर, " अशा तऱ्हेनें त्याला आपली तहानभूक शमविण्याचें साधन जो पैसा तो मिळवावा लागला. पण या धंद्यावरची

मिळकत ती काय असणार ? पण कसा तरी त्याचा त्यावर गुजारा चालला होता हें खास. याच सुमारास टॉयफलसड्रॉखची आईसुद्धां वारली, व तो या अफाट जगांत अगदीं एकटा राहिला.

वरील विवेचनावरून टॉयफलसड्राख याचा स्वभाव कसा बनत चालला होता हें समजून येईल. घरांत बहिणभावंडें नसल्यामुळें व शाळेंतही मुलांशीं नीटसें न जमल्यामुळें तो एकांतप्रिय बनला होता. घरांतील हें करूं नको, तें करूं नको अशा नकारार्थी शिस्तीनें तो कार्याक्षम झाला होता. अंगच्या बुद्धिमत्तेमुळें व वाचनाच्या नादामुळें तो मननशील झाला होता. दुसऱ्या माणसाशीं त्याचा फारसा संबंध न आल्यामुळें त्याच्या मनाचा विकास बहिर्मुख न होतां अन्तर्मुख झाला होता. सारांश, त्याच्या गूढजन्माप्रमाणें त्याचा स्वभावही गूढ बनला होता. अशा एकांतप्रिय, अन्तर्मुख, कार्याक्षम, मननशील स्वभावाच्या माणसामध्यें उचंबळणारे मनोविकार राहू शकतील अशी कल्पनाही होत नाहीं. तरी पण टॉयफलसड्राखमध्यें तीव्र मनोविकार होते. मात्र त्याच्या विलक्षण परिस्थितीमुळें व शिक्षणामुळें ते मनोविकार राखेनें आच्छादिलेल्या विस्तवासारखे होते. ज्याप्रमाणें राखेच्या ढिगांत विस्तव असेलसें वाटत नाहीं, पण त्या ढिगावर जर गवतासारखा जलद पेट घेणारा पदार्थ पडला तर अन्तर्गूढ विस्तव तेव्हांच प्रदीप्त होतो, त्याचप्रमाणें टॉयफलसड्राखचे मनोविकार अन्तर्मुख होते इतकेंच; पण ते प्रदीप्त करणारा विषय मिळाल्यास ते जोरानें बाहेर पडत असले पाहिजेत ही गोष्ट त्याच्या आयुष्यांत जी एक प्रेमकहाणी घडून आली व त्यायोगें त्याच्या पुढील आयुष्यावर जो विलक्षण परिणाम घडला त्यावरून दिसून येईल.

ब्लुमिन ( फुलांची राणी किंवा कुसुमावती ) या नांवाची कुमारिका कोणाची तरी चुलत बहिण होती. ती तरुण होती. तिचे डोळे काळेभोर होते; व एकंदरींत ती फार सुरेख होती. चांगल्या प्रतिष्ठित घराण्यांत तिचा जन्म झालेला होता. पण दुर्दैवानें ती द्रव्यहीन असून एका श्रीमंत नातेवाईकाच्या आश्रयानें राहिलेली व म्हणूनच परस्वाधीन होती. परंतु टॉयफलसड्राखची व तिची गांठ कोठें व कशी पडली ? एखाद्या संगीत चहापार्टीच्या प्रसंगीं गांठ पडली, किंवा रुक्ष कामाच्या निमित्तानें गांठ

पडली, किंवा टाऊगुड याच्या मार्फत गांठ पडली, किंवा एखाद्या चित्रकाराच्या दुकानांत गांठ पडली हें कांहीं खात्रीनें सांगतां येत नाहीं. पण गांठ कशीही पडली असो---ती आकस्मिक असो, कामानिमित्त असो किंवा मुद्दाम घडवून आणलेली असो, ती एखाद्या सभोंवार सृष्टिशोभा असलेल्या बंगल्यांत पडलेली असो, किंवा बागेंतील छोटेखानी बंगलींत पडली असो--ती गांठ पडली हें खास; व त्या तरुण हंसतमुख हुशार राणीच्या गुलाबी गालांकडे पाहून टॉयफल्सड्राखचा अंतर्मुख प्रेमविकार बहिर्मुख होऊन प्रदीप्त झाला व तो त्या रमणीच्या प्रेमपाशांत सांपडला. टॉयफल्सड्राखला पाहून त्या रमणीची तीच अवस्था झाली. याप्रमाणें दोघांमध्यें देखतप्रेम उद्भूत झालें. एकमेकांना एकमेकांशीं बोलण्यांत आनंद वाटूं लागला. त्यांचें निरनिराळ्या विषयांवर संभाषण झालें. तें विनोदाचें, कळकळीचें व मौजेचें झालें. त्या संभाषणाचे प्रसंगीं एकमेकांकडे एकमेकांना पहात रहाण्याची बुद्धि होऊं लागली. सारांश, त्या दोन व्यक्तींमध्यें प्रेमाचें आकर्षण सुरू झालें. ती भेटीची वेळ संपत आली. जातांना ब्लुमिनचा हात टॉयफल्सड्राखच्या हाताला लागला. त्यांनीं एकमेकांचा निरोप घेतला. त्यानें आपली पुनः भेट होईल अशी इच्छा प्रदर्शित केली; तिनें खुषीनें होय म्हटलें. झालें. घरीं परत आल्यावर टॉयफल्सड्राखचें मन थाऱ्यावर राहिलें नाहीं. त्याला ध्यानीं मनीं ती कुसुमावती दिसूं लागली. तिनें एका क्षणांत याच्या हृदयांत कायमची जागा पटकावली. तो प्रेमानें वेडा झाला. त्याची व तिची पुनः शहरांत गांठ पडली. आतां तर त्याच्या दृष्टीला पूर्वीपेक्षांही ती सुंदर दिसूं लागली. तिच्या सान्निध्यांत कांहीं अवर्णनीय भावना त्याचे मनांत उद्भूत होऊं लागल्या. प्रेमावरून अर्थात् भावी वैवाहिक संबंधाकडे त्याची दृष्टि वळे व त्याकडे दृष्टि वळली म्हणजे नंदनवननिवासाची कल्पना त्याचे मनांत येई. याप्रमाणें टॉयफल्सड्राखचें प्रेममनोराज्य झपाट्यानें वाढत चाललें. आपल्या प्रियकरणीचें आपल्यावर तितकेंच प्रेम आहे असा त्याचा भरंवसा होता. याप्रमाणें कांहीं काळ लोटला. टॉयफल्सड्राखच्या मनांतील प्रेमवृक्ष भराभर फोफावत चालला. तोंच एके दिवशीं सकाळीं ब्लुमिन म्लान वदनानें व अश्रुपूर्ण नयनानें टॉयफल्सड्राखकडे आली. व

कांपऱ्या स्वरानें ह्मणाली "आपल्याला यापुढें भेटतां येणार नाहीं." संपलें! टॉयफल्सड्राखवर आकाशची कुऱ्हाड पडल्याप्रमाणें झालें. "बाईसाहेब, आपला मी निरोप घेतों." असें तो म्हणाला. टायफल्सड्राखच्या स्वाभिमानाला धक्का बसला व म्हणून तो यापुढें कांहीं एक बोलला नाहीं. आपल्या दारिद्र्यामुळें हिच्या नातेवाईकांनीं हिला आपल्या मनासारखें करूं दिलें नाहीं अशी त्यानें आपल्या मनाशीं खुणगांठ बांधली. त्यांनीं दुःखित अंतःकरणानें एकमेकांचा निरोप घेतला, आणि टॉयफल्सड्राखच्या आयुष्यांतील प्रेमकहाणी येथेंच संपली. त्याच्यासारख्या गूढ स्वभावाचा माणूस एकदां प्रेम करतो; त्याचे अन्तर्मुख मनोविकार एकदांच प्रदीप्त होतात; त्याच्या मनोविकारांचा एकदांच भडका होतो!

अशा परिस्थितींत नेहेमींच्या तरुणांची काय स्थिति झाली असती. कादंबऱ्यांत व नाटकांत वर्णिल्याप्रमाणें अशा तरुणांस तीन मार्ग खुले असतात. एक तर तो भेडा बनतो व वेड्याच्या दवाखान्यांत पाठविला जातो; किंवा एकंदर स्त्रीजातीच्या बेइमानपणाबद्दल आक्रोश करीत स्त्रीद्वेष्टा होऊन सैतानी कविता करतो किंवा आपला कपाळमोक्ष करून घेतो. पण टॉयफल्सड्राखनें या तिन्ही धोपट मार्गांपैकीं एकाचाही अवलंब केला नाहीं. त्यानें आपला चतुर्थ पंथ काढला. अर्थात् त्यालाही फार वाईट वाटलें; त्याचे आयुष्यांतील आशा नष्ट झाली; त्याचे मनांत नैराश्य व वैराग्य उत्पन्न झालें पण त्यानें तें बाह्यतः कांहींएक दृष्टीस पडूं दिलें नाहीं. त्यानें आपले मनोविकार पुन्हा पूर्वींसारखे अन्तर्मुख केले, व पहिल्यासारख्या शांत तऱ्हेनें आपलें सामानसुमान बांधलें व आपला प्रवाशी सोटगा घेऊन तो प्रवासास निघाला. अर्थात् त्याला प्रवासांत एखादें इष्ट स्थान गांठावयाचें होतें, अशांतला भाग नव्हता. त्याचा प्रवास म्हणजे निव्वळ निरर्थक भटकणें होतें, यामुळें जिकडे लहर फिरे तिकडे तो जाई. त्यानें हजारों प्रांत पाहिले, सर्व जगभरच त्यानें प्रवास केला म्हणाना. या त्याच्या प्रवासाचें जर वर्णन करावयाचें मनांत आणलें तर तो एक स्वतंत्र ग्रंथच होईल.

याप्रमाणें तो फिरत फिरत एका गांवीं आला असतांना व एका रस्त्यांतून जात असतांना त्या स्थळाची स्तब्धता गाडीच्या चाकांच्या

आवाजानें मोडली. उत्तरेकडून निघून एक आल्हादजनक चार घोड्यांची गाडी दक्षिणेकडे चालली होती. गाडीच्या मागच्या पुढच्या शिपायांनीं लग्नसमारंभास साजेसे पोशाक केले होते. टॉयफल्सड्राखला वाटलें कीं, या सुखी जोडप्याची ही विवाहाच्या नंतरची पहिली संध्याकाल असावी; एका क्षणांत तें जोडपें सन्निध आलें. पण टॉयफल्सड्राखच्या दृष्टीस काय पडलें ? आपला मित्र टॉऊगुड व ब्लुमिन ! त्या दोघांनीं ओळखत न ओळखत ओझरता राम राम टायफल्सड्राखला केला व तें जोडपें शेजाऱ्च्या झाडीच्या आड गेलें व तेथून पुढें अर्थात् तें इंग्लंडला गेलें. व टॉयफल्सड्राख हा मागें अंधारांत एकटा राहिला.

## ४

# टॉयफलसड्राखचा आध्यात्मिक विकास !

कुसुमावतीनें 'आपली भेट पुनः होणार नाहीं' असें दुःखित अन्तःकरणानें सांगितल्यापासून टॉयफलसड्राखच्या मनाला जबरदस्त धक्का बसून तो आपला प्रवासी सोडगा घेऊन प्रवासास निघाला, हें वर सांगितलें; तरी पण त्याच्या अन्तःकरणांत अगदीं अंधुक अशी आशा होती कीं, कदाचित् कुसुमावतीनें जरी नातेवाईकांच्या स्वार्थी, संसारी सल्ल्यावरून आपली संगति सोडली असली तरी तिचें निरपेक्ष प्रेम आपल्यावर असल्यामुळें पुढेंमागें—कालांतरानें—तिचा आपला संयोग होण्याचा संभव आहे. म्हणूनच त्याची निराशा व वैताग हीं शिखराला जाऊन पोंचलीं नव्हतीं. पण जेव्हां त्यानें कुसुमावतीला व टाऊगुडला एका गाडींत विवाहाच्या पोषाखांत पाहिलें, तेव्हां त्याची ती अंधुक अंधुक आशाही पार रसातळास गेली. जगांत खरें प्रेम, खरा स्नेह, वगैरे सात्विक मनोवृत्ति मुळींच नसून जग हें स्वार्थी, सुखार्थी, 'मोलें घातलें रडाया, नाहीं असू आणि माया !' अशा सैतानी मनोवृत्तींनीं भरलेलें आहे; त्यांत उच्च भावनांचा गंधही नाहीं; तेव्हां असल्या जगाशीं आपल्याला काय करावयाचें आहे; अशा प्रकारची विरक्ति, वीट व वैताग टॉयफलसड्राखचे मनांत उद्भवला. पहिल्या प्रवासांत जो कांहीं तरी अंधुक, अस्पष्ट व अनिर्वाच्य असा हेतू होता तोही सर्वस्वीं नाहींसा झाला. या जगांत आपलें कोणी नाहीं, या पृथ्वीवर आपण एकटे—एकलकोंडे—आहों, आपल्या मनाच्या विसांव्याला जागा नाहीं; सारांश, ज्या प्रेमादि मनोवृत्तींमुळें मनुष्य दुःखें, संकटें, आधिव्याधी सोसतो, त्या उच्च मनोवृत्ति टॉयफलसड्राखच्या मनांतून पार नाहींशा झाल्या व त्यांच्या जागीं सैतानी-दानवी—विकार उद्भूत झाले.

याप्रमाणें प्रेमाच्या दृष्टीनें, संसाराच्या दृष्टीनें, भावी सुखाच्या दृष्टीनें त्याचें अन्तःकरण अंधकारमय झालें होतें, तर विचाराच्या दृष्टीनें त्या

मनाला कांहींएक आधार राहिला नव्हता. त्याच्या वाचनानें, त्याच्या विचारातिशयामुळें, त्याच्या सृष्टिशास्त्राच्या अतिपरिचयानें, त्या काळच्या जडवादात्मक तत्वज्ञानानें, त्या काळीं बोकाळलेल्या जनपदहितवादानें, सारांश, टॉयफलसड्राखच्या बौद्धिक शिक्षणानें त्याचा क्रिस्ती धर्मावरील विश्वास पार उडाला होता. इतकेंच नाहीं, तर एकंदर अतीन्द्रीय गोष्टी-वरील त्याची श्रद्धा, मनुष्यमात्रांतील स्वाभाविक जिज्ञासा व सृष्टीच्या गूढाबद्दल वाटणारा विस्मय, सृष्टिसौंदर्याबद्दल वाटणारें कौतुक इत्यादि उच्च मनोविकारही नाहींसे झाले होते. यामुळें जगाच्या गूढाच्या मुळाशीं परमेश्वर आहे. त्याच्याच सर्वशक्तित्वामुळें, सर्वज्ञतेमुळें, सर्वसाक्षित्वामुळें व सर्व गुणसंपन्नतेमुळें या जगाचे व्यवहार सुरळित चालत आहेत; तो परमेश्वर सर्वव्यापी आहे; सर्व चराचर जग त्याचेंच दृश्य पण अनित्य स्वरूप आहे. जगांत सैतानाचें राज्य चालू आहे असें वरवर वाटलें तरी शेवटीं सत्याचाच जय होतो, व परमेश्वरी संकेत असाच आहे. अशा प्रकारच्या अध्यात्मिक विचारांस टॉयफलसड्राखचें मन पारखें झालें होतें.

टॉयफलसड्राखच्या मनाची स्थिति याप्रमाणें अवर्णनीय झाली होती. अशा स्थितींत त्या मनानें धीर धरावा तरी कशाच्या आधारावर ? विचारानें व विवेकानें मनाला आधार देणाऱ्या आध्यात्मिक श्रद्धा, भक्ति वगैरे मनोवृत्ति नष्टप्राय करून टाकल्या होत्या. प्रेमाच्या बाबतींतील त्या दुःखमय अनुभवानें हृदयांत सर्वत्र निराशेचा अंधकार पसरला होता. ही मनाची स्थिति विलक्षण यातनामय होय यांत शंका नाहीं. कारण मनाला बुद्धीकडून किंवा हृदयाकडून कोणीकडूनच आधाराला जागा नव्हती. अशा वेळींच मनाला आपल्या दुर्बलतेची तीव्र जाणीव उत्पन्न होते व ही तीव्र जाणीवच फार कष्टमय असते. आपल्यामध्यें कर्तृत्व असेल; पण तें प्रत्यक्ष कृतीच्या रूपानें दिसेपर्यंत आत्मशक्तीचा प्रत्यय यावा कसा ? आत्मशक्तीची अंधुक, अस्पष्ट जाणीव आपल्यांत असते; पण ती दृग्गोचर होण्यास कृतिरूप आरसा लागतो. म्हणून आत्मप्रत्यय येण्यास आपल्याला काय करतां येईल, हें कळावें लागतें.

आतां टॉयफलसड्राखकडे पाहिल्यास त्याचे हातून कांहीं एक कृति झाली नव्हती; त्याच्या सर्व व्यवसायांची बेरीज पूज्यच होती. तेव्हां या

कृतिरूप आरशाशिवाय टॉयफल्सड्राखला आत्मप्रत्यय तरी कसा यावा ? त्याच्या मनांत जो अज्ञेयवाद, नास्तिक्यवाद व जी अश्रद्धा माजली होती, तिच्यामुळें त्याचा आपल्यावरील आत्मविश्वासही उडाला होता. आपल्या हातून कांहीं होण्यासारखें आहे असेंच त्याला वाटत नसे. आयुष्याचें कोडें त्याच्या बुद्धीला जास्त जास्तच गूढ व अगम्य भासूं लागलें. त्याप्रमाणेंच संसाराच्या प्रेमगूढांत त्याचा विरसच झाला होता. या अनंत विश्वांत आपण एक दुर्बळ प्राणी आहोंत. इतर सर्व प्राणीमात्रापासून आपण अलग आहोंत; या अतर्क्य जगांत आपल्या विश्वासाचें माणूस, आपल्या जीवाचा कलीजा, आपल्या जीवास जीव देणारा खरा प्रेमळ स्नेही नाहीं; येथील मैत्री खोटी आहे; येथलें प्रेम नकली आहे; सारांश, ज्याप्रमाणें जंगलांतला वाघ एकाकी भटकत असतो त्याप्रमाणें जगांत आपणही एकाकी फिरत आहों; आपल्या सोबतीस सैतानसुद्धां नाहीं, असे त्राग्याचे विचार टॉयफल्सड्राखच्या मनांत सारखे येत होते. कारण, त्याच्या नास्तिक्यबुद्धीनें जगांतून सैतानाची कल्पनासुद्धां नाहींशी केली होती. या जगांत कांहीं जीव नाहीं; या जगाला कांहीं प्रयोजन नाहीं; या जगामध्यें चांगली किंवा वाईट कर्तृत्वशक्ति नाहीं; हें जग म्हणजे एक निर्जीव प्रचंड यंत्र आहे व त्यांत सर्वांचा शेवटीं चक्काचूर व्हावयाचा आहे. अशी टॉयफल्सड्राखची समजूत होत चालली होती.

अशा मनःस्थितींत टॉयफल्सड्राख आत्महत्त्याच करून घ्यावयाचा. पण ख्रिश्चन धर्माच्या पूर्व संस्कारामुळें व कांहीं अंशीं जात्याच आळशी असल्यामुळें त्यानें आत्महत्त्या केली नाहीं. आपल्याला अकस्मात् एखाद्या गोष्टीनें मृत्यु आल्यास किती बरें होईल असे विचार मात्र वारंवार त्याच्या डोक्यांत घोळत असत.

त्याचा भूतांखेतांवर विश्वास नव्हता खरा, तरी पण कांहींएक अस्पष्ट भीति त्याच्या मनाला त्रास देई; जमीन, आकाश व यांमधला पोकळ भाग मिळून एका प्रचंड राक्षसाचा जबडा झाला आहे आणि त्या जबड्यांत आपण हळूं हळूं शिरतों आहोंत असें टॉयफल्सड्राखला वाटे. या मनोवेदना सोशीत असतांना पॅरिसच्या आसपास भटकतांना, एका अत्यंत ऊष्मा भासणाऱ्या दिवशीं टॉयफल्सड्राखच्या मनांत एकाएकीं

खालील विचार आले. ' मना, तूं कशाची भीति बाळगतोस ? भिऱ्याप्रमाणें एकसारखा कांकूं व कुरकुर कां करतोस ? कांपत कांपत व वांकून वांकून कां चालतोस ? अरे क्षुद्र द्विपाद प्राण्या ! तुझ्यापुढें वाढून ठेवलेल्या दुःखाच्या ताटांत येवढें भिण्यासारखें काय आहे ? मृत्यूच ना ? आणखी नरकाच्या यातना, सैतान व मनुष्य तुझ्या विरुद्ध जें काय करील किंवा करूं शकेल हेंच ना ? तुला धैर्य नाहीं काय ? कांहीं असलें तरी तें तुला सोसायला यायचें नाहीं काय ? तूं स्वतंत्रतेचा पुत्र आहेस, व जरी तूं बहिष्कृत असलास तरी तुझा नाश करणाऱ्या नरकाला तुला पायाखालीं तुडवितां येईल. तर मग मृत्यु किंवा दुसरा येईल तो प्रसंग यांस पाठ देण्यास तयार हो, म्हणजे झालें. ' " हा विचार माझ्या मनांत आल्याबरोबर माझ्या आत्म्यामध्यें एक प्रकारच्या तेजाचा संचार झाला व माझ्या मनांतून भीतीनें आपलें ठाणें कायमचें उठविलें. माझ्यामध्यें अवर्णनीय शक्ति अवतरली असें मला भासलें; मी आत्मा आहे—देव आहे—असें मला वाटूं लागलें. तेव्हांपासून माझ्या दुःखाला उतार पडत चालला. "

या मनःस्थित्यंतरास टॉयफलसड्रॉखनें आपला आध्यात्मिक जन्म असें म्हटलें आहे. वरील विवेचनावरून हा जन्म म्हणजे मानवी प्राण्यामध्यें जागृत होणारी स्वातंत्र्याची जाणीव होय. मनुष्यप्राणी इतर निर्जीव वस्तूप्रमाणें बाह्य कारणांवर सर्वस्वी अवलंबून नाहीं. त्याच्यामध्यें एक अद्वितीय अशी स्वातंत्र्यशक्ति आहे व त्यायोगें तो सर्व दुःखाचे पार जाऊं शकतो, अशी एकदां मनाची खातरी झाली म्हणजे मनुष्याचें दुःख नाहींसें होतें. आपल्या अंगीं अद्वितीय आध्यात्मिक तेज आहे, अशी जाणीव एकदां मनुष्यांत उत्पन्न होऊन आत्मप्रतीति आली, म्हणजे सर्व जगाकडे तो निराळ्याच दृष्टीनें पाहूं लागतो व मग त्याला तें जग पहिल्यापेक्षां निराळ्या रूपानें दिसूं लागतें. तीच आतां टॉयफलसड्रॉखच्या दृष्टीची स्थिति झाली होती.

या आध्यात्मिक जन्मानंतर टॉयफलसड्रॉखच्या बाह्यवृत्तींत फारसा फरक झाला होता असांतला भाग नाहीं. अझून तो सारखा भटकतच होता. पण सूक्ष्म दृष्टीनें पाहणाऱ्यास आतां त्याच्या भटकण्यांत कांहीं

एक हेतू असावा असें वाटलें असतें. त्याचें मन अन्तर्बाह्य दुःखानें विद्ध झालेलें होतें, तेव्हां परमेश्वरी सृष्टीकडे किंवा मानवी कृतीकडे त्याचें मुळींच लक्ष जात नसे. पण आतां त्याच्या प्रवासांत त्याचें या गोष्टीकडे लक्ष जाऊं लागलें होतें. हें त्याच्या खालील उद्गारांवरून दिसून येतें.

" शहरें व गांवें—विशेषतः पुरातन गांवें व शहरें—मी मोठ्या हौसेनें पहात असें. या योगें आपण लांब रस्त्यामधून मूर्तिमंत दूरचा काळ पहात आहों असें वाटतें. जणूं कांहीं पुरातन भूतकाळाचा एक अंश वर्तमानकाळांत आणून आपल्यापुढें उभा केलेला आहे. या जुन्या शहरांत दोन हजार वर्षांपूर्वी पेटत घातलेला चुलीचा विस्तव अजून पेटत आहे व त्याचा प्रत्यक्ष धूर आपल्याला दिसत आहे. त्याचप्रमाणें त्या काळीं, त्या ठिकाणीं मानवी जीवितरूपी अग्नीही प्रदीप्त झाला व त्याची परंपरा आतांपर्यंत सारखी चालत आली असून त्या अग्नीच्या प्रेमळ किंवा उग्र मूर्ति अर्थात प्रेमळ किंवा क्रूर प्रकृतीचीं माणसें आपल्याला आढळत आहेत.

मानवी कृतीचीं व कर्तबगारीचीं प्रमुख फळेंही गूढ, अपूर्व व सांप्रदायिक असतात. मानवी सरकाराची घटना व त्याची सत्ता, घ्या, मानवी चालीरीति व आचारविचार घ्या, कलाकुसरीचें समग्र ज्ञान व सृष्ट वस्तूंचें रूपांतर करण्याची शक्ती घ्या, या सर्व गोष्टी अवश्य व अमूल्य आहेत खऱ्या; पण त्या किल्लीकुलपांत कोंडून ठेवतां येत नाहींत. त्या अमूर्त मार्गांनीं भूतसंचाराप्रमाणें बापापासून लेकाला लाभतात. जर त्या दृष्टिपथांत आणण्याचा आग्रह धरला तर त्या कोठेंही दिसावयाच्या नाहींत. नांगरधरे व घणमारे मूर्तिमंत हवे तितके आहेत. पण त्यांचें शेतकीचें, धातुकामाचें व इतर कळाकुसरीचें कौशल्य एखाद्या दुकानांत सांठवलेलें सांपडेल काय? नाहीं. तें कौशल्य हवेंतून व सूर्यकिरणांतून कानांनीं व डोळ्यांनीं मिळतें. तें अमूर्त, अव्यक्त व आध्यात्मिक आहे. त्याचप्रमाणें कायदे कोठें आहेत, सरकार कोठें आहे, हें विचारूं नका. तें कोणत्याही देशाच्या राजवाड्यांत किंवा राजगृहांत सांपडणार नाहीं; तेथें तुम्हांला वीटा, दगड व फितीनें गुंडाळलेलीं कागदाचीं भेंडोळीं याखेरीज कांहीं एक दिसणार नाहीं. तर मग युक्तीनें बनविलेलें तें सर्व-

शक्तिमान सरकार कोठें सांपडेल ? तें सर्वत्र आहे. पण कोठेंही दिसणार नाहीं. तें फक्त त्याच्या कृतींत दृग्गोचर होईल. स्वतः तें अमूर्त, अदृश्य, गूढ व अद्‌भुत आहे; तसं आपलें सर्व आयुष्य हें आध्यात्मिक आहे. आपण जें ज करतों त्याचा त्याचा उगम गूढ, अदृश्य, आध्यात्मिक शक्तींत आहे.

भूतकाळचें दृश्य व प्रगट पहिलें फळ तीन प्रकारचें आहे असें म्हटलें तरी चालेल. राज्यव्यवस्था व लष्करी व्यवस्था यांनीं युक्त शहरें; दुसरें, रस्ते, पूल वगैरेनीं युक्त लागवडीचीं शेतें; व तिसरे ग्रथ. या तीन वस्तूंमध्यें शेवटचीचा शेवटीं शोध लागलेला आहे. पण ती दुसऱ्या दोहींपेक्षां पुष्कळ पटीनें ज्यास्त मौल्यवान् आहे. खरोखरी खऱ्या ग्रंथाचें माहात्म्य अद्‌भुत आहे ! दरसाल रसातळास मिळणाऱ्या व सदा दुरुस्ती लागणाऱ्या दगडांच्या निर्जीव शहरांसारखे ग्रंथ नाहींत. तर ते लागवडीचीं शेतें आहेत—नव्हे आध्यात्मिक वृक्ष आहेत. हे वृक्ष वर्षांनुवर्षें व युगानुयुगें टिकतात. ( कारण हजारों वर्षांचे ग्रथ उपलब्ध आहेत. ) दरसाल या वक्षांना नवीं पानें येतात. ( ग्रंथावरील टीका त्यावरून काढलेले सिद्धांत, त्यापासून निघालेले तात्त्विक किंवा राजकीय पंथ, किंवा त्यांच्या आधारानें केलेलीं प्रवचने, लिहिलेली चोपडी व वर्तमानपत्री लेख हीं सर्व या वृक्षांचीं पानें होत. ) या सर्वांमध्यें एक प्रकारची जादु भरली आहे. कारण त्या योगें मानवी मनें बनतात व बदलतात. शतका दोन शतकांत असा अद्‌भुत ग्रंथ लिहिण्याची स्फूर्ति होणाऱ्या कविवर्या, ज्याला नगरस्थापक म्हणतात त्याचा हेवा करूं नको. व ज्याला विजेता किंवा नगरनाशक म्हणतात त्याच्यावर दया कर ! तूं विजेता व विजयी आहेस; पण तू खरा विजेता आहेस. कारण तूं सैतानावर जय मिळवितोस. तूं संगमरवरी दगडाच्या किंवा धातूच्या केलेल्या स्मारकापेक्षांही ज्यास्त टिकाऊ असें स्मारक निर्माण केलें आहेस, तूं अद्‌भुत मानासिक सृष्टि—सरस्वती मंदिर—निर्मिली आहेस. या तुझ्या मंदिराच्या यात्रेस सर्व मानवी प्राणी जातील. मूर्खा ! तू पुराणसंशोधनाच्या भरांत गीझाचे दगडी मनोरे किंवा साच्चाराचे मातीचे मनोरे पाहण्याकरितां प्रवासाचा एवढा त्रास कशाला घेतोस ! मी तुला सांगतों कीं, ते तेथं आज तीन हजार वर्षें

वालुका प्रदेशाकडे मूढपणें पहात निचेष्ट व निश्चल पडले आहेत. तुला हिब्रु भाषेंतील बायबल, निदान लूथरचें रूपांतर तरी वाचतां येणार नाहीं काय ? ”

टॉयफलस्ड्राख प्रवास करतांना युरोपांत नुकत्याच घडलेल्या लढायांच्या रणमैदानावर गेला असावा असें दिसतें. त्या वेळचे त्याचे लढाईच्या तत्वज्ञानाचे विचार मनन करण्यासारखे आहेत.

“ अगदीं स्पष्ट व सरळ शब्दांत सांगावयाचें असल्यास लढाईचें तात्पर्य व पर्यवसान काय म्हणून सांगतां येईल ? उदाहरणार्थ, माझ्या माहितीप्रमाणें इंग्लंडांतील डमड्रज ( ‘तोंडदाब बुक्यामार’ ) या गांवीं साधारणतः पांचशें माणसें राहतात व काम करतात. फ्रेंच लोकांच्या कांहीं स्वाभाविक शत्रूकडून फ्रेंच लढायांच्यावेळीं यांपैकीं तीस सशक्त माणसें निवडलीं जातात. डमड्रज गांवानें आपल्या खर्चानें या लोकांचें बालपणीं संगोपन केलें; त्यानें मोठ्या आयासासायासानें या लोकांना लहानाचे मोठें केलें. त्यांना कामधंदा शिकवला, म्हणूनच एकाला विणकाम येऊं लागलें; दुसरा बांधकामांत तरबेज झाला; तिसरा घणकाम करूं लागला व त्यांतला अत्यंत दुर्बल मनुष्यसुद्धां पांच मण ओझें उचलणारा हमाल झाला. तथापि रडण्याच्या व प्रार्थनेच्या हलकल्लोळांत त्या तिसांना निवडतात, त्यांना तांबडा पोशाख देतात, व सरकारी खर्चानें दोन हजार मैल, अथवा स्पेनच्या दक्षिणेस गलबतांतून नेतात व तेथें त्यांची गरज लागेपर्यंत सरकारी खर्चानें त्याना पोसतात. आतां स्पेनच्या दक्षिणेस त्याच जागीं फ्रान्समधल्या ‘ तोंडदाब बुक्यामार ’ या गांवचे कामदारांना त्याचप्रमाणें आणतात. शेवटीं इतक्या खटाटोपानें या दोन टोळ्या एकमेकांशेजारीं येतात व हातांत एक एक बंदुक घेऊन हे साठ लोक समोरासमोर उभे राहतात. तावडतोब ‘ बंदुका झाडा ’ असा हुकूम होतो; व लागलीच हे लोक एकमेकांचा जीव घेतात; आणि साठ चपल उपयुक्त कामदारांऐवजीं जगांत साठ प्रेतें तयार होतात व त्यांना पुरावें लागतें व त्यांच्याकरितां शोक करावा लागतो.’ या माणसांचें आपसांत कांहीं तंटा भांडण होतें काय ? जरी या जगांत सैतानाचा स्वैर संचार आहे तरी या लोकांचें एकमेकांशीं काडीइतकें भांडण नव्हतें. ते एकमेकांपासून फार

दूर रहात असत; ते एकमेकांना अगदीं ओळखत नसत; नव्हे, या अफाट जगांत व्यापाराच्या योगानें न कळत ते एकमेकांना मदत करीत असत. तर मग त्यांचें भांडण कसें जुंपलें ? अरे वेड्या ! येवढें तुला कळत नाहीं. या दोन लोकांच्या राजकर्त्यांमध्यें भांडण जुंपलें. व एकमेकांचीं डोकीं उडविण्याऐवजीं या राजकर्त्यांनीं मोठ्या खुषीनें या गरीब मूर्खांचीं डोकीं उडविलीं ! अरे देशोदेशीं हीच स्थिति आहे ! ”

वरील उताऱ्यावरून टॉयफलसड्राखला आपल्या दुःखमय स्थितीचा विसर पडून सभोंवतालीं घडणाऱ्या गोष्टींकडे त्याचें आतां लक्ष जाऊं लागलें होतें असें दिसतें. यापुढल्या त्याच्या प्रवासापासून त्याला जगाचें यथार्थ ज्ञान मिळविण्याची संधि मिळाली व ती त्यानें वाया दवडली नाहीं असें वाटतें. दूरदूरचे देश, तेथलीं ग्रंथसंग्रहालयें; तेथल्या भाषा, सृष्टिकृत किंवा मनुष्यकृत दृश्यें, निरनिराळ्या ठिकाणचे राजकीय व इतर प्रमुख पुरुष त्यानें पाहिले. टॉयफलसड्राख उत्तरध्रुवाकडेसुद्धां गेला व तेथें त्याला एक धिप्पाड, रानटी मनुष्य भेटला. तो टॉयफलसड्राखला मारूं लागला, पण टॉयफलसड्राखनें आपलें छोटें पिस्तुल काढलें व तें पाहतांक्षणीं तो धिप्पाड मनुष्य टॉयफलसड्राखच्या वाटेस न जातां आपल्या वाटेनें गेला. यावरून टॉयफलसड्राखनें दारूगोळा व पिस्तुल यांच्या खऱ्या उपयोगाबद्दल उद्गार काढले आहेत. “ दारूगोळा व पिस्तुल यांचा खरा उपयोग म्हणजे सर्व माणसांना सारखेपणा आणणें हा होय. यायोगें धिप्पाड, सशक्त व बळकट आणि अशक्त खुजे व दुर्बल हा फरक नाहींसा होतो. नव्हे, ज्याला जास्त बुद्धि तोच यायोगें यशस्वी होतो यावरून शारीरिक बलापेक्षां अध्यात्मिक शक्ति जास्त ठरते. ”

वरील उताऱ्यावरून टॉयफलसड्राखच्या मनामध्यें आतां पालट होत चालला होता असें दिसतें. त्याची ती वैराग्याची, विरक्ततेची, निराशेची वृत्ति मावळून तिच्या ऐवजीं त्याचेमध्यें नवजीवन येत होतें. त्याचें प्रत्यंतर पुढील उताऱ्यावरून येतें. टॉयफलसड्राख उद्गारतो ‘ खाईस्टची कसोटी देवानें, जीर्णारण्यांत पाहिली म्हणतात. पण आपल्या सर्वांना अशा विकारवशतारूपी मोहजालाच्या कचाट्यांतून तावून सुलाखून निघा-

वयाचें नाहीं काय ? विकारवश आदिपिता ॲडम त्यापासून आपला जन्म; मग आपली विकारवशतेपासून सुटका अगदीं सोप्या रीतीनें कशी होणार ? आपल्या आयुष्याच्या भोंवतीं दैवाचा फेरा गुंडाळलेला आहे. तरी पण स्वातंत्र्य किंवा कर्तृत्वशक्ति आपल्या अंगीं आणणें, हाच मानवी आयुष्याचा खरा हेतू नाहीं काय ? अर्थात् आयुष्य म्हणजे एक निरंतरचा संग्राम आहे. विशेषतः प्रारंभीं तर आपल्याला निकराचीच झटापट करणें प्राप्त आहे. कारण 'श्रेयसे यतस्व' किंवा 'कल्याणाकरितां काम कर' ही आपल्या मनःपटलावर अलौकिक लिपींत लिहिलेली परमेश्वरी आज्ञा मनुष्याला रात्रंदिवस चैन पडूं देत नाहीं व आपल्या वर्तनांत आपली कर्तृत्वशक्ति दाखविण्यास त्याला प्रवृत्त करते, तर 'ऋणं कृत्वा घृतं पिब' किंवा 'ऋण करून सण कर' ही तामसी आज्ञा आपल्या रोमरंध्रांत गुणगुणत असते व आपलें घोडें पुढें दकलीत असते. अशा स्थितींत सात्विक वृत्तीचा वरपगडा होईपर्यंत आपल्या अंतःकरणांत गोंधळ व झगडा माजल्याखेरीज कसा राहील ?

मला ही गोष्ट अगदीं स्वाभाविक वाटते कीं, विकारवश मनुष्याच्या हृदयांत जेव्हां परमेश्वरी आज्ञा परमेश्वरी प्रेरणेनें उद्भूत होते, तेव्हां तामसी वृत्तीचा विजय किंवा पराजय झाल्याखेरीज गत्यंतर नाहीं. म्हणून अशा वेळीं मनुष्य घोर एकांतवास पतकरतो; तेथें त्याला सैतानाशीं भयंकर झगडा करावा लागतो व सैतानास वाटेस लावावें लागतें. या प्रकाराचें तुम्ही कसेंही वर्णन करा, मूर्तिमंत सैतान खडकाळ व वालुकामय जीर्णारण्यांत येशुखिस्ताला दृश्य झाला त्याप्रमाणें आपल्याला तो दृग्गोचर होतो म्हणा; किंवा अधमपणाच्या व आपलपोटेपणाच्या जनाकीर्ण भूमींत रूपकानें सैतान दृग्गोचर होतो म्हणा; परंतु अशा प्रकारच्या मोहजालांत आपण सांपडतों यांत शंका नाहीं. जर आपण अशा कचाट्यांत सांपडलों नाहीं तर आपण दुर्दैवी खरे ! अशा कचाट्यांत न सांपडणें म्हणजे अपूर्ण मनुष्य राहणें होय व जर आपण अर्धनर—वानर—राहिलों तर आपलें दुर्दैव नव्हे का ? कारण, मग आपल्या हृदयांत खऱ्या सूर्यप्रकाशाप्रमाणें ती परमेश्वरी आज्ञा प्रदीप्त होणार नाहीं; तर ती इतर भिकार दिव्याप्रमाणें अंधुकपणें मिणमिण करीत राहील; किंवा अंधकारात

अथवा जड धुरांत धुमसत राहील. आपलें जीर्णारण्य म्हणजे नास्तिक युगाच्या वेळचें अफाट जग होय; आपले चाळीस दिवस म्हणजे दुःखाचीं व उपासमारीचीं वर्षानुवर्षें होत. तथापि या वर्षांनाही अंत आहेच. होय; मला जरी विजय मिळाला नाहीं तरी विकारहेतूशीं मी झगडत आहें अशी माझ्यांत जाणीव उत्पन्न झाली आहे; व जीवांत जीव आहे तोंपर्यंत किंवा शरीरांत शक्ति आहे तोंपर्यंत सारखा झगडा करण्याचा निश्चय मीं केला आहे, येवढी मला खातरी आहे. मी सुद्धां कानाशीं किटकीट करणाऱ्या, दृष्टीला दुःख देणाऱ्या, दैत्यदानवांनीं व्यापलेल्या, व जादुगिरीनें भरलेल्या जगज्जीर्णारण्यांत गुरफटून गेलों होतों. वणवण भटकल्यावर ज्याला शिखर नाहीं किंवा ज्याचें शिखर फक्त स्वर्गांत आहे अशा पर्वताच्या वरच्या सूर्यप्रकाशित उतारावर मला माझा मार्ग काढावा लागत आहे. ”

अलंकारिक भाषेंत बोलणें हा आमच्या चरित्रनायकाचा स्वभाव बनला होता हें एकदां सांगून टाकलेले बरें. दुसऱ्या ठिकाणीं टायफलसड्रॉख रूपकानें सांगतो “ या पिढींतील तुला माहीत असलेल्या कर्तृत्ववान् माणसाप्रमाणें तुझें चरित्र नाहीं काय ? जमीन ओसाड टाकल्यानंतर कांहीं काळानें पहिलें पीक घेतलें म्हणजे ज्याप्रमाणें त्यांत पीक व गवत सारख्याच जोरानें उगवतें, त्याप्रमाणेंच मानवी मनाची स्थिति आहे. तेथेंही तरुणपणीं चांगल्या गोष्टीच्या इतकाच वाईट गोष्टीबद्दल उत्साहाचा ऊत येतो; पण जेव्हां प्रत्यक्ष जगांतील निराशेनें आध्यात्मिक गोष्टींबद्दल संशयबुद्धि उत्पन्न होते व त्या संशयबुद्धीचें हळू हळू नास्तिकबुद्धींत पर्यवसान होतें, तेव्हां ह्या व्यावहारिक व आध्यात्मिक अश्रद्धारूपी अनावृष्टीनें तें सर्व उत्साहाचें जोरदार पीक वाळत जातें. पुनः मात्र मनोभूमींत दुसरें पीक आलें, तर तें टिकाऊ असतें. तेथें निरंतरची हिरवीगार गवताळ जागा दिसली व अनावृष्टीला दाद न देणाऱ्या प्रच्छाय देवदाराच्या खालीं मनुष्याला बसतां आलें तर तें ईश्वरी कृपेनेंच होय. माझ्या मनाची अशीच स्थिति झाली; म्हणजे त्यांत दोन पिकें आलीं व त्यांतलें दुसरें पीक टिकाऊ होतें. ” वर वर्णिल्या तऱ्हेनें अभिमान करण्यासारखी क्रांति टायफलसड्रॉखच्या आयुष्यांत घडून आली यांत शंका नाहीं. त्याचें तें

वेड्यासारखें व मृगजळाच्या पाठीमागें लागल्यासारखें पर्यटन ही एक त्याच्या आयुष्यांतील सैतानाकडून झालेल्या येशुखिस्ताच्या जीर्णारण्यांतील कसोटीप्रमाणें, शुद्धिकारक कसोटीच होती; त्या कसोटींतून टायफल्सड्रॉख तावून सुलाखून निघाला व सैतानाचा पराजय होऊन टायफल्सड्राखच्या आयुष्याच्या खऱ्या कर्तव्यास प्रारंभ झाला. पॅरिसच्या आसपास असतांना त्याच्या मनोभूमींत सैतानी व सात्विक वृत्तींचें ज्यावेळीं तुमुल युद्ध चाललें होतें व त्याच्या मनांत जेव्हां जाणीव उद्भूत होत होती, ती वेळ युद्धाची, आणीबाणीची व काटा सैतानी वृत्तीकडे झुकणार किंवा सात्विक वृत्तीकडे झुकणार हें ठरविणारी होती. तेव्हां सैतान म्हणत होता 'अरे टायफल्सड्राख तूं माझा भक्त हो, नाहींतर तुझा मी नाश करीन " पण शेवटीं त्याला टायफल्सड्राखनें ' तूं चालता हो ' असें दरडावून सांगितलें.

विक्षिप्त टायफल्सड्राख ! आपल्या आयुष्यांतील ही विलक्षण हकीकत स्पष्ट सरळ व सोप्या भाषेंत, सांगितली असतीस तर किती बरें झालें असतें. पण अशी साधी हकीकत आमच्या जवळील कागदांतून काढणें अशक्य आहे. येथें सर्व वर्णन अलंकारिक, व्यंग्य-सूचक औपरोधिक भाविष्योत्तरपर अशा भाषेंत केलेलें आहे.

टायफल्सड्राखनें एकदां म्हटलें आहे " मानवी मनाच्या गूढ गुहेंत घडणारी गोष्ट जड दृष्टीला दिसेल अशी कशी रेखाटतां येईल ? जें अनिर्वचनीय आहे त्याचें हल्लीच्या पाखांड काळच्या कोणच्या शब्दांनीं वर्णन करणार ? " टायफल्सड्राख म्हणतो—" अरबी समुद्रावरून येणाऱ्या उष्ण व कोरड्या वाऱ्याचा जोर आतां जिरला आहे. त्या वाऱ्याचा आवाज माझ्या कानांत ' इकडून तिकडे गेलें वारें ' या न्यायानें निघून गेला व माझ्या बधिर कानाला तो आतांच ऐकूं आला. माझें वणवण फिरणें मीं थांबविलें व मी खालीं बसून विचार करूं लागलों. कारण जणूं कांहीं माझ्या मनाच्या क्रांतीची वेळ जवळ आली. माझ्या सर्व आशा व आकांक्षा मी सोडल्यासारख्या दिसल्या. आशेच्या आभासानों तुह्मी दूर पळा. मी तुमचा यापुढें पाठलाग करणार नाहीं, किंवा यापुढें तुमच्यावर विश्वास ठेवणार नाहीं; व भीतीच्या भेसूर भूतांनों मीं तुह्मांला भीत नाहीं. तुह्मीं सर्व आभासमय व असार आहांत. मला

येथें विश्रांति घेऊं द्या; कारण मी वाटेला विटलों आहें व माझा जीव जिकीरीस आला आहे. मी येथें मरणाची वाट पहात आहें. जगणें व मरणें मला सारखेंच आहे. याप्रमाणे माझ्या मनाची उदासीन वृत्ति झाली असतांना माझ्या सात्विक वृत्तीच्या गुणानें मला शांत झोंप लागली व माझीं दुःखमय स्वप्नें हळूं हळूं निघून गेलीं मी जागा होतों तों, माझ्यापुढें नवा स्वर्ग व नवी पृथ्वी उभी राहिली. नीतिपथांतलें पहिलें पूर्वकार्य—स्वार्थाचा लोप करणें—पुरें झालें; माझ्या नेत्रावरील पटल नाहींसें झालें व माझ्या हातांतील बिड्या तुटल्या." या ठिकाणाहून दिसणाऱ्या देखाव्याचें वर्णन जसेंच्या तसें देणें बरें.

१८५६८

'पर्वतापुढच्या उंच पठारावरील आकाशरूपी तंबूंत ध्यानमग्न व विचारमग्न बसून राहण्यांत किती तरी मौज आहे; माझ्यावर छपराप्रमाणें निळा घुमट आहे; माझ्या सभोंवार भिंतीप्रमाणें चार निळसर पडदे—चार निळसर दिशा—आहेत व त्यांच्या खालची किनार सोन्यासारखी चकाकत आहे. पर्वताच्या पोकळींत वसलेले सुंदर किल्ले; त्यांचे ते हिरवेगार फुलाचे ताटवे, तेथल्या त्या गोऱ्यापान रमणीय स्त्रिया, या सर्वांकडे येथें बसून पहात राहणें कितीतरी आनंददायक आहे; किंवा यापेक्षां जास्त आनंददायक म्हणजे, दऱ्यांच्या योगानें लपलेविल्या व रक्षिलेल्या गवती छपराच्या झोंपड्या व तेथल्या, सभोंवतालीं मुलें असलेल्या व भाकऱ्या भाजणाऱ्या आया यांचेकडे पाहणें होय. किंवा माझ्या पर्वतावरील बैठकीसभोंवतीं पसरलेलीं नऊ गावें व खेडीं हीं पाहणे, व त्यांची कल्पना मनांत आणणें हेंही आनंददायक आहे. या गांवांतील व खेड्यांतील प्रार्थनामंदिराच्या घंटा शांत हवेंत मला चांगल्या ऐकूं येतात व त्यामुळें तीं गावें व खेडीं धातुमय जिव्हांनीं मज-जवळ बोलत आहेत कीं काय असा मला भास होतो. तसेंच सर्व प्रकाऱ्च्या हवेंत धुराच्या लोटांनीं तीं गावें व खेडीं आपलें अस्तित्व व आयुष्य प्रकट करीत आहेत; मला दिवसाचे तास स्वयंपाकी घड्याळानें उत्तम कळतात. कारण घरधनीणी सकाळीं, दुपारीं, सायंकाळीं आपल्या नवऱ्याकरितां चहाचें आधण आणीत असतांना निघणारा तो स्वयंपाकी धूर आहे. त्याचे निळसर लोट नऊ गांवांपैकीं प्रत्येक गांवांतून एकदम

किंवा एकामागून एक निघत आहेत व त्यावरून अमक्या वेळचें जेवण तयार होत आहे, हें मला कळतें. ही कांहीं कमी मजेदार गोष्ट नाहीं! कारण येथें मला सर्व परगणा व त्यांतील प्रियानुराधन व कुटाळक्या, त्यांतील तंटेबखेडे व सुखसमाधान वगैरे गोष्टी इतक्या लहान प्रमाणावर दृष्टीस पडतात कीं, तो परगणा मला माझ्या टोपीनें झांकता येईल. माझ्या लांबच्या पर्यटनांत जर जगांतील व्यवहार सविस्तर पाहण्यास मी शिकलों असलों तर येथें बसून मला त्यापासून सामान्य सिद्धांत व अनुमानें काढण्यासही जागा फार चांगली आहे.

येथून काळेंकुट्ट वादळ दुरून जोरानें जातांना मला दिसत असे व काळसर निळसर श्रेक हार्न ( स्वीत्झरलंडांतील एक पर्वत ) च्या सभोंवतीं ती वावटळ भोवऱ्याप्रमाणें फिरून कांहीं वेळानें नाहींशी होई; व असें झालें म्हणजे सूर्यप्रकाशांत श्रेक हार्न पुन्हा पांढरा दिसे. कारण त्या वावटळींत बर्फ असे. हे निसर्गा! तुझ्या प्रचंड प्रयोगालयांत व खदखदावयाच्या कटहांत तुझें काम सारखें चालू आहे. पण निसर्ग म्हणजे काय? तुला मी परमेश्वर कां म्हणत नाहीं? तूं परमेश्वराचें जिवंत वसन नाहींस काय? खरोखरीं तुझ्या द्वारें बोलणारा हा प्रत्यक्ष परमेश्वरच नव्हे काय? तुझ्याठायीं राहणारा व तुझ्यावर प्रेम करणारा परमेश्वर व माझ्याठायीं राहणारा व माझ्यावर प्रेम करणारा परमेश्वर एकच नव्हे काय?

वरील सत्याची पूर्वछाया—किंवा असें म्हणणें बरें—पूर्ववैभव माझ्या मनांत गूढपणें भिनलें. नोव्हांझेंबलाकडे गलबत फुटलेल्या माणसाला वसंत ऋतूचा उजाडता दिवस जितका प्रिय वाटतो; किंवा आईपासून चुकलेल्या व गोंधळून ओक्साबोक्शी रडणाऱ्या मुलाला आईचा आवाज जितका प्रिय वाटतो, किंवा स्वर्गीय गायनवादनाचा मधुर ध्वनि गानलुब्ध माणसाला जितका प्रिय असतो, तितकीच परमेश्वराच्या व्यापकत्वाची कल्पना माझ्या त्रस्त मनाला प्रिय वाटली. हें जग जड व सैतानी नाहीं, किंवा भुतांखेतांनीं भरलेलें मसण नाहीं, तर हें देवरूप असून परमेश्वरानें निर्माण केलेलें आहे, असें दाखविणारी दिव्यदृष्टि आल्याबरोबर मी माझ्या मानवीबंधूकडे अनंत प्रेम व अनंत दया या वृत्तीनीं पाहूं लागलों. गरीब बिचाऱ्या भटकणाऱ्या स्वछंदी मनुष्यप्राण्या; माझ्याप्रमाणेंच तूंही देहदंडाच्या द्वारें

तावून सुलाखून निघाला आहेस. तूं राजाचा पोशाख घातलेला अस, किंवा भिकाऱ्यांची बंडी घातलेली अस, तुला त्याचा त्रास व भार हा सदोदित ठेवलेलाच आहे; व शेवटीं दोघांचाही विश्रांतीचा पलंग थडगेंच होय. हे माझ्या भाऊ, मी तुला आपल्या हृदयाशीं धरून धीर कां देऊं नये, व तुझ्या डोळ्याचीं सर्व आसवें कां पुसूं नयेत ? खरोखरीं या एकांत स्थळीं मनाला जो पुष्कळांच्या आवाजाचा गोंगाट श्रोत्रेंद्रियानें ऐकूं येत आहे, तो गोंगाट मला वेड लावणारा नसून माझ्यामध्यें दया उत्पन्न करीत आहे असें मला वाटतें. ज्याप्रमाणें मुक्या जनावराची अस्पष्ट आरोळी व रडणें हें परमेश्वराला प्रार्थनेप्रमाणें वाटतें त्याप्रमाणेंच हा गोंगाट मला प्रार्थना वाटत आहे. थोड्यांत आनंद मानणारी गरीब बिचारी धरित्री ही मला आतां माझी माता—दुष्ट सावत्र आई नव्हे—अशी वाटते. महाकांक्षी व अल्पप्रयत्नी मनुष्यप्राणी मला आतां प्रिय आहे; व त्याच्या पापाखातर व पीडेखातर मी त्याला बंधू म्हणावें असें मला वाटतें.

या पठारावर असतांना जगाच्या सततच्या एका गूढाचा माझ्या मनांत उलगडा पडला. जगांत वाईटाचा कसा उदय झाला ? हा प्रश्न मनुष्यापुढें सदोदित उभा राहतो व त्याचें उत्तर कळल्याखेरीज मनाचें समाधान होत नाहीं. या प्रश्नाला माझें उत्तर असें आहे. मानवी मोठेपणामुळें मनुष्याला दुःख होतें. कारण मनुष्यांत अनंतत्व आहे व कोणत्याही युक्तीनें त्याचा सांतांमध्यें समावेश करतां येत नाहीं. अर्वाचीन युरोपांतले सर्व सरकारी फडणीस, घरांतलें सामानसुमान पुरविणारे व मेवामिठाईवाले हे जरी सर्व एकत्र झाले, तरी एका चांभारास ते सर्व सुखी करूं शकतील काय ? एक दोन तासांपेक्षां ज्यास्त वेळ त्यांच्या हातून हें काम पार पडणार नाहीं. कारण त्या चांभारालासुद्धां त्याच्या पोटाखेरीज अगदीं निराळा असा आत्मा आहे व त्या आत्म्याच्या सततच्या समाधानाकरितां व पूर्ततेकरितां ईश्वराचें अनंत विश्व त्याला एकट्याला पाहिजे. कारण अशा अनंताशिवाय जी जी इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न होणार ती ती सफल कशी व्हावयाची ? त्याला दारूचा समुद्र अपुराच होणार व त्याला शेषाच्या जिभाही कमी वाटणार. कारण तुम्ही दारूचा समुद्र भरला नाहीं तोंच ती दारू ज्यास्त चांगल्या द्राक्षाच्या हंगामांतली

आहे. हितावह अशा संतापभरानें तुझ्या शरीरांत भिनलेला जुनाट अहं-काररूपी रोग तुझा आत्मा बाहेर काढून टाकीत आहे व मृत्यूवर जय मिळवीत आहे. काळाच्या कानठाळ्या बसवणाऱ्या लाटा तुला गिळून टाकीत नाहींत, तर त्या तुला शुद्ध शाश्वत तत्त्वाकडे ढकलीत नेत आहेत तेव्हां सुखावर प्रेम करूं नको; ईश्वरावर प्रेम कर. हें सनातन आस्तिक्य तत्त्व आहे. या ठिकाणीं सर्व विरोध नाहींसा होतो. जो या ठिकाणीं जातो व काम करतो त्याला श्रेय मिळतें.

या आपल्या आयुष्यांत मुख्य मनःकलह म्हणजे कालगतीशीं आहे. बाकीचे कलह गौण आहेत. मी तुला सांगतों, जर मानवबंधूंशीं तुझी कोणत्याही बाबतींत कलागत लागली तर त्याचा खरा अर्थ काय याचा विचार कर. जर तूं त्या कलागतीच्या मुळाशीं गेलास तर तुला आढळून येईल कीं, तिचें मूळ म्हणजे स्वार्थ होय; जगांतील सुखाचा फाजील वांटा तूं घेत आहेस व तो भाग माझ्या वांट्यापैकीं आहे. आतां हा भाग मी तुला कांहीं घेऊं देणार नाहीं. त्याकरितां मीं तुझ्याशीं लढेन-सुद्धां. अरे रे! हें भांडण किती क्षुल्लक आहे! कारण वाटावयाचा सुखाचा साठा इतका भिकार आहे! खरोखरी ता सांठा बहुतेक कवच्यांचाच आहे. कारण, त्यांतला बलक सांडून गेला आहे जो काय थोडा अवशेष राहिला आहे तो एकाच्या तहानभुकेला पुरावयाचा नाहीं. त्याच्या-करितां सर्व मानवप्राण्यांची आपआपसांत हिसकाहिसकी चालली आहे! अशा स्थितींत तुला असें म्हणतां येत नाहीं काय? अरे आधाशी प्राण्या, माझ्या वांट्यास आलेला भाग तुला हवा आहे तर तूं घे. हा मी तुला खुषीनें व समाधानानें देतों. मला देवानें आणखी देण्याचें सामर्थ्य दिलें असतें तर किती चांगलें झालें असतें. या तत्त्व-विचारांत मनुष्याच्या कर्तव्याचें सर्वस्व आलें नाहीं खरें; तरी पण या तत्त्वांत मनुष्याचें सहनशीलतेचें कर्तव्य तरी अन्तर्भूत झालें आहे यांत शंका नाहीं. ज्याप्रमाणें आपल्याला हें तत्व सिद्ध करतां आलें त्याप्रमाणें जर त्याची अंमलबजावणी करतां येईल तर किती चांगलें होईल.

पण मनाची कितीही खातरी पटलेला सिद्धांत असो; त्याचें वर्तनांत पर्यवसान झाल्याखेरीज तो सिद्धांत व्यर्थ आहे, नव्हे, वर्तनाखेरीज

कोणत्याही सिद्धांताची खरी खातरी पटत नाहीं. कारण विचार हा निसर्गतः अनंत, अनाकार व भोंवऱ्यासारखा गरगर फिरणारा असतो, निश्चित अनुभवाच्या खातरीखेरीज त्या विचाराला स्थिरता येऊन त्याचें ठाम मत किंवा सिद्धांतपरंपरा बनत नाहीं. एका साधुसंतानें म्हटलें आहे तें अगदीं खरें आहे, कीं, कोणत्याही तऱ्हेचा संशय वर्तनाखेरीज फिटत नाहीं. म्हणूनच अंधःकारांत किंवा अंधुक प्रकाशांत कष्टानें चांचपडणाऱ्या, व पूर्ण अरुणाचा उजेड व्हावा म्हणून आर्त स्वरानें प्रार्थना करणाऱ्या मनुष्यानें, मला अमोल्य वाटलेला खालील उपदेश हृदयांत सांठवून ठेवावा—" तुझ्या अगदीं सान्निध असलेलें व तुझ्या सदसद्विवेक बुद्धीस पटलेलें कर्तव्यकर्म करीत जा. म्हणजे त्या पुढल्या कर्तव्यकर्मांचा प्रकाश तुझ्या अंतःकरणांत आपोआप पडेल. "

आध्यात्मिक स्वातंत्र्याची हीच वेळ नव्हे काय ? ज्या कर्तव्यभूमींत मनुष्यप्राणी काम मिळण्याकरितां अस्पष्टपणें धडपड करीत असतो; लवकर काम मिळत नाहीं म्हणून न कळत म्लानवदन होतो, त्याला जेव्हां ती कर्तव्यभूमि प्रत्यक्ष दृग्गोचर होते व ती आंत शिरण्यास खुली केलेली आहे असें दिसतें, तेव्हां गटेच्या ' विल्हेममायस्टरची उमेदवारी ' या कादंबरींतील लोथेरो ज्याप्रमाणें ' अमेरिका येथें आहे, किंवा यापलीकडे कोठेंही नाहीं ' असें कळल्यावर आश्चर्यचकित झाला, तीच अवस्था मनुष्यप्राण्याची कर्तव्यभूमींत शिरल्यावर होते. मनुष्याच्या आयुष्यांत एकही प्रसंग असा नसतो कीं तेव्हां त्याला कांहीं एक कर्तव्यकर्म किंवा ध्येय नाहीं. खरोखरींच भिकार, कष्टदायी; कंटकमय, तुच्छ वाटणाऱ्या जगांत तूं आतां प्रत्यक्ष उभा आहेस; येथेच तुझें कर्तव्यकर्म किंवा ध्येय आहे. दुसऱ्या कोठेंही नाहीं. तर मग येथूनच तें करण्यास सुरवात कर व कर्तव्यकर्म करीत असतांना श्रद्धा ठेव. आयुष्याची जाणीव धर व स्वातंत्र्य मिळव. मूर्खा, तुझें कर्तव्यकर्म किंवा ध्येय तुझ्या ठायींच वास करीत आहे; त्या कर्तव्यकर्मांला आड येणाऱ्या अडचणीही तुझ्या ठायींच आहेत. ( तूंच आपला मोक्षदायी बंधू आहेस; तूंच आपला रिपु आहेस. ) तसेंच तुझ्या परिस्थितीरूप उपादानकारणांतूनच तुला तुझें कर्तव्यकर्म किंवा ध्येय बनवावयाचें आहे. तर मग तें उपादानकारण कसलें का

असेना; त्याला तूं काव्यमय किंवा धीरोदात्त स्वरूप दिलेंस म्हणजे झालें. प्रत्यक्ष जगाच्या तुरुंगांत सांपडल्यामुळें तूं उसासे टाकतोस व स्वतंत्रपणें अंमल करण्यास व काम करण्यास दुसरें जग पाहिजे ह्मणून देवाची दीन मुखानें प्रार्थना करतोस, पण तुला हें कळत नाहीं, कीं तूं जें मागतोस ते तुझ्यापाशीं आधींच आहे. जर तूं डोळसासारखा पाहशील तर तुला कळेल कीं ते 'प्रार्थित जग येथेंच आहे, नाहीं तर दुसरें कोठें मुळींच नाहीं.'

निसर्गाप्रमाणेंच मानवी मनाची स्थिति आहे. निसर्गांत सृष्टीचा प्रारंभ प्रकाशानें झाला, तीच गोष्ट मानवी मनाला लागू आहे. डोळ्यांना पाहण्याची शक्ति आली नाहीं तोंपर्यंत सर्व इन्द्रियें पंगूच असतात. ज्याप्रमाणें हवे तसे हेलकावे खाणाऱ्या पंचमहाभूतांच्या गोंधळांत 'प्रकाश उत्पन्न होऊं दे' या आज्ञेची वेळ सुदैवाची होती. त्याप्रमाणेंच संसारसागरांत गटंगळ्या खाणाऱ्या मनाला 'तुजमध्यें ज्ञान उत्पन्न होऊं दे' या जाणीवेची वेळ सुदैवाची खरी! अशी जाणीव उत्पन्न होण्याची वेळ ही लहानथोरांना अद्भुत व दिव्य नव्हे काय? ईश्वरी आज्ञेबरोबर महाभूतांचा तो सांवळा गोंधळ थांबतो व ती कशी तरी कोंबलेलीं व परस्परविरोधी महाभूतें एकमेकांपासून व्यवस्थेनें वेगवेगळीं पडून आकाश व पृथ्वी होतात. तिच्या खालीं खोल खडकाचा पाया शांतपणें भरला जातो व आकाशांत घुमट होऊन त्यांत सदाप्रकाशित तारे बसविले जातात; व काळ्याकुट्ट नाशकारक गोंधळाचे ऐवजीं प्रफुल्लित, सुपीक व आकाशानें परिवेष्ठित अशी पृथ्वी तयार होते.

मीही आतां आपल्याला म्हणूं शकलों. तूं यापुढें गोंधळांत राहूं नको. तूंही विश्व किंवा अल्प विश्व हो. तूंही उत्पन्न कर. सृष्टीच्या अत्यंत लहान भागाचा भाग जरी तुला उत्पन्न करतां आला तरी ईश्वराच्या नावानें उत्पन्न कर. तुझ्यामध्यें जी शक्ति आहे तिचा उपयोग कर; ऊठ, ऊठ, जें कांहीं करावयाचें हाताला लागेल तें आपली सर्व शक्ति खर्च करून पार पाड. ज्याला दिवस म्हणतात, तो आहे तोंपर्यंत काम करीत रहा; कारण दिवसानंतर रात्र येणारच व त्यांत मात्र कोणालाही कांहींही करतां येणार नाहीं."

झालें ! येथें टॉयफलसड्रॉखचा जीवनवृत्तांत व मनोविकासवृत्तांत संपला. या हकीगतीनें टॉयफलसड्रॉखच्या ' नेपथ्यमीमांसा ' नांवाच्या ग्रंथावर बराच प्रकाश पडेल अशी आशा आहे. तेव्हां आतां टॉयफलस-ड्राखच्या ' नेपथ्यमीमांसा ' विवेचनास व त्या विवेचनावरून निघणाऱ्या सामाजिक सिद्धांताच्या स्पष्टीकरणास लागणें बरें.

# नेपथ्यमीमांसा ( पूर्वार्ध )

वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥

श्रीमद्भगवद्गीतेंतील वरील श्लोकांत वर्णिलेल्या उपमेंतच कार्लाईलच्या नेपथ्यमीमांसेचें सार आहे. गीतेंत या उपमेचा फक्त पुनर्जन्माचें तत्व स्पष्ट करण्याकरितां उपयोग केलेला आहे. कार्लाईलनें या वस्त्राच्या उपमेचा उपयोग सामाजिक, आर्थिक, आध्यात्मिक अशा समाजाच्या सर्व बाबतींत करून त्यापासून सामाजिक प्रगतीचें एक तत्व स्पष्ट करून दाखविलें आहे व असें करतांनां जडापासून चिताकडे असा क्रम कार्लाईलनें ठेवला आहे. अर्थात् कार्लाईलच्या नेपथ्यमीमांसेचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असें स्वाभाविक, दोन भाग पडतात. व म्हणूनच दोन लेखांत ही नेपथ्यमीमांसा संपवून पुढील एका लेखांत कार्लाईलनें या मीमांसेचा एक मासला म्हणून भावी समाजस्थितीचें रेखाटलेलें भेसूर चित्र याची प्रतिछाया काढून नंतर त्यानें प्रस्थापित केलेल्या सामाजिक प्रगतीच्या तत्वाच्या अनुरोधानें हिंदुसमाजांतील कांहीं चालीरीतींचें विवरण शेवटील लेखांत करण्याचा विचार आहे.

प्रथमत: कपडे कसे अस्तित्वांत आले असतील याचें विवेचन कार्लाईल किंवा टॉयफल्सड्रॉख यानें केलें आहे. कोणत्याही धार्मिक ग्रंथांत दिलेल्या माहितीकडे पाहिलें किंवा मनुष्य प्राण्याच्या आद्यस्थितीकडे शास्त्रीय दृष्टीनें पाहिलें तरी प्रथमत: मनुष्यें नग्न स्थितींतच असलीं पाहिजेत हें उघड आहे. मनुष्यांच्या या आद्यस्थितीचें व कपड्याच्या उत्पत्तीचें खालील वर्णन टॉयफल्सड्रॉखनें दिलें आहे.

“ कपड्याचा पहिला उपयोग ऊब आणणें किंवा लज्या राखणें हा नव्हता तर शोभा देणें हा होता. मूळच्या रानटी माणसाची स्थिति खरोखरीं दु:खप्रद असावी. त्यांचे ते लोकरीसारखे केस व दाढी कमरे-

पर्यंत येऊन विणलेल्या कपड्याप्रमाणें त्याचे आंगाभोंवतीं लोंबत असली पाहिजे. लांब केस व दाढी यामधून टक लावून पाहणारी त्याची दृष्टि भीतिप्रदच असावी. त्याचें शरीर स्वाभाविक जाड केंसाळ कातडीनें आच्छादिलेलें असलें पाहिजे. तो रानटी माणूस रानटी फळांवर आपली भूक भागवून जंगलांतील उजेडाच्या भागामधून भटकत असला पाहिजे, किंवा कॅलिडोनीयाच्या जुन्या रहिवाशाप्रमाणें आपलें पशूरूपी किंवा मनुष्यरूपी भक्ष्य मिळविण्याकारितां दलदलीच्या जागेंत लपत छपत पडलेला असला पाहिजे. त्या वेळीं त्याचेजवळ जड गारगोटीच्या गोळ्यांखेरीज स्वसंरक्षणाचीं साधनें किंवा हत्यारें नसावींत, हें आपलें एकच एक हत्यार हरवूं नये म्हणून त्या माणसानें वळलेली चामड्याची लांब वादी त्या गोळ्याला अडकविली असली पाहिजे; त्यायोगें त्या गोळ्यानें त्याला बिनचूक व घातक नेम मारतां येई, इतकेंच नव्हे तर तो गोळा परत आणतां येई. तथापि भूक व सूड या दोन विकारांच्या दुःखाचें शमन झाल्यावर मनुष्याचें पहिलें लक्ष सुखापेक्षां शोभेकडे लागलें असावें. शिकारीच्या श्रमामुळें त्याच्या अंगांत ऊब येत असावी, किंवा वाळलेल्या पानांत, झाडाच्या ढोलींत, झाडाच्या सालीच्या सांवलींत किंवा आपोआप बनलेल्या गुहेंत बसून त्याला ऊब मिळे. परंतु शोभेकरितां त्याला कपड्याची आवश्यकता होती. रानटी लोकांत कपड्याचे पूर्वी गोंदणें व अंगाला रंग लावणें या गोष्टी दृष्टीस पडतात. रानटी माणसाची पहिली मानासिक गरज म्हणजे शोभेची हाव ही असावी. कारण सुधारलेल्या देशांतसुद्धां कमी सुधारलेल्या वर्गामध्यें हीच प्रवृत्ति दृष्टोत्पत्तीस येते. ”

याप्रमाणें कपडे मुळांत शोभेकरितां अस्तित्वांत आले असले तरी कालेंकरून त्यापासून दुसरेही फायदे होऊं लागले. त्यायोगें शरीररक्षणाला मदत होऊं लागली. त्यायोगें आनंददायी ऊब मिळूं लागली. परंतु कपड्याचे फायदे इतक्यावरच थांबले नाहींत. लाज किंवा विनय हा मनोविकार मनुष्य प्राण्याला अजून ठाऊक नव्हता. तो गूढपणें कपड्यानें उद्भूत झाला. कपड्यानें मनुष्यांत व्यक्तिविशेषत्व आणिलें. कपड्यानें त्याला सामाजिक दर्जा दिला. सारांश, कपड्यानेंच मनुष्याला सारी माणुसकी मिळवून दिली. वरील विवेचनावरून असें वाटतें कीं, मनुष्य हा

हत्यारें वापरणारा प्राणी आहे. स्वतः अशक्त व लहानकुडीचा असा हा प्राणी फारच झालें तर अर्धफूट पायाच्या डगमगीत आधारावर उभा राहूं शकतो, व वाऱ्यानें उडून जाऊं नये म्हणून त्याला पाय पसरून चालावें लागतें. द्विपादप्राण्यांमध्यें सर्वांत अशक्त प्राणी म्हणजे मनुष्यप्राणी होय! तीनशें पौंडाचें वजन मनुष्याला अवजड ओझें वाटतें. कुरणांतील गोऱ्हा मनुष्याला केरांतल्या चिंधीसारखा फेंकून देईल. तथापि त्याला हत्यारें बनवितां येतात व त्यांचा उपयोग करता येतो. या हत्यारांच्या योगानें खडकाच्या पर्वताचेंसुद्धां त्याला बारीक पीठ करतां येतें, त्यायोगें लाल तापलेलें लोखंड मऊ कणकीप्रमाणें त्याला मळतां येतें. त्यायोगें समुद्र हे त्याचे गुळगुळीत रस्ते होतात. वायु व अग्नि हे त्याचे घोडे बनतात. मनुष्यप्राणी हत्याराखेरीज कोठेंही दृष्टीस पडत नाहीं. हत्याराखेरीज तो कःपदार्थ आहे. पण हत्यारासहित तो सर्वशक्तिमान आहे. तेव्हां मनुष्य हा हत्यार वापरणारा प्राणी आहे, अशी मनुष्याची व्याख्या ठरते. कपडे हे हत्यारें वापरणाऱ्या या मानवी प्रवृत्तीचा फक्त एक मासला आहे. मनुष्यानें प्रथमतः बीं पेरण्याकरितां शोधून काढलेल्या लाकडी यंत्रापासून तों वाफेच्या एंजिनापर्यंत किंवा ब्रिटिशपार्लमेंटापर्यंत मनुष्यानें हत्यारांत घडवून आणलेली प्रगति आश्चर्यकारक आहे. मनुष्य जमीनीच्या पोटांतून काळे दगड बाहेर काढतो ( अशुद्ध लोखंड ) व त्यांना आज्ञा करतो. ' मला व माझ्या सामानाला ताशी पंचवीस मैलांच्या वेगानें घेऊन चला ' आणि ते दगड त्याप्रमाणें काम बजावतात. मनुष्य चिठ्या टाकून सहाशें अठ्ठावन लोकांना एकत्र जमवितो ( पार्लमेंटचे सभासद ) व त्यांना हुकूम करतो " या राष्ट्राला आमच्याकरितां श्रम करावयास लावा. आमच्याकरितां त्याला रक्तपात करूं द्या; आमच्याकरितां त्याला भुकेनें व्याकूळ होऊं द्या; आमच्याकरितां दुःख सोसूं द्या; व आमच्याकरितां पाप करूं द्या. " ते त्याप्रमाणें करतात.

पोषाखापैकीं काम करतांना कपड्यांवर घालावयाचें मळवस्त्र घ्या ना. इराणांत लोहाराचें मळवस्त्र ( त्यानें यशस्वी बंड केल्यामुळें ) राष्ट्रीय निशाण बनलें. या मळवस्त्राचा उल्लेख आलेल्या किती तरी गोष्टी इतिहासांत प्रसिद्ध आहेत. आतां मळवस्त्र काय काय करीत नाहीं ? आपल्या

स्वच्छतेवर घाला घालणाऱ्यापासून आपलें संरक्षण करतें; आपल्या सुरक्षिततेचा भंग करणाऱ्यापासून आपला बचाव करतें. आपल्या सद्गुणांवर हल्ला करणाऱ्यापासून आपली सुटका करतें. व केव्हां केव्हां आपल्या लुच्चेगिरीची उघडीक करणाऱ्यापासून आपलें रक्षण करतें. अगदीं गरीबापासून तों श्रीमंतापर्यंत–कापडी किंवा लोखंडीपत्र्याच्या मळवस्त्रापासून तो झालरीच्या रेशमी मळवस्त्रापर्यंत कितीतरी तऱ्हा व प्रकार मळवस्त्रांत आहेत ! या मळवस्त्राखालीं किती गोष्टी लपविल्या गेल्या आहेत व कितीतरी संपादल्या गेल्या आहेत ? खरोखरीं विचार करतां समाजांतील लष्करी पेशा व कोतवाली पेशा या पेशाचे वर्ग म्हणजे अतोनात खर्चाचीं समाजाचीं मळवस्त्रेंच नव्हेत काय ? धार्मिक पेशाचा वर्गसुद्धां समाजाचें एक प्रकारचें मळवस्त्र नव्हे काय ? हल्लीं या मळवस्त्राचा कितपत उपयोग आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. अर्वाचीनकाळीं नवीन नवीन कागदाचीं मळवस्त्रें तयार होऊं लागलीं आहेत व त्यानांच हल्लीं समाजांत जास्त जास्त महत्व येत चाललें आहे."

याप्रमाणें कपड्याची उत्पत्ति व उपयोग याचें विवेचन करून टायफलसड्राखनें पुढें ऐतिहासिक कालच्या पोषाखाच्या उत्क्रांतीचा इतिहास दिला आहे. निरनिराळ्या देशाच्या व निरनिराळ्या काळच्या स्त्रीपुरुषांच्या पोशाखांच्या तऱ्हा कसकशा होत्या याचें मजेदार वर्णन त्यानें केले आहे.

" पंधराव्या शतकांतील जर्मन लोकांमधला ऐटबाज पोशाख जर आपण पाहिला तर आपल्याला हसूं आल्याखेरीज राहणार नाहीं. हेंही खरें आहे कीं, त्या जुन्या काळचे जर्मन लोक जर जीवंत होऊन त्यानीं आपले पोशाख पाहिले तर ते आश्चर्यानें थक्क होऊन तोंडांत बोटेंच घालतील. परंतु कोणताही जर्मन किंवा कोणताही मनुष्य जीवत होत नाहीं, म्हणून बरें. यामुळें गतकाळचा वर्तमान काळाला उगाच त्रास होत नाहीं. मात्र ज्याप्रमाणें झाडाच्या मुळ्या व फांद्या यांची गुंतागुंत न होतां मुळें सुरक्षितपणें जमीनीखालीं राहून झाड वाढतें, त्याप्रमाणें वर्तमान व गत या काळाची गुंतागुंत न होतां गतकाळापासून वर्तमानकाळ उत्पन्न होतो. अत्यंत प्रियतम व महत्तम पदार्थांची जागासुद्धां थोडक्याच वेळांत दुसऱ्या पदार्थानें भरून निघते. ही गोष्ट दुःखप्रद तर खरीच, पण लक्षांत

ठेवण्यासारखी आहे. नेपोलीयनसारखे योद्धे व बायरनसारखे कवीसुद्धां सात वर्षांत जुने होऊन नामशेष होतात. हाच प्रगतीचा नियम होय. पोशाख काय किंवा दुसरे दृश्य पदार्थ काय यांना एक तत्व लागू आहे. तें हें कीं, तीच ती चाल सारखी फार काळ टिकत नाहीं."

यानंतर टायफल्सड्रॉखनें पोषाखासंबंधीं एक बडें तत्व सांगितलें आहे. तें हें कीं, समाजाचें सर्व अस्तित्व व प्रगति पोशाखावर अवलंबून आहे. हें तत्व टायफल्सड्रॉखनें कोणत्या युक्तिवादानें सिद्ध केलें; अथवा त्याला तें अन्तःस्फूर्तीनें समजलें किंवा तें त्याला त्याच्या अनुभवानें कळलें हें कळण्यास साधन नाहीं. इतकी गोष्ट खरी कीं, टायफल्सड्रॉखची नेपथ्य-मीमांसा म्हणजे केवळ बाह्यपोशाखाची मीमांसा नव्हे. पोशाख किंवा कपडे हें एक त्यानें रूपक घेतलें आहे व तें रूपक समाजाच्या निरनिराळ्या संस्थांना व चालीरीतींना लावून दाखविलें आहे.

" मनुष्याच्या आयुष्यामध्यें असा एखादा प्रसंग येतो कीं, तेव्हां मी कोण, कोठून आलों व मला जावयाचें आहे कोठें वगैरेसारखे तात्विक प्रश्न त्याच्यापुढें उभे राहतात. असे प्रश्न मनापुढें आले म्हणजे जग व त्या जगांतील दिक् व काल हीं सर्व आवरणें आहेत व त्याच्या आंत एक आत्मिकतत्व आहे व त्या तत्वाचाच आपला आत्मा हा एक अंश आहे—जगज्ज्योतीची आपण एक ठिणगी आहों—असें आपल्याला वाटल्याखेरीज रहात नाहीं. अर्थात् अशा विचारानें सर्व जग म्हणजे एका गूढ तत्वाचें दृश्य आवरण किंवा पोशाख आहे असें चटकन ध्यानांत येतें व ज्याप्रमाणें आवरण व गूढ तत्व हीं भिन्नभिन्न आहेत असें कळतें त्याप्रमाणें मनुष्य व त्याचा पोशाख हीं वेगळीं आहेत असेंही ध्यानांत येतें. अशा रीतीनें विचार करूं लागलों म्हणजे असें मनांत येतें कीं, इतर प्राण्यांना पोशाख लागत नाहीं, सृष्टीदेवीनें त्यांना स्वरक्षणाकरितां स्वाभाविक पोशाख दिला आहे. मग माणसानाच पोशाखाची इतकी आवश्यकता कां ? माणसाचें पोशाखाखेरीज चालावयाचें नाहीं काय ? मनुष्य हा प्राणीसुद्धां स्वाभाविक नग्नच आहे. पोशाख हें त्याचें कृत्रिम आवरण आहे."

टायफल्सड्रॉखचे वरील विचार प्रथमदर्शनीं विचित्र भासण्यासारखे आहेत. टायफल्सड्रॉख हा काय निसर्गवादी आहे; त्याला सर्व कृत्रिम

गोष्टींचा तिटकारा असून मनुष्याची निसर्गस्थितीच त्याला प्रिय असून त्या स्थितीप्रत मनुष्याला नेण्याचा त्याचा वेडगळ विचार आहे कीं काय अशी शंका वाचकांस येण्याचा संभव आहे. पण खरोखरीं तशांतला प्रकार नाहीं. टायफल्सड्रॉखला पोशाखाचा उपयोग व त्याचे समाजावर घडणारे चिरपरिणाम यांची चांगली माहिती आहे असें त्याच्या ग्रंथावरून दिसतें. नुकत्याच जन्मलेल्या बालकाचें कपड्याखेरीज चालावयाचें नाहीं व अर्भकपणाचे कपडे टाकून बाळपणाचे किंवा तरुणपणाचे कपडे घालणें हा एक मोठा महत्वाचा सामाजिक समारंभ झाला आहे; प्रत्येक मनुष्य तरुणपणीं पोशाखाचा शोकी असतो; तसें ऐटीकरितां नव्हे तर थंडी-वाऱ्यापासून निवारण करण्याकरितां पोशाखाचा फार उपयोग आहे; सारांश, पोशाखाच्या कृत्रिम कृतीनें मनुष्यानें निसर्गावर एक प्रकारची ताण केली आहे; या सर्व गोष्टी टायफल्सड्रॉखला माहीत आहेत. योग्य तऱ्हेनें उपयोग केल्यास कपड्याची कृत्रिम क्लृप्ती मनुष्याच्या उन्नतीला उपकारक आहे हें त्याला कबूल आहे. कपड्याचा प्रभाव मोठा गूढ आहे हेंही टायफल्सड्रॉखला माहिती आहे; हें त्याच्या खालील उद्गारांवरून दिसतें. न्यायाधीश व आरोपी यांमध्यें मनुष्याच्या दृष्टीनें काय फरक असतो ? पण पोशाखाचा किती विलक्षण प्रभाव आहे पहा. " दोन व्यक्ति तुमच्या दृष्टीस पडतात; एकीनें तलम तांबड्या रंगाचा कपडा घातला आहे ( न्यायाधीश ). दुसरीनें भरभरीत मळक्या निळ्या रंगाच्या कापडाचा कपडा घातला आहे ( आरोपी ). तांबडी व्यक्ति निळ्या व्यक्तीस म्हणते ' तुला फाशीची शिक्षा दिली आहे व तुझें शरीर फाडण्याकरितां उपयोगांत आणावयाचें आहे. ' निळी व्यक्ति दचकून जाऊन हा हुकूम ऐकते व आश्चर्याची गोष्ट ही कीं ती व्यक्ति खिन्न मनानें फासाकडे जाते. तेथें तिला गळफास लावला जातो; मरेपर्यंत तेथें ती लोंबकळते; नंतर शस्त्रवैद्य त्या व्यक्तीच्या शरीराची फाडाफाड करून त्याच्या हाडाचा सांगाडा वैद्यशास्त्रीय ज्ञानाकरितां बनवून ठेवून देतात. हा चमत्कार कसा घडतो; स्वस्थानापलीकडे कोणत्याही वस्तूचें कार्य जात नाहीं या तत्वाचें काय झालें ? तांबड्या व्यक्तीचा निळ्या व्यक्तीवर शारीरिक ताबा नाहीं; पहिलीनें दुसरीला आपल्या मुठींत धरलें

नाहीं, किंवा पहिलीचा दुसरीला प्रत्यक्ष स्पर्श झाला नाहीं.. त्याचप्रमाणें कोर्टाचे बेलीफ, पोलिस शिपाई किंवा फासावर चढविणारा मांग यांच्याशीं आज्ञा करणाऱ्या त्या तांबड्या व्यक्तीचा इतका निकट संबंध नाहीं कीं त्या व्यक्तीनें त्यांना इकडे तिकडे दोरानें ओढल्याप्रमाणें ओढावें. परंतु या प्रकरणांतलि प्रत्येक व्यक्ति आपआपल्यापरी स्वतंत्र व वेगळी आहे. तथापि या ठिकाणीं बोलल्याप्रमाणें कृत्य घडतें. तो स्पष्ट हुकूम सर्वांना कामाला लावतो व फासाची दोरी आपलें काम करते.'

" विचारी वाचकहो, या चमत्काराचीं दोन कारणें आहेत असें वाटतें; पहिलें कारण हें कीं, मनुष्यप्राणी हा चिन्मय प्राणी आहे व म्हणूनच तो इतर सर्व माणसांशीं अमूर्त बंधनांनीं बांधलेला आहे. दुसरें कारण हें कीं, या त्याच्या चिन्मयत्वाची सांकेतिक खूण म्हणून तो कपडे वापरतो. फाशीची शिक्षा देणाऱ्या त्या व्यक्तीच्या त्या घोडकेसाच्या टोपावरून, त्या खारीच्या कातड्यावरून व त्या मखमलीच्या झग्यावरून ती व्यक्ति म्हणजे न्यायाधीश असें कळत नाहीं काय ? या सगळ्याचा विचार करतां–आश्चर्याची गोष्ट खरी–असें म्हणणें प्राप्त आहे कीं, समाजाचें अस्तित्व कपड्यांवर अवलंबून आहे."

वरील उताऱ्यावरून टायफल्सड्राखला कपड्याचा प्रभाव पूर्णपणें अवगत आहे असें कळून येतें. इतकेंच नाहीं तर त्याच्या मतीं पोशाख ही एक सांकेतिक खूण आहे हेंही कळून येतें. कपड्याच्या सांकेतिकपणाबद्दलचे त्याचे विचार विलक्षण आहेत.

" सर्व दृश्य वस्त्रें सांकेतिक आहेत; जे तुमच्या दृष्टीला दिसतें तें स्वतःकरितां तेथें दिसत नाहीं. तर त्याचा दुसराच गूढ अर्थ असतो व ती दृश्य वस्तू त्या गूढाचें दृश्य स्वरूप असते. जडवस्तु जड स्वरूपानें दृश्य होतात खऱ्या, पण त्याचें रहस्य किंवा गूढार्थ चिन्मयच असतो; व अदृश्य चिन्मयत्व स्फुट करण्याकरिताच तें जडरूप धारण करतें. या तत्वानुसार पोशाख हा कमी योग्यतेचा नाहीं. .पोशाखाला गूढार्थ आहे. अर्थात् पोशाख हा सांकेतिक पदार्थ आहे. राजाच्या झग्यापासून तों रंकाच्या रकट्यापर्यंत सर्व पोशाख मानवी प्राण्याच्या वासनेचें द्योतक नाहीं तर वासनाविजयाचे द्योतक आहेत. उलट पक्षीं सर्व सांकेतिक

किंवा द्योतक गोष्टी म्हणजे एक प्रकारचे कपडेच आहेत; मग ते हातानें विणलेले असोत किंवा कल्पनेनें विणलेले असोत. आपल्या बुद्धीच्या अपूर्व व अदृश्य सृष्टीला कल्पनाशक्ति व्यक्त स्वरूप देते; अर्थात् कल्पनाशक्ति एक प्रकारचे कपडेच विणते असें म्हटलें तरी चालेल. ही कपड्याची उपमा सर्वत्र लागू पडते. मनुष्याचा अधिकार, त्याचें सौंदर्य किंवा दुष्टपणा हे सर्व मनुष्याचे एक प्रकारचे कपडेच आहेत. नव्हे, जर तुम्ही या गोष्टीचा खोल विचार केलात, तर मानवी प्राणी व त्याचें आयुष्य हें सर्व सांकेतिक किंवा द्योतकच आहे असें म्हणावे लागेल. कारण, मनुष्य प्राणी म्हणजे परमात्म्याच्या अंशाचें—आत्मज्योतीच्या एका ठिणगीचें—दृश्यस्वरूप किंवा पोशाखच होय. तसेंच मनुष्याचें शरीर हा एक आत्म्याचा पोशाखच आहे. भाषा ही विचाराचा पोशाख किंवा मांसल शरीर आहे. हा पोशाख कल्पनाशक्तीनें विणला आहे. कल्पनाशक्ति उपमांच्या योगानें हा पोशाख तयार करते. कारण भाषेंतले थोडे मूळ शब्द सोडून दिले तर भाषा उपमांनीच बनलेली आहे. मग या उपमा दृश्य असोत किंवा लुप्तप्राय झालेल्या असोत. भाषेच्या मूळच्या शब्दांना व अवयवांना जर भाषाशरीराचीं हाडें म्हटलें तर उपमा या त्या शरीराचा मांसल व जिवंत भाग आहे. कारण उपमारहित भाषापद्धति क्वचितच दृष्टीस पडेल. कांहीं भाषाशैली रोडक्या, वाळलेल्या व बारीक शरिराच्या असतात; पण आतां अधिक उदाहरणांची काय जरूर आहे ? जो जो मूर्तरूपानें राहतो; जो जो चिन्मयाचा द्योतक आहे; तो तो पदार्थ पोशाखच आहे. हा पोशाख कांहीं काळपर्यंत वापरावयाचा असतो व पुढें तो टाकावयाचा असतो. तेव्हां नेपथ्यमीमांसा या एका विषयांत मानवी सर्व गोष्टींचा समावेश होतो; सर्व दृश्य जग व जगांतील वस्तुजात हा एक पोशाखच आहे व सर्व ज्ञानाची गुरुकिल्ली म्हणजे नेपथ्यमीमांसा होय."

वरील अलंकारिक वर्णनाच्या स्पष्टीकरणार्थ टायफल्सडाखनें धार्मिक पोशाखाचे एका ठिकाणीं केलेलें विवेचन येथें उतरून घेणें सोईचें होईल. तरी तेवढें विवेचन देऊन या नेपथ्यमीमांसेचा पूर्वार्ध पुरा करूं.

"धार्मिक पोशाख म्हणजे उपासनेच्या वेळीं उपाध्याय अंगावर घालतात

ते अंगाला घट्ट बसणारे आंगरखे किंवा सर्वांच्या वर घालावयाचे पांढरे झगे नव्हेत; किंवा प्रार्थनामंदिरांत जातांना लोक आदितवारीं छानछोकीचा पोशाख करतात तोही नव्हे. हे तर धार्मिक पोषाख आहेतच. पण धार्मिक पोशाखाच्या व्याख्येंत अधिक महत्वाच्या गोष्टींचा समावेश होतो. धार्मिक पोशाख म्हणजे मनुष्यांनीं आपल्या अंतःकरणांत असलेल्या धर्मतत्वांच्या आविष्करणाकरितां वेळोवेळीं अस्तित्वांत आणलेलीं दृश्य स्वरूपें होत. अर्थात् जगाच्या उच्चतम अवस्थेबद्दलची जी ईश्वरी कल्पना त्या कल्पनेला मूर्तस्वरूप देण्याकरितां मनुष्यानीं उत्पन्न केलेली संस्था म्हणजे धार्मिक पोशाख होय. या संस्थेचा उद्देश मनुष्यामध्यें धर्माची जागती ज्योत सदा प्रकाशित व उज्वलित ठेवणें हा होय."

"मानवी आयुष्याच्या सर्व पोशाखांत व कपड्यांत हे धार्मिक कपडे सर्वांत अत्यंत महत्वाचे आहेत, हें सांगणें नकोच. हे कपडे प्रथमतः मानवी संस्थातील आश्चर्यांतलें आश्चर्य जो समाज त्यानें सूत तयार करून विणले. कारण मनुष्याच्या अंतःकरणांत धर्मज्योति धुमसत असली व ती कितीही अविनाशी असली तरी ती प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणांत अनुद्भूत राहते; पण दोन चार माणसांचा जमाव जमून त्याचा लहानसा समाज बनला म्हणजे ती धर्मज्योति प्रदीप्त होते व दृश्य अशा धर्मसंस्थेंत व धर्मपंथांत तिचें रूपांतर होतें. स्वर्गाकडे दृष्टि असलेल्या किंवा उच्चतम धार्मिक कल्पना मनात घोळणाऱ्या माणसांचें संघटन व संभाषण यांचा प्रभाव खरोखरींच गूढ व जादूपेक्षांही आश्चर्यकारक आहे. स्वर्गाकडे दृष्टि असण्याचा तुम्ही निवळ वाच्यार्थ घ्या किंवा त्याचा लक्ष्यार्थ घ्या; पण स्वर्गाकडे दृष्टि असतांनाच—पृथ्वीकडे लक्ष असतांना किंवा स्वार्थी कल्पना मनात घोळत असतांना नव्हे—एकी, परस्पर प्रेम किंवा समाज, शक्य आहे. एका ग्रंथकारानें म्हटलेलें अगदीं खरें आहे कीं, आपल्या म्हणण्याबद्दल जर आपण दुसऱ्याची खात्री करूं शकलों तर त्या आपल्या म्हणण्याच्या खरेपणाबद्दल आत्मप्रत्यय किती तरी वाढतो! दयेची दैदीप्यमान ज्योत ज्याच्या डोळ्यांत चमकत आहे अथवा द्वेपाचा पिवळसर वणवा ज्याच्या अंतःकरणांत पेटला आहे अशा आपल्या मानवी बंधूच्या चेहेऱ्याकडे निरखून पहा म्हणजे तुमचा शांत आत्मा ताबडतोब त्या

दैदीप्यमान ज्योतीशीं समरस बनतो किंवा त्या वणव्याशीं एक जीव होतो व या संयोगानें ह्या आत्म्याचें अन्तःकरण सर्वश्लेष प्रेमानें उचंबळून तरी जातें, किंवा सर्वकष द्वेषानें भरून तरी जातें. यावरून माणसामाणसांच्या संघटनांत काय विलक्षण जादू भरली आहे ती दिसून येते. सामान्य आयुष्यांतील साधारण प्रसंगामध्यें जर असा प्रभाव आहे तर जेथें मनुष्यांतील ईश्वरी अशा अंशांचा एकमेकांशीं संबंध येतो तेथें केवढा प्रभाव दिसून येईल हें सांगावयास नको. ''

याच अर्थानें धार्मिक पोशाख समाजानें विणला आहे असें म्हटलें होतें. दृश्य व मूर्त धर्मसंस्था समाजापासून उत्पन्न होते व समाज त्या संस्थेमुळेंच शक्य होतो. नव्हे, प्रत्येक भूत, वर्तमान व भावी किंवा भाव्य समाज हा एक प्रकारचा मूर्तिमंत धर्मपंथच आहे. असें म्हटलें तरी चालेल. सर्वांत उत्तम धर्मपंथ म्हणजे स्पष्टपणे उपदेश करणारा व स्पष्टपणें भविष्योत्तर पुराण सांगणारा पंथ होय. त्यापेक्षां खालच्या प्रतीचा धर्मपंथ म्हणजे अवतारी पुरुष होऊन उपदेश करूं इच्छिणारा व भविष्योत्तर पुराण सांगू इच्छिणारा धर्मपंथ होय; सर्वांत कमी दर्जाचा धर्मपंथ म्हणजे वार्धक्यानें मुका झालेला किंवा विलयापूर्वीच्या बेशुद्धींत कांहीं तरी बडबडणारा धर्मपंथ होय. या ठिकाणीं धर्मपंथ म्हणजे धर्माचीं देवालयें, प्रार्थनामंदिरें व उपदेश करणें व भविष्योत्तर पुराण सांगणें म्हणजे निवळ गायन व प्रार्थना होय, अशी जर कोणाची कल्पना असेल तर ती खास चुकीची होईल.

या धार्मिकपथरूपी पोशाखाबद्दल व कपड्याबद्दल बिनदिक्कत असें विधान करण्यास हरकत नाहीं कीं, असल्या धर्माच्या पोशाखाखेरीज किंवा मूर्तशरीराखेरीज कोणताही समाज आजपर्यंत टिकला नाहीं व पुढेंही टिकणार नाहीं. अलंकारिक भाषेनें बोलावयाचें असतां समाजांतील निरनिराळ्या संस्थांना शरीरांतील निरनिराळ्या भागाची उपमा देतां येईल. या उपमेनें या संस्थेच्या कार्याचें स्वरूप नीट ध्यानात येईल. या दृष्टीनें पाहतां ज्या सरकार या संस्थेमुळे समाज एकत्र येऊं शकतो व त्याचें अन्तर्बाह्य शत्रूपासून संरक्षण होतें त्या सरकार या संस्थेला समाजरूपी शरीराची बाहेरची कातडी मानतां येईल. ज्याच्या योगानें समाज हयात राहून काम करूं शकतो

असे हस्तकौशल्याचे किंवा बुद्धिकौशल्याचे सर्व धंदे व धंद्याच्या मंडळ्या या समाजरूपी शरीराचीं—कातडीच्या खालीं असणारीं—मांस, स्नायु व हाडें मानतां येतील व शेवटीं धर्मसंस्थेला आयुष्यसंवर्धन करणारें व ऊब आणणारें रुधिराभिसरण करून देणाऱ्या काळजापासून निघणारें मज्जा-तंतुजाल मानतां येईल. धर्मसंस्थारूपी तंतुजालाखेरीज उद्योगरूपी हाडें व स्नायु हे अचेतन राहतील किंवा त्यांना कृत्रिम विद्युच्छक्तीनें चेतना आणावी लागेल. व या धर्मसंस्थारूपी तंतुजालाखेरीज कातडी, कच्चें चामडें किंवा कुजणारें कातडें होईल व सर्व समाज पुरावयाला योग्य असें प्रेत बनेल. धर्मसंस्था नाहींशा झाल्यास मनुष्य खरा समाजप्रिय प्राणी राहणार नाहीं; तो फक्त कळप करणारा प्राणी राहील व ही प्रवृत्तिसुद्धां फार वेळ टिकणार नाहीं; पण सर्व मनुष्यप्राण्यांत स्वार्थपरा-यणता, परस्पर द्वेष, हिंस्र पशूंचा एकलकोंडेपणा व फाकाफाक यांचा फैलाव होईल. या योगें समाजाचें शवसुद्धां वाळून जाऊन नाहींसें होईल. याप्रमाणें धार्मिक पोशाखाचें सुधारलेल्या किंवा विचारी माणसांना इतकें महत्व वाटतें.

हें खरें आहे कीं, हल्लींच्या काळीं धार्मिक कपडे अगदीं फाटून गेले आहेत; इतकेंच नव्हे तर त्यापेक्षांही वाईट स्थिति आहे. ती ही कीं, त्या कपड्याचा खरा द्योतकपणा नाहींसा होऊन ते कपडे म्हणजे निरर्थक पोकळ आकृति किंवा मुखवटे बनले आहेत. त्या मुखवट्यांतला जीव किंवा जीवंत तत्व नाहींसें झालें आहे. या कपड्यांत कोळ्यासारख्या किंवा झुरळासारख्या प्राण्याचे पुंजकेच्या पुंजके झाले असून त्यांचें विनाशक काम चालू आहे; व ते मुखवटे कांचेच्या डोळ्यातून जीवंतपणाच्या मिषानें तुमच्याकडे टक लावून पाहत आहेत. आज पिढीदोडपिढी खरा धर्म या धार्मिक संस्थांतून नाहींसा झाला आहे. तो धर्म न कळत व समाजाच्या कोनाकोपऱ्यांत आपल्याकरितां निदान आपल्या पोराबाळांकरितां तरी नवे कपडे करण्याच्या कामांत गुंतला आहे. खरा धर्मोपदेशक हा सर्व मनुष्यांमध्यें श्रेष्ठतम होय. पण खोटा धर्मोपदेशक हा मनुष्यांतील अति-नीच कोटीपैकीं आहे व असल्या या खोट्या धर्मोपदेशकाचे कपडे त्याचे-पासून घेऊन त्याच्या जखमी माणसांना पट्ट्या करणें किंवा ते कपडे स्वयं-

नं.

पाकाकरितां किंवा फार तर शास्त्रीय कामाकरितां असणें हें समाजांच्या ज्यास्त फायद्याचें होईल. ”

वरील उताऱ्यावरून टायफलड्रॉखच्या नेपथ्यमीमांसेची व्यापकता वाचकांच्या ध्यानांत येईल अशी आशा आहे. टायफल्सड्रॉखचें तें एक रूपक आहे. या नेपथ्यमीमांसेच्या रूपानें त्यानें समाजाची प्रगतिमीमांसा केली आहे. त्याचें म्हणणें असें आहे कीं, समाजांतील संस्था, चालीरीती व इतर व्यवस्था या प्रथमतः अन्वर्थक असतात व त्या पोषक असतात. पण कालेंकरून त्यांतील आत्मा नाहींसा होतो व मग त्या निरर्थक पोकळ होतात व त्या मृत संस्था तशाच चालू ठेवल्या तर त्या समाजाला हानिकर होतात. अशावेळीं जुन्या संस्था नाहींशा करून नव्या संस्था स्थापणें, समाजाच्या वाढीला साजतील असे नवे कपडे करणें, हें काम अवश्यक असतें; यालाच समाजाचें पुनरुज्जीवन म्हणतां येईल. हें पुनरुज्जीवन कसें व कोणत्या बाबतींत घडवून आणावयाचें हें या नेपथ्यमीमांसेच्या उत्तरार्धावरून दिसून येईल.

## ६

# नेपथ्यमीमांसा ( उत्तरार्ध. )

टायफल्सड्रॉखची नेपथ्यमीमांसा म्हणजे निव्वळ बाह्य कपड्याची मीमांसा नव्हे, तर कपड्याच्या रूपकानें समाजाची प्रगतिमीमांसा करण्याचा त्याचा मानस आहे असें पूर्वार्धावरून दिसून आलेंच असेल. त्याच्या म्हणण्याचा भावार्थ हा कीं, ज्याप्रमाणें मनुष्याचे कपडे कालें करून फाटतात व त्याच्या वाढीमुळें निरूपयोगी होतात व म्हणूनच ते टाकून दुसरे करावे लागतात त्याचप्रमाणें समाजाच्या संस्थांची व चालीरीतींची स्थिति आहे. त्याही कालेंकरून टाकाऊ होतात. अशा वेळीं समाजाला एक प्रकारची अवनति आलेली असते व हा त्या समाजाच्या सुधारणेचा किंवा पुनरुज्जीवनाचा काळ होय. टायफल्सड्रॉखच्या मतें आपल्या काळच्या युरोपियन समाजाला अशी अवनतीची स्थिति प्राप्त झाली आहे व म्हणून सर्व समाजाला व त्यांतील संस्थांना आगींतून तावून सुलाखून उजळा देण्याची वेळ आली आहे. या युरोपीय समाजस्थितीबद्दल त्याचे खालील उद्गार वाचनीय आहेत.

‘ जेथें सामाजिक भावना नामशेष झाली आहे; ज्या समाजांत संयुक्त घराची कल्पना नाहींशीं होऊन गर्दी असलेल्या बिऱ्हाडाची कल्पना फैलावली आहे, ज्या ठिकाणीं समाजांतील प्रत्येक व्यक्ति आपल्या शेजाऱ्याशीं बेफिकीरपणें वागते इतकेंच नव्हे, तर आपल्या शेजाऱ्याच्या विरुद्ध वागत आहे व हातीं लागेल तें लाटून आपलेंसें म्हणण्यास तयार आहे, शांततेच्या नांवाखालीं जेथें गळेकापू व खिसेकातरू यांची चढाओढीची हातघाई चालू आहे; मात्र या हातघाईमध्यें प्रत्यक्ष हत्यारांचा उपयोग होत नाहीं, पण हत्यारापेक्षांही भयंकर लबाडीचा सरसहा उपयोग चालू आहे; ज्यामध्यें मैत्री व सहानुभूति या भावना अशक्य कोटीपैकीं वाटतात; जेथें धार्मिक पवित्र सहभोजन म्हणजे धुरकट खाणावळी-

तलें सहभोजन बनलें आहे, ज्या ठिकाणीं धर्मोपाध्यायाची जीभ धार्मिक विषयाविषयीं लवलव करीत नाहीं तर खाण्यापुरती लवलव करते, जेथें नेते व धुरंधर लोक बहुजनसमाजाला खरा मार्ग न दाखवितां ' जें जें होईल तें तें पहावें ' ची जपमाळ घेऊन बसतात, अशा समाजाच्या अवस्थेला खरा समाज तरी कसा म्हणतां येईल ? गरीब लोक–उपेक्षिलेल्या दुष्काळीं गुराढोरांप्रमाणें–भुकेनें व अति श्रमानें मरत असलेले; तर श्रीमंत लोक आळसानें अति–विषयसेवनानें व फाजील वृद्धीनें नाहींसे होत असलेले असा दुःखद देखावा हल्लींच्या समाजांत बारकाईनें पाहणाराच्या दृष्टीस पडत नाहीं काय ? तसेंच माननीयांचा मान हल्लीं राहतो काय ? जर त्यांना मान मिळत असेल तर तो मोबदल्याच्या हेतूनेंच हांजीहांजींखोराकडून मिळतो. एका काळीं पवित्र व अन्वर्थक असलेले संस्कार हे पोकळ, अर्थहीन डामडौली समारंभ बनले आहेत व ते करतांनासुद्धां खर्चांकरितां लोक कुरकुर करतात; समाजाचे उपयुक्त कपडे नाहींसे होत चालले आहेत; धर्मसंस्था अतिमेदानें व बधिरतेनें मूक झाली आहे. राजकीय संस्था आपला पगार मिळविण्याच्या पंचाईतींत पडलेली रखवालदारीची संस्था बनली आहे. सारांश हल्लीं समाज अवनती व नाश यांच्या मार्गाला लागला आहे; मग ही अवनती किंवा नाश सावकाश समाजसंस्था गजून होत जात असो किंवा त्याची जलद होळी होऊन होत असो. परंतु समाज ही संस्था कालाप्रमाणें अविनाशी असल्यामुळें–कारण जेथें जेथें थोडीं फार माणसें जमलेलीं आहेत तेथें तेथें समाज आहे–ती कधींही मरत नाहीं. तर तिच्या रूपांत नेहमीं फरक होत जातो व तो फरक प्रगतीपरच असतो व म्हणून जुने कपडे, जुन्या संस्था, जुन्या चालीरीती कातीप्रमाणें टाकून समाज नवीन नवीन व कालाला आणि प्रगतीला अनुरूप अशा संस्था अस्तित्वांत आणीत असतो. यालाच समाजाचें पुनरुज्जीवन म्हणतात; एक समाज अजिबात मरून त्याचे जागीं नवा कोरा करकरीत समाज कधींच अस्तित्वांत येत नाहीं. समाजांत जीवंत प्राण्याप्रमाणें नाश व पुनरुज्जीवन या क्रिया एकसमयावच्छेदेंकरून चाललेल्या असतात; निरर्थक, निरुपयोगी व जुनें

जाऊन अन्वर्थक उपयुक्त व नवीन उत्पन्न होणें म्हणजेच समाजाची प्रगति होय.'

याप्रमाणें समाजांत सारखी घडामोड चाललेली असते. समाजांत चाललेल्या मोडीकडेच दृष्टी न देतां—समाजाकडे दोषैक दृष्टीने न पाहतां—समाजांत चाललेल्या घटनेकडे जर आपण लक्ष दिलें तर मनुष्य कालाबद्दल निराश होणार नाहीं व सद्यःकाळातील आपल्या कर्तव्याची त्याला जाणीव होईल; व त्याला हेंही दिसून येईल कीं, समाजांत आपण एकटेच नाहीं; तर सर्व समाजांतील एकाच काळच्या सर्व व्यक्तींचा परस्पर अत्यंत निकट संबंध आहे; इतकेंच नव्हे तर मनुष्यजात पिढ्यानुपिढ्या संबद्धच आहे असें समजून येईल.

" मानवी जातीच्या पिढ्यांचा विभाग व्यक्तीच्या प्रगतीस कितीसा उपयोगी आहे हें पाहणें मोठें मौजेचें आहे. पिढ्या या कष्टी मानवजातीच्या दिवसाप्रमाणे आहेत. त्या पिढ्यांतील जन्ममृत्यू हें मनुष्यजातीला स्वोन्नतीकरितां काम करावयास लावणाऱ्या सकाळच्या भूपाळ्या व निद्रा आणणाऱ्या सायंकाळच्या शेजारत्या होत. जी गोष्ट बापानें केली आहे तिचा उपभोग मुलगा घेतो, पण मुलाला स्वतःचें नियत असें कर्तव्यकर्म आहेच. याप्रमाणें सर्व वस्तुजात वृद्धी पावत असते व कालाच्या ओघांत पुढें पुढें जात असते. कला, संस्था, पंथ यांची केव्हांही पूर्णावस्था होत नाहीं; तर त्या नेहमीं पूर्णावस्थेकडे जात राहतात. प्रसिद्ध ज्योतिषी केप्लर यानें आकाशांत ज्या कांहीं नव्या गोष्टी पाहिल्या त्या न्यूटन पाहण्यास शिकतो; परंतु न्यूटनमध्यें एक दैवी स्फूर्ति आहेच त्या योगानें तो केप्लरपेक्षां अधिक शोध लावतो. हीच गोष्ट धार्मिक संस्थांत दृग्गोचर होते. यहुदी लोकांच्या कायदेकार मोझेसनंतर योग्यकाळीं जंटाईल लोकांचा अवतारी पुरुष आलाच. ही जशी नवीन गोष्टीच्या उत्पत्तीची परंपरा झाली तशीच जुनाट झालेल्या गोष्टीच्या नायनाटाची परंपरा आहेच. लूथरनें जुनाट निरुपयोगी झालेल्या धर्मसंस्थांचा विध्वंस केला; त्याच्या पुढचें काम व्हॉल्टेअर या फ्रेंच लेखकानें केलें हीच. गोष्ट राजकीय बाबतींत खरी आहे. एका पिढीचा राजकीय सुधारक दुसऱ्या पिढीला पहिल्याच्याही पुढें जातो. सारांश, तुम्ही कोठेंही जा, मानवी जात व

समाज यांची सारखी प्रगतीच चाललेली असेल; कोठें प्रगतीचा वेग फार सावकाश असेल तर कोठें फार जलद असेल इतकेंच

जुन्या संस्था नष्ट होऊन त्या जागीं नकळत नव्या संस्था उत्पन्न होत असतात. याचें एक उदाहरण टायफल्सड्रॉखनें दिलें आहे तें विलक्षण आहे " हल्लीं धर्म किंवा प्रार्थनामंदिरें नाहींत; तसेंच हल्लीं भविष्य करणारांनीं मूकवृत्ति धरली आहे व हल्लीं धार्मिक उपदेश चालत नाहीं असें तुम्ही म्हणता. पण मी म्हणतों प्रत्येक गावांत एक उपदेशक येऊन राहतो व तो आपलें प्रार्थनामंदिर बांधतो व त्याला तो वर्तमानपत्र हें नांव देतो. मानवी मुक्तीकरितां महत्त्वाच्या महान्महान् तत्वांचा जो उपदेश तो करतो तो तुम्हीं ऐकतां व त्यावर श्रद्धा ठेवतां. कोठेंही पहा तुम्हाला या भिक्षेकरी पंथाचे लोक दृग्गोचर होतात. पूर्वींच्या भिक्षेकरी पंथाप्रमाणें हे लोक अनवाणी चालतात; त्यांच्याही आंगाखांद्यावर कपडालत्ता नसतो. तरीपण हे ईश्वरभक्तीस्तव व पैशाच्या भिक्षेस्तव मोठ्या उत्साहानें उपदेश करीत असतात. हे लोक जुन्या मूर्तींचा विध्वंस करतात. मूर्तिभंजक पुष्कळ वेळां ज्याप्रमाणें नीतिदृष्ट्या भ्रष्ट असतात त्याप्रमाणें हेही असतात. तरीपण हे नव्या प्रार्थनामंदिरांची जागा आंखीत असतात. त्यायोगें भावी पिढयांतील खऱ्या धर्मभक्तांना उपदेशाला चांगल्या जागा तयार होत असतात. एवंच मीं मागें म्हटल्याप्रमाणें जुनी कात टाकण्यापूर्वींच तिच्याखालीं नवी कातडी तयार झालेली असते. "

' त्याप्रमाणें पूर्वींच्या धर्मग्रंथाऐवजी आतां वाङ्मयाचा उदय होत आहे. यांत पुष्कळ भाग फेसाचा व पोकळ असेल. परंतु कालेंकरून चांगल्या वाईटाची निवड होईल व त्यात दैवी स्फूर्तीचे लेखक सांपडतील व ते या अवनतीच्या काळींमुद्धां आपले स्वर्गीय वाटाडे बनतील. '

वरील उद्गारांवरून टायफल्सड्रॉखच्या नेपथ्यमीमांसेचें रहस्य वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. आतां या रहस्यांतील गूढतम भागाचा सारांश न देतां त्या समग्र भागाचेंच येथें रूपांतर देणें बरें.

" आपल्याला कल्पना नाहीं इतका खोल चमत्काराचा गुढार्थ आहे. पण चमत्कार म्हणजे तरी काय ? सयामच्या राजाला बर्फाचा तुकडा हा

चमत्कार वाटे. ज्याच्या जवळ हवा काढण्याचा पंप व मोर्चुताचा अर्क असेल तो हा चमत्कार करून दाखवूं शकला असता. दोन आणे दस्तुरी देऊन बंद असलेलें फाटक प्रत्येक वेळीं उघडतांना त्या राजापेक्षांही कमी बुद्धीच्या माझ्या घोड्याला मी चमत्कार करतो असेंच वाटेल. पण खरा चमत्कार म्हणजे सृष्टिनियमाचें उल्लंघन नव्हे काय ? असें कित्येक विचारतील; त्यांना मी उलट प्रश्न करून उत्तर देईन. सृष्टिनियम कोठें आहेत ? मानवी बुद्धीनें आजपर्यंत शोध लावला त्याप्रमाणें आणखी शोध लागून आतांपर्यंत ठाऊक नसलेले अधिक गूढ सृष्टिनियम सांपडल्यावर मृत माणसापासून जीवंत माणूस उठणे हे सृष्टिनियमाचें उल्लंघन न वाटता त्या नियमाचें प्रत्यंतरच वाटूं लागेल.

येथें कांहीं लोक आश्चर्यानें विचारतील कीं, एखाद्याला लोखंडाला तरंगावयास लावतां येतें याच मुद्यावर त्याला धर्म शिकविण्याचा काय अधिकार आहे ? एकोणिसाव्या शतकांतील आपणां लोकांना वरील विधान अयोग्य वाटेल खरें. पण आपल्या पहिल्या शतकांतल्या वाडवडिलांना तें विधान अर्थपूर्ण वाटलें असेल

कांहीं शिकलेली मंडळी विचारतील सृष्टिनियमांतला नियम म्हणजे सृष्टीचें स्थैर्य नव्हे काय ? या जगाचें चक्र अचल अशा नियमांनीं बद्ध असेंच फिरत नाहीं काय ? याला माझें उत्तर हें कीं, ज्याला अवतारी पुरुष नित्य व शाश्वत म्हणतात तो परमेश्वर खरोखरीच बदलत नाहीं व ईश्वरानें निर्माण केलेलें हें भवचक्र मात्र अचल नियमांनीं फिरतें. पण सृष्टीचे हे अचल नियम कोणचे हा जुना प्रश्न येथें पुन्हां उभा राहतो. अर्थात हे नियम म्हणजे पिढ्यानुपिढ्यांच्या अनुभवानें ठरलेले मानवी ज्ञानभांडारांत सांठविलेले शास्त्रीय सिद्धांत होत हें उघड आहे. पण या उत्तरावर अशी कोटी करतां येईल कीं, सृष्टीच्या उत्पत्तीच्या वेळीं आपल्या अनुभवासकट मनुष्य प्राणी हजर होता काय ? शास्त्रीय ज्ञानांत मुरलेल्या लोकांनीं सृष्टीच्या बुडाशीं बुडी मारून त्याचा थांग लावला आहे काय ? सृष्टिकर्त्यानें मनुष्याला आपला सर्व बेत सांगून दिला आहे काय कीं ज्या योगें अतर्क्य सृष्टीचा मूळ नकाशा त्यांनीं पाहिल्यामुळें अमक्या ठिकाणीं अमूक आहे हें त्यांना अचूक दाखवितां येतें ? अरेरे ! अशी

स्थिति नाहीं. आपण सामान्य माणसें जेथें आहों तेथें हे शास्त्रीय शोधक आहेत; मात्र ते आमच्यापेक्षां या बिनबुडाच्या व बिनकिनाऱ्याच्या अनंत समुद्राच्या हातभर ज्यास्त खोल गेले आहेत इतकेंच !

प्रसिद्ध गणिती लॅपसेस यानें सूर्यमाला व त्यांतील ग्रह व उपग्रह याच्या गतीची मीमांसा आपल्या पुस्तकांत दिली आहे व त्याचा पडताळा दुसऱ्यांना पटलेला आहे. हे सर्व शोध महत्वाचे आहेत खरे. पण आकाशांत चमकणाऱ्या अनंत ताऱ्यांपैकीं किती थोड्यांचा आपणाला शोध व माहिती लागली आहे.

सर्वांत शहाण्या माणसाची दृष्टि दूरवर फांकलेली असते, पण त्यालासुद्धां सृष्टि ही अनंतपट खोल व अनंतपट विस्तृत वाटते व या अनंत विस्तारापैकीं आपल्याला थोडींशीं वर्षें व थोडेसे मैल याचीच फक्त माहिती आहे. सृष्टीच्या क्रमापैकीं आपल्या पृथ्वीरूपी ग्रहाच्या एका भागाची थोडीशी माहिती आपल्याला झाली आहे. पण एकंदर सृष्टीचा क्रम आपल्याला अवगत आहे काय ? एखाद्या पाण्यांतील माशाला आपल्या खाडींतील खड्यानखड्याची माहिती झाली असेल. पण त्या माशाला समुद्राची भरती-ओहोटी, समुद्रांतले क्रमिक प्रवाह, व्यापारी वारे, पावसाळे व चंद्राचीं ग्रहणें यांची माहिती आहे काय ? पण या सर्व गोष्टींचा त्याच्या खाडींतील स्थितीवर परिणाम होतो व ती अकस्मात् बदलते. मानवी प्राणी हा वरच्या माशाप्रमाणें आहे; पृथ्वी ही त्याची लहान खाडी होय. अनंत विश्व हा त्याचा समुद्र होय. युगानुयुग ईश्वरी नेमानेम हे त्याचे पावसाळे व क्रमिक प्रवाह होत.

सृष्टीला भांडार म्हणतात व खरोखरी सृष्टि ही प्रचंड ग्रंथभांडार आहे व या ग्रंथभांडाराचा कर्ता व लेखक परमेश्वर होय. हे ग्रंथभांडार वाचणें हे किती दुर्घट काम आहे. या ग्रंथभांडाराची लिपी मुष्कीलीनें आपल्याला समजते; मग त्यांतील शब्दाचें, त्यांतील वाक्याचें, त्यांतील मोठमोठ्या वर्णनाचें व काव्यमय व तात्विक भागाचें ज्ञान मिळविणें मानवी प्राण्याला किती कठीण काम आहे. या दैवी ग्रंथभांडारांतील एखाददुसऱ्या ओळीचा अर्थ लावण्यास अवतारी पुरुष पाहिजेत. मग सामान्य माणसाचा येथें काय पाड ! आपल्या शास्त्रीय संस्थांनीं व मंडळ्यांनीं जोराची खटपट चाल-

विली आहे खरी; पण या गूढ ग्रंथभांडारांतील थोडींफार अक्षरें लावून त्यांतून कांहीं उपयुक्त गोष्टींचा शोध त्यांनीं लाविला आहे, इतकेंच.

रूढी आपणा सर्वांना हातारचळ लावते खरें पाहिलें असतां रूढी हीच सर्वांत प्रमुख पटकार आहे. ती जगांतील सर्व भूतांकरितां अमूर्त कपडे विणते व त्यायोगें तीं भूतें आपल्याला दृग्गोचर होऊन आपल्याजवळ राहतात व आपल्या घरांत व कारखान्यांत उपयोगी नोकराप्रमाणें कामें करतात; परंतु या भूतांच्या दैवी स्वरूपाची पुष्कळांना ओळख नसते. तत्वज्ञान प्रथमपासून असें म्हणत आलें आहे कीं, रूढी ही मोठी वंचक आहे, आपण प्रत्येक बाबतींत रूढीच्या अनुरोधानें चालतों, नव्हे आपण रूढीमुळें पुष्कळ गोष्टींवर विश्वास ठेवतों. स्वतंत्र विचाराचे आहों अशी आपण कितीही घमेंड मारली तरी पुष्कळ वेळां ज्यांना आपण स्वयंसिद्ध तत्वें म्हणतों तीं वादविषय न झालेले आपले समज असतात. एवढेंच नव्हे, तर सर्वकाळीं तत्वज्ञान म्हणजे रूढीविरुद्ध मानवी प्राण्यानें सतत चालविलेलें बंड किंवा अंधरूढीच्या पार जाण्याची जोराची खटपट होय.

रूढीनें उत्पन्न केलेले आभास व तिच्या हातचलाखीचे खेळ असंख्य आहेत; परंतु सर्व खेळांतील चतुराईचा खेळ म्हणजे खरोखरी चमत्काराची गोष्ट वारंवार पाहून ती चमत्कृतिहीन आहे, असे भासविणे हा होय. हें खरें आहे कीं, या योगें आपले या जगांतील व्यवहार सुलभ होतात कारण मनुष्यानें नेहमींच आश्चर्यसंमूढ न राहतां आपलें जगांतील कर्तव्यकर्म पार पाडलें पाहिजे. या ठिकाणीं रूढी ही प्रेमळ दाईप्रमाणें मनुष्यप्राण्याच्या हिताचाच मार्ग दाखविते. पण हेंही खोटें नाहीं कीं, ती दाई प्रेमळ पण मूर्ख आहे किंवा आपण तिचीं मूर्ख लाडावलेलीं लेकरें आहोंत व त्यामुळें आपल्या विश्रांतीच्या व विचाराच्या वेळांत—कामाच्या वेळीं नव्हे—तेच आभास खरे मानतों. जी गोष्ट अद्भुत आहे ती दोनदां दोनशेंदां, किंवा सहस्रदां पाहिली म्हणून तिच्याबद्दल आपण उदासीन व्हावें काय ? असें व्हावयाला कांहींही योग्य कारण नाहीं; मनुष्यप्राणी म्हणजे एक काम करावयाचें यंत्र आहे व ज्याप्रमाणें कापूस पिंजून किंमतीचा माल करणाऱ्या वाफेच्या यंत्राला वाफ त्याचप्रमाणें मनुष्यप्राण्याला काम करायला येण्याकरितां वाफे ऐवजीं विचारशक्ति दिली

आहे एवढेंच. हीच जर मनुष्यप्राण्याबद्दलची कल्पना करावयाची असेल तर मात्र अद्भुताबद्दल आश्चर्याला जागा नाहीं खरी ! नाहीं तर विचारवान् प्राण्याला अद्भुताबद्दल आश्चर्य वाटलें पाहिजे.

भाषेंतील नांवाची शक्तिही या बाबतींत विलक्षण आहे. खरोखरी नांवेंसुद्धां रूढीनें विणलेले व वस्तुजाताचा अद्भुतपणा लपविणारे कपडेच आहेत चेटूक, भूतबाधा व पिशाचानें पकडणें याला हल्लीं आपण वेड व मज्जातंतूचे रोग म्हणतों. पण हें नांव देतांना आणखी एक नवा प्रश्न उद्भवतो, याचा आपण विचार करीत नाहीं. वेड म्हणजे काय व मज्जातंतू म्हणजे काय हा तो प्रश्न होय. जिला आपण सत्य सृष्टि म्हणतों व जी आपल्याला सुरेख रेखाटलेल्या देखाव्यासारखी दिसते तिच्यामध्यें वेड म्हणजे एक अद्भुत भयप्रद व म्हणूनच सैतानी घोंटाळाच नव्हे तर काय ? प्रसिद्ध धर्मसुधारक लूथर याला दिसलेलें भूत दृग्गोचर असो कीं मनोगोचर असो, पण तें कमी सत्य होतें काय ? प्रत्येक शहाण्यासुर्त्या माणसांत अशा वेडाची लहर असते किंवा त्याच्यावर भूतबाधेचा अंमल असतोच. ज्याप्रमाणें पृथ्वीच्या पोटांतील काळ्याकुट्ट पायावर पृथ्वीचा राहण्यास योग्य व वृक्षवेलींनीं युक्त असा पृष्ठभाग तयार होतो त्याचप्रमाणें या वेडाच्या लहरीवर व भूतबाधेच्या अंमलांतून शहाणपणाची इमारत उभारली जाते.

परंतु अद्भुततेला लपविणारे व आभास उत्पन्न करणारे मूलभूत व जगाला आवरण करणारे जर कोणचे दोन दृश्य पदार्थ असतील तर ते दिक् किंवा आकाश व काल हे होत. हे पदार्थ आपल्या जन्माच्यासुद्धां आधीं पिंजले व विणले जातात, ते आपल्या जीवात्म्याच्या इहलोकच्या वस्तीकरितां तयार केलेले असतात; व ते सर्वव्यापी असून त्यांच्याच योगें या मायामय जगांतील लहानसहान आभास उत्पन्न होतात. जोंपर्यंत मानवी प्राणी या पृथ्वीवर रहात आहे तोंपर्यंत या पदार्थांचें आवरण त्याला दूर सारता येत नाहीं. फार झालें तर क्षणार्धपर्यंत या आवरणाचा भेद करून त्यांतून पलीकडे पाहतां येतें.

दंतकथेंतल्या भाग्यवानाजवळ एक कामधेनुस्वरूपी टोपी होती. ही टोपी डोकीवर घालून अमक्या ठिकाणीं मला जावयाचें आहे अशी

इच्छा केल्याबरोबर त्याला त्या टोपीच्या प्रभावानें तेथें जातां येत असे, या युक्तीनें त्या भाग्यवानानें आकाशावर ताबा मिळविला होता; नव्हे, या योगें त्यानें आकाशाचें अस्तित्व नाहींसें केलें होतें. त्या युक्तीनें भाग्यवानाला दूर हा शब्द नाहींसा झाला. सर्व ठिकाणें त्याला एके ठिकाणीं होती. या दंतकथेंतील टोपीप्रमाणें टोप्या करणारा जर एखादा कारखानदार निघाला व तो सर्वांना अशा टोप्या देऊं लागला तर जगांत काय विलक्षण क्रांति होईल. त्याचप्रमाणें जर या दिङ्नाशी टोप्यांच्या कारखानदाराप्रमाणें कालनाशी टोप्यांचा कारखानदार निघाला तर अधिक ज्यास्त विलक्षण क्रांति होईल नाहीं बरें ? माझ्याजवळची पै न पै देऊन मी या दोन टोप्या विकत घेतल्या असत्या. एक टोपी घालून मी कोठेंही जाण्याची इच्छा करतांच तेथें जातां आलें तर काय बहार होईल ? नंतर दुसरी टोपी घालून कोणत्याही कालांत जाण्याची इच्छा करतांच त्या काळांत जातां आले तर अधिकच बहार होणार नाहीं का? ही दुसरी शक्ति जास्तच अजब वाटेल नाहीं का? आपल्य इच्छेप्रमाणें सृष्टीच्या उत्पत्तीच्या आरंभीं हजर असणें व सृष्टीच्या प्रलयकाळीं हजर असणें हीं एका काळीं करतां आल्यास काय मौज होईल ? इसवी सनाच्या पहिल्या शतकांत हजर राहून क्रिस्त शिष्य सेंटपॉल व रोमन तत्ववेत्ता सेनेका यांच्याशीं संभाषण करून लगेच एकतिसाव्या भावी शतकातील भावी पॉल व सेनेका यांच्याशीं संभाषण करण्यास सांपडणें ही गोष्ट किती विस्मयजनक आहे.

पण ही गोष्ट अशक्य आहे असें तुम्हांला वाटतें. तर मग काय भूतकाळ व भूत गोष्टी अजीबात नाहींशा होतात व भावी काळ व भावी गोष्टी अझून अस्तित्वांत नसतात असें तुमचें म्हणणें ? पण याचें उत्तर तुमच्या गूढ शक्ति, स्मृति व आशा याच देतात. कारण या अजब शक्तीच्या सहाय्यानें तुम्हांला भूतभविष्य काळांना एकत्र बोलावून त्यांच्याशीं हितगुज—अस्पष्टपणें कां होईना-करतां येते. गत दिवसाचे पडदे वर केले जातात व उद्यांक दिवसाचे पडदे खालीं केले जातात; पण काल व उद्यां या दोहोनाहीं अस्तित्व आहे. कालरूपी तत्वाला भोंक पाडून शाश्वताकडे पहा. मानवी आत्म्याच्या हृत्पटलावर लिहिलेला लेख

जो सर्व काळीं सर्व तत्वज्ञान्यांनीं वाचला आहे—लक्षपूर्वक वाचा व वाचल्यावर त्यावर विश्वास ठेवा म्हणजे तुमच्या ध्यानांत येईल कीं, दिक् व काल हे ईश्वर नव्हेत तर ते ईश्वराची कृति आहेत. ईश्वर सर्वत्र व सर्वकाळीं आहे.

या विचारानें आत्म्याच्या अमरत्वाची अंधुक कल्पना तरी येत नाहीं काय ? ज्याला आपण आंगाखांद्यावर खेळविलें तो आपला प्रिय बालक मृत झाला असतां त्याला आपण थडग्यांत पुरतों. आपलें कष्टमय व दुःखमय आयुष्य एकटेच आक्रमण करीत असतां त्याचें तें पांढरें थडगें दूरदूर जाणाऱ्या मैलाच्या दगडाप्रमाणें आपल्याला ज्यास्त ज्यास्त अंधुक होत जातें. हें थडगें हा निव्वळ सैतानी आभासच आहे किंवा आपला प्रिय मित्र गूढपणें—ज्याप्रमाणें आपण येथें गूढपणें परमेश्वरासन्निध आहों त्याप्रमाणे—परमेश्वरासंन्निध आहे ? हेच खरें मानण्यास हरकत नाहीं कीं, कालावच्छिन्न आभास मात्र विनाश पावले आहेत किंवा विनाशी आहेत. जी जी गोष्ट होती, आहे, व होईल तिचें खरें सत्व हें सदोदित अस्तित्वांत आहे. हें सत्व दुर्दैवानें नवें वाटत असल्यास त्यावर सावकाशपणें विचार करीत बसा; मग तो विचार वीस वर्षे चालो किंवा वीस शतकें चालो. या सत्वावर विश्वास ठेवण्याखेरीज गत्यंतर नाहीं, तरी पण त्याचें बुद्धीला पूर्णपणें आकलन होण्यासारखें नाहीं.

ज्या दिक्काल चिन्मय पदार्थांनीं आपलें मानवी जीवित सतत आवृत झालेलें आहे त्यांनीं आपली व्यावहारिक विचारसरणी, आपले विचार व आपले कल्पनातरंग या सर्वांना नियमित करावे ही गोष्ट योग्य, न्याय्य व अपरिहार्यच आहे. परतु त्यांनीं मानवी प्राण्याच्या मनावर अंमल चालवावा व आपल्या सभोंवार पसरलेल्या अद्भुत चमत्काराबद्दल आपल्याला अंध करावें ही गोष्ट मात्र अयोग्य आहे. दिक्काल हे चिन्मय पदार्थ आहेत असें समजा—नव्हे—प्रत्यक्ष जडासारखे दृग्गोचर पदार्थ आहेत असेंही पाहिजे तर समजा; म्हणजे तुमच्या ध्यानांत येईल कीं, या पदार्थांचे पातळ आवरणामुळे परमेश्वराचें दैदिप्यमान स्वरूप मानवी दृष्टीला दिसत नाहीं. उदाहरणार्थ, जर मी आपला हात लांब करून सूर्याला मुठींत धरलें तर तो अद्भुत चमत्कार होणार नाहीं काय ? तरी पण

दररोज आपण आपला हात लांब करून पुष्कळ वस्तु मुठींत धरतों व त्यांना इकडून तिकडे झोंके देतों. पहिला प्रकार आपल्याला अद्भुत वाटतो; पण दुसरा वाटत नाहीं, हें किती कोत्या विचाराचें लक्षण आहे. चमत्कार काय निव्वळ मैलांच्या लांबींत किंवा शेरांच्या वजनांत आहे ? खरा गहन व ईश्वरसाक्षात्कारी चमत्कार हा होय कीं, मला माझा हात लांब करतां येतो; व माझ्या मुठींत धरावयाची स्वतंत्र शक्ति माझ्यामध्यें आहे. याप्रमाणें खऱ्या अद्भुत चमत्कारांबद्दल मानवी प्राण्याच्या मनांत अंधत्व उत्पन्न करून त्याची फसवणूक करणारे चिन्मय तत्व म्हणजे आकाश होय. कालाची कृति यापेक्षांही विलक्षण आहे. जगांतील सर्व अद्भुत चमत्कारांना लपविणारें व जगांतली जादुगिरी नाहींशी करणारें तत्व म्हणजे हा वंचक काल होय. जर आपल्याला कालविध्वंसक टोपी एकदां तरी घालावयाला मिळाली तर आजपर्यंत ऐकलेल्या खऱ्याखोट्या अद्भुत चमत्काराच्या गोष्टी व जादुगिरीचे खेळ यापेक्षां ज्यास्त अद्भुत गोष्टी या जगांत आहेत असें आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल. परंतु दुःखाची गोष्ट ही आहे कीं, अशी टोपी आपल्याजवळ नाहीं व अशा टोपीशिवाय तर हा अद्भुत चमत्कार आपल्या दृष्टीस पडणें कठीण आहे.

उदाहरणार्थ, जर ग्रीक देवतांपैकीं जुपिटर व आपोलो यांच्या मुलांनीं आपल्या मुरलीच्या ध्वनीनें ग्रीसमधील थीब्स शहराचे तट बांधले असते तर ती गोष्ट अद्भुत झाली नसती काय ? पण आपण राहतों त्या शहराची तटबंदी, तेथले सुंदर रस्ते व दगडी घरें भयंकर खाणींतून दगड आणून कोणीं बांधलीं ? ज्या विभूतींनीं पूर्वकाळीं मानवोन्नति घडवून आणली त्यांच्याच बुद्धीरूपी मुरलीच्या नादानें हें सर्व घडून आलें नाहीं काय ? अठराशें वर्षांपूर्वीं अशी विभूति ( येशुक्रिस्त ) या जगांत अवतीर्ण झाली व त्या विभूतीच्या साध्या, सोप्या, असंस्कृत पण अंतःस्फूर्तीनें निघालेल्या मधुर गायनानें ( त्यानें केलेल्या उपदेशानें ) मानवी मनें आकर्षित झालीं व त्या गायनाचा ध्वनि अझून ऐकूं येत आहे व त्या नादानें हजारों हृदयें अझूनही उचंबळत आहेत. हा काय कमी अद्भुत चमत्कार आहे ? ग्रीसमधील थीब्स शहर आरफीयसच्या ( आपोलोचा मुलगा ) गाण्यानें बांधलें इतकेंच नाहीं तर कोणच्या तरी विभूतीच्या

गाण्याखेरीज कोणतेंही शहर बांधलें गेलें नाहीं किंवा मनुष्याला अभिमान वाटणारें कोणतेंही काम झालेलें नाहीं.

कालानें उत्पन्न केलेला दृग्भ्रम दूर सारा; व जवळ असलेल्या गतिदायक कारणावरून दूर असलेल्या गतिप्रवर्तकाकडे नजर फेंका. एकाच चेंडूला टोला देऊन तो दूर फेंकला गेला म्हणजे मात्र तो टोला होय; पण तोच टोला जर हजारों स्थितिस्थापक चेंडूंच्या परंपरेमधून आला म्हणजे तो टोला नव्हे असें कसें म्हणतां येईल? जर कालविध्वंसक टोपीच्या साहाय्यानें तुम्हांला प्रारंभाकडून लगेच शेवटाकडे नेतां आलें असतें तर तुमच्या दृष्टीवरील कालकृत भ्रमपटल जाऊन तुमच्या हृदयावर जगांतील खऱ्या अद्भुत चमत्कारांचें प्रतिबिंब उमटलें असतें. व मग हें सुंदर जग त्यांतल्या कानाकोपऱ्यासुद्धां तुम्हांला ' वैकुंठींचें राज्य ' वाटलें असतें व प्रत्येक ताऱ्यामध्यें, प्रत्येक गवताच्या काडीमध्यें व विशेषतः प्रत्येक जिवंत प्राण्यामध्यें परमेश्वरी स्वरूप दिसलें असतें. परंतु परमेश्वराचें कालावच्छिन्न वस्त्र जी सृष्टि तीमध्यें शाहण्याला परमेश्वरी रूप दिसतें; पण मूर्खाला तेथें तें रूप दिसत नाहीं याला काय करणार?

प्रत्यक्ष खऱ्या भूतापेक्षां अधिक अद्भुत कांहीं असेल काय? प्रसिद्ध इंग्रज ग्रंथकार जॉनसन याला सर्व आयुष्यभर भूत पाहण्याची फार इच्छा होती. तें पाहण्याकरितां त्यानें भुताटकीचीं घरें धुंडाळलीं; कबर-स्थानाचीं भुयारें शोधलीं व प्रेताच्या पेट्या तपासल्या, पण व्यर्थ! काय हा वेडगळपणा! ज्या मानवी जीवितप्रवाहाबद्दल त्याला इतकें प्रेम वाटत होतें त्या प्रवाहाकडे त्यानें जड डोळ्यांनीं कधींही पाहिलें नाहीं काय किंवा त्याचें मनानें मनन केलें नाहीं काय? अथवा त्यानें कधीं स्वतःवर नजर फेकली नाहीं काय? स्वतः जॉनसन हा प्रत्यक्ष व खरें भूतच होता. त्याच्या जवळून जवळजवळ दहा लक्ष भूतें रस्त्यांतून जात येत होतीं. ही गोष्ट ध्यानांत येण्याकरितां कालाचा दृग्भ्रम दूर करा. तीन वीसा वर्षांचा तीन मिनिटांत संक्षेप करा म्हणजे समजेल कीं, तो जॉनसन कोण होता व आपण कोण आहों? आपण शरीरानें युक्त अशीं दृश्यमान भूतेंच नाहीं तर काय? व आपणही कालांतरानें हवेंत मिळून जाऊन अदृश्य बनत नाहीं काय? हें निवळ रूपक नाहीं; हें शास्त्रीय सत्य आहे. आपण

अभावापासून उत्पन्न होऊन रूपें धारण करतों व भूतें बनतों. खऱ्या भूताप्रमाणें आपल्यालासुद्धां अमरत्व आहे व अमरत्वांत मिनिटें, वर्षें व युगें सारखींच आहेत. या आपल्या आयुष्यांत भूतांच्या सुंदर गायनाप्रमाणें प्रेमाचीं व श्रद्धेचीं गाणीं ऐकूं येत नाहींत काय ? तसेंच आपल्या परस्पर वादविवादांत व शिव्याशापांत भूताप्रमाणें आपण आरडतओरडत नाहीं काय ? व भूताप्रमाणें आपण रात्रीच्या स्वप्नाकुल झोंपेंतून पहाटेच्या वाऱ्यानें जागे होऊन आपल्या कामाला लागत नाहीं काय ? सारांश, भूतांत व आपल्यांत फरक काय आहे ? मॅसिडान देशाचा प्रसिद्ध शिकंदर बादशाहा आतां कोठें आहे ? ॲराबेला व आयझस या ठिकाणीं युद्धाच्या घोर आरोळ्या देणारें त्याचें प्रचंड सैन्य मागें राहिलें आहे काय ? किंवा भांबावलेल्या भूताप्रमाणें तें सर्व नाहींसें झालें ? हीच स्थिति नेपोलियन व त्याचें सैन्य यांची झाली आहे. भूतें ! सर्व पृथ्वीवर दोन प्रहरीं एक अब्जावर भूतें उघडपणें वावरत आहेत. तुमच्या घड्याळाची एक टिकटिक होत आहे इतक्या वेळांत पन्नास भूतें नाहींशीं होतात व तितकींच उत्पन्न होतात.

आपल्यामध्यें भावी भूत आहे इतकेंच नव्हे तर आपण प्रत्यक्ष भूतेंच आहोंत हा विचार किती गूढ व गंभीर आहे. हीं आपलीं इंद्रियें; ही आपली थैमान करणारी शक्ति; हा आपल्या जीविताचा रक्तप्रवाह व त्यातले ते उचंबळणारे मनोविकार; हीं सर्व कोठून आलीं? हीं सर्व जडात्मक व आभासात्मक आवरणें आहेत; व तीं आपल्या आत्म्याभोंवतीं गुरफटलेलीं आहेत; यायोगें कमीअधिक कालपर्यंत परमेश्वरी सत्व मूर्तिमान बनतें. तो मजबूत लढाऊ घोड्यावर बसलेला योद्धा पहा. त्याच्या डोक्यांतून जणूं काय ठिणग्या बाहेर पडत आहेत; त्याच्या मनगटांत व अंतःकरणांत आवेश भरला आहे, पण तो योद्धा व घोडा म्हणजे एक दृग्भ्रम आहे. तीं एक आविर्भूत झालेली चित्‌शक्ति होय ! ते दोघेही भरभक्कम वाटणाऱ्या पृथ्वीवरून ‘ धीरोदात्त ’ असे चालतात; पण त्यांना कळत नाहीं कीं, पृथ्वी म्हणजे एक पातळ थर आहे. तो थर दुभंगतो व योद्धा व घोडा हे एकदम बुडून जातात आणि कल्पनेनेंसुद्धां त्यांचा मागमूस लागत

नाहीं; कांहीं वेळापूर्वीं ते अस्तित्वांत नव्हते; पुन्हां कांहीं वेळानें ते नाहींसे होतात; व त्यांचा कांहींएक अवशेष रहात नाहीं.

हाच सृष्टीचा प्रथमपासून क्रम आहे व हाच शेवटपर्यंत चालावयाचा आहे. पिढ्यानुपिढ्या भूतें मूर्ति धारण करतात, काळोख्या रात्रींतून बाहेर येतात व परमेश्वरी संकेताप्रमाणें आपलें काम करतात. त्यांच्यामध्यें जी शक्ति व जो आवेश असतो त्यांचा ते विनियोग करतात; कोणी उद्योगांत पडून वैश्यवृत्ति पतकरतात; कोणी शास्त्रीय शोधाचे पाठीस लागतात; कोणी क्षात्रवृत्ति पतकरून धारातीर्थीं पतन पावण्यास जातात; प्रत्येकाचें काम संपल्यावर त्याला परत बोलावण्यांत येतें; व त्याचे पृथ्वीवरील शरीररूपी वस्त्र गळून पडतें; मग तें मातीस मिळून अदृश्य होतें.

याप्रमाणें आपण अदृश्यांतून उद्भूत होतों, कांहीं काळपर्यंत पृथ्वीवर वावरतों व पुनः अदृश्यांत विलीन होतों; आपल्या आक्रमणात पृथ्वीवरील पर्वत सपाट होतात; व तेथले समुद्र भरून जातात. जड व मायामय पृथ्वी सत्यपूर्ण व जीवंत भूतांना अडथळा कसा करू शकेल ? कठीण हिऱ्यावर आपल्या पावलाचा ठसा उमटतो; व पिछाडीचा शेवटला माणूस आघाडीच्या पहिल्या माणसाचीं चिन्हें ओळखू शकेल अशी मानवी परंपरा चालू आहे. पण ही कोठून आली व कोठें जात आहे ? हें दृष्टीला गोचर होत नाहीं; श्रद्धेला कळत नाहीं; इतकें खरें कीं, ती परंपरा गूढापासून गूढाकडे किंवा परमेश्वरापासून परमेश्वराकडे चालली आहे. स्वप्नें ज्याचीं बनतात त्यानें आपण बनलेले आहोत व हें आपलें छोटे आयुष्य निद्रेनें परिवेष्टित आहे." झालें. येथें टॉयफल्सड्राखची नेपथ्यमीमांसा संपली. ही नेपथ्यमीमांसा म्हणजे एक तत्वमीमांसा आहे हे वरील विवेचनावरून दिसून आलें असेल व त्या तत्वमीमांसेचें विशेष स्वरूप म्हणजे ही तत्वमीमांसा एकेश्वरी स्वरूपाची आहे. या दृश्य जगाच्या मूळाशीं एक परमेश्वर आहे; सर्व दृश्य जग हें त्या गूढ परमेश्वराचें दिक्कालावच्छिन्न असें विनाशी स्वरूप आहे. मानवी व्यवहारांतही हाच प्रकार आहे. मानवी संस्था, व आचारविचार यांचे मुळाशीं तात्विक असें गूढतत्व असतें. हें गूढतत्व त्या आचारामधून दिसत आहे, तोंपर्यंत

ते आचार व संस्था अन्वर्थक आहेत असें म्हणतां येईल. पण आचारांच्या आंतला गूढार्थ नाहींसा झाला म्हणजे ते आचार निरर्थक झाले असें म्हटलें पाहिजे. मग नवे अन्वर्थक आचार प्रचारांत आणणें रास्त आहे. आचार व गूढार्थ यांत नेहमीं संवाद पाहिजे; ते विसंवादी झालें म्हणजे नवे आचार प्रचारांत आणणें प्राप्त आहे. हेंच टॉयफल्सड्राखच्या नेपथ्यमीमांसेचें रहस्य आहे.

आतां हें कार्लाईनें प्रतिपादन केलेलें तत्व हिंदुचालीरीतींना कसें लागूं पडतें हें दाखविण्यापूर्वीं कार्लाईच्या विचारकंथा या ग्रंथाच्या एका प्रकरणाचें सबंध भाषांतर देण्याचा विचार आहे. कारण त्या प्रकरणांत वर्णिकेली स्थिति हल्लींच्या काळीं सुद्धां सर्व समाजांत दिसून येत आहे. कार्लाईलच्या विचारसरणीचें व्यावहारिक स्वरूपही त्या प्रकरणावरून कळेल. अर्थात् हें प्रकरण गूढ व्याजोक्तीनें भरलेलें आहे. पण त्याचा अर्थ व त्यापासून घ्यावयाचा उपदेश हीं अगदीं स्पष्ट आहेत.

७

# रंगेलपेशे व कंगालपेशे लोक.

प्रथमतः रंगेलपेशा पुरुषाची व्याख्या करूं या. ज्याचें सर्व आयुष्य उद्दिष्ट व उद्योग कपड्याकरितांच आहे असा कपडे घालणारा पुरुष म्हणजे रंगेलपेशा पुरुष होय. त्याच्या आत्म्याचें त्याच्या अंतःकरणाचें, त्याच्या शरीराचें व त्याच्या पैशाच्या पिशवीचें शक्तिसर्वस्व शहाणपणानें व शोभिवंतपणानें वस्त्रपरिधान करण्याकडे वाहिलेलें असतें. इतकें कीं, जर इतर लोक जगण्याकरितां कपडे वापरतात असें म्हटलें तर रंगेलपेशा पोषाखाकरितां जगतो असें म्हणणें रास्त होईल. जें पोशाखाचें महत्व सिद्ध करण्याकरितां अपूर्व विद्वत्तेच्या व कुशाग्र बुद्धीच्या जर्मन प्रोफेसरास एक प्रचंड पुस्तक लिहावें लागलें तें महत्व कल्पकाच्या उपजत बुद्धीप्रमाणें रंगेलपेशाच्या अंतःकरणांत आपोआप उदित होतें. त्याला पोशाखानें काव्यस्फूर्ति येते. तो पोशाखाचा कवि बनतो. जिला टॉयफल्सड्राख ' कपडयाची दिव्य कल्पना ' म्हणेल ती कल्पना रंगेलपेशाच्या मनांत जन्मतः उद्भूत होते. व असल्या इतर कल्पनांप्रमाणें ती कल्पना एक तर बहिर्मुख होऊन आपलें अस्तित्व प्रगट करते; किंवा अन्तर्मुख राहून अवर्णनीय वेदनांनीं त्याचें अंतःकरण विद्ध करते.

परंतु उदार व उत्साही कल्पकाप्रमाणें रंगेलपेशा बेधडक त्या कल्पनेला कृतिरूप देतो. तो आपल्या विलक्षण पोशाखांत जगाला दर्शन देतो. सनातन नेपथ्य--स्वर्गाची मूर्तिमंत साक्ष म्हणून व त्या स्वर्गाकरितां आपलें जीवनसर्वस्व अर्पण करणारा भक्त म्हणून सर्व जगभर वावरतो. त्याला आपण आतांच कवि म्हटलें नाहीं का ? खरोखरीच आपल्या शरीराच्या फुगीर त्वग्भूर्जपत्रावर तो आपल्या छानछोक पोशाखानें आपल्या प्रियकरणीच्या प्रेमकटाक्षांकरितां लघुकाव्य करीत नाहीं काय ? नव्हे, सर्व जगाकरितां सुवाच्य कवितावद्ध महाकाव्य तो करतो असेंच म्हणाना !

शिवाय रंगेलपेशाला विचारशक्ति आहे व त्याला दिक्कालांच्या कल्पना आहेत असें गृहीत धरलें—असें गृहीत धरण्यास कांहीं एक हरकत नाहीं—तर पोशाखासंबंधींच्या आजीव भक्तीनें व नश्वराकरितां अविनाशी तत्वाच्या त्यागानें तो रंगेलपेशा कालावच्छिन्न व कालातीत या तत्वांचा मिलाफ व एकीकरण ( उलट क्रमानें कां होईना ) करून सिद्ध पुरुषाची कृति करून दाखवीत नाहीं काय ?

बरें आपल्या या त्यागाबद्दल, या काव्यस्फूर्तीबद्दल व या सिद्धत्वाबद्दल रंगेलपेशा जगाजवळ मोबदला तरी काय मागतो ? फक्त तुम्हीं त्याचें अस्तित्व ओळखा; तो सजीव प्राणी आहे इतकें कबूल करा; निदान तो दृश्य देखावा किंवा प्रकाशकिरणांचें प्रतिबिंब पाडणारा पदार्थ आहे एवढें म्हणा म्हणजे झालें ! कृपण कायद्यानें त्याला पूर्वींच मिळालेल्या मिळकतीखेरीज तो तुमचें सोनेंरुपें मागत नाहीं; त्याला फक्त तुमच्या नेत्रकटाक्षाची अपेक्षा असते. त्याच्या अस्तित्वाचा गूढार्थ तुम्हाला समजो वा न समजो किंवा विपरीत समजो; फक्त त्याच्याकडे तुम्हीं दृष्टि फेंका म्हणजे त्याला समाधान आहे. जें कृतघ्न जग रंगेलपेशावर एवढीशी स्वल्प कृपा करीत नाहीं त्या जगाची छी: थू कां करूं नये? बरें, तेंच जग सुकलेल्या मुसरी किंवा सयामी जुळे असल्या आश्चर्याकडे सारखें पहात राहतें; मात्र रंगेलपेशारूपी घरगुती आश्चर्यांतल्या आश्चर्याकडे ढुंकूनही पहात नाहीं किंवा त्यानें पाहिलेंच तर तिरस्कारबुद्धीनें पाहतें ! रंगेलपेशाला प्राणिशास्त्रज्ञ सस्तन प्राणिवर्गांत मोडीत नाहींत; प्राणिछेदक काळजीपूर्वक त्याचें पृथक्करण करीत नाहींत; बरें, आपल्या पदार्थसंग्रहालयांत रंगेलपेशाचा दारूत मुरलेला किंवा पिचकारीनें विषारी पदार्थ शरीरांत घालून न सडेल अशा तऱ्हेनें ठेवलेला मासला कोणीं पाहिला आहे काय ? हेरिंगबोन सरदार तपकिरी रंगाचा सदरा, तपकिरी रंगाचा पोशाख व तपकिरी रंगाचा बूट घालो; त्याला कांहीं एक हरकत नाहीं. सामान्य लोक आपल्या नित्याच्या गरजा भागविण्यांत गुंतलेले असतात. ते या रंगेलपेशाकडे मुळींच लक्ष देत नाहींत.

हल्लीं दाक्षिण्ययुगाप्रमाणें जिज्ञासायुग नाहींसें झालें आहे असे म्हटलें तरी चालेल. कदाचित् तें नुसतें निद्रित झालें असेल. कारण,

त्या दोन्ही युगांचें पुनरुज्जीवन करण्याकरितां नेपथ्यमीमांसा अवतरली आहे. जर या नेपथ्यशास्त्राबद्दलच्या खऱ्या मतांचा प्रसार होईल तर ब्रिटिश बेटांतील रंगेलपेशांचें सत्य स्वरूप व त्यामध्यें भरलेला गूढार्थ यांच्याबद्दलच्या हास्यास्पद व शोकास्पद भ्रमाचा निरास होईल. टॉयफलसड्राखच्या ग्रंथांतील खालच्या लांब उताऱ्यावरून या प्रश्नावर चांगला प्रकाश—निदान संधिप्रकाश तरी—पडेल अशी आशा आहे. मात्र ही दुःखाची गोष्ट आहे कीं, इतर ठिकाणाप्रमाणें या ठिकाणीं सुद्धां प्रोफेसरसाहेबांची तात्विक सूक्ष्म दृष्टि दिवाभीताप्रमाणें ईषदंध झाल्यासारखी दिसते. किंवा या सर्व लिहिण्यांत त्यांची वक्रव्याजोक्ति नाहींना ? यांपैकीं कोणचें खरें याचा वाचकच विचार करतील.

" या संक्षुब्ध काळांत ज्या वेळीं धर्मतत्व प्रार्थनामंदिरांतून हांकून लावल्यामुळें गुप्तपणें सदाचारी लोकांच्या अन्तःकरणांत शिरून तेथून नव्या रूपानें आविर्भूत होण्याची इच्छा करीत आहे, आपल्याला नवें पार्थिव शरीर शोधण्याकरितां इकडे तिकडे हिंडणाऱ्या अशरीरी आत्म्याप्रमाणें तें धर्मतत्व आधारावांचून जगभर हिंडत आहे, अशा वेळीं तें धर्मतत्व तात्पुरतीं पुष्कळ विलक्षण रूपें धारण करतें. मानवी स्वभावाच्या उच्चतर उत्साहाचा आदर्श सध्यां अस्तित्वांत नाहीं खरा, परंतु तो उत्साह अविनाशी असून तो अंधपणें पण अप्रतिहतपणें या संकीर्ण समुद्रांत काम करीत असतो. व म्हणूनच त्या उत्साहापासून पंथावर पंथ समाजावर समाज आविर्भूत होतात व पुनः विलीन होऊन नवीं नवीं रूपें धारण करतात

मुख्यतः हा प्रकार इंग्लंडमध्यें दिसून येतो कारण युरोपांतील सर्व देशांत इंग्लंड हा सुसंपन्न पण कुसंस्कृत देश आहे. यामुळें तेथें उष्णता व अंधःकार हीं तत्वें जास्त प्रमाणांत अस्तित्वांत आहेत व अशा तत्वांपासूनच विद्रूप रूपें उत्पन्न होतात. त्या देशांतील नवीन पंथांत आपल्या या विषयांशीं संलग्न व सर्वथा संस्मरणीय असा एक पंथ नुकताच अस्तित्वांत आला आहे. या पंथाचें नांव 'रंगेलपेशापंथ'. या पंथाची जी काय थोडी माहिती मिळाली आहे ती येथें नमूद केली आहे.

धर्मबुद्धि नसलेले किंवा तिच्या आविर्भावाचा विवेक नसलेले वर्त-

मानपत्रकर्ते आपल्या गूढलेखांत हा पंथ धार्मिक नसून व्यावहारिक आहे असें लिहितात हें खरें आहे. पण मानसशास्त्रीय दृष्टीला या पंथाचें भाविक व योगीय स्वरूप स्पष्टपणें दिसून येतें.

हा पंथ वस्तुपूजा विभूतिपूजा, किंवा बहुदेवतापूजा या कोणत्या वर्गापैकीं आहे हें सांगणें हल्लींच्या आपल्या ज्ञानावस्थेंत कठीण आहे. प्रकाश व अंधकार अशा दोन नित्य तत्वांवर भाव ठेवणाऱ्या मॅनिकिझिम नांवाच्या धर्मपंथाची छाया या पंथावर पडलेला दिसते; तसेंच, (कारण मानवी मतिविभ्रम याचें वर्तुळाकार परिभ्रमण चाललेलें असतें व म्हणूनच तेच ते मतिविभ्रम प्रादुर्भुत होतात.) निराहार उपवासानें व आपल्या नाभीकडे पुष्कळ काळपर्यंत टक लावून पाहिल्यानें त्या नाभीमध्यें विश्वदर्शन व स्वर्गदर्शन होतें असें जे ॲथॉसचे मठवासी म्हणतात त्यांच्या वेडगळ पंथासारखा हा पंथ आहे असें वाटतें.

ज्या पुरातन पंथाला झोरॅस्टर, कनफ्युशीअस, महंमद इत्यादि महात्म्यांनीं गौणता देऊन त्याची महती कमी करण्याचा–पूर्ण नाश करण्याचा नव्हे–प्रयत्न केला व उच्चतम धर्मामध्ये ज्याला अगदींच मज्जाव केला जातो–त्या स्वपूजेचा रंगेलपेशापंथ हा नव्या काळानुरूप नवा अवतार आहे असा माझा कयास आहे. म्हणून जर कोणी या पंथाला पुनरुज्जीवित अह्रीमनपंथ किंवा दैत्यपूजेचें नवें रूप म्हणावयाचें ठरवील तर त्याला आक्षेप घेतां येणार नाहीं.

बाकी या पंथाचे लोक नवीन पंथाच्या उत्साहानें प्रेरित झाल्यामुळें धैर्य दीर्घोद्योग व बदींत पडलेल्या मानवी जातींत जितकी शक्ति असणें शक्य आहे तितकी शक्ति त आपल्या पंथाच्या कामांत दाखवितात. ते आपल्या पंथाच्या बाबतींत पावित्र्य व पृथग्भाव यांचा आविर्भाव आणतात; ते आपला विशेष तऱ्हेचा पोशाख करतात व विशेष तऱ्हेची भाषा (इंग्रजी व फ्रेंच भाषेचें मोडकें तोडकें मिश्रण) वापरतात; सारांश ते आपली निराळी वागणूक ठेवतात व जगापासून अलिप्त राहतात.

या पंथाच्या लोकांचीं ज्यू लोकांच्या देवळांप्रमाणें मुख्य शहरीं देवळें असतात; व त्यांना स्वागतगृहें म्हणतात ते मुख्यतः रात्रीं देवपूजा करतात; त्यांच्या पंथाचे उपाध्याय व उपाध्यायिनी असतात; मात्र हा मान

तहाहयात नसतो. त्यांचे विधी शाक्तपंथी पद्धतीचे किंवा ग्रीक लोकांतील कांहीं गुप्तपंथासारखे असतात असें म्हणतात. पण हे विधी गुप्त तऱ्हेनें केले जातात. या पंथाचीं धर्मपुस्तकेंही आहेत; त्यांना चैनबाजी कादंबऱ्या म्हणतात. हे धर्मग्रंथ संपले नाहींत; उलट या धर्मग्रथांची वाढ अजून चालूच आहे. मात्र यांपैकीं कांहीं आधारभूत समजतात व कांहीं समजत नाहींत.

या धर्मपुस्तकांचे कांहीं मासले मी किंमत भरून विकत घेतले व नेपथ्यमीमांसाजिज्ञासूच्या उत्साहानें व या पंथाचें रहस्य समजावून घेण्याच्या आशेनें मी या धर्मग्रंथांचा अभ्यास सुरू केला. परंतु त्या प्रयत्नाचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. ज्या वाचनशक्तीबद्दल जग माझी प्रशंसा केल्याखेरीज राहणार नाहीं, ती माझी प्रचंड वाचनशक्तिसुद्धां या ठिकाणीं प्रथमतः कुंठित झाली व तिचा प्रभाव चालेना.. मीं आपला सर्व उत्साह खर्चीं घातला; अटोकाट प्रयत्न केला पण व्यर्थ ! कांहीं काळानंतर मला माझ्या कानांत कांहीं तरी गुणगुणत आहे असा भास झाला; तें गुणगुणणें ज्यू लोकांच्या अलगुज्यावरील वाजविण्यासारखे सखल आवाजांत होतें असें वाटलें. त्यानंतर मला एक प्रकारची झोंप आली. या झोंपेला वश न होतां ही झोंप झाडून टाकण्याचा मीं प्रयत्न केला तोंच अननुभूत अशी कंपवायुसारखी भावना माझ्यामध्यें उद्भवली व मग मोठी मूर्च्छा आली; शेवटीं डॉक्टरच्या हुकुमानें व माझ्या शारीरिक व मानसिक शक्तीच्या ऱ्हासाच्या भयानें व एकदर प्रकृति ढासळण्याच्या भीतीनें मी नाखुशीनें पण निश्चयानें तो प्रयत्न सोडून दिला. या ठिकाणीं ज्यू लोकांच्या धार्मिक गुप्त गोष्टींपासून परकी माणसांना परावृत्त करण्याकरितां पाताळांतून व स्वर्गांतून अग्निगोलरूपी उत्पात झाले म्हणतात; तशा प्रकारचा दैवी चमत्कार तर या धर्मग्रंथांच्या आक्रमाच्या बाबतींत घडून आला नाहीं ना? तें कांहींही असो. पण आटोकाट प्रयत्न केल्यावरसुद्धां मला यश मिळालें नाहीं हें खरें व म्हणून या पंथाचें माझें वर्णन अपूर्ण आहे हें मला कबूल करणें भाग आहे. पण मला जितकी माहिती मिळविणें शक्य झालें तितकी माहिती मिळवून हें वर्णन मी लिहिलेलें आहे.

माझें आयुष्य व माझीं इंद्रियें याबद्दल मला प्रेम आहे म्हणून खासगी

व्यक्ति या नात्यानें मी दुसरी कोणती चैनबाजी कादंबरी उघडणार नाहीं. असा निश्चय केला खरा ! परंतु आतां काय करावें या विवंचनेत मी असतांना माझ्या सुदैवानें मेघमालेंतून एक हात माझ्या साहाय्यास धांवला. त्यायोगें मला जरी विजय मिळाला नाहीं तरी माझी विवंचने तून सुटका झाली हें खास. जी कंपनी इंग्लंडांतून नेहमीं पुस्तकें आणते त्या कंपनीकडून आलेल्या एका पुस्तकाच्या पार्सलला आंतून लावलेले कांहीं छापील कागद होते; निरर्थक मानलेल्या निकामी कागदांकडे ज्याप्रमाणें मुसलमानलोक आदरानें पाहतात त्याप्रमाणें मी त्या निकामी कागदाकडे पाहिलें; तोंच आश्चर्याची गोष्ट अशी कीं, सुरस कादंबरी याच विषयावर एका इंग्रजी मासिकांत लिहिलेल्या निबंधाचीं तीं पानें होतीं असें आढळून आलें. तो निबंध व्यावहारिक दृष्टीनें लिहिलेला होता; तसेंच त्या निबंधांत या पंथाच्या एका प्रमुख पण मला अज्ञात अशा पेलहॅम नांवाच्या प्रवर्तकाविरुद्ध कांहीं मजकूर होता. तथापि अशा तुटपुंजा लेखांत सहसा न सांपडणारें या पंथाचें रहस्यकथन त्या लेखांत सविस्तर केलेलें होतें. नव्हे, या लेखाच्या एका भागांत या पंथाच्या मताप्रमाणें मानवी प्राण्याचें पूर्ण कर्तव्यकर्म कशांत आहे व या पंथाचें सारसर्वस्व कशांत आहे हें निवेदन केलें होतें. तें सारसर्वस्व मी सात कलमांत संक्षिप्तपणें पण होतां होईल तों लेखकाच्या मूळ शब्दांतच सांगतों.

## रंगेलपंथी श्रद्धेचीं कलमें.

१ आंगरख्यांना त्रिकोणाकृति आकार कोठेंही नसावा; त्याचप्रमाणें मागच्या बाजूच्या सुरकुत्या काळजीपूर्वक काढून टाकाव्या.

२ गळपट्टी ही मोठ्या महत्वाची बाब आहे ती मागल्या बाजूस सखल असून किंचित् वांकलेली असावी.

३ कोणत्याही नेपथ्यनियमान्वयें सदभिरुचीच्या माणसाला हाटेंटाट लोकांच्या ढेरढुंगणपणाचा अवलंब करण्याची परवानगी मिळणार नाहीं.

४ सपुच्छ आंगरख्यांत सुरक्षितता आहे.

५ सद्गृहस्थाची सदभिरुचि आंगठ्यांच्या आवडीनिवडीवरून दिसून येते.

६ पांढरीं जाकीटें वापरण्याची पुरुषांना कांहीं निर्बंधाखालीं परवानगी दिली जाते.

७ पाटलोण कुल्यावर अत्यंत घट्ट असली पाहिजे.

हीं सर्व तत्वें सध्यां तरी विनयपूर्वक पण स्पष्टपणें नाकारण्याची मी परवानगी घेतों.

या रंगेलपेशा पंथाच्या अगदीं उलट पंथ ब्रिटिश बेटांत उत्पन्न झालेला आहे. प्रथमतः तो आयर्लंडांत निघाला व अझूनसुद्धा त्याचें प्रधानपीठ म्हणजे आयर्लंड देशच होय; परंतु तो ग्रेटब्रिटनमध्येंही दिसून येतो व त्याचा सर्वत्र एकसारखा प्रसार होत आहे. या पंथानें आपल्या तत्वांचे आधारभुत ग्रंथ अझून तयार केले नाहींत व जरी रंगेलपेशापंथानें आपले ग्रंथ केले आहेत तरी पण ते ग्रंथ साहाय्याखेरीज मानवीबुद्धीला अगम्य आहेत. म्हणून रंगेल-पेशा पंथाच्या तत्वांप्रमाणे या पंथाची तत्वेंही मला दुर्बोध आहेत. या पंथाला निरनिराळ्या ठिकाणच्या त्याच्या स्थापनेवरून निरनिराळीं नांवें मिळालीं आहेत असें दिसतें. इंग्लंडांत या पंथाला 'श्रमकर' किंवा 'क्लेशकर' पंथ म्हणतात; (अशास्त्रीय शब्द आहे म्हणा.) पण कांहीं लोक 'गौर-गुलाम' म्हणतात; स्कॉटलंडांत या पंथाला 'रगड्याचा भारा' म्हणतात. ज्या आयर्लंडांत या पंथाचें प्रधान पोंवळें आहे तेथे त्या पंथाला किती तरी घोटाळ्यांत पाडणारीं नांवें आहेत; पकचर, नग्नपाद,—फीतवाले, गरीबगुलाम इत्यादि इत्यादि.

सर्वांत शेवटलें नांव हें मूळचें व जातिवाचक दिसतें; इतर नांवें हीं त्या मूळ जातीचीं गौणभेददर्शक नांवें असावींत; किंवा फार झालें तर पितृरूप मूळबीजापासून उत्पन्न झालेली ती संतति असावी; परंतु या सूक्ष्म भेदांचा विचार करणें म्हणजे कालाचा व्यर्थ अपव्यय करणें होय. इतकें सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं, मूळचा पंथ हा गरीब गुलामांचा आहे ही निर्विवाद गोष्ट आहे. ह्या मूळपंथाचे कितीही उपपंथ झालेले असोत किंवा त्यांना कांहींही नांवें मिळालेलीं असोत; इतकें खरें कीं, मूळ पंथाचीं मतें, आचार व प्रधानगुण हे सर्व उपपंथांत पसरलेले आहेत व त्यांनींच त्या सर्व पंथांना चालन दिलेलें आहे.

या पंथाचीं यथार्थ किंवा निश्चित तात्विक मतें काय आहेत; या गरीब गुलामांना विश्व व मनुष्य व त्याचें आयुष्य यांबद्दल काय वाटतें; पूर्व-

कालाकडे, सद्यःकालाकडे व भावीकालाकडे ते कोणत्या भावनांनीं व बुद्धींनीं पाहतात इत्यादि गोष्टी स्पष्ट करून सांगणें अवघड आहे. त्या पंथाच्या घटनेंत कांहींसा वैखानसपणा दिसतो. वैखानस व्रतांपैकीं दारिद्र्य व आज्ञाधारकपणा हीं दोन व्रतें तत्पंथीय लोकांना बंधनकारक आहेत; व यांपैकीं पहिलें हे लोक फार कडकपणें पाळतात असें म्हणतात; इतकेंच नव्हे, तर माझी अशी समजूत आहे कीं, धर्माची प्रत्यक्ष आज्ञा असो कीं नसो; या व्रतपालनास ते वचनबद्ध असतात व जन्मापूर्वींच या कामाला कायमपणें वाहिलेले असतात. वैखानसव्रतांपैकीं तिसरें व्रत चारित्र्य याचें कडक पालन होतें कीं नाहीं हें समजत नाहीं.

आणखी हे कंगालपेशे विशेष पोशाख वापरण्याच्या प्रधानतत्वाच्या बाबतींत रंगेलपेशाचें अनुकरण करतात. या आयर्लंडांतील गरीब गुलामांच्या पोशाखाचें वर्णन येथें केलें नाहीं. कारण भाषारूपी अपूर्ण साधनानें त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. त्यांचा पोशाख म्हणजे सर्व तऱ्हेच्या कपड्यांच्या व सर्व तऱ्हेच्या रंगांच्या असंख्य आंचळ्या, दशा व वांकडे तिकडे तुकडे यांनीं बनलेला असतो. व त्या गहनगूढरूपी आंगरख्यांत कांहीं एका अज्ञात पद्धतीनें अंग अडकविलें जातें. बटनें, कापडाचे बंद, किंवा लांकडी टांचणी यांनीं त्या आंगरख्याच्या दोन बाजू जोडल्या जातात. व त्यावर एक कातड्याचा, तागाचा किंवा गवती दोरीचा पट्टा अडकाविला जातो. गवती दोरीवर त्यांचें फार प्रेम असतें असें दिसतें. कारण केव्हां केव्हां पादत्राणाच्या ऐवजीं यांचाच ते लोक उपयोग करतात. शिरोभूषणाच्या बाबतींत ते लोक रूढि मानीत नाहींत. अर्धवट कंगोऱ्याच्या टोप्या, मुकुटाखेरीज टोप्या किंवा अर्धवट मुकुटाच्या टोप्या त्यांना चालतात. पहिल्या प्रकारच्या टोप्या ते केव्हां केव्हां कंगोरा वर करून विश्वविद्यालयांतील टोप्यांप्रमाणें वापरतात. ही टोपी कशी काय दिसत असेल तें कोणास ठाऊक ? गरीब गुलाम ( Poor Slaves ) या नांवावरून हा पंथ स्लेव्होनिक, पोलिश किंवा रशियन या देशांत उत्पन्न झाला असावा असें वाटतें. परंतु त्याचें अन्तरंग व अन्तःस्वरूप यावरून मात्र त्या पंथाची ट्युटानीक टोळीपासून उत्पत्ति असावी असें म्हणावें लागतें. ते पृथ्वीपूजक आहेत अशी कल्पना करणें रास्त दिसतें. कारण ते पृथ्वी खणतात, जमी-

नीच्या पोटांत मोठ्या आनंदानें व अप्रतिहतपणें काम करतात किंवा आपल्या खासगी लहान प्रार्थनागृहांत राहून पृथ्वीपासून निघालेल्या पदार्थांचें मनन करून त्यांपासुन दुसरे पदार्थ निर्माण करतात. ते आकाशस्थ ज्योतींकडे क्वचितच पहातात व पाहिलेंच तर बेपर्वाईनें पहातात. ड्राईडसप्रमाणें ते अंधाऱ्या घरांत राहतात, केव्हां केव्हां ते कांचेच्या असलेल्या खिडक्या फोडून त्यांमध्यें कापडाचे बोळे किंवा दुसरे अपारदर्शक पदार्थ भरून तेथें पुरेसा काळोख करतात. आणखी निसर्गपूजकांच्या अनुयायांप्रमाणें त्यांच्या पूजेंत क्रौर्यापर्यंत उत्साहाची उसळी उठते, व ते आपल्या मातीच्या झोंपड्यांत नरमेध करतात.

खाण्यापिण्याचे बाबतींतही त्यांचे निर्बंध आहेत. सर्व गरीब गुलाम हे कंदमूलभक्षक असतात. कांहीं मत्स्याहारी असतात व खारलेले हेरिंग नांवाचे मासे खातात; दुसरा कोणचाही मांसाहार ते करीत नाहींत; फक्त कांहीं विलक्षण व विपरीत ब्राह्मणी भावनेनें ते मेलेल्या जनावराचें मांस खातात. त्यांच्या खाण्याचा मुख्य पदार्थ म्हणजे विस्तवावर भाजलेले बटाटे; त्या बटाट्यांना मसाला किंवा कोरड्यास कांहीं लागत नाहीं, फक्त पाईंट या नांवाचा कांहीं अवर्णनीय पदार्थ त्यांत घालतात. बटाटे—पाईंट या नांवाचें पक्वान्न कोणत्याही युरोपांतल्या पाकशास्त्राच्या पुस्तकांत स्पष्टपणें वर्णन केलेलें पाहावयास सांपडत नाहीं. पेयाकरितां ते रुचिवैचित्र्याचा लहानसा मासला म्हणूनच कीं काय, अत्यंत सात्विक पेयांपैकीं पेय दूध व अत्यंत तामस पेयांपैकीं तामस पेय पाथीन ( आयरिश दारू ) यांचा उपयोग करतात. ही पाथीन नांवाची दारू, ब्लु रुईन या नांवाची इंग्लिश दारू, व्हिस्की नांवाची स्कॉट दारू व या सारख्या या पथाच्या लोकांच्या पेयांची मीं चव घेतली आहे हें स्पष्ट आहे. या दारूंत मद्यार्क अत्यंत मोठ्या प्रमाणांत असतो. त्या मद्याची रुची कडू तेलानें लपविली जाते इतकेंच. पण या पदार्थासारखा तिखट पदार्थ मीं आजन्मांत पाहिला नाहीं. ही दारू म्हणजे खरोखरी द्रव दावानल आहे यांत शंका नाहीं. त्यांच्या सर्व धार्मिक विधींत पाथीन आवश्यक मानली जाते व तिचा त्या वेळीं पुष्कळ उपयोग केला जातो असें सांगतात.

प. वा. जॉन बरनार्ड या नांवाच्या मला अज्ञात अशा एका आयरिश साधारणतः सत्प्रिय प्रवाशानें एका घराचें खालील वर्णन दिले आहे. जरी त्यानें या घरांत राहणारी मंडळी कोणत्या पंथाची होती हें स्पष्टपणें सांगितलें नाहीं तरी वर्णनावरून ती मंडळी कंगालपेशी होती असें दिसतें. या वर्णनावरून माझे वाचकांना आयर्लंडांतील गरीब गुलाम जणूं काहीं प्रत्यक्ष दृग्गोचर होईल. नव्हे, प्रत्यक्ष जेवतांना दिसतील असें वाटतें.

वर निर्दिष्ट केलेल्या त्या बिनमोल निकामी कागदांत रंगेलपथी लेखकानें रंगेलपेशा घराचें वर्णन दिलें आहे. तेंही जाबास जाव या नात्यानें येथें नमूद करणें वावगें नाहीं.

प्रथमत: गरीब गुलामाचें वर्णन देऊं या. हा एक प्रकारचा खाणावळवाला दिसतो; मूळवर्णन असें आहे:—

## गरीब गुलामाचें गृह.

या खाणावळींतलें सामान म्हणजे एक मोठें लोखंडी भांडें, दोन देवदारी मेजें, दोन बाकें, दोन खुर्च्या, एक लाकडी पेला शिडीनें चढावयाचा एक माळा त्या घराला होता; त्यावर कुटुंबांतली मंडळी निजत. खालच्या जागेचे कुडानें दोन भाग केलेले होते; एक गाय व डुक्कर यांकरितां; दुसरा स्वतःकरितां व पाहुण्याकरितां होता. घरांत शिरल्यावर कुटुंबातील अकरा मंडळी जेवावयास बसलेली दिसली. एका मोठ्या देवदारी फळ्यासारख्या मेजावर बाप वरच्या बाजूस बसला होता; आई खालच्या बाजूस बसली होती, व मुलें मधोमध दोन्ही बाजूंस बसलीं होतीं. बटाट्याच्या भांड्यांतील पदार्थ ठेवण्याकरितां त्या फळ्याचा सर्व मधला भाग खोलगट केला होता, सारख्या अंतरावर मिठाकरितां लहान लहान भोकासारखे खळगे केले होते, मेजावर एक दुधाचें भांडें ठेवलेलें होतें. मांस, दारू, पाव, चाकू, ताटें इत्यादि चैनीच्या पदार्थांना फांटा दिला होता. "आमच्या प्रवाशाच्या अवलोकनाप्रमाणें तो गरीब गुलाम स्वतः सपाट पाठीचा, काळ्या भुवयांचा, आकर्ण तोंडाचा मोठा मजबूत माणूस होता. त्याची बायको उन्हानें काळवंडलेली पण चांगल्या आकृतीची बाई होती. व त्यांचीं मुलें उघडीं बोडकीं पण गलेलठ्ठ होतीं व त्यांची गिधाडाच्या

सारखी भूक होती. त्यांचे धार्मिक किंवा तात्विक विचार किंवा आचार यांबद्दल या लेखांत उल्लेख किंवा उपन्यास नाहीं.

परंतु आता रंगेलपेशाच्या घराकडे वळूं. पुष्कळ वेळां निर्दिष्ट केलेला व प्रतिभावान् लेखक या घरांत रहात असला पाहिजे.

## रंगेलपेशाचें गृह.

शोभिवंतपणें शृंगारलेलें नेपथ्यगृह. त्याला निळसर पडदे, त्यांत त्याच रंगाच्या खुर्च्या व कोचें एका मेजाच्या दोन्ही बाजूंस दोन भले मोठाले आरसे. त्या मेजावर शरीरशृंगाराचीं सर्व साधनें ठेवलेलीं, एका शिंपाच्या लहान मेजावर विलक्षण तऱ्हेनें मांडून ठेवलेल्या सुगंधी अत्तराच्या बाटल्या दिसत आहेत. याच्या समोरच अंग धुवावयाची चकाकणाऱ्या चांदीच्या मुलाम्याची साधनसामुग्री ठेवलेली आहे. डाव्या बाजूस कळाकुसरीचें काम केलेलें कपड्याचें कपाट आहे. त्या कपाटाच्या अर्धवट उघडलेल्या दारामधून कपडेच कपडे दृग्गोचर होत आहेत. खालच्या खणांत विलक्षण लहान आकाराचे जोडे होते. या कपाटाच्या समोरच अर्धवट उघडलेल्या दारामधून स्नानमंदिर ओझरतें दृग्गोचर होत होतें. त्याचे पाठीमागें आपोआप उघडणारे लागणारे दरवाजे होते. त्यांतून त्या पंथाचे लेखक स्वतः आंत येतात; मागून पांढरें रेशमाचें जाकीट घातलेला व तागाच्या तलम मळवस्त्रानें आच्छादिलेला अनुचर नम्रपणें येतो.

याप्रमाणें हे दोन पंथ आहेत. सध्या ब्रिटिश बेटांतील बेताल लोक या दोन पंथांचे अनुयायी होत आहेत व त्यांचीच त्या सदासंतप्त देशांत चळवळ चालली आहे. मुत्सद्याच्या राजकीय दृष्टीला विरोध व वैमनस्य यांनीं युक्त असा त्यांचा संबध अगदीं असमाधानकारक आहे. रंगेलपेशाचें हें स्वपूजेचें किंवा तामसीपूजेचें तत्व व कंगालपेशाचें पृथ्वीपूजेचें किंवा 'मरमर कामकर' चें अशीं हीं दोन तत्वें अझून मधून मधून व अल्प प्रमाणांत दिसून येत आहेत हें खरें. पण त्यांचीं पाळेंमुळें खालून सर्व समाजाच्या गाभ्यापर्यंत पोंचलीं आहेत व इंग्रज लोकांचें राष्ट्रीय जीवन गूढपणें पण अप्रतिहतपणें पोखरीत आहेत.

याचा परिणाम असा होत आहे कीं सर्व समाजाचे परस्परविरोधी व परस्परांपासून विभक्त असे दोन तट पडत आहेत.

संख्येनें व व्यक्तिशः सामर्थ्यानें कंगालपेशे किंवा ' मरमर कामकर ' लोक घटकोघटकीं वाढत आहेत असें दिसतें. रंगेलपेशापंथ हा स्वभावतः बळजबरीनें दुसऱ्यास आपल्या पंथांत आणणारा नाहीं; परंतु त्याचें वंशपरंपरागत सामर्थ्य किंवा वैभव मोठें आहे व त्यात एकीचें सामर्थ्य ज्यास्त आहे. उलट कंगालपेशे यांच्यामध्यें तट फार असून अझून त्यांना एकत्र आणणारें केंद्रस्थान उत्पन्न झालें नाहीं;फार झालें तर ते लोक गुप्तपणें मिळून सहकार्य घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. खरोखरीं साधुसंतांच्या मेळ्याप्रमाणें जर मरमर–कामकऱ्यांचा मेळा जमला तर त्यापासून काय विलक्षण परिणाम उत्पन्न होतील. रंगेलपेशापंथ अझून कंगालपेशापंथाकडे तुच्छतेनें पहात आहे. पण कदाचित् कसोटीचा काळ जवळ येत आहे व त्यावेळीं कोणी खालीं पहावें व कोणी वर पहावें याचा प्रत्यक्षच निकाल लागेल.

मला असें वाटतें कीं कालेंकरून सर्व इंग्लंडदेशामधील लोकांचा या दोन पंथात समावेश होईल; आधले मधले वर्ग रंगेलपेशा पंथाला तरी जाऊन मिळतील किंवा कंगालपेशा पंथाला तरी जाऊन मिळतील व मग आधलें मधले वर्ग मुळींच राहणार नाहींत. ख्रिश्चन असो, किंवा परधर्मीय असो सर्व रंगेलपेशे एक होतील; तसेंच ख्रिश्चन किंवा परधर्मी असे सर्व कंगालपेशे एक होतील. या कंगालपेशांतच जनपदाहितवादी, जहाल व स्वयंपाकी यांचा समावेश होईल. स्थिर पृथ्वीच्या दूरदूरच्या पण समोरासमोरच्या भागांत प्रादुर्भूत झालेल्या दोन भोंवऱ्यांशीं या दोन पंथांची तुलना करतां येईल. अझून हे भोंवरें खळबळ करीत असतांना दिसतात. व अकारण बुडबुडणाऱ्या विहिरीप्रमाणें भासतात. मानवी क्लृप्तीनें हे अझून झांकून टाकतां येतील असेंही वाटतें. परंतु त्या भोंवऱ्यांकडे दृष्टि फेंका. दर दिवस त्याचा व्यास वाढत आहे अफाट समुद्राच्या पोटांतून उकळणारे ते पोकळ दोन शंकू आहेत; त्यांवर आपली स्थिर पृथ्वी हा एक पातळ पापुद्रा आहे. याप्रमाणें दर दिवस मधली माती आंत कोसळत आहे; दर दिवस या भयंकर भोंवऱ्याचें भगदाड वाढत आहे, व

आतां फक्त एका फळीवजा जमिनीचा पापुद्रा त्यांमध्यें राहिला आहे. तोही धुवून गेल्यावर मग काय ? मग जिकडे तिकडे पाणीच पाणी व नोहाच्या जलप्रलयावर ?रकडी करणारा प्रलय ! किंवा दुसरी उपमा अधिक अनुरूप होईल. रंगेलपेशा व कंगाल-पेशा हे पंथ म्हणजे समाजानें चालविलेलीं दोन अद्वीतीय अनंत विजेचीं यंत्रें आहेत, व त्यांमध्यें परस्परविरोधी अपूर्व व अफाट लक्षणाच्या विजेचा सांठा आहे असें समजा. कंगालपेशापंथ ही ऋणात्मक वीज आहे. रंगेलपेशापंथ ही धनात्मक वीज आहे; दुसरा पंथ राष्ट्रांतील सर्व धनात्मक वीज ( सर्व संपत्ति ) आपल्याकडे दरघडी आकर्षून घेत आहे, व पहिला पंथ, त्याचप्रमाणें, ऋणात्मक वीज ( क्षुधा ) आप-ल्याकडे ओढून घेत आहे. आतांपर्यंत या विरोधी विजांपासून क्षणिक ठिणग्या व प्रकाशकण दृग्गोचर होत आहेत, परंतु थोडें थांबा ! व सर्व राष्ट्र विद्युन्मय होऊन सर्व जीवनविद्युतेचा आरोग्यकारक समभाव जाऊन तिचें धनात्मक विद्युत ( संपत्ति ) व ऋणात्मक विद्युत ( क्षुधा ) असे दोन विभक्त भाग होऊन त्यांचा दोन प्रचंड ब्यॅटरीमध्यें संग्रह होऊं द्या ! मग बालकाच्या बारिक बोटाची नुसती हालचाल पुरे आहे. त्या योगें त्या प्रलयकालीन घनगर्जिताप्रमाणे पृथ्वीच्या वज्रघा-तानें चिंधड्या होऊन ती अदृश्य धूमरूप पावते ! सूर्याला आपल्या ग्रहमालेतील एक ग्रह नष्ट झाल्यामुळें चुकल्याचुकल्यासारखें होतें व तदनंतर चन्द्रग्रहणें बंद पडतात ! किंवा यापेक्षां ही दुसरी चांगली !—

पुरे, पुरे झाल्या या उपमा व रूपकें. या अतिरेकाबद्दल टॉयफल्सड्राख जास्त दोषी आहे किंवा आम्हीं जास्त दोषी आहों हें सांगणे कठीण आहे.

पुष्कळ वेळां टॉयफल्सड्राखला आम्हीं त्याच्या दीर्घ तर्कटीपणाबद्दल व अति सूक्ष्म संशोधकत्वाबद्दल दोष दिला आहे. पूर्वीपासून आम्हांला त्याच्या गूढविद्याप्रवृत्तीचा व धर्मप्रवृत्तीचा परिचय आहे. या त्याच्या प्रवृत्तीमुळें त्याच्या दृष्टीला ज्यांत त्यांत धार्मिकता दिसून येते. परंतु त्याची इतर वेळीं सूक्ष्म असलेली दृष्टि या रंगेलपेशापंथाच्या बाबतींत अन्तरंधतेनें इतकी व्यास कशी झाली? किंवा त्याचें हें सर्व लिहिणें मूळपासून व्याजो-क्तिपर तर नाहीं ? तो प्रोफेसर व सिद्ध पुरुष हा जितका बहाणा करतो

नितका तो अंध नाहीं ? सामान्य माणसाबद्दल आम्ही आस्तीक पक्षीं खातरीनें उत्तर दिलें असतें. परंतु टॉयफल्सड्राखसारख्याबद्दल बोलतांना थोडा अंदेशा वाटतो. मध्यंतरी जरी खरोखरीं त्याचे मनांत व्याजोक्ति असेल तरी त्यानें सद्यः स्थितींत कांहीं एक अंतर पडत नाहीं. प्रोफेसरसाहेबांना खालील उत्तर देणारे कांहीं थोडे नाहींत. आम्ही मूर्ख आहोंत असें कां तुमच्या प्रोफेसर साहेबांना वाटतें ? त्यांच्या व्याजोक्ती चा अतिरेक झाला आहे. आम्हीं त्या व्याजोक्तीच्या पलीकडे पाहतो इतकें नाहीं तर प्रोफेसरसाहेबांच्याही पलीकडे पाहतो.

९८५१४

# उपनयन.

कार्लाईल हा ग्रंथकार इंग्लिश समाजाच्या संक्रमणावस्थेंत उदयास आला व त्यानें आपल्या आध्यात्मिक पण प्रवृत्तिपर, पुराणाभिमानी पण प्रगतिपर, गूढ पण गंभीर व कांहीं-अंशीं कठोर पण कळकळीच्या विचारांनीं समाजांत सुधारणा घडवून आणिली. त्या सुधारणेच्या मुळाशीं असलेलें तत्व त्यानें आपल्या ' विचारकंथेंत ' विशद करून दाखविलें. कार्लाईलच्या प्रगतिपर तत्वाचा इत्यर्थ हा कीं, समाजांतील चालीरीति, आचारविचार, विधिसंस्था यांचीं दोन अंगें असतात. एक अंतरंग व एक बहिरंग. प्रथमतः जेव्हां या गोष्टी समाजांत प्रसृत होतात तेव्हां अंतरंग व बहिरंग यांमध्यें संवाद किंवा आनुरूप्य असतें. पण कालेंकरून त्या गोष्टीचें अंतरंग बदलतें व मग अंतरंग व बहिरंग यांमध्यें विसंवाद किंवा विरोध उत्पन्न होतो. म्हणजे मग बहिरंग हें दाणा काढून टाकलेल्या फोलाप्रमाणें होतें. तरीसुद्धां पुराणप्रियतेमुळें, संवयीमुळें व अंधश्रद्धेमुळें समाज त्या बहिरंगाला-त्या फोलालाच-चिकटून बसतो. पण अशी फोलाला चिकटून बसण्याची वृत्ति म्हणजे समाजाची मृतावस्थाच होय. जिवंतपणाचें लक्षण असें आहे, कीं, अंतरंगांत बदल झाला, कीं, तदनुरूप बहिरंगांत बदल झालाच पाहिजे. हें सामाजिक प्रगतिपर तत्व कार्लाईलनें मनुष्याचे अवयव व वस्त्रें या उपमेनें विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्याप्रमाणें मनुष्याचे अवयव वाढल्यावर जुन्या काळचे कपडे त्याच्या अंगाला आंखूड होतात व तेच फाटकेतुटके कपडे घातल्यास विद्रूपता येते, त्याचप्रमाणें समाजाच्या विचारवाढीनंतर जुने विधि व आचार चालविले तर समाजाला एक प्रकारची विद्रूपता येते.

कार्लाईलनें ' विचारकंथेंत ' प्रतिपादन केलेलें हें तत्व हिंदुसमाजांतील कांहीं धार्मिक व सामाजिक चालीरीतींना उत्तम तऱ्हेनें लागू पडतें अशी या लेखकाची समजूत असल्यामुळें कार्लाईलच्या ' विचारकंथे 'चा सारांश

देण्याचा इतका वेळ खटाटोप केला. कार्लाईलचें प्रगतिपर तत्व युरोपच्या अर्वाचीन इतिहासाचे अवलोकन करून ठरविलें गेलें होतें. पण या इतिहासाचा हा विशेष आहे कीं, तो अप्रतिहतपणें पुढें पुढें जाणाऱ्या समाजाचा इतिहास आहे. यामुळें कार्लाईलनें आपल्या काळाला अनुरूप अशी प्रगतिपर तत्वाची एकच बाजू पुढें मांडली आहे. म्हणजे समाजांतील चालीरीतींचें अंतरंग नेहमीं सुधारत जातें; म्हणून बहिरंग जुन्या कपड्यांप्रमाणें बदललें पाहिजे. पण केव्हां केव्हां अंतरंग कुजलें असेल किंवा अंतरंग नाहींसें झालें असेल व बहिरंग शाबूत असेल अशा प्रसंगीं बहिरंग टाकून देण्याचे कारण नाहीं. मात्र त्या बहिरंगाचे मध्यें अंतरंगरूपी जीव घातला पाहिजे; म्हणजे, पुन: अंतरंग व बहिरंग यामध्यें संवाद किंवा आनुरूप्य उत्पन्न होईल. कार्लाईलच्या तत्वाची ही दुसरी बाजू आहे. आता कार्लाईलचें तत्व हिंदू समाजांतील चालीरीतींना लावतांना या तत्वाच्या दोन्ही बाजू विचारांत घेतल्या पाहिजेत. कारण, आजचा हिंदुसमाज हा जुनाट वृक्षाप्रमाणें फार पुरातन काळापासून चालत आलेला समाज आहे. हा समाज भरतीओहटीप्रमाणें प्रगतिपर व अवनतिपर अशा स्थित्यंतरांतून बाहेर पडलेला आहे. यामुळें हिंदुसमाजांतील धार्मिक किंवा सामाजिक चालीरीती या सर्वच निरुपयोगी जुन्या कपड्याप्रमाणें टाकाऊ नाहींत. कांहीं चालींचें बहिरंग अझून शाबूत आहे व तें हिंदुसमाज पाळीत आहे; पण त्यांतलें अंतरंग विसरलें गेलें आहे व म्हणून त्या चालीरीतींत मूळचें अंतरंग आणून घातलें तर त्या चालीरीती हल्लींच्या काळींसुद्धां समाजास साजेशा होतील. कांहीं चालीरीतींचें अंतरंग बदलूनच गेलें आहे व यापुढें त्या चालीरीतींचें बहिरंग टाकून देणें भाग आहे. कारण अशा चालींचें मूळचें अंतरंग हल्लींच्या काळीं परत आणणें शक्य नाहीं.

चालीरीतींचें अंतरंग परत आणणें म्हणजेच त्या चालीरीतींचें पुनरुज्जीवन करणें होय व बदललेल्या अंतरंगानुरूप नवीन चाल पाडणें म्हणजे त्या चालीची सुधारणा करणें होय. तेव्हां हिंदुचालीरीतींमध्यें हल्लींच्या समाजाच्या परिस्थित्यनुरूप फेरबदल करणें तो दोन तऱ्हेनें केला पाहिजे.

कांहीं चालीरीतींचे बाबतींत पुनरुज्जीवनाची आवश्यकता आहे तर कांहीं चालीरीतींचे बाबतींत सुधारणेची जरूरी आहे.

इतकें विवेचन पुढील विशिष्ट चालीरीतींच्या उहापोहास पुरेसें आहे. आतां हिंदु धार्मिक विधीमधील—एका दृष्टीनें सर्वांत महत्वाच्या विधीचे-उपनयनाचे निरीक्षणास लागूं.

उपनयन, मौंजीबंधन किंवा हल्लींच्या प्रचारांतलें नांव मुंज हा आर्य-धर्मांतील फार पुरातन काळापासून चालत आलेला विधि आहे. ऋग्वे-दांत याचा उल्लेख नाहीं खरा. पण विधीचें वर्णन देणें हा ऋग्वेदाचा उद्देशच नाहीं. आर्यांनीं वेळोवेळीं निरनिराळ्या देवतांना केलेल्या प्रार्थना व त्यांचीं स्तुतिपर स्तोत्रें यांचाच फक्त संग्रह ऋग्वेदांत केला आहे. अथर्ववेदांत मात्र – उपनयनविधीचें नसलें तरी – उपनयन झालेल्या व त्यायोगें ब्रह्मचारी बनलेल्या तरुणाचें वर्णन आहे. तें सूक्त ब्रह्मचाऱ्याच्या स्तुतिपरच आहे म्हणाना पण या सूक्तांत ब्रह्मचाऱ्याच्या आयुष्यक्रमाचें जें वर्णन दिलेलें आहे तें स्मृतिकालीन उपनीत मुलाच्या वर्णनाशीं हुबेहुब जमतें. या अथर्ववेदांतील सूक्तावरून उपनयनविधीचें पुरातनत्व शाबीत होतें यांत शंका नाहीं. पण या विधीचें समग्र विवेचन स्मृतिग्रन्थांत व त्या ग्रन्थांपैकीं सर्वांत जुना ग्रंथ जो मनुस्मृति त्यांत सांपडतें व असें होणें रास्त आहे. कारण, स्मृतिग्रंथांत आर्यसमाजांतील प्रचलित चालीरीती, आचारविचार, विधिसंस्था व कायदेकानु या सर्वांचा संग्रह केलेला आहे. तेव्हां आतां मनुस्मृतींतील या विवेचनाकडे वळूं.

मनुस्मृतीप्रमाणें मुंज हा विधी सर्व आर्यांना लागू होता. इतकेंच नव्हे, तर हा सर्व आर्यांचा एक विशिष्ट हक्क होता. त्या काळीं आर्यांचे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे तीन वर्ग धंद्यावरून झालेले होते, व आर्यावर्तांतल्या मूळच्या रहिवाशांना ‘ शूद्र ’ म्हणत असत; व त्यांचा वर्णव्यवस्थेच्या कल्पनेंत स्मृतिकारांनीं अन्तर्भाव केला होता खरा. पण शूद्र अगदीं कमी दर्जाचे समजले जात असत व आर्य धर्माच्या विधींचा अधिकार शूद्रांना केव्हांही देण्यांत आला नव्हता. उपनयनाच्या विधीचें आर्यांना इतकें महत्व वाटे कीं, तो विधी त मनुष्याच्या जन्मासारखा समजत व म्हणू-नच सर्व आर्यांना द्विज म्हणण्याची रीत पडली. द्विज म्हणजे ज्याचें उप-

नयन ( स्वाभाविक जन्मानंतरचा आध्यात्मिक जन्म ) झालें आहे असा आर्यांतील मनुष्य. अर्थात् शूद्रांना द्विजत्व नाहीं असें समजलें जाई. व हें द्विजत्व संस्कारजन्य आहे असें म्हणत हें खालील श्लोकार्धावरून दिसतें ' जन्मना जायते शूद्रः संस्कारैर्द्विज उच्यते '.

जरी उपनयन सर्व आर्यांना लागू असे तरी या विधीचे बाबतींत निरनिराळ्या वर्णांना निरनिराळे नियम लावून दिले होते. उपनयनकाला-संबंधीं नियम खालील तीन श्लोकांत आले आहेत.

गर्भाष्टमेऽब्दे कुर्वीत ब्राह्मणस्योपनायनम् ।
गर्भादेकादशे राज्ञो गर्भात्तु द्वादशे विशः ॥
ब्रह्मवर्चसकामस्य कार्यं विप्रस्य पंचमे ।
राज्ञो बलार्थिनः षष्ठे वैश्यस्येहार्थिनोऽष्टमे ॥
आषोडशाद्ब्राह्मणस्य सावित्री नातिवर्तते ।
आद्वाविंशात्क्षत्रबन्धोराचतुर्विंशतेर्विशः ॥

जन्मापासून, आठव्या वर्षीं ब्राह्मणाचें, अकराव्या वर्षीं क्षत्रियाचें, बाराव्या वर्षीं वैश्याचें उपनयन करावें. ब्रह्मवर्चस्व मिळवूं पाहणाऱ्या ब्राह्मणाचें पाचव्या वर्षीं, शक्तिमान् होऊं इच्छिणाऱ्या क्षत्रियाचें सहाव्या वर्षीं, व संपत्ति संपादन करूं पहाणाऱ्या वैश्याचें आठव्या वर्षीं उपनयन करावें. ब्राह्मणाचें सोळा वर्षेपर्यंत, क्षत्रियाचें बावीस वर्षेपर्यंत व वैश्याचें चोवीस वर्षेपर्यंत उपनयन लांबलें तरी क्षम्य आहे.

यापुढें मात्र उपनयनविधि न झाल्यास तीन्ही वर्णांचे लोक आर्यत्वापासून च्युत होतात व अशा लोकांना व्रात्य म्हणतात व व्रात्यस्तोम नांवाचा होमविधि केल्याखेरीज त्यांना परत आर्यत्व येत नाहीं, असें मनुस्मृतींत सांगितलें आहे. यावरून या विधीचें महत्व दिसून येईल. पुढें या विधीच्या बहिरंगाचें सविस्तर वर्णन मनुस्मृतींत आहे. त्यामध्यें उपनयन झाल्यानें ब्रह्मचारी बनलेल्या निरनिराळ्या वर्णांच्या मुलानें मेखला, दंड, यज्ञोपवीत हीं कसकसलीं व कशीं धारण करावीं; ब्रह्मचाऱ्याच्या स्थितीची द्योतक भिक्षा कोणापाशीं व कशा तऱ्हेनें मागावी; अन्न कसें व केव्हां सेवन करावें, आपल्या वडील मंडळींना कशा तऱ्हेनें संबोधन करावें व आपआपसांत कुशल प्रश्न कसे करावे, गुरु, गुरूच्या सवर्ण व असवर्ण

बायका व त्यांचीं मुलें यांच्याशीं कसें वागावें. वगैरे नियम सांगितले आहेत.

या विधीचें अंतरंग म्हणजे विद्यार्जन किंवा विद्यार्थिदशा होय. उपनयन हा विधी म्हणजे विद्या ग्रहण करण्यास सुरवात करण्याचा विधी होय. त्या वेळच्या विद्येंत आद्यस्थान वेद विद्येला देत असत, हें स्वाभाविक आहे. म्हणून वर उद्धृत केलेल्या एका श्लोकांत उपनयनाला सावित्री असा पर्याय शब्द वापरला आहे. सावित्री म्हणजे सूर्याच्या स्तुतिपर ऋग्वेदांतील प्रसिद्ध गायत्री मंत्र होय.

या विद्यार्थिदशेसंबंधीं मनुस्मृतींतील नियम सर्व काळीं व सर्व ठिकाणीं लागू पडतील असेच आहेत. मनुस्मृतीप्रमाणें विद्यार्थी किंवा ब्रह्मचारी यानें खालील श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें ब्रह्मचारीदशेंत वर्तन ठेविलें पाहिजे.

अग्नीन्धनं भैक्षचर्यामधःशय्यां गुरोर्हितम् ।
आसमावर्तनात्कुर्यात् कृतोपनयनो द्विजः ॥
लौकिकं वैदिकं वापि तथाध्यात्मिकमेव च ।
आददीत यतो ज्ञानं तं पूर्वमभिवादयेत् ॥
नित्यं स्नात्वा शुचिः कुर्याद्देवर्षिपितृतर्पणम् ।
देवताभ्यर्चनं चैव समिदाधानमेवच ॥
वर्जयेत्मधुमांसंच गन्धं माल्यं रसान् स्त्रियः ।
शुक्तानि यानि सर्वाणि प्राणिनां चैव हिंसनम् ॥
अभ्यंगमञ्जनं चाक्ष्णोरुपानच्छत्रधारणम् ।
कामं क्रोधं च लोभं च नर्तनं गीतवादनम् ॥
द्यूतं च जनवादं च परिवादं तथानृतम ।
स्त्रीणां च प्रेक्षणालंभमुपघातं परस्य च ॥
प्रतिश्रवणसंभाषे शयानो न समाचरेत् ।
नासीनो न च भुञ्जानो न तिष्ठन्न पराङ्मुखः ।
आसीनस्य स्थितः कुर्यादभिगच्छंस्तु तिष्ठतः ।
प्रत्युद्गम्यत्वा व्रजतः पश्चाद्धावंस्तु धावतः ॥
नोदाहरेदस्य नाम परोक्षमपि केवलम् ।

न चैवास्यानुकुर्वीत गतिभाषितचेष्टितम् ॥
गुरोर्यत्र परीवादो निन्दा वापिप्रवर्तते ।
कर्णौ तत्र पिधातव्यौ गन्तव्यं वा ततोन्यतः ॥
विद्याब्राह्मणमेत्याह शेवधिष्टेऽस्मि रक्ष माम् ।
असूयकाय मां मादास्तथा स्यां वीर्यवत्तमा ॥
यमेव तु शुचिं विद्यान्नियतब्रह्मचारिणम् ।
तस्मै मां ब्रूहि विप्राय निधिपायाप्रमादिने ॥

सकाळ संध्याकाळचें होमहवन, भिक्षा व जमिनीवर निद्रा व गुरूच्या गृहकृत्यांत मदतरूपी त्याचें हित इतक्या गोष्टी ब्रह्मचाऱ्यानें हा ब्रह्मचर्याश्रम सोडीपर्यंत केल्या पाहिजेत.

अर्थशास्त्रादि लौकिक विद्या, वेदाध्ययनादि वैदिक विद्या, ब्रह्मज्ञानादि आध्यात्मिक विद्या, ज्या ज्यापासून ब्रह्मचारी शिकेल त्याला त्याला प्रथम त्यानें अभिवंदन केले पाहिजे.

रोज स्नान करून शुचिर्भूत होऊन ब्रह्मचाऱ्यानें देव, ऋषि, व पितर यांचें तर्पण करावें; देवांची पूजाअर्चा करावी व सकाळसंध्याकाळ होमहवन करावें.

ब्रह्मचाऱ्यानें मद्य, मांस, गंध, पुष्प, गोडधोड, आंबट चिंबट इत्यादिकांचा त्याग करावा स्त्रियांशीं सहवास ठेऊ नये. व प्राण्यांची हिंसा करूं नये; तसेंच अंगाला तेलें लावणें, डोळ्यांत काजळ किंवा सुरमा घालणें, जोडा छत्री वापरणें, काम क्रोध, लोभादि विकार व गाणें बजावणें व नाचणें याही गोष्टी वर्ज कराव्या; त्याप्रमाणेंच जुवा खेळणें, लोकांशीं भांडण, परनिंदा, स्त्रियांशीं सलगीचें संघटण व दुसऱ्याला त्रास देणें या गोष्टी करूं नयेत.

ब्रह्मचाऱ्यानें अंथरुणावर पडून असतां, किंवा आसनावर बसून असतां किंवा जेवीत असतां, किंवा जागेवर उभें असतां किंवा दुसरीकडे तोंड फिरविलेलें असता गुरूचें म्हणणें श्रवण करूं नये, किंवा त्यांच्याशीं संभाषण करूं नये. तर गुरु आज्ञा करतांना बसला असतां ब्रह्मचाऱ्यानें उठून आज्ञा ऐकावी; गुरु उठलेला असतांना शिष्यानें चालत आज्ञा

ऐकावी; गुरु चालत असतांना शिष्यानें जलद चालत ऐकावी; गुरु धांवत असतां शिष्यानें अधिक धांवून आज्ञा ऐकावी.

गुरूच्या पश्चात्सुद्धां उपपदविरहित गुरूचें नांव घेऊं नये. तसेंच त्यांचे बोलणें, चालणें व इतर कृति यांची नक्कल करूं नये. ज्या ठिकाणीं गुरूचें दोषाविष्करण किंवा निंदा चालू असेल तेथें कानांवर हात तरी ठेवावे किंवा तेथून निघून जावें. विद्यादेवी ब्राह्मणाकडे येऊन म्हणते " मी तुझी ठेव आहें; माझें रक्षण कर, माझी निंदा व अवहेलना करणाराला तूं मला देऊं नकोस; असें केलेंस तर मी सामर्थ्यवान् होईन; पण जो शिष्य शुद्ध आहे, ज्यानें इंद्रियदमन केलेलें आहे, जो विद्यारूपी धनाला जपणारा आहे, ज्याच्यामध्यें दोष नाहींत अशा शिष्याला मला दे. "

या विद्यार्थिदशेची मर्यादा कोठपर्यंत व विद्यार्थिदशेचें समावर्तन झाल्यावर ब्रह्मचाऱ्यानें गृहस्थाश्रम केव्हां स्वीकारावा याबद्दलचे नियम खालील श्लोकांत आलेले आहेत.

' षट्त्रिंशदाब्दिकं चर्यं गुरौ त्रैवेदिकं व्रतम् ।
तदर्धिकं पादिक वा ग्रहणांतिकमेव वा ॥
वेदानधीत्य वेदौ वा वेदं वापि यथाक्रमम् ।
अविप्लुतब्रह्मचर्यो गृहस्थाश्रममावसेत् ॥

गुरुगृहीं राहून छत्तीस वर्षें, अठरा वर्षें किंवा नऊ वर्षें किंवा सार्थ वेदाध्ययन पूर्ण होईपर्यंत हें व्रत चालवून व एक दोन किंवा तीन वेदांचें पूर्ण अध्ययन करून व ब्रह्मचर्यव्रताचे नियम अखंड पाळून मग मनुष्यानें गृहस्थाश्रम स्वीकारावा.

वरील विवेचनावरून उपनयन या धार्मिक विधीचे अतरंग व बहिरंग याचें स्वरूप नीट ध्यानांत येईल असें वाटतें; पण हा ब्रह्मचर्याश्रम मुलापुरताच होता असें नाहीं. मुलाप्रमाणें मुलीचेंही उपनयन आर्य लोकांत पुरातन कालीं होत असे व हा विधी खराच आर्यधर्माचा द्योतक विधी होता हें खालील विवेचनावरून दिसून येईल.

घोषा, रोमशा, लोपामुद्रा, विश्ववारा वगैरे कित्येक स्त्रिया ऋग्वेदांतील कांहीं मंत्रांच्या द्रष्ट्या म्हणून प्रसिद्ध आहेत. यांना ब्रह्मवादिनी असें सामान्य नांव असे. बृहद्देवतेंत या स्त्रियांसंबंधीं " ब्रह्मवादिन्य ईरिताः "

असा उल्लेख आहे. सायणानें आपल्या अथर्ववेदभाष्यांत ब्रह्मवादिन् शब्दाचा " ब्रह्म वेदः, तद् वदितुं शीलं येषां इति ब्रह्मवादिनः, ब्रह्मविचारका महर्षयः " असा अर्थ दिला आहे. याज्ञवल्क्याची स्त्री मैत्रेयी ब्रह्मवादिनी होती असें " तयोर्ह मैत्रेयी ब्रह्मवादिनी बभूव " या बृहदारण्यकांतील वाक्यावरून सिद्ध होतें. पण वैदिककाळीं ब्रह्मवादिनी शब्दाचा संसारपरित्याग करणारी संन्यासिनी असा अर्थ मात्र रूढ नव्हता. ब्रह्मवादिनी स्त्रियांपैकीं कांहीं मैत्रेयीप्रमाणें लग्नें करून संसार करीत, तर कांहीं आकौमार ब्रह्मचारिणीही असत. ब्रह्मवादिनी वाचक्नवी गार्गीनें लग्न केलें नव्हतें असें शांकरभाष्यांतील " रैक्ववाचक्नवीप्रभृतीनामेवं भूतानामपि ब्रह्मविक्त्व श्रुतेरवगमात् " या वाक्यावरून दिसून येतें. शंकराचार्यांचे मतें वाचक्नवी अनाश्रमी होती तिनें लग्न केलें नव्हतें.

धर्मशास्त्र, गृह्यसूत्रें वगैरेमध्यें मात्र ब्रह्मवादिनी शब्दाचा उपयोग कुमारब्रह्मचारिणी या अर्थी केला आहे. हारीतानें म्हटलें आहे कीं, " स्त्रिया दोन प्रकारच्याः—ब्रह्मवादिनी आणि सद्योवधू. ब्रह्मवादिनींना उपनयन, अग्नींधन ( अग्निपरिचर्या वगैरे ) वेदाध्ययन आणि स्वगृहीं भिक्षाचर्या हीं विहित कर्में सांगितलीं आहेत. सद्योवधू स्त्रियांचा मात्र विवाहकाल प्राप्त झाला असतां कसें तरी उपनयन करून टाकून विवाह करावा. " ( द्विविधाः स्त्रियः । ब्रह्मवादिन्यः सद्योवध्वश्च । तत्र ब्रह्मवादिनीनामुपनयनं अग्नीन्धनं वेदाध्ययनं स्वगृहे च भिक्षाचर्या इति । सद्योवधूनां तु उपस्थिते विवाहे कथंचिदुपनयनमात्रं कृत्वा विवाहः कार्यः ।) ( पराशरसंहितेवरील माधवाचार्यांचें भाष्य.)

या विषयींची आणखी एक गोष्ट येथें सांगितली पाहिजे. धर्मशास्त्रकार यमानें स्त्रियांच्या उपनयनादिकांसंबंधीं असें म्हटलें आहे:—

पुराकल्पे कुमारीणां मौञ्जीबंधनमिष्यते ।
अध्यापनं च वेदानां सावित्रीवाचनं तथा ॥

सायणाचार्यादि पंडितांनीं पुराकल्प शब्दाचा अर्थ प्राचीन कल्प, पूर्वींचे युग, हें चालू युग नव्हे. असा अर्थ केला आहे, पण तो बरोबर वाटत नाहीं. पुराकल्प शब्दाचा या ठिकाणीं '**ब्राह्मण ग्रंथाचा अंश विशेष**' असा अर्थ केला पाहिजे. 'हेतुर्निर्वचनानिन्दा' इत्यादि ब्राह्मण

ग्रंथाचे जे दहा प्रकार शबरस्वामीनें सांगितले आहेत, त्यांतील एकाचें नांव **पुराकल्प** असें आहे. त्या पुराकल्पाप्रमाणें कुमारींचें मौंजीबंधन, वेदाध्ययन आणि गायत्रीमन्त्रोपदेश या गोष्टी वेदविहित ठरतात. वरील श्लोकांतील ' इष्यते ' हें वर्तमानकालबोधक क्रियापदही असाच अर्थ सुचवितें.

मनुस्मृतिकाळापर्यंत ही चाल अझून थोडी फार प्रचारांत होती असें मनुस्मृतींतील खालील दोन श्लोकांवरून दिसून येतें.

अमन्त्रिका तु कार्येयं स्त्रीणामावृदशेषतः ।
संस्कारार्थं शरीरस्य यथा कालं यथाक्रमम् ॥
वैवाहिको विधिः स्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः ।
पतिसेवा गुरौ वासो गृहार्थोऽग्निपरिक्रिया ॥
एष प्रोक्तो द्विजातीनामौपनायनिको विधिः ।
उत्पत्तिव्यञ्जकः पुण्यः कर्मयोगं निबोधत ॥

हे सर्व जातकर्मादि ( उपनयनासकट ) विधि शरीराच्या शुद्धीकरितां त्या त्या वेळीं व त्या त्या क्रमानें स्त्रियांचे करावे; पण ते वेदमंत्राव्यतिरिक्त करावे. स्त्रियांना विवाहविधी हाच पहिला वैदिक संस्कार होय ( म्हणजे तो उपनयनाचे ठिकाणीं आहे ) पतिसेवा हाच त्यांचा गुरुगृहीं वास व गृहकृत्यें हें त्यांचें होमहवन होय. याप्रमाणें द्विजत्व दाखविणारा पुण्यकारक असा उपनयनविधि द्विजातींना सांगितलेला आहे.

वरील श्लोकावरून मनुस्मृतिकाळीं सुद्धां स्त्रियांची मुंज होत होती. पण तिला मुलांच्या मुंजीइतकें महत्व नव्हतें. निदान ती समंत्रक होण्याचें बंद झालें होतें. पण त्याचे पूर्वी स्त्रियांचें समंत्रक उपनयन होत होतें इतकेंच नव्हे, तर स्त्रिया गुरुगृहीं रहात असत; त्यांनाही संध्यावंदन व सायंप्रातर्होम करण्याचा अधिकार होता. पण मनूचे काळीं या चाली बंद पडत चालल्या होत्या; किंवा त्या बंद व्हाव्या असें मनुला वाटत तरी होतें खास. आर्य स्त्रियांचा हा उपनयनाचा हक्क कधीं नाहींसा झाला असावा व तो का नाहींसा झाला असावा व आर्यसमाजात बालविवाहाचा प्रवेश केव्हां झाला असावा हे मोठे कठीण सामाजिक प्रश्न आहेत. आर्य लोकांची जी दुसरी शाखा

—पारशी शाखा—त्या शाखेमध्यें मुलामुलींची मुंज होतें. मुंबईत आजतागाइत नवज्योत ( हें पारशांच्या उपनयनाच्या विधीचें नांव होय ) मुलामुलींची होते व त्या लोकांत स्त्रीपुरुष दोघेही सररहा कस्ती किंवा आपलें जानवें अगर यज्ञोपवीत घालतात. यावरून जुन्या आर्य लोकांतसुद्धां ही चाल असावी हें स्पष्ट होते. पण आर्य लोक हिंदुस्थानांत पुष्कळ पसरल्यावर व त्यांनीं अनार्य बायका आपल्या घरांत आणल्यावर सर्व स्त्रियांना हा वेदाध्ययनाचा हक्क देणें त्यांना योग्य वाटलें नाहीं व अनार्य स्त्रियांबद्दलच्या कमीपणाची भावना आर्य स्त्रियांच्या दर्जाच्या बाबतींत प्रादुर्भूत झाली व तेव्हांपासून स्त्रियांचें उपनयन बंद झालें किंवा निदान अमंत्रक होऊं लागले. पूर्वीं मुलीचें मुलाप्रमाणेंच आठव्या वर्षीं उपनयन होत असलें पाहिजे. पण स्त्रियांचें वैदिक संस्कार बंद झाले व त्यांना विवाहविधी हाच एक वैदिक संस्कार ( कारण विवाह कायदेशीर करण्याकरितां तो आवश्यक होता ) राहिला. तेव्हां तो विवाहविधीच उपनयनाचे काळीं करण्याची प्रवृत्ति सुरू झाली असावी व आठवें वर्ष हें मुलीचें विवाहाचें योग्य वय असा समज समाजांत प्रचलित झाला असावा. पण या प्रश्नासंबंधीं अजून पुष्कळ शोध व्हावयास पाहिजे आहे यांत शंका नाहीं. पूर्वकाळीं स्त्रियांचें उपनयन होत असावें अशाबद्दल अप्रत्यक्ष पुरावा पुष्कळ आहे. रामायणांत ऐके ठिकाणीं सीता संध्याकाळीं संध्या करण्याकरितां नदीवर गेली आहे, असा उल्लेख आहे. कांहीं स्मृतींत बायकांच्या कांहीं अपराधांना ' गायत्री मंत्राचा जप अमुक संख्या करावा ' अशी शिक्षा सांगितली आहे. अगदीं अलीकडील धर्मसिंधु नांवाच्या ग्रंथांत विवाहापूर्वीं जीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत त्यांत उपनयन न केल्याबद्दलचें एक प्रायश्चित्त सांगितलें आहे, या व असल्या अप्रत्यक्ष उल्लेखांवरून एका काळीं पारशी समाजाप्रमाणें हिंदुसमाजांत सुद्धां स्त्रियांच्या सरसहा मुंजी होत असाव्या असें दिसतें.

वरील विवेचनावरून उपनयन या विधीची सार्वत्रिकता स्पष्ट होते. हा विधी सर्व आर्यांचा—म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांचा व त्या वर्णांतील स्त्रीपुरुषांचा—होत असे, व तो विधी विद्याधिकाराचा द्योतक होता. म्हणजे या सर्व आर्यांतिल स्त्रीपुरुषांना सरसहा विद्या संपा-

दन करण्याचा अधिकार होता. अर्वाचीन भाषेंत म्हणावयाचें म्हणजे त्या काळीं मोफत व सक्तीच्या सार्वत्रिक शिक्षणाचा नियम होता.

मनुस्मृतींत वर्णन केलेला उपनयन विधी व ब्रह्मचर्याश्रम हे काल्पनिक नाहींत, तर उपनयन झाल्यावर मुलें गुरुगृहीं राहून विद्याभ्यास करीत व तीं सुद्धां ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादि त्रिवर्णांचीं असत असें महाभारतादि पुराणांतील कथांवरून स्पष्ट होतें. त्या कथेपैकीं एक लहानशी गोष्ट येथें देणें वावगें होणार नाहीं. अर्थात या गोष्टींतील सर्व भाग खरा नसेल, पण त्या काळची पद्धत व विशेषतः गुरुगृहीं राहून त्यांच्या गृहकृत्याला मदत करण्याची पद्धत तरी त्या गोष्टीवरून दिसून येईल.

धौम्यऋषीकडे तीन शिष्य होते, एकाचें नांव वेद, दुसऱ्याचें नांव उपमन्यु व तिसऱ्याचें नांव आरुणि. विद्यादान करण्यापूर्वीं धौम्यऋषि कांहीं कालपर्यंत आपल्या शिष्यांची आज्ञाधारकपणाबद्दल परीक्षा करीत. तदनुरूप त्यांनीं वेदाला आपल्या स्वतःच्या शुश्रूषेला ठेवलें व त्याला कठीण कामें सांगितलीं. तीं सर्व कामें त्यानें निमूटपणें केल्यावर त्यांनीं त्याला सर्व विद्यापारंगत केला व विद्यार्थीदशेचें समावर्तन त्याचेकडून करवून मग त्याला गृहस्थाश्रम घेण्याची परवानगी दिली.

उपमन्यु हा भला धष्टपुष्ट होता तेव्हां त्याला गुरें राखावयास ठेवला. तो भिक्षा मागून आणून ती खाई, व मग गुरें राखून संध्याकाळीं गुरुगृहीं येई. धौम्य ऋषींनीं त्याला धट्टाकट्टा पाहून 'भिक्षा आणशील ती मला दे' अशी आज्ञा केली. यावर उपमन्यूनें दोनदां भिक्षा मागण्याची युक्ति काढली. तीही धौम्यांस समजल्यावर ती त्यांनीं बंद करविली. मग उपमन्यु रानांत गाईचें दूध काढून त्यावर राहू लागला पण पहिल्यासारखा धष्टपुष्ट पाहून धौम्यऋषींनीं पुनः त्याची चौकशी केली. व त्याला दूध पिण्याची मनाई केली. उपमन्यु वासरें गाईचें दुध पितांना पडणाऱ्या फेसावरच आपली भूक भागवूं लागला तरी त्याची आंगलट कांहीं कमी झाली नाहीं. म्हणून धौम्यांनीं पुनः त्याची विचारपूस केली व फेंसही खाण्याची उपमन्यूला मनाई केली. आतांमात्र त्याची उपासमार झाली. पण भूक अनावर झाल्यावर त्यानें रानांतील रुईच्या पानांचा चीकच खाण्यास प्रारंभ केला. पण त्यायोगें त्याचे डोळे गेले व गुरें

राखीत असतांना तो एका विहिरींत पडला. उपमन्यु रोजच्याप्रमाणें सायंकाळीं घरीं न आल्यामुळें धौम्यऋषि त्याच्या शोधार्थ रानांत गेले व त्यांनीं उपमन्यूला हांक मारिली, तों त्यानें आपण विहिरींत पडल्याचें सांगितलें. धौम्यऋषींना उपमन्यूच्या सत्यप्रियतेबद्दल व आज्ञाधारकत्वाबद्दल सानंद आश्चर्य वाटलें व अश्विनीकुमारांचा धांवा कर म्हणजे तुझे डोळे तुला परत येतील असा उपमन्यूला त्यांनीं आशीर्वाद दिला. उपमन्यूनें अश्विनीकुमारांचा धांवा केला व त्या देवांच्या वैद्यांनीं उपमन्यूची दृष्टि पूर्ववत् केली. मग धौम्य ऋषींनीं त्याला सर्व विद्येंत पारंगत केला.

धौम्य ऋषींनीं आरुणीला शेतांत जाऊन जोरानें वाहणाऱ्या पाण्याला बंधारा बांधण्यास सांगितलें. त्यानें त्या ठिकाणीं पाट्यांच्या पाट्या माती टाकली. तरी पण पाण्याचा प्रतिबंध होईना. तेव्हां आरुणीला एक युक्ति सुचली. आपणच शेताचे कांठाला बांधासारखे आडवें पडावें, म्हणजे पाणी अडेलच. त्याप्रमाणें तो त्या शेताच्या कांठावर आडवा पडला. सायंकाळीं आरुणी घरीं आला नाहीं, हें पाहून धौम्य ऋषि शिष्यासह त्याचा शोध करण्यास शेतावर गेले व त्याला त्यांनीं हांक मारली. तेव्हां त्यानें असलेल्या जागेवरून ओ दिली. धौम्य म्हणाले "शाबास आरुणे माझी आज्ञा पाळण्याकरितां तूं आपल्या जीवाकडेसुद्धां पाहिलें नाहींस." याप्रमाणें धौम्य ऋषि आरुणीवरही खुष झाले व त्यांनीं त्याला आपली सर्व विद्या दिली. या व अशा तऱ्हेच्या किती तरी गोष्टी महाभारतांत व इतर पुराणांत आहेत. यावरून या काळीं शिष्यांनीं गुरुगृहीं राहून विद्या संपादन करण्याचा प्रघात अगदीं सार्वत्रिक होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. या वर्णनात्मक भागावरून आता कार्लाईलच्या तत्वाच्या अनुरोधानेंच चर्चात्मक भागाकडे वळूं.

वरील विवेचनावरून स्मृतिकाळीं व महाभारतकाळीं उपनयन या विधीचें अंतरंग व बहिरंग यामध्यें पूर्ण आनुरूप्य होतें असें दिसून येईल. हा विधी समाजाच्या उन्नतीचा एक पाया होता. कारण या विधीच्या अंतरंगी व बहिरंगी प्राधान्यानें समाजांतील तरुण लोक सुशिक्षित केले जात व विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर प्रौढ वयांत ते गृहस्थाश्रमी

बनत. यामुळें समाजांतील लोक स्वावलंबी, सुदृढ व सद्गुणी असे असत. व त्यांची प्रजाही स्वावलंबी सुदृढ व सद्गुणी निपजे.

पण कालेंकरून या विधीच्या अंतरंगांत व बहिरंगांत विसंवाद पडूं लागला. आधीं हा धार्मिक विधी बहुसंख्याक लोकांचा सरसहा सामान्य हक्क न राहतां तो अल्पसंख्याकांचा धार्मिक विशेष हक्क बनला. म्हणजे ब्राह्मणांचाच फक्त हा हक्क असा समज बळावत चालला व त्याजबरोबर वेदविद्या म्हणजे ब्राह्मणांचीच विद्या असें वाटूं लागलें. इतर जातींची मुंज मागें पडत चालली. निदान तो 'वेदोक्त' किंवा वेदमंत्रांनीं न करतां 'पुराणोक्त किंवा अमंत्रक' करण्याचा प्रघात सुरू झाला. व कालें करून ती चाल या खालच्या जातींत नष्टप्रायच झाली व त्याबरोबरच विद्याधिकारही नाहींसा झाला व खालच्या जाती निरक्षर बनत चालल्या.

ब्राह्मणजातीमध्यें सुद्धां या विधीच्या बहिरंगाकडेच ज्यास्त लक्ष देण्याची प्रवृत्ति वाढली. विद्याभ्यासाची पद्धती ब्राह्मणवर्गामधून अजिबात नाहींशी झाली असें नाहीं. पण ब्रह्मचर्याश्रमाचा काल संकुचित होत चालला व उपनयन झाल्यापासून दहा, वीस, पंचवीस वर्षांची ब्रह्मचर्याची पूर्वींची योग्य कालमर्यादा इचा संकोच होऊन ती मर्यादा दहा, वीस, पंचवीस दिवसांवर येऊन ठेपली. म्हणजे मुंजीचें समावर्तन किंवा सोडमुंज ही फारच अल्प अवधीनंतर होऊं लागली. मुलांचें गुरुगृहीं राहणें बंद पडत चाललें व त्यांना अकालीं गृहस्थाश्रमी बनविण्याची पालकांची हौस वाढत चालली. सारांश, मुंजीच्या विधीचें अंतरंग पार बदलून गेलें व निव्वळ बाहिरंग मात्र राहिलें. या बहिरंगांत लौकिक बाबींची आणखी भर पडली. व मुंज म्हणजे आईबापांच्या हौसेचा, त्यांच्या सुखसोहळ्याचा, त्यांच्या संपत्तिप्रदर्शनाचा, त्यांच्या इष्टमित्र सम्मेलनाचा एक लौकिक समारभ बनला. म्हणजे कार्लाईलच्या तत्त्वाप्रमाणे विधी जुन्याकपड्यांसारखा टाकाऊ झाला. जुन्या विधीतलें जीवंत बीज नष्ट झालें व निवळ फोलकट शिल्लक राहिलें.

हल्लीं आमच्या समाजांत चालू असलेल्या मुंजीच्या विधीला फोलकटपणा आला नाहीं असें कोण समंजस मनुष्य म्हणेल ? मुलांच्या शिक्षणारंभाचा हा विधी असें आतां कोण मानतो ? मुलें हल्लीं मुंजीच्या

आधींच शाळेंत जाऊं लागतात. बरें, ब्रह्मचर्य पाळण्याच्या नियमाचा हा विधि म्हणावा तर हल्लींचें ब्रह्मचर्य चार आठ दिवससुद्धां टिकत नाहीं. कारण, मुंज झाल्यावर सोडमुंजीची आईबापांना घाई होते व मुलाचें लग्न करण्याचा विचार मनांत घोळूं लागतो. मुलांच्या बाबतींत बालविवाहाचा प्रचार कमी होत चालला आहे खरा. तरी पण विद्या पुरी होईपर्यंत गृहस्थाश्रमी बनावयाचे नाहीं; हा पूर्वींच्या ब्रह्मचर्याश्रमांतील व उपनयनाच्या विधींतील नियम अजून पूर्णपणें अंमलांत आला नाहीं. बरें, उपनयन हा विधी पूर्वींप्रमाणें आर्यत्वाचा द्योतक तरी राहिला आहे काय ? नाहीं. कारण, आर्यधर्माचे संरक्षक जे ब्राह्मण ते इतर जातींना हा विधी करावयाची इच्छा झाल्यास प्रतिबंध करतात व 'वेदोक्ताचा' जबरदस्त बखेडा माजवितात हें नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. पूर्वकाळीं हा विधी सर्व द्विजांना कर्तव्य असतां या जुन्या विधीचें पुनरुज्जीवन करूं इच्छिणाऱ्या जातींना ब्राह्मण लोक प्रतिबंध करणार कोण बरें ? इंग्रजी राज्यामुळें आतां विद्येचे दरवाजे सर्व वर्णांना खुले झाले आहेत व त्याचा फायदा इतर वर्ण घेऊं लागलेच आहेत. तेव्हां उपनयनाच्या प्रतिबंधानें विद्याद्वारें त्यांना थोडीच बंद होणार आहेत ? तेव्हां उपनयन हा आतां फोलकटच विधी राहिला नाहीं काय ? मग या फोलाबद्दल इतकें रणकंदन माजविण्याची काय जरूरी आहे ? अशा प्रकारचे विचार या विचारयुगांत उद्भवल्याखेरीज राहणार नाहींत.

कार्लाईलच्या तत्वानुरूप या मुंजीच्या विधीबद्दल हल्लींच्या काळीं य **करप** योग्य ठरतें त्याचा थोडक्यांत विचार करून या विषयाची रजा घेऊं.

उपनयन या विधीचे अंतःस्वरूप चांगलें आहे. समाजांतील प्रत्येक व्यक्तीला—मग ती स्त्री असो अगर पुरुष असो—शिक्षण हें अवश्य आहे व हें शिक्षण देणें आईबापांचें व समाजाचें आद्य कर्तव्य आहे हें सांगणें हेंच या विधीचें अंतःस्वरूप आहे. अर्थात् हें स्वरूप प्रत्येक प्रगतीपर समाजाला मान्य होण्यासारखें आहे. या विधीचें बहिरंग हें कालमानाप्रमाणें बदलणारें आहे. पूर्वकाळीं कांहीं एक धार्मिक विधि केला म्हणजे आईबापांना आपल्या मुलामुलींना गुरुगृहीं पाठविण्याची प्रवृत्ति होई. हल्लींच्या

काळीं सक्तीचा व मोफत शिक्षणाचा कायदा करण्याच्या योगानें आईबापामध्यें ही प्रवृत्ति उत्पन्न करण्याची रीत पडत चालली आहे. परंतु उपनयनाचे बहिरंग आतांसुद्धां शिल्लक राहिलें तरी वावगें नाहीं. मात्र त्यांत विद्यार्थीदशेचा अतरंगरूपी जीव घातला पाहिजे. आर्यधर्माचें लक्षण ह्मणून उपनयनविधि कायम ठेवावयाचा असल्यास हिंदुसमाजानें आर्यसमाजाचें या बाबतींत अनुकरण केलें पाहिजे. आर्यसमाजपंथी लोकानीं उपनयनविधीचें प्रशंसनीय रीतीनें पुनरुज्जीवन केलें आहे.

आर्यसमाजपंथी लोक हिंदूंच्या सर्व जातींना—शूद्रांनासुद्धां--उपनयनाचा अधिकार देण्यास तयार आहेत. व गुरुकुलांत सर्व जातींच्या मुलांच्या ते मुंजी करतात. त्याप्रमाणेंच मुलींच्या मुंजी करण्यास ते तयार आहेत व तसा प्रघात ते पाडूं लागले आहेत. मुंज झाल्यावर बारा—चवदा वर्षें मुलानें ब्रह्मचारी राहिलें पाहिजे व विद्याभ्यास केला पाहिजे आणि या मुदतीच्या आधीं आईबापांनीं मुलाचा वाङ्निश्चय किंवा विवाह करतां कामा नये; असा निर्बंध ते अमलांत आणीत आहेत. अशा तऱ्हेने उपनयनाचें पुनरुज्जीवन झाल्यास किती तरी सामाजिक सुधारणा त्यानें ताबडतोब सिद्ध होतात. एक बालविवाहास अजिबात फाटा मिळतो. दुसरी, मुलांमुलींना शिक्षण देणें आईबापांचें आद्यकर्तव्य बनून स्त्री-शिक्षणाची वाढ आपोआप घडून येते. तिसरा, सर्व जातींना उपनयनाचा अधिकार मिळाल्यामुळें हिंदुजातीचें एकीकरण होतें. चवथी, खिश्चन्धर्माप्रमाणें किंवा, मुसलमान धर्माप्रमाणें हिंदुधर्माचा एक सामान्य धार्मिकविधी प्रचलित होऊन उपनयन हा विधी हिंदुधर्माचें एक प्रमुख चिन्ह बनतें. यावरून उपनयन विधीच्या अंतरंगाचें महत्त्व जाणून त्याचा कसा उपयोग करावा हें सुज्ञांनीं मनाशीं ठरवावें.

९

# विवाहविधी.

आमच्या हिंदुसमाजांत लग्न किंवा विवाह हा एक अत्यंत महत्त्वाचा संस्कार मानलेला आहे. मागील कलमांत वर्णिलेल्या उपनयनानंतरचाच हा एक संस्कार होय. हिंदुशास्त्रकारांनीं मनुष्याच्या आयुष्याचे चार भाग कल्पून त्याचे चार आश्रम बनविले आहेत. वर्णव्यवस्था व आश्रमव्यवस्था या हिंदुसमाजाच्या विशेष व्यवस्था आहेत व यालाच वर्णाश्रमधर्म म्हणतात. प्रत्येक माणसानें ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम आयुष्याच्या वाढत्या क्रमाप्रमाणें स्वीकारला पाहिजे; असा धर्मशास्त्राचा कटाक्ष आहे. यांपैकीं शेवटच्या दोन आश्रमाचा अवलंब फारच क्वचित् करण्यांत येतो. मात्र पहिले दोन प्रचारांत आहेत. त्यांपैकीं ब्रह्मचर्याश्रमाचें विवेचन मागील कलमांत केलें. येथें गृहस्थाश्रमाचें विवेचन करावयाचें आहे.

ज्याप्रमाणें ब्रह्मचर्याश्रम मौंजीबंधनानें स्वीकारला जातो त्याप्रमाणें गृहस्थाश्रम विवाहविधीनें स्वीकारला जातो. तेव्हां या विवाहविधीचें स्वरूप पाहिलें पाहिजे. हिंदुसमाजांत नानाजाती, नानापंथ, नानामतें असल्यामुळें व हिंदुसमाज फार अफाट असल्यामुळें या विवाहविधीच्या बाबतींत किती तरी वैचित्र्य उत्पन्न झालें आहे. कोठें कुलीन पद्धतीची बहुपत्नीकत्वाची चाल चालू आहे; तर कोठें बहुपतित्वाची चाल प्रचलित आहे; कोठें लग्नसमयीं वधूचे बापानें वरपक्षास मोठी दक्षिणा देण्याची चाल—हुंडा देण्याची चाल—जोरांत आहे, तर कोठें वरानें वधूचे बापास पुष्कळ पैसा दिला पाहिजे, असा आचार अंमलांत आहे; कोठें वरपक्षानें वधूस मागणी घालण्याची पद्धति आहे; तर कोठें वधूच्या बापाला वर शोधनाकरितां पायपिटी करावी लागते; कोठें मुलामुलींचीं अगदीं पाळण्यांत लग्नें होतात; तर कोठें वधूवर जराशीं मोठीं असतात; कोठें लग्नविधीच्या

बाबतींत मुहूर्त पाहण्याची गरज लागते; तर कोठें लग्नविधी केव्हांही उरकून घेता येतो; कोठें बारा वर्षांतून एक वर्ष विवाहाला वर्ज असतें; तर कोठें बारा वर्षांतून एकच वर्ष विवाहाला विहित असतें. या असल्या वैचित्र्याखेरीज कुलाचार, ग्रामाचार, देशाचार यासंबंधानें पुष्कळ विधि-वैचित्र्य उत्पन्न झालें आहे. तेव्हां विवाहाच्या बाबतींतील सर्व चाली-रीतीचें सविस्तर वर्णन करण्यास एक स्वतंत्र ग्रंथ लिहावा लागेल. इतकें खरें कीं, सर्व जातींत व सर्व प्रांतांत विवाहाचा वैदिक विधि साधारणतः सारखाच आहे. व हल्लींच्या हिंदुकायद्याच्या दृष्टीनें विवाह कायदेशीर होण्यास हा वैदिकविधीच अवश्य मानलेला आहे. इतर विधी व आचार हे गौण असून अनवश्यक आहेत. तेव्हां येथें या वैदिक विधीचें कालीं-ईलच्या तत्वानुरूप अन्तरंग व बहिरंग या दोन दृष्टीनें विवेचन केलें म्हणजे पुरे आहे.

विवाहविधीचें अंतरंग साधें, सोपें व स्पष्ट आहे. मानव जातीच्या स्थितीकरितां व वृद्धीकरितां स्त्रीपुरुषसंयोगाची जरूरी आहे; इतकेंच नव्हे, तर स्त्रीपुरुषांचा सहवास व सहकार्य यांची जास्तच जरूरी आहे. मनुष्यप्राणी जन्मतः इतका दुर्बल, इतका परावलंबी व इतका अकिंचि-त्कर आहे कीं, जर त्याचे आईबाप बालपणीं त्याचें संरक्षण करण्यास व संगोपन करण्यास एकत्र राहून तयार नसतील तर मानवी जीवित क्षणभर–ही टिकणार नाहीं. म्हणूनच मानवजातीच्या अगदीं रानटी स्थितीपासून तों थेट सुधारलेल्या स्थितीपर्यंत सर्व अवस्थांत कुटुंब करून राहण्याची प्रवृत्ति मनुष्यांत दिसून येते. कुटुंब म्हणजे स्त्रीपुरुष व अपत्यें यांचा समुदाय होय. सारांश, हिंस्त्र प्राण्यांप्रमाणें मनुष्यप्राणि एकलकोंडा प्राणी नाहीं; तर तो संगतिप्रिय किंवा कुटुंब करून राहणारा प्राणी आहे असें शास्त्रज्ञ म्हणतात. ही संगतिप्रियताच स्त्रीपुरुषांना लोहचुंबकाप्रमाणें एक-मेकांकडे ओढते व इतर प्राण्यांप्रमाणेंच मनुष्याला कामवासना असतांना क्षणिक कामवासना तृप्तीपुरताच स्त्रीपुरुषांचा संयोग क्षणिक न राहतां तो कायमचा बनतो. कालेंकरून या कामवासनेचेंच प्रेमामध्यें पर्यवसान होतें व कुटुंबांतल्या व्यक्ति प्रेमग्रंथीनें बद्ध होतात.

अर्थात् विवाहसंस्थेला उन्नत स्वरूप हळू हळूच येत जातें. मनुष्याच्या

रानटी स्थितींत पुरुष बायकांना आपल्या मालमत्तेसारख्याच समजतात. म्हणून दुसऱ्या टोळ्यांतून धरून आणून स्त्रियांना आपल्या बायका करण्याची रीत पडते. यालाच स्मृतिकारांनीं राक्षस व पैशाच विवाह पद्धति असें म्हटलें आहे. याच काळांत समाजांत पुष्कळ बायका एकाच पुरुषानें करण्याची रीति उत्पन्न होते. कारण, पराक्रमी पुरुषाला बायका धरून आणण्यामध्यें पुरुषार्थ वाटतो; व बायकांचा दर्जा कमी असल्या-मुळें पुष्कळ बायका घरांत कामास उपयोगी पडतात. पण समाजांतील व्यक्तींमध्यें जसजशी सात्विक व उच्च मनोवृत्तीची वाढ होते तसतशी असल्या राक्षसी विवाहपद्धती मागें पडून बाप आपण होऊन मुलीला वरास अर्पण करूं लागतो व तसें करतांना वराला वरदक्षिणा म्हणून हुडाही देतो. या पद्धतीला ब्राह्मविवाहपद्धति म्हणतात. हल्लींच्या हिंदु-समाजांत हीच विवाहपद्धति चालू आहे व काहीं विवाहविधी या पद्ध-तीला अनुरूप असे आहेत. पण वधूवरांनीं आपल्या पसंतीनें एकमेकांस वरण्याची स्वयंवरपद्धति ही आपल्या समाजांत कांहीं अंशानें तरी चालू होती यांत शंका नाहीं. तसेंच विवाहाचे उदात्त स्वरूप म्हणजे एकपत्नीक विवाहपद्धति होय असें आर्यलोकांना वाटत असे. अशा उदात्त विवाहाचें प्रसिद्ध उदाहरण रामाचें आहे. अशा विवाहांत पतिपत्नीचा संबंध समान दर्जाचा असून त्याला उच्चतम मैत्रीचें स्वरूप येत असे. हें कालिदास व भवभूति या दोन प्रसिद्ध कवींच्या दोन श्लोकांवरून दिसून येईल. ते श्लोक हे—

“ गृहिणी सचिवः सखीमिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ ।
करुणाविमुखेन मृत्युना हरता त्वां कि न मे हृतम् ॥
प्रेयो मित्रं बंधुता वा समग्रा । सर्वे कामाः शेवधिर्जिवितं वा ॥
स्त्रीणां भर्ता धर्मदाराश्चपुंसामित्यन्योन्यं वत्सयोर्ज्ञातमस्तु ॥

कठोर काळानें तुझें हरण करतांना-माझी गृहलक्ष्मी, माझा मंत्री; माझा एकांतांतील मित्र, माझी ललितकलेंतली प्रिय विद्यार्थीण—माझें काय नेलें नाहीं ?

स्त्रियेचा भर्ता व पुरुषाची धर्मपत्नी हे परस्परांचे अत्यंत मित्र होत,

सर्व संबंधीसर्वस्व यामध्यें आलें आहे, सर्व मनकामनांची संतृप्ति करणारे हे आहेत; आणि सर्व सुखाचे हे निधी आहेत; या सर्व गोष्टी तुम्हांला ठाऊक असू द्या.

वरील विवेचनावरून विवाहाच्या अंतरंगाच्या खऱ्या स्वरूपाची कल्पना येईल असें वाटतें. या स्वरूपापासून इतक्या गोष्टी निष्पन्न होतात. विवाहानें मानव जातीची अभिवृद्धी करणारें, मानवी मनामध्यें सात्विक व उदात्त भावना उद्भूत करून परस्परांवर प्रेम करून परस्परांना साहाय्य करणारें कुटुंब बनतें. अर्थात् हें कुटुंब किंवा गृहस्थाश्रम चालविण्यास समर्थ अशाच वयांच्या स्त्रीपुरुषांचा विवाह हा संबंध आहे. तसेच विवाहानें बद्ध झालेल्या स्त्रीपुरुषांचा दर्जा समान असून हा संबंध एकपत्नीक व एकपतीक असाच पाहिजे तरच तो उदात्त स्वरूपाचा राहूं शकेल. असो.

हा विवाह संस्थेचा आत्मा झाला. या संस्थेचें शरीर म्हणजे विवाहप्रसंगींचे विधी होत. हेंच विवाहाचें बहिरंग होय. तेव्हां आतां त्याच्या विवेचनास लागूं.

मागें सांगितलेंच आहे कीं, हिंदुसमाजाच्या विवाहविधींत कुलाचार, ग्रामाचार, देशाचार वगैरे किती तरी चालींची भर पडली आहे. त्याचप्रमाणें वर्ण, प्रवर, गोत्र वगैरे संबंधीचें किती तरी निर्बंध आहेत. तसेंच फलज्योतिष, भूतपिशाच, वगैरे गोष्टींवरील श्रद्धेच्या योगानें आलेल्या किती तरी चाली आहेत. पण त्या सर्वांचें येथे विवेचन करण्याचे कारण नाहीं. जो सर्व साधारण वैदिक म्हणून विधी करतात त्याचें थोडक्यांत वर्णन करणें येथें योग्य होईल.

हल्लीं आमच्या समाजांत ब्राह्मविवाहविधीच प्रचलित आहे. या विवाहाची मनूनें खालीलप्रमाणें व्याख्या केली आहे.

"आच्छाद्य चार्चयित्वा च श्रुतिशीलवते स्वयम् ।
आहूय दानं कन्याया ब्राह्मो धर्मः प्रकीर्तितः ॥"

"चांगल्या शिकलेल्या व उत्तम शीलाच्या वरास स्वतः बोलावून आणून त्याला वस्त्रालंकार देऊन कन्या देणें हा ब्राह्म विवाहाचा प्रकार होय."

या व्याख्येला कांहीं तरी जुळेल असाच संस्कारविधी सध्यां प्रचारांत आहे. मात्र या एकंदर विधीमधले वैदिक मंत्र ऋग्वेदकालीन आहेत. याज्ञिक भाग मागाहून तयार केलेला आहे.

विवाह संस्काराला सुरवात करतांना प्रथमतः देवस्थापना, गणपती-पूजन व पुण्याहवाचन वगैरे सामान्य धार्मिकविधी करण्याची रीत आहे. नंतर वाङ्निश्चय म्हणून एक विधी करतात. यामध्यें वरपिता व वधूपिता वधूवरांचा विवाह करण्याचा करार करतात. यामध्यें वैदिक मंत्र नाहींत व हा विधी प्रत्यक्ष लग्नाचे आधीं पुष्कळ दिवस केला तरी चालतो. पण सध्यां तो एकंदर विवाहविधीबरोबरच करून घेतात. नंतर श्रीमंतपूजन म्हणून एक विधी करतात. याचा मूळचा शब्द सीमांतपूजन असा आहे. पण त्याचा अपभ्रंश श्रीमंतपूजन असा झाला आहे. व या अपभ्रंशानें एक गैरसमजही उत्पन्न झाला आहे. तो हा कीं, वरपक्ष म्हणजे नेहमीं श्रीमान् पाहिजे. निदान श्रीमानाची ऐट तरी आणण्याची या गैरसमजानें लोकांना संवय लागली आहे. सीमांतपूजन म्हणजे वर वधूच्या गांवच्या सीमेवर आल्यावर वधूपित्यानें त्याला सामोरा जाऊन मोठ्या आदरातिथ्यानें घेऊन येण्याचा विधी आहे. म्हणजे वरानें वधूचे गांवीं जावयाचें असा या विधीच्या वेळचा अर्थ आहे. हल्लीं पुष्कळदां वधूकडील मंडळी वराच्या गांवीं जातात. तेव्हां अशा वेळीं सीमांतपूजन हा विधी निरर्थकच होतो; नव्हे, हास्यापदच होतो. बाहेरगांवाहून आलेल्या वधूपक्षानें गांवांतच असलेल्या वराचे स्वागत करण्यासारखें हल्लीचें कृत्य होतें. त्यानंतर वर मिरवत मिरवत वधूचे घरीं येतो. तेव्हां अतिथीला करावयाचा मधुपर्क करतात. तदनंतर ठरलेल्या मुहूर्तावर वधुवरांमध्यें अन्तर्पाट धरून मंगलाष्टकें म्हणून बरोबर सुमुहूर्तीं वधूकडून वरास पुष्पमाळा घालवितात.

येथपर्यंतचे विवाहसंबंधीचे विधी हे सामान्य विधी आहेत; त्यांत वैदिक मंत्र फारसे नाहींत. हे विधी कायदेशीर होण्यास अवश्यक नाहींत; ते निवळ औपचारिक आहेत. यापुढले विधी हेच विवाहाचे खरे वैदिक विधी होत. ते म्हणजे कन्यादान व विवाह होम; विवाह होमामध्यें लाजाहोम, पाणिग्रहण, परिणय व सप्तपदी असे चार विधि असतात. म्हणजे कन्यादान धरून एकंदर विवाहातले पाच विधी होतात. यांपैकीं

पहिला कन्यादान हा विधि मूळचा नाहीं व तो विवाह कायदेशीर ठरण्यास अवश्य नाहीं असें कांहीं अर्वाचीन कायदेपंडितांचें मत आहे. कारण, फार जुन्या काळच्या गृह्यसूत्रांत कन्यादानाचा उल्लेख नाहीं. शिवाय ज्या वेळीं कन्या प्रौढ असे त्या वेळीं ती आपला स्वयंवर विवाह करी. मनुस्मृतींत सुद्धां कन्येनें ऋतुमती झाल्यावर बापानें विवाह करून देण्याची तीन वर्षें वाट पहावी व नंतर स्वतः वर शोधून विवाह करावा अशी स्पष्ट अनुज्ञा दिली आहे. तसेंच स्वयंवर पद्धतींत व गांधर्वविवाह पद्धतींत वधुवरांच्या पसंतीनें विवाह घडून येत असे. तेथेंही कन्यादानाची अवश्यकता नसे. शिवाय ब्रह्मचाऱ्याला गृहस्थाश्रमाचा स्वीकार करण्याचा धर्म मनुस्मृतींत खालील श्लोकांत सांगितला आहे. त्यांत वराचें वय प्रौढ आहे असें धरलें आहे व त्यानें आपल्याला अनुरूप वधू पहावी असें म्हटलें आहे. यावरून वधूवरांचीं वयें त्या काळीं प्रौढ असत व अशा स्थितींत कन्यादानाची गरज पडत नसावी.

षट्त्रिंशदाब्दिकं चर्यं गुरौ त्रैवेदिकं व्रतम् ।
तदर्धिकं पादिकं वा ग्रहणांतिकमेव वा ॥
वेदानधीत्य वेदौ वा वेदं वापि यथाक्रमम् ।
अविप्लुतब्रह्मचर्यो गृहस्थाश्रममावसेत् ॥
गुरुणानुमतः स्नात्वा समावृत्तो यथाविधि ।
उद्वहेत द्विजो भार्यां सवर्णां लक्षणान्विताम् ॥

परंतु स्त्रियांची मुंज बंद होऊन त्यांचे बालपणींच लग्न करण्याचा प्रघात पडल्यावर धर्मशास्त्रकारांना असें वाटूं लागलें कीं, बालपणीं वधू अज्ञान असते, तिचें तिला संरक्षण करतां येत नाहीं, तेव्हां तिचा जो स्वाभाविक पालक बाप त्यानें ती अल्पवयी कन्या वरास दान म्हणून द्यावी. या विवाहपद्धतीलाच ब्राह्मविवाह म्हणतात. म्हणूनच कन्यादानाच्या विधीची जरूरी वाटूं लागली व तें एक विवाहविधीचें अवश्यक अंग होऊन बसलें. आतां क्रमानें या पांच विधींचें थोडक्यांत वर्णन करूं.

वधूपिता आपल्या पत्नीसह वधूवरांच्या दक्षिणेस बसून आचमन वगैरे करून खालील संकल्प करतो

' विश्वंभरः सर्वभूताः साक्षिण्यः सर्व देवताः
इमां कन्यां प्रदास्यामि पितॄणां तारणाय च ॥'

सर्व चराचर जगास व्यापून टाकणारा असा परमेश्वर, पृथ्वी, आप, तेज वायु व आकाश हीं पंचमहाभूतें आणि सर्व देवतां या सर्वांस साक्षी ठेवून पितरांच्या उद्धाराकरितां ही कन्या तुम्हांला देतों. असा संकल्प झाल्यावर वधूपिता 'पुण्याची वृद्धी होवो, मनाची प्रसन्नता असो, दीर्घायुष्य शांति पुष्टि व संतोष असो, जें पाप त्याचा नाश होवो' अशा प्रकारची प्रार्थना करून वराच्या हातावर कन्येचा हात ठेवून ते दोन्ही हात आपल्या हातात धरून वर व वधू यांच्या कुलांतील तीन पिढ्यांच्या पुरुषांच्या नांवांचा उच्चार करून ही मी आजपर्यंत पालन केलेली कन्या आपल्यास देतो असें वरास ह्मणतो. मग जामात ह्मणतो. " कामानें कामास दिली; काम देणारा व काम घेणारा, मी तुझें कामानें व धर्मप्रजावृध्यर्थ ग्रहण करतों"

नंतर वधूचा बाप वराला म्हणतो " माझ्या कुळांत झालेली व मी आजपर्यंत पाळलेली माझी कन्या मीं तुम्हाला दिली आहे. तरी आपण हिला धर्म अर्थ व काम या तीन्ही पुरुषार्थांत सोडून वागूं नये. " वर प्रतिज्ञा करितो ' मी हिला सोडून वागणार नाहीं.'

नंतर वधूपिता वरास या कन्यादानाच्या शाश्वतीकरितां सोन्याचें नाणें देतो.

तदनंतर सूत्रवेष्टन, कंकणबंधन, अक्षतारोपण, मंगलसूत्रबंधन इत्यादि विधी होतात.

सूत्रवेष्टनाचें वेळीं खालील मंत्र म्हटला जातो.

इहैव स्तं मा वियौष्टं विश्वमायुर्व्यश्नुतं ।
क्रीळंतौ पुत्रैर्नप्तृभिर्मोदमानौ स्वे गृहे ॥

असेच तुम्ही रहा. परस्परांपासून वियुक्त होऊं नका. तुम्हांस दीर्घायुष्य प्राप्त होवो. आपल्या घरीं मुलें नातवंडें यांसह आनंदानें नांदा.

नंतर दोघांच्या भोंवतालीं गुंडाळलेलें सूत एकत्र करून त्याचें कंकण करून तीं वधुवरांच्या हातात एकमेकांनीं बांधावयाचीं हा विधि होतो.

पुढें धुतलेल्या तांदुळांच्या अक्षता घेऊन खालील मंत्र म्हणून त्या अक्षता वधूवरांच्या मस्तकावर टाकतात.

वधू—भगो मे कामः समृद्धयताम् ।
( भाग्याविषयींची माझी इच्छा तृप्त होवो. )
वर—यज्ञो मे कामः समृद्धयताम् ।
( यज्ञाविषयींची माझी इच्छा पूर्ण होवो. )
वधू—प्रजा मे कामः समृद्धयताम् ।
( प्रजेविषयींची माझी इच्छा पूर्ण होवो. )
वर—श्रियो मे कामः समृद्धयताम् ।
( लक्ष्मीविषयींची माझी इच्छा पूर्ण होवो. )

नंतर वर वधूच्या गळ्यांत मंगलसूत्र बांधतो यासंबंधीचा मंत्र अर्वाचीन दिसतो. तो जुना नाहीं असे वाटतें.

मांगल्यतंतुनानेन भर्तृ—जीवनहेतुना
कंठे बध्नामि सुभगे सजीव शरदः शतम् ॥

हे सुभगे, माझ्या जीवनाला कारण असें हें मंगलसूत्र मी तुझ्या गळ्यांत बांधतों. माझ्याबरोबर सुखानें शंभर वर्षें वास कर.

हे इतके विधी झाल्यावर विवाहांतला अत्यंत अवश्यातला अवश्य जो विधी विवाहहोम त्याला सुरवात होते.

आर्य लोकांचा अग्नि हा मुख्य देव. तेव्हां त्याची आराधना करून त्याचे देखत वरानें कन्येचें पत्नित्वानें ग्रहण करावयाचें. प्रथमतः वर गृह्याग्नि सिद्ध करून त्याला व पवमान व प्रजापति या देवांना तूप व लाह्या यांच्या आहुती देतो व त्या वेळीं तो खालील त्या त्या देवतांच्या स्तुतिपर व आपल्याला आयुष्य, अन्न, सुख, द्रव्यपुत्रादि समृद्धि व पराक्रमादि गुण देण्याबद्दल प्रार्थना करतो. यामध्यें विवाह प्रसंगाचा विशेष तऱ्हेचा उल्लेख आहे असें दिसत नाहीं. म्हणून सर्व मंत्राचा खुलासेवार अर्थ दिला नाहीं.

ओम् अग्न आयूंषि पवस आसुवोर्ज मिषंचन ।
आरे बाधस्वदुच्छुनां स्वाहा ॥
ओम् अग्निर्ऋषिः पवमानः पांचजन्यः पुरोहितः ।
तमीमहे महागयं स्वाहा ॥

ओम् अग्ने पवस्वस्वपा अस्मेवर्चः सुवीर्यम् ।
दधद्रयिं मयि पोषं स्वाहा ॥
ओम् त्वमर्यमाभवासि यत्कनीनां नाम स्वधावन् गुह्यं बिभर्ति ॥
अंजंति मित्रं सुधितं नगोभिर्यद्दंपती समनसो कृणोषि स्वाहा ॥

याप्रमाणें गृह्याग्नीची सिद्धता व प्रार्थना झाल्यावर वरानें वधूच्यापुढें उभें राहून वधूच्या पांच अंगुलींसह उजवा हात आपल्या डाव्या हातानें धरून खालील मंत्र म्हणावा.

गृभ्णामि ते सौभगत्वाय हस्तं मया पत्याजरदष्टिर्यथा सः ।
भगो अर्यमा सविता पुरन्धिर्मह्यं त्वादुर्गार्हपत्याय देवाः ॥

मी सौभाग्याकारणें तुझ्या हस्ताचें ग्रहण करितों. जो मी तुझा पति त्या माझा समागम दीर्घकाळपर्यंत तुजला होवो. भग, अर्यमा, सविता पुरन्धि या देवांनीं गृहस्थाश्रमाकरितां तुला मजप्रत दिली.

याच विधीला पाणिग्रहण म्हणतात. व विवाह करणें म्हणजे वधूचें पाणिग्रहण करणें असा अर्थ या विधीमुळेंच प्रचारांत आला.

यानंतर वधूकडून लाजाहोम करवितात. यामध्यें घृतयुक्त लाह्या वधूचा भाऊ अथवा दुसरा कोणी नातेवाईक वधूच्या ओंजळींत घालतो व वर वधूकडून आहुति देववितो व वर खालील मंत्र म्हणतो.

ओम् अर्यमणंनु देवं कन्या अग्निमयक्षत ।
सइमां देवोअर्यमा प्रेतो मुंचातु नामुत स्वाहा ॥

विवाह होमांतील लाजाच्या आहुतीनें वधूच्या पितृगृहाचा संबंध सुटून ती पतिगृहाप्रत येते. पाणिग्रहणानें पति तिचा पत्नित्वानें स्वीकार करतो. नंतर वर वधूचा हात धरून तिला बरोबर घेऊन होमाभोंवतीं तीन प्रदक्षिणा घालतो. यावरून विवाहाला परिणय असेंही नांव पडलें आहे. प्रदक्षिणांच्या वेळीं वर पुढील मंत्र म्हणतो.

अमोहमस्मि सा त्वं सात्वमस्यमोहम्
द्यौरहं पृथिवी त्वं सामाहमृक्त्वं तावेइ विवाहावहै ॥
प्रजां प्रजनयावहै संप्रियौ रोचिष्णू ।
सुमनस्यमानौ जीवेव शरदः शतम् ॥

मी अम् आहे तूं सा आहेस. तूं सा आहेस आणि मी अम् आहें.

मी द्यौ तूं पृथिवी, मी साम आणि तूं ऋक् अशा प्रकारें आपण व्यवहार ( संसार ) करूं. आपल्यास मुलेंबाळें होतील व आपण परस्परांस प्रिय, आनंद देणारी व परस्परांशीं संतुष्ट अशा रीतीनें शंभर वर्षें वांचूं.

यामंत्राचा भावार्थ असा कीं साम या शब्दांत जसा 'सा' व 'अम्' या पदाचा संबंध किंवा आकाश आणि पृथ्वी यांचा अथवा साम आणि ऋक् यांचा जो संबंध (ऋग्वेदाची ऋचा प्राचीन गायन पद्धतीनें म्हटली म्हणजे तीच सामवेदाची ऋचा होते) तसाच आपला निकट संबंध असो.

लाजाहोम झाल्यावर वधूस दोन्ही पाय दगडाच्या पाट्यावर किंवा सहाणेवर ठेऊन उभें राहण्यास सांगून वर खालील मंत्र म्हणतो.

ओम् इममश्मानमारोहाश्मेव त्वं स्थिरा भव ।
सहस्व पृतनायतोऽभि तिष्ठ पृतन्यतः ॥

हे वधू तूं ह्या पाषाणावर चढ आणि पाषाणाप्रमाणें तूं मनानें स्थिर हो. तुझे जे अहितकर्ते असतील त्यांना तूं आपल्या वर्तनानें वश कर.

यानंतर विवाहांतील सप्तपदी नांवाचा विधी करावयाचा असतो. स्थंडिलाजवळ तांदुळाच्या सात पुंज्या घालतात. त्यांवरून वधूवरांनीं एकत्र पावलें टाकून चालत जावयाचें हें विधीचें रहस्य आहे. चांगलीं माणसें एकमेकांबरोबर सात पावलें चाललीं म्हणजे त्यांचें पूर्ण सख्य होतें या समजुतीस अनुसरून हा विधि आहे. वर वधूचा हात धरून त्या पुंजक्यांवरून सावकाश चालत जातो व प्रत्येक पावला गणिक खालील मंत्र म्हणतो.

पहिल्या पावलास. इष एकपदीभव सा मामनुव्रताभव
पुत्रान् विंदावहै बहूंस्ते संतु जरदष्टयः ।

मजबरोबर चालल्यानें तुझा माझा ( रसादिकांच्या ) प्राशनापुरता संबंध झाला; तू सर्व कृत्यांमध्यें मजला अनुकूल हो; आपणास पुष्कळ पुत्र होवोत ते शतायु होवोत.

दुसऱ्या पावलास 'ऊर्जे द्विपदीभव.' ( इत्यादि. पूर्वींप्रमाणेंच ) दोन पावलें चालल्यानें अन्नापुरता संबंध झाला.

तिसऱ्या पावलास 'रायस्पोषाय त्रिपदी भव.' धनधान्यवृद्धिपुरता संबंध झाला.

चवथ्या पावलास ' मायो भव्याय चतुष्पदी भव. ' परस्पराचें आरोग्य व कल्याणवृद्धिंगत करण्यापुरतां संबंध झाला.

पांचव्या पावलास ' प्रजाभ्यः पंचपदी भव. संतानापुरता संबंध झाला.

सहाव्या पावलास 'ऋतुभ्यः षट्पदीभव' सर्व कार्यांच्या विशेष काला पुरतां संबंध झाला.

सातव्या 'पावलास सखा सप्तपदी भव' सर्व प्रकारें सख्य हा संबंध झाला.

सखायौ सप्तपदा बभूव सख्य ते गमेयं, सख्यात्ते मा योषं सख्यान्मे मा योष्टः । समवाय संकल्पावहै संप्रियौ रोचिष्णू सुमनस्यमानौ इषमूर्जमीभं सवसानौ सं नौ मनांसि संव्रता समुचित्तान्यकरम् ॥

आंता सात पावलें चालून झाल्यावर आपण परस्परांचे सोबती झालों.

तुजशीं मी नित्य सख्य ठेवीन; तुझें सख्य कधीं सोडणार नाहीं; तूं माझें सख्य कधीं सोडूं नको; आपला सर्व कामांत एकोपा असूं दे; आपण आपआपल्या सल्यानें सर्व बेत करूं; एकमेकावर प्रेम करूं व एकमेकांच्या सहवासांत राहून एकमेकांचें सदोदित हित चिंतून व सर्व सुखासमाधानाचा एकच अनुभव घेत आपल्या आकांक्षा आपल्या प्रतिज्ञा व आपले विचार यांचें एकीकरण करूं या.

सप्तपदीनंतर विवाहहोमाची वरवधू आहुती देऊन पूर्णता करतात. वधुवराकडून ध्रुव तारा, सप्तऋषि इत्यादिकाचें दर्शन घेववितात. त्या वेळीं वधूकडून जीव पत्नी प्रजाविंदेय ( माझा पती शतायु होऊन मला संतति व्हावी अशी मी इच्छा करतें ) असें म्हणवितात त्या वेळीं खालील मंत्र म्हटला जातोः—

ध्रुवाद्यौ ध्रुवा पृथिवी ध्रुवं विश्वमिदं जगत् ।
ध्रुवासः पर्वता इमे ध्रुवा स्त्री पतिकुले इयम् ॥

द्यौ पृथिवी, पर्वत वगैरे प्रमाणें तू माझ्या कुलांत स्थिर रहा.

येथें विवाहविधी समाप्त होतो.

पुढें गृहप्रवेशनीय यज्ञ वधूवरांनीं करावयाचा असतो. त्या वेळीं खालील पांच मंत्र म्हणण्यांत येतात.

आनः प्रजां जनयतु प्रजापतिराजरसाय समनक्त्वर्यमा ।
अदुर्मंगलीः पतिलोकमाविश शन्नो भव द्विपदे शं चतुष्पदे ॥

अघोरचक्षुरपतिघ्न्येधि शिवा पशुभ्यः सुमनाः सुवर्च्चाः ।
वीरसूर्देवकामास्योना शन्नोभव द्विपदे शं चतुष्पदे ॥
इमांत्वामिंद्रमीढ्वः सुपुत्रां सुभगां कृणु ।
दशास्यां पुत्रानाधेहि पतिमेकादशं कृधि ॥
सम्राज्ञी श्वशुरे भव सम्राज्ञा श्वश्र्वां भव ।
ननान्दरि सम्राज्ञी भव सम्राज्ञी अधि देवृषु स्वाहा ॥
समञ्जतु विश्वेदेवाः समापो हृदयानि नौ ।
संमांतरिश्वा संधाता समुदेष्ट्री दधातु नौ ॥

प्रजापति आमचें ( दोघांचें ) ठिकाणीं प्रजा उत्पन्न करो. अर्यमा वृद्धापकाळपावेतों आम्हांमध्यें ऐक्य राखो. अमंगलकारक नसलेल्या मनानें पतिलोकांत प्रवेश कर. आपच्या द्विपाद चतुष्पादांचें (पशुपक्षांच्या) ठिकाणीं शुभदायक हो.

तुझे डोळे सौम्य होवोत, ( आपल्या ) पतीचा तूं नाश करूं नको; पशूंचें ठिकाणीं दयाळू, चांगल्या मनाची, कल्याणकारक, तेजानें युक्त, वीराना जन्म देणारी सुखदायक अशी हो; आमच्या द्विपादचतुष्पादाच्या ठिकाणीं शुभदायक हो.

हे वर्षणकर्त्या इन्द्रा या वधूला शोभन पुत्रांनीं युक्त व शुभदायक कर; इच्या ठिकाणीं दहा पुत्र उत्पन्न कर; पती हा अकरावा कर.

तूं सासू, सासरा, नणंदा, दीर याना संराज्ञी म्हणजे त्यांचेवर सौम्यतेनें अधिकार चालविणारी अशी हो.

विश्वेदेव ( सर्व देवता ) आपली हृदयें एक करोत. आपोदेवता ( पाणी ) आपली हृदयें एक करोत. मातारिश्वा व धाता तीं एक करोत. देष्ट्री ( धर्मादि उपदेश करून मार्ग दाखविणारी ) आम्हाला एक कर

गृहप्रवेशानंतर वधुला खालील तऱ्हेचे आशीर्वाद देतात. गृहान्गच्छ गृहपत्नी यथाऽसो वशिनी त्वं विदथमावदासि । तूं घरी जा आणि गृहस्वामिनी हो. तूं आपल्या पतीच्या घरीं मुख्य स्थान घेऊन धर्मकृत्यें कर.

इहप्रियं प्रजयाते समृध्यतां । अस्मिन्गृहे गार्हपत्याय जागृहि । एना पत्यातन्वं संसृजस्वाधाजिव्री विदथमावदाथः ॥

घरीं गेल्यावर वधूनें वरास असें म्हणावयाचें असतें.

अपश्यं त्वा मनसा चेकितानं तपसोजातं तपसोविभूतम् ।
इहप्रजामिह रयिं रराणः प्रजायस्व प्रजया पुत्रकाम ।।

यावर वर वधूस उत्तर देतो तें असेः—

अपश्यं त्वा मनसा दीध्याना स्वायां तनुं ऋत्विये नाथमानाम् ।
उपमामुच्चा युवतिर्बभूयाः प्रजायस्व प्रजया पुत्रकाम ।।

विवाह झाल्यावर वधुवर स्वतंत्रपणें संसार करूं लागतात पण असें करण्यापूर्वीं तीन रात्र तरी दोघांनीं ब्रह्मचर्य पाळावें असें सांगितलें आहे. कांहीं शास्त्रांमध्यें चतुर्थी कर्म म्हणून निराळा विधीही करण्यांत येतो. याचा उद्देश इतकाच कीं, पतिपत्नि या नात्यानें प्रत्यक्ष व्यवहार करण्यापूर्वी पुनः एकदां देव-ब्राह्मणांचा आशीर्वाद मागावयाचा व देवतांची स्वतःच्या कल्याणाकरितां प्रार्थना करावयाची

येथपर्यंत विवाहविधीचें वर्णन केलें. आतां कार्लाईलचें तत्वानुरूप त्याचें पर्यालोचन करूं. विवाहसंबधींचे आचार व विधि टाकाऊ झालेले आहेत. कीं काय म्हणजे विवाहाच्या खऱ्या उद्देशाविरुद्ध ते आहेत काय ? या प्रश्नाला एकच उत्तर आहे. तें हें कीं हा पुरातन वेदोक्त विवाहविधि उत्तम प्रकारचा आहे आणि अत्युच्च समाजपद्धतीला ज्या प्रकारचा विधि पाहिजे तसाच तो आहे. आधीं या विधिप्रमाणें वधूवरें हीं चांगलीं सुशिक्षित व समंजस व प्रौढ झालेलीं असून त्यांना गृहस्थाश्रमाची जबाबदारी कळत आहे असें गृहीत धरलेलें आहे; तसेंच या विधिप्रमाणें वधूचा कुटुंबांतील दर्जा मोठा मानलेला आहे. घरांतील ती साम्राज्ञी आहे असें म्हटलें आहे; त्याप्रमाणेंच पतिपत्नीचा संबंध समानत्वाचा व मित्रत्वाचा मानलेला आहे. या बाबतींत हा आर्यविधी क्रिस्चनधर्म विधीपेक्षांही उदात्त आहे. त्या विधीमध्यें स्त्रिला स्वातंत्र्य दिलेलें नाहीं. तिला ' मी नवऱ्याची आजन्म सेवा करीन व त्याच्या आज्ञेंत वागेन' अशी शपथ घ्यावी लागते. ही शपथ हीनत्वदर्शक आहे असें युरोपांतील स्त्रिया म्हणूं लागल्या आहेत व म्हणून हे शब्द विवाहविधी-

तून काढून टाकावे अशाबद्दल त्यांची खटपट चालू आहे. आर्यविवाहविधीप्रमाणें पुरुष बरोबरीच्या नात्याची सहधर्मचारिणी म्हणून संसार करण्यासाठीं स्त्रीचा स्वीकार करतो. आर्यविधीमध्यें वधूला कांहीं म्हणावयाचें नसतें. परंतु वर प्रथमतःच 'मी तुझे धर्म अर्थ व काम चालवीन' अशी प्रतिज्ञा करतो व सप्तपदी झाल्यावर 'तूं माझी पूर्ण मित्र झालीस; आपण आपली मैत्री निरंतर राखूं; तूं व मी एकविचारें संकल्प करूं; दोघांचे विचार व मनें एक असतील.' असें म्हणतो.

यावरून आमच्या विवाहांतील विधि बिघडलेला नाहीं व त्यांत फारशी सुधारणा करण्याची जरूरी नाहीं. अर्थात् वैदिकविधीच्यावर जीं लौकिकविधींचीं पुटें चढलीं आहेत तीं काढून टाकलीं पाहिजेत. या बाबतींत आमच्या समाजांतील विवाहाचें अंतरंग कुजलें आहे. म्हणजे विवाहाच्या ध्येयासंबंधीं आमच्या विपरीत कल्पना झाल्या आहेत. मुलीचा विवाह ऋतुप्राप्तीपूर्वींच झाला पाहिजे; तसेंच बालविवाह चांगला व सात्विक; गांधर्वविवाह हा राजस व गौण; या त्या कुजक्या कल्पना होत. खरोखरीं पाहतां विवाह हा संबंध प्रौढ वयाच्या व संसार करण्यास शरीरानें, शीलानें व शिक्षणानें योग्य झालेल्या स्त्रीपुरुषांनीं आपल्या आवडीप्रमाणें व प्रेमानें घडवून आणावयाचा आहे; त्यामध्यें आईबापांचें काम सल्लामसलत देण्याचें आहे; पण मुख्य भाग व खटपट ही वधूवरांनीं करावयाची आहे; या कल्पना रूढ झाल्या पाहिजेत रजोदर्शन ही शरीराच्या पूर्ण विकासाची खूण नाहीं; मुलींना प्रौढावस्था १७।१८ वर्षांनंतर येते; हें शारिरशास्त्राचें तत्त्व समाजानें जाणलें पाहिजे या हितकर कल्पनांप्रमाणें विवाह घडवून आणल्यानें विवाहविधि सार्थ होईल. हल्लीं विवाह व विवाहविधि यांमध्यें जो विसंवाद उत्पन्न झाला आहे तो विवाहाच्या विपरीत कल्पनांनीं झालेला आहे. तेव्हां या कल्पना सोडल्या, म्हणजे या बाबतींत इष्ट ती सुधारणा घडून आल्यासारखें होईल. सारांश, ज्याप्रमाणें उपनयनाच्या बाबतींत विधीच्या उद्देशाप्रमाणें समाजाचें वर्तन झालें पाहिजे; त्याचप्रमाणें या बाबतींतही विवाहविधीच्या खऱ्या उद्देशाप्रमाणें समाजाचें वर्तन झालें पाहिजे.

---

१०

# अंत्यविधि.

मानवी जीवितांतला मरणाचा प्रसंग हा मोठा गूढ, गंभीर व भयानक प्रसंग आहे. मरणानंतर मनुष्याचें काय होतें हें गूढ अत्यंत रानटी स्थितींतील माणसापासून तों अत्यंत सुधारलेल्या स्थितींतील माणसापर्यंत सर्वांना सारखें आश्चर्यचकित करीत आलें आहे; व आपआपल्या ज्ञानाप्रमाणें याबद्दल माणसांनीं निरनिराळ्या कल्पना बसविल्या आहेत. जो मनुष्य चार घटकेपूर्वीं उत्तम बोलत चालत असतो, ज्याच्या मानसिक शक्ति सर्व ज्ञावृत असतात, त्याच मनुष्याच्या शरीरांत एका क्षणांत सर्व सामसूम होऊन मानवी शरीर लगेच काष्ठमय बनतें. या चमत्कारावरून मरण म्हणजे मानवी प्राण्याचा आत्यंतिक नाश नव्हे, अशी प्रथमपासूनच मनुष्याची समजूत होते. मनुष्याला शरीराव्यतिरिक्त आत्मा असून मरणानें तो आत्मा मरत नाहीं; तो इहलोकांतून कोठें तरी परलोकीं जातो. सारांश, आत्म्याच्या अमरत्वाची कल्पना रानटी स्थितीपासून तों थेट सुधारलेल्या स्थितीपर्यंत सर्व काळीं व सर्व समाजांत दिसून येते. मरणप्रसंगाच्या गूढत्वामुळें व गंभीरत्वामुळें या प्रसंगासंबंधीं प्रत्येक धर्मांत कांहीं विधि अस्तित्वांत आले आहेत व त्याप्रमाणें तसे हिंदु धर्मांत व हिंदु समाजांतही प्रामुख्यानें दिसून येतात.

हिंदु शास्त्राप्रमाणें मनुष्याचे जे सोळा संस्कार मानले आहेत त्यातला हा शेवटला संस्कार होय. कार्लाईलच्या या तत्वानुरूप हिंदु चालीरीतींचें निरीक्षण करण्याकरितां घेतलेला हा तिसरा विधि होय. ही निवड सहेतुक केलेली आहे. मनुष्याच्या आयुष्यांतील विद्याभ्यासाच्या सुरवातीचा, गृहस्थाश्रमाच्या प्रारंभाचा व आयुष्याच्या अंतकाळचा हे तिन्ही प्रसंग मोठे महत्त्वाचे आहेत यांत शंका नाहीं. यांपैकीं पहिल्या दोहोंचा विचार कलम ८ व ९ यात केला. आतां या तिसऱ्या प्रसंगाचें विवेचन या

कल्पांत करावयाचें आहे. व तें करावयाचें म्हणजे अर्थात् कार्लाईलच्या तत्त्वाप्रमाणें या विधींचें बहिरंग कोणतें व अंतरंग कोणतें हें पहावयाचें व त्यांमध्यें सध्यां कितपत संवाद आहे हें ठरवावयाचें. तेव्हां प्रथमतः या विधीच्या बहिरंगाकडे वळूं.

हिंदुसमाजांत हल्लीं प्रचारांत असलेला अंत्यविधि बराच मोठा आहे; नव्हे हा एक विधि नाहींच तर तो विधिसमुच्चय आहे व त्याचा काला-वधीही फार मोठा आहे. मनुष्य आसन्नमरण झाल्यापासून त्याच्या मर-णाला एक वर्ष होईपर्यंत हा विधि कालरूपी पटांगणांत पसरलेला आहे परंतु ही कालमर्यादा फारच लांब व त्रासाची वाटूं लागल्यामुळें पुढें करावयाचे पुष्कळ विधि मागें ओढून सर्व अंत्यविधि मरणापासून तेरा दिवसांत संपवावे अशी योजना केलेली आहे. तेरा दिवसही हा विधि करण्याचा त्रास वांचविण्याकरितां कांहीं विधि मरणदिवशीं करून बाकीचे सर्व विधि शेवटच्या पांच दिवशीं उरकून घेण्याचीही रीत पडली आहे.

या बऱ्याच मोठ्या अंत्यविधीचें सामान्य स्वरूप त्रिविध आहे. या विधीचें एक अंग म्हणजे निरानिराळ्या प्रकारचीं श्राद्धें होत. याचें दुसरें अंग म्हणजे दानें होत व याचें तिसरें अंग म्हणजे प्रायश्चित्तें होत. हीं सर्व अंगें करतांना त्यांना श्रौतस्वरूप देण्याकरितां ठिकठिकाणीं ऋग्वेद मंत्र सांगितलेले आहेत. यांपैकीं कांहीं मंत्र त्या त्या कृत्याला अनुरूप आहेत. पण पुष्कळसे कांहीं तरी साम्यावरून त्या त्या विधीमध्यें उद्भूत करून घेतले आहेत. पण वास्तविक त्यांचा संबंध अंत्यविधीशीं फारसा नसावा असें वाटतें. असो.

मनुष्य आसन्नमरण झाला म्हणजे प्रथमतः त्याला शक्ति असल्यास त्याचेकडून किंवा त्याच्या वारसाकडून सर्व प्रायश्चित्तविधि करवितात. या विधीला पुनः दोन पुरत्या आहेत. पूर्वांगत्वेन विष्णु श्राद्ध व उत्तरांग-त्वेन विष्णु श्राद्ध. विष्णु हा पाप हरण करणारा देव! म्हणून त्याची पूजा-अर्चा करून ब्राह्मणांना दक्षिणा देऊन मग प्रायश्चित्तविधि करावयाचा त्यांतला मुख्य भाग म्हणजे पापें केशांना धरून राहतात या समजुतीवर

सर्व क्षौर करून पंचगव्य प्राशन करणें होय. या विधीचा संकल्प मोठा मजेदार आहे. या संकल्पाप्रमाणें आयुष्यभर पातकें करून मग एक दम प्रायश्चित्त घेऊन स्वर्गलोक गांठणें सुकर आहे.

जन्मप्रभृत्यद्य यावत्ज्ञाताज्ञातकामाकामसकृदसकृत् कृतकायिक वाचिक मानासिकसांसर्गिकस्पृष्टास्पृष्टभुक्ताभुक्तपीतापीतसकलपातकातिपातकोपपातक लघुपातकसंकरीकरणमलीनीकरणापात्रीकरणजातिभ्रंशकरप्रकीर्णक पातकांच्या निरासाकरितां सर्व प्रायश्चित्त घेतों.

हा विधि स्त्री व शूद्र यांच्या बाबतींत अमंत्रक करावयाचा.

हा सर्व प्रायश्चित्तविधि झाल्यावर अगदीं मरणकाळ जवळ आला म्हणजे गाईला सर्व प्रकारचे अलंकार घालून तिची पूजा करून व ब्राह्मणाची पूजा व योग्य संभावना करून त्याला ती गाय दान करावयाची. या दानाचा हेतु मनुष्याचें सुखानें प्राणोत्क्रमण व्हावें असा आहे

वरील दोन विधि प्रत्यक्ष मरणापूर्वी करावयाचे असतात. मरण आल्याबरोबर जर त्या मरणवेळीं कांहीं अनिष्ट नक्षत्रसंयोग असेल तर किंवा खाटेवर मरण आलें असेल तर किंवा रात्रीं मरण येऊन दिवसां दहनविधि करण्याची पाळी आली असेल तर या दोषांचें परिमार्जन करण्याकरितां सुतक संपल्यावर 'मी प्रायश्चित्त घेईन' असा संकल्प करून मग अधिकारी पुरुषानें क्षौर करावयाचें. व मग प्रेत उचलून स्मशानभूमीवर वाहकांनीं किंवा शिबिकेंत ( गाडींत ) घालून न्यावयाचें. तेथें गेल्यावर गृह्याग्निविच्छेद झाला असल्यास दर वर्षास एक कृच्छ याप्रमाणें प्रायश्चित्त करण्याचा संकल्प करून नेहेमींच्या मंत्रांनीं अग्नीची पूजा व प्रार्थना करून अग्नि प्रदीप्त करावयाचा असतो.

येथपर्यंत अंत्यविधीचें पूर्वांग झालें म्हणावयाचें प्रत्यक्ष और्ध्वदेहिकविधि यापुढें सुरू होतो.

जमिनीची प्रार्थना, चितीरचना, प्रेताच्या अंगावर सात ठिकाणीं सुवर्णाचे तुकडे किंवा तद्भावीं तुपाचे बिंदु टाकणें वगैरे विधि होतात. अशुभ नक्षत्रावर मरण आल्याबद्दलच्या दोषाच्या निवारणाकरितां एक विशेष विधि येथें करतात व दर्भप्रतिमा प्रेताबरोबर जाळतात. व नंतर प्रेताला अग्नि देतात. पुढें कपाळमोक्ष होईपर्यंत थांबावयाचें असतें

कपाळमोक्ष झाल्यावर और्ध्वदेहिकविधि करणारानें पाण्यानें भरलेलें मडकें खांद्यावर घेऊन त्याला एका लहानशा दगडानें भोंक पाडून प्रेताला एक प्रदक्षिणा घालावी, दुसरी घालतांना दुसरें भोंक पाडावें व तिसरी घालतांना तिसरें भोंक पाडावें व नंतर तें मडकें मागच्यामागें फेंकून फोडून टाकावें. प्रेताचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून रस्त्यावर पाणी घालण्याकरितां हा विधि आहे कीं काय तें कळत नाहीं. कारण याचा हेतु प्रयोगांत दिला नाहीं. नंतर जमलेल्या आप्तेष्टांनीं प्रेताच्या क्षुत्पिपासा-निवारणाकरितां तिलांजली द्यावयाची असते. नंतर सर्व मंडळी घरोघर जातात.

येथें और्ध्वदेहिकविधीचा पहिला भाग संपतो.

यापुढें तेरा दिवस रोज कांहीं तरी विधि करावयाचा असतो. पण त्याचा संग्रह करून शेवटल्या चार पांच दिवसांत हे सर्व विधि उरक-ण्याची पद्धति आहे. पण येथें दररोजचें वर्णन वेगवेगळें करणें बरें.

बहुतेक सर्व विधि श्राद्धस्वरूपाचे आहेत व यांच्या मुळाशीं कल्पना खालील प्रकारची असावी असें दिसतें. मनुष्य मेला म्हणजे त्याचें जड शरीर आत्मा सोडून जातो. पण त्याला दिव्यशरीराची जरूरी असते व तें दिव्यशरीर तयार होण्यास नऊ दिवस लागतात व रोज तें क्रमशः तयार होत असतें. तसेंच त्या आत्म्याला मनुष्यलोकांतल्याप्रमाणेंच अन्न-पाण्याची, वस्त्रप्रावरणांची वगैरे सर्व प्रकारची परलोकीं जरूर असते. शिवाय त्या आत्म्याला प्रवासही खूप करावयाचा असतो. मनुष्य-लोकापासून मरणानंतर प्राणी प्रेतलोकाप्रत जातो. तेथून पितृलोकाप्रत जातो व मग स्वर्गादि लोकांप्रत जातो. इतक्या सर्व प्रवासभर त्याची तरतूद करावयाची असते. अशा प्रकारची त्या प्रेताची सर्व सोय करावयाचे मार्ग म्हणजे श्राद्ध व दान हे दोन प्रकार होत. व त्यांच्यावरच या तेरा दिव-सांत जास्त भर असतो. पुढें मेलेल्या माणसांचा मागल्या दोन पिढ्यांच्या पितरांशीं संबंध व संयोग घडवून आणावयाचा असतो. यालाच सपिंडी-करण म्हणतात. हिंदु धर्माच्या सर्व विधींत बाप, आजा व पणजा अशी त्रयी मानलेली आहे. तेव्हां या त्रयींत नुकत्याच मेलेल्या माणसाच्या

आत्म्याचा अन्तर्भाव करण्याकरितां पूर्वीच्या त्रयींतील एक आत्मा काढून टाकून ही नवी त्रयी या वेळीं बनवावयाची असते. असो.

हे सर्व विधि करतांना ब्राह्मणानें त्या मृत मनुष्याचें प्रतिनिधित्व पतकरावयाचें असतें; पण हें काम करणें वाईट अशी समजूत असल्यामुळें कोणीही ब्राह्मण स्वतः हें प्रतिनिधित्व पतकरीत नाहीं. म्हणून या सर्व दहा बारा दिवस एक दर्भवटु ( दर्भाची मनुष्याकृति प्रतिमा ) करतात व त्याला म्हणून सर्व विधि करतात.

तसेंच या बारा दिवस करावयाच्या श्राद्धाचे दोन भाग केलेले दिसतात. पहिला, तिसरा, पांचवा, सातवा, नववा, व अकरावा या दिवशीं करावयाच्या श्राद्धांना नवश्राद्ध किंवा विषमश्राद्ध म्हणतात व अर्थात् बाकी राहिलेल्या श्राद्धांना सम नांव येतें. हीं बारा दिवसांचीं बारा श्राद्धें असून आणखी निरनिराळ्या दिवशीं करावयाचीं श्राद्धें आहेत त्यांना विशिष्ट अन्वर्थक नांवें आहेत.

प्रथमदिनाविधि—

प्रथमतः दर्भवटूला दाहजनित तापशांतीकरितां मृत्तिकास्नान घालावयाचें व त्या वेळीं म्हणावयाचे नेहमीं सर्व मंत्र म्हणावयाचे. नंतर दाहजनित तृपाशांतीकरितां तिलांजली द्यावयाची. नंतर नग्नप्रच्छादन श्राद्ध करावयाचें. यांचा उद्देश नांवावरून स्पष्ट आहे. पुढें पाथेयश्राद्ध करावयाचें. याचा हेतु प्रेताला मनुष्यलोकापासून प्रेतलोकीं जाण्याकरितां प्रवास करतांना लागणारें फराळाचें सामान पुरविण्याचा आहे.

चितेमधून अस्थि काढण्याचा विधि निरनिराळ्या दिवशीं करण्याची मुभा आहे.

पहिल्या नऊ दिवसांच्या विधींपैकीं प्रमुख भाग म्हणजे रोज दर्भवटूला पिंडदान करणें. स्मशानभूमीवर जाऊन हा करावयाचा असतो. तेथें जाऊन अग्नीवर नव्या भांड्यांत भात शिजवून त्याचे गोळे करून हें पिंडदान करावयाचें. या पिंडदानाचा उद्देश मागें सांगितल्याप्रमाणें मृत मनुष्याच्या आत्म्याला दिव्यदेह निर्माण करून देण्याचा आहे व ज्याप्रमाणें या जीवलोकांत देहाची वाढ हळू हळू होते किंवा मातीची मूर्ति करणारा मूर्तीचे एक एक अवयव बनवीत जातो, तसेंच

दिव्यदेहनिर्मितीचें होत असलें पाहिजे, अशा कल्पनेवर हा नऊ दिवसांच्या पिंडदानाचा विधि बसविलेला दिसतो. रोज करावयाचा विधि सारखाच, मात्र प्रत्येक दिवशींचा संकल्प वेगळा. म्हणजे प्रेत-देहाला अमुक अमुक अवयव उत्पन्न व्हावे अशाकरितां हें पिंडदान. तेव्हां आतां निरनिराळें वर्णन न करतां खालील कोष्टकांत या नऊ दिवसांच्या पिंडदानाची माहिती देतों.

| दिवस | हेतु |
|---|---|
| पहिल्या दिवशीं | शिरावयवनिष्पत्ति |
| दुसऱ्या दिवशीं | चक्षुश्रोत्रनासानिष्पत्ति |
| तिसऱ्या दिवशीं | भुजवक्षग्रीवामुखनिष्पत्ति |
| चवथ्या दिवशीं | पार्ष्णिकुक्षीकटीनाभिनिष्पत्ति |
| पांचव्या दिवशीं | ऊरूजानुजंघानिष्पत्ति |
| सहाव्या दिवशीं | गुल्फपादांगुलिमर्मनिष्पत्ति |
| सातव्या दिवशीं | अस्थिमज्जाशिरानिष्पत्ति |
| आठव्या दिवशीं | नखरोमादिनिष्पत्ति |
| नवव्या दिवशीं | मर्मवीर्यादिनिष्पत्ति |

दशमदिनविधि—

प्रेताच्या क्षुत्पिपासानिवृत्तीकरितां या दिवशीं पिंडदान व सर्व बांधवांनीं तिलांजलि द्यावयाची. याच दिवशीं बहुधा अस्थिक्षेपविधि करतात. प्रयागास अस्थि टाकावयाच्या असल्यास सवडीप्रमाणें पुढें केव्हां तरी टाकल्या तरी चालतात.

एकादशादिनविधि—या दिवशींचा पहिला विधि म्हणजे सर्वांनीं सचैल स्नान करून शुद्ध होणें हा होय व अशौचदोषनिवृत्तीकरितां पंचगव्य प्राशन करावयाचें. नंतर मृत मनुष्याच्या प्रेतत्वनिवृत्तीकरितां एक बैल पोळ सोडावयाचा विधि करतात. त्याकरितां त्या बैलाची पूजा करून त्याच्या कातडीवर पोळाचा शिक्का मारून त्याला सोडून द्यावयाचा. या कृत्याला ऋग्वेदांत कोठें ऋचा न सांपडल्यामुळे खालील श्लोक तयार केलेला दिसतो. या अंत्यविधीच्या सर्व प्रयोगांत जेथें जेथें ऋग्वे-

दांतील ऋचा सांपडली नाहीं, तेथें तेथें प्रयोगकारांनीं सोप्या संस्कृतांत श्लोक बनविलेले दिसतात. त्याचा मासला म्हणून हा श्लोक दिला आहे. हे असल्या प्रकारचे या सर्व विधींतील श्लोक सत्यनारायणाच्या पूजेंतील श्लोकाच्या तोडीचे आहेत.

एकादशेऽन्हि प्रेतस्य यस्य नोत्सृजते वृषः ।
प्रेतत्व सुस्थिरं तस्य दत्तैः श्राद्धशतैरपि ॥

पुढें महैकोद्दिष्टश्राद्ध म्हणून एक मोठें श्राद्ध करावयाचें असतें. एकालाच उद्देशून केलेलें श्राद्ध तें एकोद्दिष्ट श्राद्ध. आतांपर्यंत केलेलीं श्राद्धं एका दृष्टीनें एकोद्दिष्ट श्राद्धेंच असतात. म्हणून अकराव्या दिवशींच्या श्राद्धाला महैकोद्दिष्ट श्राद्ध म्हणतात, असें वाटतें. कारण सपिंडीकरणानंतर नेहमीं बाप, आजा व पणजा अशा त्रयीला उद्देशूनच श्राद्ध करतात. परतु तत्पूर्वींचीं श्राद्धें स्वाभाविक एकोद्दिष्टच असतात. पण या महैकोद्दिष्टश्राद्धाला मात्र एक ब्राह्मण बोलावून तें श्राद्ध करावें असें सांगितलें आहे. ब्राह्मण नच मिळाल्यास अग्निप्रतिष्ठापना करून अग्नीमध्यें पिंडदान करावें असें सांगितलें आहे.

याच श्राद्धाचे वेळीं प्रेताला वस्त्र, शयन, आभरण, पादुका, छत्र, उदकपात्र, व वाहन अर्पण करतात. अर्थात् या सर्व वस्तु त्या आत्म्याला त्याच्या पुढच्या प्रवासांत उपयोगीं पडाव्या म्हणून ब्राह्मणाला द्यावयाच्या असतात.

महैकोद्दिष्टश्राद्ध झाल्यावर अकरा रुद्रांच्या तृप्तीकरतां रुद्रगणश्राद्ध करतात; मग आठ वसूंच्या तृप्तीकारितां वसुगणश्राद्ध करतात. याच दिवशीं निरनिराळ्या उद्देशानें निरनिराळीं दानें करावयाचीं असतात. या सर्व दानांचा सामान्य उद्देश मृत मनुष्याची प्रेतत्वनिवृत्ति व्हावी, त्याला उत्तम लोक प्राप्त व्हावा व त्याच्या सर्व पापांचें क्षालन व्हावें असा असतो. दानाच्या निरनिराळ्या वस्तूंचा उद्देश प्रेताच्या निरनिराळ्या गरजा भागविण्याकारितां असतो. अर्थात् हा हेतु त्या वस्तूच्या स्वरूपावरून सहज अंदाजतां येतो. असा स्वरूपावरून स्पष्ट खुलासा होत नसला तर प्रयोगकार दानाच्या सामान्य हेतूचा तेथें उल्लेख करतात.

हीं दानें संख्येनेंच उल्लेखिलीं जातात. तेव्हां या दानांचीही कोष्टकरूपानें यादी देणें बरें.

दशदानें—गो, भू, तिल, हिरण्य, आज्य, वस्त्र, धान्य, गूळ, रुपें व मीठ–सर्वांचा उद्देश जन्मापासून मरणापर्यंत झालेल्या पापांचें क्षालन.

अष्टदानें—शिधा, उदककुंभ, गाय, वस्त्र, भूमि, शय्या, छत्री, आसन—सर्वांचा उद्देश पूर्वीप्रमाणें पापक्षय व त्या त्या वस्तूंपासून इहलोकीं होणाऱ्या फला ( उपयोगा ) सारखें फल परलोकीं मिळणें.

बैल ( पोळ ) सोडण्याच्या विधीच्या अंगभूत अष्टदानें—तीन शिधे, तिलोदक, कुंभ, गाय, वस्त्र, व हिरण्य.

चवदा उपदानें—यांचा संकल्प जसाचा तसा देतों—

जन्मार्जिताखिलपापनाशपूर्वकम् उत्तमलोक-

प्राप्त्यर्थ परलोके तत्तद्दानकल्पोक्तफलावाप्तये—

| दानाचें नांव | उपयोग | दानाचें नांव | उपयोग |
|---|---|---|---|
| अन्न | क्षुधानिवृत्ति | लोहदंड | पापनिवृत्ति |
| उदक | पाणपोईचें फल | अग्नि | इष्टिकाशैत्यांधकारानि० |
| जोडा | कंटककूर्चादिपीडानि. | दीप | अंधकारनिवृत्ति |
| कमंडलु | तृषाशमन | तिल | पापनिवृत्ति |
| छत्री | कडक उन्हाच्या निवा० | तांबूल | मुखसौगंधप्राप्ति |
| वस्त्र | शीतजन्यपीडानिवारणार्थ | चंदन | आनंदप्राप्ति |
| यष्टिका | भयनिवारणार्थ | पुष्प | आल्हादप्राप्ति |

वैभव व शक्ति असल्यास करावयाचीं आणखी उपदानें:—

सिद्धस्थाली, ऊर्णापट्ट, कंबल, व्यजन, तुलसीपत्र, गोपीचंदन, कर्पूर, दर्पण, हरिद्रा व कार्पास.

नंतर प्रायश्चित्तगोदानविधि असतो. याचा संकल्पही मोठा मजेदार आहे. त्यावरून आंधळ्या अविवाहित भिकाऱ्यानें माझ्या नातवावर मी छत्रचामरें पाहावीं असा वर मागण्याच्या हरदासी कथेची आठवण झाल्याखेरीज रहात नहीं.

संकल्प असा——' जन्मप्रभृत्यद्ययावदाचरितसमस्तपातकस्याकृत प्रायश्चितस्य मरणांतपापापनोदनार्थंगोरोमतुल्यवत्सरावधिविविधभोगपरिपूर्ण-स्वर्गवासभोगोत्तरंविष्णुसायुज्यप्रीत्यर्थं प्रायश्चित्तधेनुदानं करिष्ये '

नंतर वैतरणीधेनुदानाचा विधि करावयाचा असतो. ही नदी उतरण्याकरितां हें दान करावयाचें असतें. या विधीचे वेळीं लहानशी नौका तयार करून तिचें पूजन वगैरे करतात.

याखेरीज आणखी तीन गाई द्यावयाच्या असतात. पहिली पापक्षयाकरितां; दुसरी मृत माणसाच्या ऋणनिवृत्तीकरिता व तिसरी मोक्षप्राप्तीकरितां. अश्वदानही करावयाचें असतें.

हीं सर्व दानें संपल्यावर पुनः एकदां पाथेयश्राद्ध करावयाचें असतें. याचा उद्देश प्रेतलोकापासून पितृलोकाकडे जातांना करावयाच्या प्रवासाच्या फराळाची सामुग्री देण्याचा असतो.

एका दृष्टीनें अंत्यविधि किंवा और्ध्वदेहिक येथें संपतो असें म्हटलें तरी चालेल. कारण हल्लीं बाराव्या दिवशीं करतात तो सपिंडीकरणविधि वास्तविक एक वर्षानें करावयाचा असतो. म्हणजे आत्म्यास प्रेतलोकापासून पितृलोकास जाण्यास एक वर्ष लागतें अशी कल्पना असावी व या त्याच्या सांवत्सरिक प्रवासांत दर महिन्यास त्याचें श्राद्ध करावें लागतें. पण अलीकडे सपिंडी बाराव्या दिवशींच करून टाकणें सोईचें वाटत असल्यामुळें हीं मधलीं श्राद्धेंही अकराव्या दिवशींच करून घेतात. अर्थात् तीं एकोद्दिष्टविधीनेंच करून घ्यावयाचीं; कारण अजून मृताचा बाप-आजा पणजा या त्रयींत प्रवेश झालेला नसतो. बारा महिन्यांचीं बारा श्राद्धें व त्याला आणखी चार श्राद्धांची पुष्टि दिलेली आहे. तीं चार श्राद्धें म्हणजे ऊन मासिक ( मासिकाच्या आदल्या दिवसाचें ), त्रैपाक्षिक ( दीड महिन्याचें ),

ऊनषाण्मासिक ( सहा महिन्याच्या आदल्या दिवसाचें ), व ऊनाब्दिक ( वर्षाच्या आदल्या दिवसाचें ).

हीं सोळा श्राद्धें झालीं म्हणजे मग सपिंडीकरण करतां येतें.

द्वादशदिनकर्म—हें सपिंडीकरण होय. या दिवशीं तीन ब्राह्मण बोलावून त्यांना भोजन वगैरे देऊन सवांग श्राद्ध करावयाचें. याच दिवशीं

ग्रंथ संग्रहालय नं. ता.

तीन पिढ्यांतील पहिला पितर याला त्रयींतून वगळून मृत माणसाच्या आत्म्याला त्रयीमध्यें समाविष्ट करावयाचें.

या सपिंडीकरणानें मृताला पितरांच्या त्रयीमध्यें त्याचा मुलगा मरेपर्यंत कायमचें स्थान मिळतें. हिंदु धर्माप्रमाणें मनुष्य आसन्नमरण झाल्यापासून त्याला पितरत्रयीमध्ये कायमचें स्थान मिळेपर्यंत जो एक वर्षाचा काळ जातो तो एकप्रकारें त्याचा मरणकाळच होय व त्या अवधीमध्यें होणारे मृतासंबंधीचे विधि म्हणजे अंत्यविधिच होत असें म्हणण्यास कांहीं एक हरकत नाहीं.

आतां मृताच्या तेराव्या दिवशीं जो विधि करतात तो वास्तविक अंत्यविधीचा भाग नाहीं. कालानुक्रमानें तो बाराव्या दिवसानंतर दुसऱ्याच दिवशीं येतो व हा तेराव्या दिवसाचा विधि घरांत मृत्यु होतो म्हणून करावा लागतो, एवढ्याच कारणांनीं तो विधि अंत्यविधीचा भाग गणला गेला. बाकी या विधींत अंत्यविधीचा फारसा संबंध नाहीं. वास्तविक तो आनंदाचा विधि असून मृतासंबंधीं सर्व कृत्यें झाल्यावर दुसऱ्या रोजच्या व्यवहारास लागण्याकरितां हा विधि करतात. प्रथमतः गणपतिपूजन करतात. मग पुण्याहवाचन करतात. नंतर भटजी यजमानावर अभिषेक करतात, यजमान नवीन वस्त्रें परिधान करतो व आप्तेष्टांना बोलवून त्यांना मिष्टान्नाचें जेवण देतो.

येथपर्यंत अंत्यविधीच्या बहिरंगाचें वर्णन केलें. आतां या विधीच्या मुळाशीं काय काय कल्पना आहेत तें पाहूं. या विधीच्या मुळाशीं आत्म्याच्या अमरत्वाची कल्पना प्रमुखत्वानें आहे. पण ती कल्पना समाजाच्या प्रथमावस्थेंतील आहे. म्हणजे मेल्यावरही आत्म्याला शरीर—जड नसेल कदाचित्—आहे. आत्म्याला मनुष्याप्रमाणेंच सर्व वासना, इच्छा व गरजा आहेत. त्याला आहारनिद्राभयादिकांनीं सोडलेलें नसतें; त्याला देवलोकीं पोंचण्यापूर्वी पुष्कळ कष्टाचा प्रवास करावा लागतो; त्याला नद्यानाल्यांतून कांट्याकुट्यांतून जावें लागतें व म्हणून मनुष्याप्रमाणें आत्म्याचीही प्रवासांत खाण्यापिण्याची तजवीज राखावी लागते व वाहनादि छत्रीजोड्यासारख्या प्रवासाच्या सुखसोई लागतात.

दुसरी कल्पना अशी कीं, आत्म्याला लागणाऱ्या या सर्व गोष्टी ब्राह्मण-

द्वारां किंवा अग्निद्वारां त्या मृतास समर्पण केल्यास त्यास पोंचतात व या जड वस्तु त्या दिव्यदेही आत्म्याला उपयोगी पडतात.

तिसरी कल्पना ही कीं, या मनुष्यलोकाखेरीज कितीतरी दुसरे लोक आहेत व ते लोक या आकाशांतच असून निरानिराळ्या लोकांमध्यें नद्या, समुद्र, पर्वत इत्यादि अडथळे आहेत व आत्म्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्यास अशा अडचणींच्याच मार्गांनीं जावें लागतें व त्यालाही बराच काळ लागतो.

चवथी व शेवटची कल्पना ही कीं, मनुष्य आजन्म कितीही पातकें करो; कसाही वागो, त्याच्या मनाला कृतकर्मांचा पश्चात्ताप झालेला असो अथवा नसो, मरणसमयीं व तदनंतर मुलानें प्रायश्चित्तें, विधि व दानविधि केल्यास त्या मृताचें सर्व पाप नाहींसें होऊन त्याला उत्तम लोकप्राप्ति होते.

येथें या कल्पना थोडक्यांत व तात्विक रूपानें सांगितल्या आहेत. आत्म्याच्या मरणानंतरच्या स्थितीचीं व निरानिराळ्या लोकांचीं अतिशयोक्तीनें भरलेलीं, कल्पनाशक्तीच्या भरारीनें रेखाटलेलीं, इतिहास म्हणून सांगितलेलीं वर्णनें प्रसिद्ध गरुडपुराणांत हवीं तितकीं आहेत. त्यांचें येथें दिग्दर्शन करण्याचें मनांत आणलें तर कितीतरी ग्रंथविस्तार होईल. सांगण्याचा मुद्दा हा कीं, आमचा सध्यां चालू असलेला और्ध्वदेहिक विधि, गरुडपुराणान्तर्गत कल्पना सर्वस्वी खऱ्या आहेत अशा समजुतीवर बसविलेला आहे. त्या दृष्टीनेंसुद्धां या अंत्यविधिरचनेंत दानें व उपदानें, प्रायश्चित्तें व श्राद्धें आणि त्यांच्या वारंवार केलेल्या आवृत्त्या व एकंदर विधींचें प्रचंडत्व यथासांग करूं म्हटल्यास त्या विधींच्या पायीं खर्च कराव्या लागणाऱ्या पैशाची बूड यांमध्यें उपाध्यायाच्या आप्पलपोटेपणाचें आविष्करण होत नाहीं असें कोण म्हणेल? तरी पण इतकें खरें कीं, गरुडपुराणांतील गोष्टी अक्षरशः खऱ्या मानल्या तर कार्लाईलच्या तत्त्वाप्रमाणें त्या कल्पना व त्यांवर चढलेले विधिरूपी कपडे यांत फारसा विसंवाद नाहीं असें म्हणणें प्राप्त आहे.

परंतु हिंदु समाजांत ज्ञानाची वाढ व विचारांची जागृति झाल्यामुळें समाजांतील प्रथमावस्थेमध्यें दिसून येणाऱ्या कल्पना हिंदु समाजांतील

समंजस व शिक्षित लोकांनीं टाकून दिल्यावर मग अन्त्यविधीचे कपडे नवीन कल्पनांशीं विसंगत होत नाहींत का ? ब्राह्मणाला किंवा अग्नीला अर्पण केलेल्या जड वस्तु आत्म्याला पोंचतात असें हल्लीं शिक्षित लोक मानतात काय ? जर अजून ते मानीत असतील तर ते एका हरदासी गोष्टींतील भोळसट राजपुत्राच्या पदवीला जात नाहींत काय ? ही हरदासी गोष्ट या संबंधानें सांगण्यासारखी आहे. कारण त्यांत या कल्पनेवरील विश्वास व या कल्पनेचें वैयर्थ्य मोठ्या खुबीदार रीतीनें व्यक्त केलें आहे.

एक होता राजा. मरणसमयीं त्याला आंबे खाण्याची फार इच्छा झाली. पण ते आंबे येण्यापूर्वींच त्याचें देहावसान झालें. राजपुत्राला फार वाईट वाटलें. 'आपल्या वडिलांची ही इच्छा तृप्त करण्याकरितां काय करावें !' याची उपाययोजना करण्याकरितां त्यानें आपल्या उपाध्यायाला निरोप पाठविला व आपली अडचण कळविली. उपाध्यायानें पाहिलें कीं, राजाकडून पुष्कळसे पैसे लाटायला ही बरी संधि आहे. उपाध्याय म्हणाले 'आपल्या वाडिलांची इच्छा सहज तृप्त करतां येईल.' 'ती कशी काय ?' असें राजानें विचारलें. 'सोन्याचे भरीव थेट आंब्याच्या आकाराचे आंबे करावे व आपले वडील जितके एका बैठकीला खात असतील तितके सोन्याचे आंबे ब्राह्मणास दान करावे म्हणजे त्यायोगें स्वर्गांत आपल्या वडिलांना आंबे मिळून त्याची इच्छा तृप्त होईल.' राजा भोळसर! त्यानें लागलीच खजिन्याच्या कामगारास हुकूम देऊन चार पांच भले मोठे भरीव आंबे होतील इतकें सोनें खजिन्यांतून मागवून सोनाराकडून आंबे तयार करवून आणून त्या उपाध्यायास दान दिले. ही गोष्ट प्रधानास कळली व उपाध्यायानें राजाला फसविल्याबद्दल त्याला चांगलें शासन करण्याची त्यानें युक्ति काढली. त्यानेंही त्या उपाध्यायाला कळविलें कीं "माझ्या आईची एक इच्छा मरणसमयीं राहून गेली होती ती तृप्त करावयाची आहे. तरी आपण सत्वर यावें." उपाध्यायाला विलक्षण आनंद झाला. आतां प्रधानाकडूनही बरीच मोठी रकम आपल्याला मिळणार असें त्याला वाटलें व तो मोठ्या खुशींतच प्रधानाचे घरीं आला व घरांत शिरतो तों त्याला तेथें विस्तवानें लाल झालेली एक भट्टी व त्या भट्टींत

लालभडक होण्याकरितां ठेवलेल्या दोन सळया दिसल्या. तो प्रधानास म्हणाला 'ही कसली तयारी?' प्रधान म्हणाला 'माझ्या मातोश्रीच्या इच्छातृप्तीची.' उपाध्याय उद्गारला 'म्हणजे?' प्रधान म्हणाला 'तुम्हाला ठाऊक आहेच कीं, माझ्या मातोश्रीची सर्व पाठ व कंबर मनस्वी ठणकत असे. मी पुष्कळ उपाय करून पाहिले; पण गुण येईना. ती दुःखानें त्रासली होती व म्हणून ती म्हणाली, 'तुझ्या औषधाचे सर्व उपाय हरले. आतां तू खेडवळ लोकांचा तरी उपाय करून पहा. अशा ठणक्यावर खेडवळ लोक लोखंडाच्या तापलेल्या सळईनें ठणक्याच्या सर्व ठिकाणावर खूब चोंचे घेतात. तसे सर्व पाठभर व कमरेवर चोंचे घेण्याची माझी फार इच्छा आहे.' प्रधान म्हणाला, 'आम्ही' खेडेगांवाहून चोंचे देणारा पाहून आणून तयारी करीपर्यंत. माझी मातोश्री मृत्युमुखीं पडली. तेव्हां तिच्या इच्छेची तृप्ति करण्याकरितां तुम्हांला निमंत्रण केलें आहे.' उपाध्याय आश्चर्यानें म्हणाला 'म्हणजे काय, तुम्ही मला लोखंडाच्या सळईनें भाजणार कीं काय? पण मला बसलेले चोंचे तुमच्या मातोश्रींना कसे पोंचणार?' प्रधान म्हणाला, 'लोखंडानें दिलेले चोंचे कदाचित् पोंचणार नाहींत. पण मी या सळया सोन्याच्या बनविलेल्या आहेत. तेव्हां ते चोंचे पोंचण्यास हरकत नाहीं. 'सोन्याच्या सळया झाल्या म्हणून काय झालें! या जगांतल्या वस्तु कोठें परलोकीं जातात!' असें उपाध्याय केविलवाण्या स्वरानें म्हणाला. प्रधान उद्गारला, 'परवांच जर परलोकीं असलेल्या राजेसाहेबांची आंबे खाण्याची इच्छा राजपुत्राकडून सोन्याच्या आंब्याचें दान घेऊन तुम्ही तृप्त करूं शकलां तर सोन्याच्या सळईनें दिलेल्या चोंच्यांचें तुम्हांला दान केल्यास तुम्ही माझ्या मातोश्रीची इच्छा कां तृप्त करणार नाहीं? या योजनेप्रमाणें मी करण्याचा निश्चय केला आहे. तरी आपली पाठ व कमर उघडी करा पाहूं' हें प्रधानाचे भाषण ऐकून उपाध्याय मनांत उमजला कीं, प्रधानानें माझी लबाडी ओळखली व माझेच दांत माझ्या घशांत घालण्याची ही युक्ती काढली.' असें समजून त्यानें ती शिक्षा भोगली.

तेव्हां कोणताही समंजस मनुष्य जडवस्तु दिव्यदेही आत्म्याला परलोकीं पोंचतात असें समजणार नाहीं. तीच गोष्ट प्रायश्चित्ताची व दानांची आहे.

मनुष्याच्या पापाचें क्षालन व्हायचा खरा उपाय म्हणजे पश्चात्ताप. म्हटलेंच आहे 'पश्चात्तापेन शुध्यति.' कारण पाप हें अंतःकरणाच्या स्वार्थी भावनेनें होतें व म्हणून त्या अंतःकरणाची शुद्धि खऱ्या अनुतापानेंच होणार. त्याला बाह्यविधि कांहींएक करूं शकणार नाहीं. तुकारामादि साधुसंतांचा अशाच तऱ्हेचा उपदेश आहे. अंत्यविधीनंतर पापक्षालनाचा सोपा उपाय म्हणजे प्रायश्चित्तें व दानें हा सांगितला आहे. व तीं प्रायश्चित्तें व दानें पापी मनुष्य करीत नाहीं तर त्याच्या पश्चात् त्याचा वारस तीं करतो व त्यायोगें मृत माणसाच्या पापाचें क्षालन होतें अशी कल्पना आहे. हीं प्रायश्चित्तें व दानें म्हणजे स्वर्गांतलि किंवा परलोकांतील अधिकाऱ्यांना शिफारसपत्रें आहेत म्हणावयाचीं ! रोमन कॅथॉलिक धर्माच्या अवनतीच्या काळीं त्या धर्माच्या पोपनीं व उपाध्यायांनीं मनुष्याच्या पापक्षालनार्थ व त्यांना उत्तम लोकांत जागा मिळण्याकरितां—हेच दोन उद्देश अंत्यविधींतील प्रायश्चित्तांच्या व दानाच्या संकल्पांत असतात हे मागील विवेचनावरून सहज दिसून आलें असेल—माफीपत्रें काढून तीं विकण्याचा सपाटा चालविला होता हें इतिहासज्ञांस विश्रुतच आहे. या माफीपत्राच्या ( Indulgences ) व उपाध्यायांच्या नीतिबाह्य वर्तनाचा वीट आल्यामुळेंच प्रॉटेस्टंटपंथ अस्तित्वांत आला हेंही इतिहासज्ञांस मशहूर आहे. आमच्या धर्मांतील प्रायश्चित्तांच्या विधींतील व माफीपत्रांत कांहींएक फरक नाहीं. तीं एकाच स्वार्थीपणाचीं अपत्यें आहेत ! तेव्हां माफीपत्रानें पापक्षालन होतें हें जसें खोटें आहे त्याचप्रमाणें प्रायश्चित्तानें व दानानें पापक्षालन होतें असें समजणें तितकेंच असमंजसपणाचें आहे.

अंत्यविधीच्या मुळाशीं असलेल्या चार कल्पनांपैकीं दोन कल्पना असत्यमय आहेत असें हल्लीं तरी बरींच समंजस माणसें समजतील यांत शंका नाहीं आत्म्याच्या अमरत्वाची कल्पना व परलोकाच्या अस्तित्वाची कल्पना या धर्माशीं जास्त निगडित असल्यामुळें त्या मनुष्यामध्यें बऱ्याच काल राहण्याचाही संभव आहे. परंतु अंत्यविधीच्या मुळाशीं असलेल्या कल्पना या फार अपरिणत व असंस्कृत स्वरूपाच्या आहेत. आत्मा अमर आहे असें मानलें तरी त्या आत्म्याला मनुष्याप्रमाणें आहार-निद्राभयादि वासना व गरजा आहेत असें मानणें अपरिणत मनाचें

द्योतक आहे. अशा कांहीं रानटी टोळ्या जगाच्या पाठीवर असलेल्या ठाऊक आहेत कीं, राजा मेल्याबरोबर त्याच्या चितेवर त्याच्या राण्या, त्याचे नोकरचाकर, त्याचे कपडेलत्ते व त्याचें सामानसुमान जाळण्याची रीत आहे व याचा उद्देश या सर्व गोष्टी त्या राजाला परलोकीं लागणार म्हणून तेथें पाठविण्याचा असतो. या रीतींत व आपल्या पाथेयश्राद्धांत किंवा वैतरणीधेनुदानविधींत किंवा दशदानविधींत फारसा फरक नाहीं. फरक असलाच तर तो इतकाच कीं, दुसरे विधि पहिल्या इतके क्रूर नाहींत. पण दोन्ही विधींच्या मुळाशीं असलेल्या कल्पना सुसंस्कृत मनाला न पटणाऱ्या अशाच आहेत. सारांश, आत्म्याच्या अमरत्वाची कल्पना व परलोकची कल्पना या हल्लींच्या काळीं रानटी स्वरूपांत न दिसतां बऱ्याच उदात्त व सात्विक स्वरूपांत दिसून येतात.

म्हणजे अंत्यविधीचे बाबतींत आपल्या समाजाची–निदान त्यांतील सुशिक्षित व समंजस भागाची तरी–स्थिति कार्लाईलनें वर्णिलेल्या युरोपांतील समाजस्थितीच्या सारखी झाली आहे. म्हणजे विधिच्या अंतरंगाच्या कल्पना पुष्कळ सुसंस्कृत आहेत. बाह्यविधि मात्र असंस्कृत किंवा जवळ जवळ रानटी स्वरूपाचे किंवा समाजाच्या पूर्वावस्थेंतील आहेत. म्हणजे विधीचें अंतरंग व त्याचें बाह्यांग यांत विलक्षण विसंवाद उत्पन्न झाला आहे व हा विसंवाद काढून टाकण्याकरिता बाह्यविधीच्या अव डबरांत पुष्कळच छाटाछाट केली पाहिजे.

अंत्यविधींतील तीं हजारों प्रायश्चित्तें, हजारों दानें, पाथेयश्राद्ध, वैतरणी धेनुदान, नवश्राद्धें वगैरे प्रकार बंदच केला पाहिजे व एकंदर विधीला साध व अन्वर्थक स्वरूप दिलें पाहिजे. मनुष्याच्या मरणानंतर त्याच्या सर्व आप्तेष्टांनीं एकत्र जमून मृताच्या गुणांचें स्मरण करणें मृताच्या आत्म्याला सद्गति मिळो अशाबद्दल परमेश्वराची प्रार्थना करणें, व त्या प्रेताची विल्हेवाट लावण्याकरितां दहनादि प्रत्यक्ष और्ध्वदेहिकविधि करणें अस्थींची वगैरे व्यवस्था करणें घरीं परत आल्यावर पुनः एकदां परमेश्वराची प्रार्थना करणें; इतकें साधें स्वरूप अंत्यविधीला येईल तरच तें समजस माणसाच्या संस्कृत कल्पनांशीं संवादी होईल.

जातिभेदाचें मूळ नाहींसें झालेलें नाहीं. गोवें प्रांतांत हजारो हिंदु रोमन कॅथॉलिक झाले आहेत. पण त्यांमध्यें ब्राह्मण—ख्रिस्ती शूद्र—ख्रिस्ती असा भेद राहिला आहे. ही संस्था हिंदुसमाजांत इतकी बद्धमूल कां व कशी झाली व हिचें बाहिरंग व अंतरंग कोणचें हें पाहण्याकरितां या संस्थेच्या स्थापनेच्या इतिहासाचें थोडक्यांत तरी सिंहावलोकन करणें अवश्य आहे. हल्लींचा प्रचंड हिंदु समाज हा मोठा मिश्र समाज आहे. आर्य द्रविड मांगोलियन सिथियन, वगैरे निरनिराळया मानववंशांतील लोक हिंदुसमाजांत दिसून येतात असें मानववंशशास्त्र म्हणतें. म्हणजे हिंदुसमाजानें निरनिराळया वेळीं हिंदुस्थानांत आलेल्या लोकांचा आपल्यामध्यें संग्रह करून घेतला आहे मात्र हिंदूसमाजानें जी वर्णव्यवस्थेची घटना केली होती त्या घटनेनुरूप या लोकांचा संग्रह केलेला आहे; तेव्हां ही वर्णव्यवस्थेची कल्पना समाजांत कशी आली हें पाहू.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें हल्लींचा हिंदुसमाज जरी मिश्र वंशांनीं झाला असला तरी या प्रचंड वृक्षाचें मूळ खोड आर्य वंशाचें आहे हें सर्वमान्य आहे. फार जुन्याकाळीं हे आर्यलोक उत्तरेकडून प्रथम हिंदुस्थानांत आले. त्या वेळीं त्यांनीं ऋग्वेदाचा बराच भाग रचला. आतां ऋग्वेदावरून असें स्पष्टपणें म्हणतां येतें कीं, ऋग्वेदकाळीं आर्यलोकांत जातिभेद किंवा वर्णभेद नव्हता. त्या काळीं आर्यलोक एकजीव होते. शिवाय येथले मुळचे राहिवाशी होते. त्यांना अनार्य किंवा दस्यू म्हणत; पण वेद रचणाऱ्या आर्यांचे ते शत्रु असत. व आर्यसमाज व हा मूळच्या राहिवाशांचा समाज यांचा कांहींएक संबंध नव्हता. ते एकाच ठिकाणीं रहाणारे पण परस्पर भिन्न व परस्परापासून अलग राहणारे समाज होते. आर्यलोक हिंदुस्थानांत येऊन जेते म्हणून स्थाईक झाल्यावर त्यांच्यामध्यें ब्राम्हण म्हणजे वेद जाणणारे व म्हणणारे राजन्य म्हणजे राजेलोक किंवा लढाई करणारे लोक,असे धंद्यावरून दोन विशेषवर्ग पडले व आर्य समाजांतील या दोन वर्गांनंतर बाकी राहिलेल्या वर्गास विश म्हणजे इतर सर्वलोक असें म्हणू लागले. म्हणजे एकंदर समाजाचे ब्राम्हण, राजन्य—याला पुढें क्षत्रिय शब्द वापरूं लागले व क्षत्रियच शब्द पुढें वर्ण किंवा जातिवाचक झाला—व वैश्य असे तीन वर्ग पडले. यांपैकीं दोन नांवें धंद्याचीं किंवा कामाचीं वाचक होतीं. तिसऱ्यावरून धंद

किंवा काम दर्शित होत नव्हतें. पण हे तीन वर्ग मिळून आर्यसमाज होतो असें म्हणण्यचा प्रघात पडला. पण या त्रिवर्गांत अजून एकजीवपणा होता सर्वांना वेदाध्ययनाचा अधिकार होता व म्हणूनच त्यांना द्विज म्हणत. सर्व लोकांचा एकमेकांशीं सर्वप्रकारचा व्यवहार होत असे. स्पर्शास्पर्शदोष रोटीबेटीव्यवहाराची बंदी व उच्चनीचभावना या कल्पनांचा या त्रिवर्गांत किंवा या त्रैवर्ण्यांत अजून अंतर्भाव झाला नव्हता. तीन वर्ग म्हणजे एकाच एकजीव समाजाचें एका विशेष दृष्टीनें वर्गीकरण होतें. या त्रैवर्णिक जेत्या आर्य समाजाचा व पेपल्या जित अनार्य समाजाचा कांहीं एक संबंध नव्हता, उलट या दोन समाजांमध्यें वैरभाव असून त्यांच्या वारंवार आपसात लढाया होत असाव्यात; व आर्यलोक या अनार्यांच्या रात्रींच्या छाप्याला फार भीत असत असें ऋग्वेदांतील ऋचांवरून दिसतें. पण काल करून एकाच प्रदेशांत राहणाऱ्या लोकामध्यें सतत वैरभाव राहणें शक्य नसल्यामुळें या दोन समाजांचें एकीकरण झालें असावें व तेव्हांपासून हिंदु समाजांत चातुर्वर्ण्याची कल्पना बद्धमूल झाली असावी असें वाटतें. मागें वर्णन केल्याप्रमाणें आर्य समाजांत त्रिवर्ग रूपी वर्गीकरण प्रचलित झालें होतें. अनार्यांचा समावेश समाजाचा आणखी एक वर्ग वाढवून करण्यांत आला. पण तो समावेश असमतेच्या पायावर करण्यांत आला. हे अनार्य आर्यांपासून रंगानें निराळे होते. त्यांची संस्कृति आर्यांपेक्षां निरळ्या दर्जाची होती. प्रत्येक जेत्या राष्ट्राप्रमाणें आर्यांना आपली संस्कृती उत्तम असें वाटे. थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे आर्य लोकांनीं अनार्यांना आपल्या समाजांत गुलाम किंवा हलकीं कामें करणारे मजूर या नात्यानें घेतलें. पण त्यांच्याशी रोटीव्यवहार किंवा बेटीव्यवहार सररहा सुरू केला नाहीं. ब्राह्मण क्षत्रिय हे दोन शब्द धंद्याचे वाचक होते. विश् किंवा वैश्य हा अवशिष्ट वाचक शब्द होता. म्हणजे इतर सर्व इतकाच त्याचा अर्थ होता. पण अनार्य लोकांचा सेवक किंवा गुलाम या नात्यानें समावेश झाल्यामुळें वैश्य शब्दालाहि शेती व वाणिज्य करणारे असा धंदेवाचक अर्थ आला व ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे समाजाचे चार वर्ग काल्पण्यांत आले व हें समाजांतील कामांचे किंवा धंद्याचे सार्वत्रिक व सनातन असें एक वर्गीकरण आहे अशी समजूत दृढ होत चालली.

वर थोडक्यांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें आर्य समाजाची घटना बनत होती; त्यावर शिक्कामोर्तब ऋग्वेदांतील पुरुषसूक्त या सूक्तानें केलें.† हें सूक्त

---

† पुरुषसूक्ताचें विवेचन यापुढें आहे. म्हणून येथें त्या सूक्ताचें साग्र व अक्षरशः भाषांतर दिलें आहे.

हजार डोक्यांचा, हजार डोळ्यांचा, हजार पायांचा तो पुरुष सर्व बाजूंनीं भूमी व्यापून दहा अंगुळें उरला. पूर्वीं झालेलें व पुढें होणारें सर्व ( जग ) पुरुषच आहे. आणखी हा अमृतत्वाचा स्वामी आहे. कारण तो अन्नानें वाढतो. इतका याचा महिमा आहे. ( पण ) पुरुष त्यापेक्षाही मोठा आहे. सर्व वस्तु याचा चवथा हिस्सा आहेत. याचे बाकी तीन हिस्से अविनाशी असून आकाशांत आहेत, तो पुरुष तीन हिशांनीं वर गेला. याचा चवथा हिस्सा पुन्हः येथें उत्पन्न झाला. नतर सचेतन व अचेतन या रूपांनीं विविध होऊन सर्व व्यापिता झाला. त्यापासून विराट् पुरुष उत्पन्न झाला. त्या विराट्पुरुषापेक्षां पुरुष अधिक आहे. तो झाल्यावर पुरुष अतिरिक्त झाला. नतर जमीन निर्माण झाली व नंतर शहरें झालीं.

ज्या पुरुषरूपी हवीनें देवांनीं यज्ञ केला; त्यावेळीं त्यांचें वसंत ऋतु तूप होतें; त्याचें ग्रीष्मऋतु जळण होतें. शरद्ऋतु हवि होता. त्या आधीं झालेल्या पुरुषावर यज्ञाकरितां दर्भांनीं पाणी शिंपडलें व त्यायोगें देव साध्य व ऋषि यांनीं यज्ञ पूर्ण केला. ज्यामध्यें सर्व पुरुष जळलेला आहे अशा यज्ञापासून दहीं मिसळलेलें तूप मिळालें. हवेंत चालणारे, अरण्यांत राहणारे व माणसाळलेले प्राणी झाले; सर्वजाळी त्या यज्ञापासून ऋग्वेद, सामवेद उत्पन्न झाले; त्यापासून छंदःशास्त्र झालें; त्यापासून यजुर्वेद झाला. त्यापासून घोडे झाले; तसेच दोन दंत असलेले झाले; त्यापासून गाई झाल्या; त्यापासून शेळया व पक्षी झाले.

जेव्हां पुरुष उत्पन्न झाला तेव्हां किती प्रकारानीं झाला ? त्याचें मुख कोणतें ? बाहू कोणचे ? उरू कोणचे ? पाय कोणचे म्हणतात ? ब्राह्मण याचे मुख आहे; राजन्य याचे बाहू केलेले आहेत, त्याचे जे उरू ते वैश्य होत; पायापासून शूद्र झालेले आहेत.

मनापासून चंद्र झाला; डोळ्यांपासून सूर्य झाला; मुखापासून इंद्र

ऋग्वेदांतील दहाव्या मंडलांतील आहे. त्यांत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व छंदःशास्त्र यांचा उल्लेख आहे. यांत सृष्टीच्या उत्पत्तीच्या आदिपुरुषाची तात्त्विक कल्पना आहे. यांत देवदेवापासून सूर्य, चंद्र, पृथ्वी वगैरे उत्पन्न झालीं आहेत, असें काव्यमय वर्णन आहे. सारांश हें सूक्त पुष्कळ अर्वाचीन (अर्थात् इतर ऋग्वेदांतील ऋचांच्या मानानें) आहे असें स्पष्टपणें दिसतें.

या सूक्तांत या चातुर्वर्ण्याचा प्रथमतःच उल्लेख येतो. या सर्व सूक्ताची काव्यमय अलंकारिक अशी भाषा आहे. त्यावेळच्या समाजांत जे चार वर्ग किंवा वर्ण झाले होते—जें वर्गीकरण निव्वळ धंद्यांचें द्योतक होतें—त्याचें समर्थन करण्याकरितां या सूक्ताच्या कवीनें या सूक्ताच्या प्रारंभींच आलेल्या विराट् पुरुषाच्या आध्यात्मिक कल्पनेवरून सहज सुचणारी विराट शरीराची उपमा घेऊन या चातुर्वर्ण्याचें वर्णन किंवा समर्थन करण्याचा प्रयत्न केला. पण या उपमेसारखी घातक उपमा कोणत्याही कवीनें आजपर्यंत केव्हांहि उपयोगांत आणली नसेल. कारण या उपमेच्या योगानें समाजांतील धंद्यांचा परस्पर निकट संबंध दाखविला जातो खरा मूळ कवीचा ही उपमा उपयोगांत आणतांना दुहेरी उद्देशही असण्याचा संभव आहे--पण त्या उपमेपासून दुसराही ध्वनी निघतो, व तो ध्वनी फार घातक झाला यांत शंका नाहीं. विराट शरीराचें मुख म्हणजे ब्राह्मण होत; या शरीराचें बाहू म्हणजे राजन्य किंवा क्षत्रिय होत; त्या शरीराचे ऊरू म्हणजे वैश्य होत; व या पुरुषाच्या पायापासून शूद्र झाले. इतकाच

---

व अग्नि झाले; प्राणापासून वायु झाला; नाभीपासून आकाश झालें, डोक्यापासून स्वर्ग झाला; पायापासून भूमी झाली; कानापासून दिशा झाल्या; याप्रमाणें सर्व केलें गेलें.

याच्या सात परिधि आहेत. याच्या एकवीस समिधा केल्या; जेव्हां देवांनीं यज्ञ केला तेव्हां त्यांनीं पुरुषाला पशु म्हणून बांधला. देवांनीं यज्ञाच्यायोगें यज्ञपुरुषाची आराधना केली; ते धर्म पूर्वकाळीं होते. ज्या ठिकाणीं पूर्वीचे साध्य व देव राहतात त्या स्वर्ग लोकाला ते महात्मे जातात.

या सूक्ताचा साधा अर्थ आहे. यांत पहिल्या तीन वर्णांना विराट शरीराच्या निरनिराळ्या अवयवांची उपमा दिली आहे; तर शूद्रांना पाय न म्हणतांना पायांपासून झालेले असें म्हटलें आहे. म्हणजे पहिले तीन वर्ण हे मुळच्या आर्य लोकांचेच असून शूद्र वर्ग मात्र समाजांत बाहेरून आलेला वर्ग असे सूक्तांत ध्वनित केलेलें आहे. त्या वेळीं तशी वस्तुस्थिति होती. या शूद्रांचें काम सेवा करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. हें काम स्वाभाविकपणेंच आर्यांना तुच्छ व कमी दर्जाचें वाटे. म्हणून शूद्रांना समाजांत घेतल्यावरसुद्धां त्यांनीं त्यांना वेदाध्ययनाचा अधिकार दिला नाहीं. तेव्हां आधींच शूद्राबद्दल तुच्छताबुद्धि, त्यांच्याशीं व्यवहाराची बंदी; त्यांतच ही विराट शरीराची कल्पना समाजांत या सूक्तानें प्रचलित केली. या सूक्तांतील उपमेचा घातकपणा कसा तो आतां ध्यानांत येईल. शरीरांतील मुख हें शरीराच्या ठेवणींत उंचावर असतें, व पाय हे त्या ठेवणींत अगदीं खालीं असतात. उंचसखल या दिग्विषयक कल्पना व उच्चनीच या नैतिक कल्पना एकमेकांशीं अत्यंत संलग्न आहेत. यामुळ एकीवरून दुसरी सहज सुचते. म्हणून या चातुर्वर्ण्याच्या कल्पनेंत उच्चनीचत्वाच्या भावनेचा अन्तर्भाव होऊं लागला. मुखाच्या ठिकाणीं ते उच्च, पायाच्या ठिकाणीं ते नीच. उपमेच्या या ध्वनीवरूनच मी तिला अत्यंत घातक अशी कल्पना म्हटलें आहे. समाजात सामाजिक व औद्योगिक कारणांनीं जें ढोबळ वर्गीकरण प्रचलित झालें होतें त्याचें समर्थन या पुरुषसूक्तकारानें करण्याचा प्रयत्न केला शरीर व त्याचे अवयव ही उपमा त्याला अन्वर्थक वाटून त्यानें त्याप्रमाणें या वर्गांचा सर्व समाजाशीं शरीर व अवयव असा संबंध आहे असें ध्वनित केलें म्हणजे समाजस्वास्थ्यास या चारी वर्णांची सारखीच अवश्यकता आहे, व ते समाजाचे सारखेच आधार आहेत असें दाखविण्याचा प्रयत्न केला; पण तें करतांना उपमेच्या दिग्विषयक स्वरूपामुळें उच्चनीचपणाची कल्पना त्या वर्गांत नकळत घुसली, व तीच आमच्या समाजाच्या हाडींमासीं खिळून गेली. चार वर्ग हे समाजाचीं आवश्यक अंगें आहेत हें दुसऱ्या उपमेनें दाखविलें गेलें असतें तर अशी उच्चनीचपणाची भावना ध्वनित झाली नसती. समाजरूपी इमारतीचे चार वर्ग आधारस्तंभ किंवा खांब आहेत

असें म्हटलें असतें तर 'अवश्यकता' अर्थ मनांत आला असता पण उच्चनीचपणाची कल्पना ध्वनित झाली नसती. संस्कृत वाङ्मयांत उल्लेखिलेल्या चतुरंगसेना या कल्पनेमध्येंही 'आवश्यक अंग' येवढाच अर्थ ध्वनित होतो; 'कमीपणा' हा अर्थ ध्वनित होत नाहीं. म्हणून चातुर्वर्ण्यव्यवस्थेऐवजीं चतुरंगव्यवस्था असा शब्दप्रयोग प्रचलित झाला असता तरीहि बरें झालें असतें.

काल्पनिक उदाहरणांनीं हें म्हणणें शाबीत करण्याऐवजीं युरोपांतील एका कल्पनेच्या आधारानेंही हें सिद्ध करतां येईल. चातुर्वर्ण्याची कल्पना जशी आपल्या समाजाच्या मूळाशीं आहे व ती संस्था अत्यंत उपयुक्त व आवश्यक आहे असा समज आहे त्याप्रमाणें राजकीय बाबतींत फार प्रगति झालेल्या इंग्लंडमध्यें किंवा युरोपमध्यें 'राज्याच्या आवश्यक संपत्ति' (Four Estates of the Realm) म्हणून एक चतुरंग समाजाचें वर्गीकरण आहे. तीं चार अंगें म्हणजे राजा, सरदारसभा, लोकसभा व छापखाना किंवा सर्व तऱ्हेचीं वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें—विचार प्रदर्शित करण्याचीं साधनें होत. राज्याच्या स्वास्थ्यास व प्रगतीस हीं सर्व अंगें अवश्यक आहेत. पण येथें उच्चनीचत्वाचा ध्वनि उद्भूत होत नाहीं व 'आवश्यकता' हा ध्वनि योग्य तऱ्हेनें सांगितला जातो. असो—

आर्यलोकांच्या चातुर्वर्ण्याच्या उगमाचें सिंहावलोकन करतांना अनुषंगानें पण नकळत त्यांतील एका दोषाचेंही थोडेसें आविष्करण होऊन गेलें. आतां त्या कल्पनेच्या वाढीकडे व सद्यःस्थितीकडे लक्ष देऊं. आर्यसमाजांत ही चातुर्वर्ण्याची कल्पना फार जुन्या काळापासून चालत आली आहे हें वरील विवेचनावरून दिसून आलेंच असेल प्रथमतः या व्यवस्थेला धंद्याचेंच स्वरूप होतें व त्यांत बराच लवचिकपणा असावा असें वाटतें. म्हणजे खालच्या वर्गांतून वरच्या वर्गांत मनुष्य जाऊं शके. उदाहरणार्थ, विश्वामित्र ऋषि घ्या. हा क्षत्रियाचा ब्राह्मण झालेला होता. पण कालेंकरून या वर्णव्यवस्थेला जातिभेदाचें रूप येत चाललें व समाजांतील दर्जा मनुष्याच्या जन्मावर ठरविण्यांत आला. व स्वतःची जात शुद्ध ठेवण्याकरितां रोटीबेटीव्यवहारादि निर्बंध आले व हिंदुसमाजाचें हल्लींचें स्वरूप—ज्यामध्यें हजारों जाति व पोटजाति आहेत—आलें. या स्वरूपाचें

वर्णन येथें करण्याचें प्रयोजन नाहीं. कारण तें आपल्या पूर्ण परिचयाचें आहे. आतां कार्लाईलच्या तत्वानुरूप या संस्थेचें परीक्षण करूं.

जातिभेदाचें बहिरंग म्हणजे जाति ओळखण्याच्या खुणा होत. या चार आहेत. हल्लीं हिंदुसमाजांतील कांहीं जाति अगदीं सावलीबाह्य आहेत. म्हणजे इतर जातींना त्यांची सावलीसुद्धां खपत नाहीं. कांहीं जाति अस्पृश्य आहेत. म्हणजे इतर जातीचे लोक त्या जातीच्या माणसास स्पर्श करणार नाहींत किंवा त्याला आपल्या घरांत येऊं देणार नाहींत. याच दोन जातींना हल्लीं शूद्र व अतिशूद्र म्हणतात. या समाजांतील अत्यंत नीच जाती समजल्या जातात. त्यांच्यामध्यें आपआपसांत पुष्कळ कडक निर्बंध आहेत. बाकीच्या सर्व जाती स्पृश्य व सावलीदोषवर्जित आहेत. पण एक जात दुसऱ्या जातीबरोबर रोटीव्यवहार करणार नाहीं. शेवटीं एक जात दुसऱ्या जातीजवळ बेटीव्यवहार करणार नाहीं. वर निर्दिष्ट केलेले चारी प्रकार ज्या समाजाच्या घटकामध्यें चालतात ती अगदीं एकरूप जात अशा एकरूप जाति केव्हां केव्हां शेंकड्यांनीं मोजण्याइतक्याच कुटुंबांच्या बनलेल्या असतात. केव्हां केव्हां त्यांचा समुदाय लाखांनीं मोजण्यासारखा असतो.

चातुर्वर्ण्याच्या अंतरंगाचें स्वरूप म्हणजे समाजांतील वर्गीकरण; डोक्याचें काम(ब्राह्मण वर्गाचें हे विशिष्ट काम असें हल्लीं त्याचें वर्णन करतात पण पुरुष-सूक्ताप्रमाण ही कल्पना रास्त नाहीं; कारण पुरुषसूक्तांत ब्राह्मणाला शीर म्हटलें नाहीं; फक्त मुख म्हटलें आहे). बाहुबलाचें काम, ऊरूचें म्हणजे उद्योगधंद्याचें ( त्या वेळचे शेतकी व व्यापार ) व पायाचें काम–सेवाधर्म ( हलक्या दर्जाची नोकरी चाकरी ). हें वर्गीकरण अगदीं ढोबळ व समाजाच्या बाल्यावस्थेंतील आहे हें उघड नाहीं काय ? जसजसा समाज सुधारत जातो, जसें जसें समाजांत ज्ञान वाढतें, जसजसें समाजाला परिणत स्वरूप येतें तसतसें समाजामध्यें वैचित्र्य उत्पन्न होतें. दोनचार धंद्यांच्या ऐवजीं हजारों धंदे होतात. सर्व धंद्यांना ज्ञानाची व डोक्याची जरूरी लागते. निरनिराळ्या समाजांच्या चढाओढींत व राज्यतृष्णेमध्यें समा-जाचें संरक्षण करण्याची जास्त आवश्यकता उत्पन्न होतें. सर्वांना लष्करी

शिक्षण पाहिजे अशी परिस्थिति येते. सारांश, समाजाच्या एका स्थितींत ठोकळ मानानें खरें असलेलें वर्गीकरण समाजाच्या परिणत स्थितींत लागू पडत नाहीं.

कोणच्याही समाजव्यवस्थेचें रहस्य हें कीं, समाजाच्या स्थैर्याकरितां व प्रगतीकरितां लागणारीं कामें व्यवस्थेनें व योग्य तऱ्हेनें व्हावीं व त्याकरितां ज्या समाजाच्या व्यक्तीमध्यें जें काम करण्याची शक्ति आहे तें काम त्याच्याकडून व्हावें. हीच गोष्ट श्रमविभागाच्या तत्वानें घडते. हल्लींच्या काळीं आमच्या जातिभेदाचें याच तत्त्वावर समर्थन करण्यांत येतें. पण आमचा जातिभेद जन्मावर अवलंबून आहे व त्याच्याच समर्थनार्थ भगवद्गीतेमध्यें 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' असा सिद्धांत केलेला आहे. याचा पुष्कळ अर्वाचीन विद्वान् असा अर्थ करितात कीं, समाजांतील वर्ण हे गुणावरून ( मनुष्याचा स्वभाव ) व कर्मावरून ( त्याची वागणूक ) केलेले आहेत. यामध्यें व युरोपांतील बडे-लोक, मध्यमस्थितींतील लोक, व एकंदर मजूरवर्ग—हा वर्गभेद यामध्यें मुळींच फरक नाहीं. पण गीतेंतील हा श्लोक व गीतेंत आलेल्या गुण व कर्म यांच्या व्याख्या पाहिल्या म्हणजे त्या श्लोकावरून अर्वाचीन तऱ्हेचा अर्थ निघत नाहीं. तर गुण म्हणजे सत्व, रज, तम, हीं सर्वव्यापी तत्वें, व कर्म म्हणजे पूर्वसंचित असा अर्थ गीतेत अभिप्रेत आहे. व चातुर्वर्ण्य गुणकर्मावरून केलं आहे याचा अर्थ जन्मतः कांहीं एक पूर्वसंचित घेऊन मनुष्य जन्माला येतो, व जन्मतः त्याच्यामध्यें सत्व, रज किंवा तम या तत्त्वांचें कमीअधिक प्रमाण असतें; व म्हणूनच ज्या जातींत मनुष्य जन्मतें त्याच जातीचें काम त्यानें करणें रास्त आहे; व जन्मावरून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या जाती केल्या आहेत; असा गीतेचा अर्थ आहे. ज्याप्रमाणें आरिस्टॉटल या ग्रीक तत्त्ववेत्त्यानें म्हटलें आहे कीं, ग्रीकलोक हे जन्मतः अधिकार गाजविण्यास लायक आहेत; बाकीचे सर्वलोक रानटी व म्हणून गुलाम व्हावयास योग्य आहेत. त्याप्रमाणेंच गीतेचा अभिप्राय आहे.

जातीभेदाच्या संस्थेसंबंधीं जो वादग्रस्त प्रश्न—समाजाचीं कामें योग्य तऱ्हेनें झालीं पाहिजेत किंवा नाहीं—हा नव्हे; तर तीं

कामें जन्मावरून वांटलीं जावीं कीं काय? अनुभव असा आहे कीं, समाजाला लागणारीं कामें करण्याची कर्तबगारी उपजतबुद्धि व परिस्थिति यांवर अवलंबून असते. दोन माणसें सारख्याच अनुकूल परिस्थितींत असतांना उपजतबुद्धिभेदामुळें त्यांच्या कर्तबगारींत फरक पडेल; किंवा उलट उपजतबुद्धि सारखी असून परिस्थितिभेदामुळेंहि कर्तबगारींत भेद पडेल. आतां जन्मजात जातिभेदानें मनुष्याच्या कर्तबगारीच्या विकासास अवसर मिळत नाहीं. कारण जातिनिर्बंधांनीं उपजतबुद्धि असून अनुकूल परिस्थिती सांपडत नाहीं. किंवा जन्मतः अनुकूल परिस्थिती असून उपजतबुद्धीच्या अभावीं कर्तबगारीचा विकास होत नाहीं; पण जन्मामुळें मनुष्याला वरचा दर्जा मिळतो. व तें वरच्या दर्जाचें काम त्या माणसाकडून चांगलें होत नाहीं. या कारणामुळें साध्या परिस्थितींत व समाजाच्या बाल्यावस्थेंत जी समाजरचना सोईची वाटली ती समाजरचना हल्लींच्या काळीं फाटलेल्या कपड्याप्रमाणें निरुपयोगी ठरत आहे.

ज्याप्रमाणें अल्पविधीच्या बाबतींत विधिला साधें व अन्वर्थक स्वरूप आणणें जरूर आहे असें दाखविलें, त्याचप्रमाणें या जातिभेदसंस्थेची स्थिति आहे. ही संस्था समाजाच्या विकासास प्रतिरोध करणारी असल्यामुळें ती टाकाऊ आहे असें हल्लीं लोकांस भासूं लागलें आहे. जन्मजात जातिभेद टाकावयाचा म्हणजे अर्थात् जातिभेदाच्या ज्या चार बाह्य खुणा आहेत त्या टाकल्या पाहिजेत. म्हणजे सोवळीचा दोष, स्पर्शास्पर्श दोष, रोटीव्यवहाराची बंदी व बेटीव्यवहाराची बंदी हीं बाह्य चिन्हें नाहींशीं झालीं पाहिजेत. समाजाचें वर्गीकरण प्रत्यक्ष दृष्टीस पडणाऱ्या कर्तबगारीवर अवलंबून ठेवलें पाहिजे. अर्थात् समाजांतील व्यक्तींना पूर्ण चढाओढीची मुभा पाहिजे व व्यक्तींच्या उपजतबुद्धिविकासास अवसर मिळण्याकरितां सार्वत्रिक शिक्षण पाहिजे. सार्वत्रिक शिक्षण झाल्यावर आपआपल्या बुद्धीप्रमाणें मनुष्यांत कर्तबगारी येईल. त्या कर्तबगारीचा समाजानें उपयोग करून घेतला पाहिजे.

सारांश, कार्लाईलच्या तत्त्वानुरूप ही संस्था आतां फाटक्यातुटक्या कपड्याप्रमाणें झाली आहे. ती संस्था टाकून युरोपांतील लवचिक एकजीव समता व समानावसर या पायावर उभारलेली

वर्णव्यवस्था हिंदुसमाजांत आली पाहिजे. पण ही जातिभेदाची कल्पना हिंदुसमाजांत इतकी मुरली आहे कीं, ती आतां समाजाच्या शरीराला कातडीप्रमाणें चिकटून बसली आहे व म्हणून ही संस्था काढून टाकतांना समाजास इतके क्लेश व दुःख होत आहे. परंतु केव्हां केव्हां शरीराच्या स्वास्थ्यास शस्त्रक्रिया अवश्यक असते तशीच येथेंही स्थिति आहे. जातिभेद नाहींसा करणें शस्त्रक्रियेप्रमाणें अवघड असलें तरी तें करणें अवश्यक आहे. व हल्लीं क्लेश कमी करण्याकरितां शस्त्रक्रियेंत जसा क्लोरोफॉर्मचा उपयोग करतात तसा या सामाजिक शस्त्रक्रियेंतहि सहानुभूति, सलोखा, सहकार्य, कायद्याचा आधार वगैरे क्लेशपरिहारक गोष्टींचा समाजाग्रणींनीं अवलंब केला पाहिजे.

१२

# उपसंहार.

---:o:---

प्रथम संकल्प केल्याप्रमाणें येथें कार्लाईलच्या ' विचारकंथेचें ' विवेचन व त्यावरून हिंदुसमाजानें घ्यावयाचा धडा याचें निवेदन संपलें. एका दृष्टीनें कार्लाईलच्या विचारकंथा ग्रंथाचें रहस्य हिंदुमनास सहज कळण्यासारखें आहे. कारण त्याचें तत्त्वज्ञान आध्यात्मिक आहे. हें तत्त्वज्ञान कार्लाईलला जर्मन तत्त्वज्ञाकडून कळलें व त्याच्या मनाला तें पटलें. म्हणून त्यानें आपल्या देशबांधवांना तें विचारकंथेच्या रूपानें शिकविण्याचा प्रयत्न केला. हें जग जड द्रव्यांनींच बनलेलें नाहीं, या जगाचें मूळ कारण कांहीं तरी चित्स्वरूप आध्यात्मिक तत्त्व आहे; सर्व जग व मानवी प्राणी हे त्याच चित्स्वरूपी परब्रह्माचीं दृश्य पण विनाशीं रूपें आहेत व म्हणून मनुष्यानें बाह्य किंवा दृश्य सुखदुःखादि गोष्टींकडे न पाहतां मनुष्याच्या चिन्मय विकासाकडे जास्त लक्ष दिलें पाहिजे; व मनुष्यांनीं परब्रह्मस्वरूपी बनण्याचें ध्येय आपल्यापुढें ठेवलें पाहिजे.

आतां हें तत्त्वज्ञान आपल्या अद्वैत तत्त्वज्ञानासारखें नाहीं असें कोण म्हणेल ? मात्र आपल्या तत्त्वज्ञानानें जगाच्या किंवा मानवी आयुष्याच्या विनाशी व म्हणून मायामय किंवा भासमय स्वरूपावर जास्त जोर देऊन परब्रह्मस्वरूपाला मिळण्याचें साधन म्हणजे संसार किंवा जग किंवा समाज सोडून देऊन रानावनांत जाऊन निवृत्तिमार्गानें परब्रह्माचें ध्यान करून समाधीच्यायोगें परमात्म्याशीं तादात्म्य करून घ्यावें असा उपदेश केला; तर युरोपच्या पूर्वीच्या एकंदर प्रगतीनुरूप कार्लाईलनें परमेश्वरप्राप्तीचें साधन म्हणजे निवृत्ति नव्हे; तर जोराची प्रवृत्ति; या जगांतच या संसारांत राहून येथलीं आपलीं कर्तव्यकर्मे व समाजाचीं कामें सुखदुःखाकडे न बघतां मोठ्या हौसेनें व मरेपर्यंत मोठ्या चिकाटीनें पार पाडणें हेंच ध्येय आपल्या देशबांधवांपुढें ठेवलें. व अर्वाचीन हिंदुसमाजालाही हें प्रवृत्ती-

चेंच ध्येय पाहिजे आहे अशी जाणीव उत्पन्न झाल्यामुळेंच आपल्या जुन्या तत्त्वज्ञानाचा प्रवृत्तीपर अर्थ लावण्याचा मोठ्या प्रमाणावर अलीकडच्या काळांत प्रयत्न करण्यांत आला आहे. हा कार्लाईलच्या तत्त्वाचाच जय आहे- यांत शंका नाहीं. तरी कार्लाईलनें आपल्या ग्रंथांत प्रतिपादन केलेलें प्रवृत्तीचें तत्व—जुन्या तत्त्वाच्या पुनरुज्जीवनद्वारा कां होईना--आमच्या भावी पिढीच्या मनांत ठसो अशी इच्छा प्रदर्शित करून कार्लाईलच्या विचारकंथेची रजा घेतों.

REFBK-0001754

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १५५
(stamp)